# ईश्वरोपासना

अथवा

# समाजसेवा.

हा निबंध

सौ. कृष्णाबाई आपटे

यांनीं

या

आर्यभूमीवरील समाजसेवें

प्रीत्यर्थ

मु. सांगली येथें

लिहिला व प्रसिद्ध केला.

तो

कर्नाटक प्रिंटिंग वर्क्स धारवाड, छापखान्यांत

रा. रा. माधव कृष्ण जोशी. यांनीं छापिला.

# ईश्वरोपासना

अथवा

# समाजसेवा.

हा निबंध

सौ. कृष्णाबाई आपटे

यांनीं

या

आर्यभूमीवरील समाजसेवें

प्रीत्यर्थ

मु. सांगलीं येथें

लिहिला व प्रसिद्ध केला.

तो

कर्नाटक प्रिंटिंग वर्क्स धारवाड, छापखान्यांत

रा. रा. माधव कृष्ण जोशी. यांनीं छापिला

१९२२.

किंमत १ रुपया.

हें पुस्तक

श्रीमत् परमपूज्य तीर्थरूप

व

श्रीसद्गुरुवर्य वेंकटेश रामचंद्र

उर्फ

**बाबासाहेब मुजूमदार पाटणकर,**

**सांगली**

यांचे चरणीं

ग्रंथकर्त्रीनें

अत्यंत पितृभक्तिपुरःसर लीन होऊन

सादर अर्पण केलें आहे.

सौ. कृष्णाबाई आपटे.

# ईश्वरोपासना अथवा समाजसेवा.

## शुद्धिपत्रक.

| पान. | कलम. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|
| | | | **अनुक्रमाणिका.** | |
| १ | ,, | ५ | संसाराची | समाजाची |
| ,, | ,, | २१ | सात्यासत्याचा | सत्यासत्याचा |
| २ | ,, | ११ | तपाचा प्रभात | तपाचा प्रभाव |
| ३ | ,, | ४ | गुरुशिष्पांचें | गुरुशिष्यांचें |
| | | | **प्रस्तावना.** | |
| १ | ,, | २७ | पाहत | पोहत |
| २ | ,, | २२ | आज्ञानानें | अज्ञानानें |
| | | | **ग्रंथ.** | |
| १ | ,, | ९ | स्थेर्य | स्थैर्य |
| ३ | ४ | १ | संसाराची | समाजाची |
| ५ | ६ | १२ | रःखूनच | राखूनच ती |
| ८ | १० | २१ | राहाल | राहील |
| १८ | २१ | ७ | त्याचा | त्याची |
| ,, | २२ | ३ | व जी | व जे |
| १९ | ,, | ५ | आपाआप | आपोआप |
| ,, | २४ | ३ | तयाग प्रीत्यर्थ | तयारी प्रीत्यर्थ |
| २० | ,, | १६ | देशाभिमानानें | देहाभिमानानें |
| २१ | ,, | १३ | निराभासा | निराभासो |
| २३ | २८ | १ | आतां | २८. आतां |
| २३ | २८ | १९ | ता सर्वव्यापी | ती सर्वव्यापी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ,, | ,, | २० | शेवटा | शेवटीं |
| २९ | ,, | २६ | सर्वानुभूतीं | सर्वाभूतीं |
| ३० | ३२ | ३ | प्रजातीनीं | प्रजापतिनीं |
| ,, | ,, | ८ | पुल | पुनः |
| ३१ | ३३ | १० | बुद्धी | बुद्धीस |
| ,, | ,, | २१ | नानी | नाहीं |
| ,, | ,, | २२ | विचारासे | विचारानें |
| ३२ | ३४ | २ | उत्तठा | उत्कंठा |
| ४० | ४५ | ५ | नसली | असली |
| ,, | ,, | ८ | सतीने | मतीनें |
| ४२ | ५० | १० | दुवृत्तीला | दुर्वृत्तीला |
| ६५ | ७१ | १४ | मन | मनू |
| ७६ | ७९ | २२ | रामतानीय | रामतापनीय |
| ७८ | ८० | १ | रुचिही | रुचिर्हि |
| १०० | ११२ | ६ | गृहात | गृहित |
| ११२ | ११७ | १० | तित्व | तिचे |
| ११४ | ११८ | ३ | भास्मि | भक्ति |

राम विजय प्रेस, रामदुर्ग.

# अनुक्रमणिका.

प्रस्तावना पान १–४

१–३ प्रास्ताविक विचार–निबंधाचा उद्देश. पान १–२

## प्रकरण १ लें.

### समाजाची सद्यःस्थिति.

४ संसाराची प्रस्तुतची स्थिति; धर्म व आचार यांची अवनतावस्था. ५ या सद्यःस्थितीचें तात्विक कारण. ६. धर्माचार्यांचा अवतार. ७–१२. धर्ममार्गाची उपेक्षा. १३–१५ संसाराची परमार्थास मदत अतएव त्याची जोपासना. पान ३–१३

## प्रकरण २ रें.

### ईश्वराविषयीं कल्पना.

१६–१७ ईश्वर म्हणजे काय? १८ देवाबद्दल शोध. १९ नाशवंत सृष्टी देव नव्हे. २० अनादि व अव्यक्त वस्तूच देव. पान १४–१७

## प्रकरण ३ रें.

### सृष्टिरचनेंतील ईश्वरीयोजनेंत देव पहाण्याची साधनें.

२१ सृष्टींत प्रभुचें सच्चिदानंदत्व. २२ जडचैतन्य विचार. २३ नरतनूच मोक्षमार्गाची पायरी. २४–२७ नित्यानित्य विवेक व स्वातंत्र्य हींच भक्तीच्या बरोबरीची मोक्षप्राप्तीची साधनें. पान १८–२२

## प्रकरण ४ थें.

### ईश्वराचे स्वरूप.

२८ तें भगवद्रूप जग हेंचि. २९ सत्यज्ञानमनंतम्. ३०–३१ चक्षुर्वैसत्यं याचा फोलपणा. ३२ ब्रह्मस्वरूपाचे ज्ञानार्थ इंद्र व विरोचन यांची तपश्चर्या ३३–३४ सत्यासत्याचा विचार. पान २३–३२

## प्रकरण ५ वें.

### प्रभूच्या सत्यस्वरूपाची व अनंतत्वाची प्रतीति, तत्प्रीत्यर्थ ईश्वरोपासना व तिची साधनें

३५ उपासनेंस योग्य स्थळ, आसन व मनाची एकाग्रता. ३६ ईश्वरोपासना. ३७ उपासनेची अवश्य साधनें. ३८ वैराग्य. ३९–४० मुमुक्षा. ४१ शम. ४२–४३ दम. ४४ निवृत्ति. ४५ तितिक्षा. ४६ श्रद्धा. ४७ यम. ४८ अहिंसा. ४९ सत्य. ५० अस्तेय. ५१ ब्रह्मचर्य. ५२ अपरिग्रह. ५३ नियमपंचक. ५४ शौच. ५५ संतोष. ५६–५९ तप व त्याचे प्रकार. ६०–६१ शास्त्रीयदृष्ट्या तपाचें विवेचन. ६२ तपाचे प्रकार. ६३–६४ सात्विकतप. ६५–६६ राजसतप. ६७ तामसतप. ६८ या तपाचे पोटभेद. ६९ शारीरतप. ७० वाङ्मयतप. ७१ मानसतप. ७२ तपाचा प्रभात. ७३ स्वाध्याय. ७४ ईश्वर प्रणिधान. पान ३३–७०

## प्रकरण ६ वें.

### सगुण उपासना.

७५–७६ अव्यक्तांतील सगुणोपासना. ७७ प्राकृत साधकांस अव्यक्त उपासना दुःसाध्य. ७८ ती दुःसाध्य असण्याची कारणें. ७९ सगुण, साकार देवाची उपासना. ८०–८२ साकार देवाविषयीं भिन्न भिन्न कल्पना. ८३ उपासनेस भक्तीची अवश्यकता. ८४–८६ भक्तांचे वर्ग. ८७–८९ आर्त भक्ति. ९० अर्थार्थी भक्त. ९१–९२ जिज्ञासु भक्ति. ९३–९५ मूर्तिपूजा. ९६ नवविधाभक्ति. ९७–९९ श्रवण भक्ति १०० श्रवण भक्तीविषयीं श्रीसमर्थांचे विचार. १०१ प्रभूच्या षड्गुणैश्वर्याचें ज्ञान सर्व धर्मास मूलाधार आहे. १०२–१०५ या ज्ञानार्जनास भरपूर साधन संप्राप्त. १०६ कीर्तनभक्ति. १०७–१०९ नामसंकीर्तनापूर्वी गुणसंकीर्तन विशेष महत्वाचे. ११० स्मरण भक्ति. १११ पादसेवन. ११२ अर्चन. ११३ वंदन. ११४ दास्य. ११५ सख्य. ११६–११८ आत्मनिवेदन. ११९ ज्ञानीभक्त. पान ७१–११७

## प्रकरण ७ वें.

१२० ईश्वरोपासनेंत समाजसेवा. १२१ अचेतन मूर्तीत प्रभूचें आवाहनापेक्षां उपासनेस सचेतन सगुणमूर्ती अधिक चांगली. १२२–१२४ सर्वसचेतनांत प्रभु आहे.

१२५ समाजसेवा. १२६ मातृदेवोभव. १२७ पितृदेवोभव. १२८ अपत्यांची शुश्रुषा हें मातापितरांचें कर्तव्य. १२९-१३० विद्याज्ञानाची अवश्यकता. १३१ आचार्य. देवोभव. १३२ व्यावहारिक विद्यागुरु व मोक्ष विद्यासद्गुरु. १३३ शिष्यलक्षणें. १३४ सद्गुरुलक्षणें. १३५ गुरुशिष्यांचें अन्योन्य संबंध. १३६ पतिपत्नींत अन्योन्य आदर. १३७ अतिथिदेवोभव. १३८ अतिथिम्हणजेकाय? १३९ क्षीणवृत्ति अतिथि. १४०-१४१ वेदार्थाच्या ज्ञानाची मनुष्यमात्रास अवश्यकता. १४२ व्यवहारिक विद्येची सर्व जातीस अवश्यकता. १४३-१४४ वेदार्थाच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष. १४५ त्या अभ्यासास अडचणि. १४६ अतिथिदेवोभव याची व्यापक व्याख्या १४७ परोपकार ही एक उपासनाच आहे. १४८ समबुद्धि. १४९ समबुद्धिच्या तपश्चर्येचे परिणाम. १५० जगत्पालकास अनन्यत्वें मागणें. पान ११८-१४७

## प्रकरण ८ वें.

उपसंहार. पान १४८-१५२

# प्रस्तावना.

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें
  तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें।
मना चंदनाचे परी त्वां झिजावें
  परी अंतरीं सज्जना नीववावें ॥

—श्रीसमर्थ रामदास.

या आपल्या आर्यभूमीस प्राचीन इतिहासांत असो, वा आर्वाचीन इतिहासांत असो, जगांतील अनेक देशांत जे नांवाजलेले देश, त्यांपैकीं हा एक असें मानिलें आहे. विद्या, कला, कौशल्य, व्यापार, उद्दीम, संपत्ति, वगैरेंत हा देश एका काळीं अत्यंत भरभराटींत होता. विद्येच्या बाबतींत तर, या आर्यभूमीनें अग्रस्थान पटकाविलें होतें, त्यांतही परमार्थविद्येंत तर इतर सर्व देशांस या आर्यभूमीनें फारच मागें टाकलें होतें, असा हा बुद्धिप्रभावांत शिखरास जाऊन पोहोंचलेला देश, कालचक्राच्या झपाट्यांत सांपडून हल्लीं त्यास अगदींच निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे. या कालचक्रानें कोणासही सोडिलें नाहीं. अत्यंत पूर्व पुण्याई संचयांत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस या संसारतपाशांत बद्ध झाल्यामुळें केव्हांना केव्हां तरी चक्र नेमिक्रमानें विषम काल प्राप्त होतो. जसें व्यक्तीस, तसेंच राष्ट्रासही, हें तत्व लागूं पडतें. अशाच या सृष्टीच्या निसर्ग व्यवहारांत हा आमचा आर्यदेश सांपडल्यामुळें, हल्लीं याची अवनति झाली असावी, असें दिसतें. याचीं तपशीलवार कारणें शोधित बसणें, व त्यांचा दोष कोणावर तरी लादणें, यांत व्यर्थ काल हरण करून कांहीं इच्छित कार्यास मदत होण्याचा मुळींच संभव नाहीं. म्हणून ही अवनति ज्याच्या त्याच्या शक्त्यनुसार दूर होण्याचें कार्यांत प्रयत्न व्हावेत, हें सद्यस्थितीला योग्य आहे. या महत्कार्यार्थ, या आर्यभूमीच्या सुदैवानें अनेक महात्म्यांनीं आपापला वांटा उचलून यथाशक्ती खटपट केली आहे व करीत आहेत. हें महत्त्वाचें कार्य हातीं घेण्याची प्रेरणा ईश्वरीइच्छेनेंच प्रस्तुत कालीं जनतेंत झाली आहे. अर्थात् या महत्कार्यास यश येण्याचा पर्वकालही लवकरच येईल, अशीं सुचिन्हें दिसत आहेत.

२. विश्वकर्त्याच्या आज्ञेप्रमाणें हा आमचा भूगोल या अफाट आभाळाच्या पोंकळींत आपल्या परिवारासह शांतपणें ठरीव पद्धतीनें पोहत असतां, आपला आंख-

लेला मार्ग सोडून त्यास तिळभरही आजूबाजूस जातां येत नाहीं. अशीच स्थिति त्याच भूगोलावर उत्पन्न झालेल्या मनुष्यप्राण्याची आहे काय? कीं, तो ज्या स्थितींत व जेथें उत्पन्न झाला असेल त्याच स्थितींत व तेथेंच त्यानें कांहींही धडपड न करितां आपलें आयुष्य कंठलें पाहिजे? या महत्त्वाच्या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या प्रयत्नांत असेंच सांगावें लागेल कीं, 'होय' या जीवात्म्यास देह हेंच त्याचें घर तें सोडून त्यास इतरत्र कोठें ही जातां येत नाहीं. परंतु, या एकाच गोष्टींत मात्र त्यास स्वातंत्र्य नाहीं; आणि इतर सर्व बाबतींत तो अगदीं स्वतंत्र आहे. आणि हा देहवास अडचणीचा वाटूं नये म्हणून त्यास या देहांतच अनेक सुखसाधनें देऊन ठेविलीं आहेत. मात्र असल्या उत्कृष्ट साधनांनीं त्याजकडून जीं जीं कर्में घडतील, त्यांची संपूर्ण जबाबदारी त्याजवरच ठेविली आहे या जबाबदारीनेंच मनुष्याचें क्रियमाण, संचित व प्रारब्ध हीं बनतात. आणि त्याची या मृत्युलोकांतील बरी-वाईट स्थितिही या जबाबदारीचेंच फळ आहे. यावरून आधानेंच असें ठरतें कीं, मनुष्यानें आपलें व आपल्या समाजाचें भलें करण्याचें मनांत आणल्यास व त्याप्रमाणें प्रयत्न केल्यास उत्कृष्ट फळ हें मिळालेंच पाहिजे.

३. हा समाज आपल्या आर्यत्वापासून वेगळा झाला असल्यामुळेंच त्यास अवनति प्राप्त झाली आहे. प्रभूनें आपल्यास वाईट दिवस आणिले, असा आरोप अनेक लोक प्रभूवर करीत असतात. वरील वाक्याचा अक्षरशः विचार केला तर त्या वाक्यांत सत्यताच दिसते. पण वाईट काल आपल्यावर आला, तो कां आला? त्यानें जरी आणिला, तर आपल्याकडून कांहीं गैर झाल्याशिवाय ही अवकृपा झाली नाहीं, असेंच ठरत नाहीं काय? मग असें गैर आपल्याकडून काय बरें झालें असावें? याचा विचार केला असतां ईश्वरी अवकृपा होण्यास कारण समाजाच्या वागण्यांत अज्ञानानें कांहीं तरी महत्त्वाच्या चुका झाल्या असल्या पाहिजेत. असेंच म्हणावें लागेल. समाजाच्या चरित्रांत दोन गोष्टी मुख्य आहेत. पहिली देवाबद्दल पूर्ण जाणीव, व दुसरी व्यक्तिमात्राच्या वागणुकींत नीति. या दोन गोष्टींकडे मनुष्याचें दुर्लक्ष झालें कीं सर्वस्वी आपण मनुष्यत्वास मुकल्यासारखें झालें. देवच नाहीं असें मानणारे विरळा, मग तो आहे असें समजून जर त्यास आपण विसरलों, तर ईश्वराचे कृपाप्रसादास मुकण्याचीच पाळी नाहीं कां येणार? देवाची जाणीव समाजांत मनुष्यास आहे किंवा नाहीं याचें प्रत्यंतर व्यवहारांत हल्लीं जे अनर्थ चालले आहेत, त्यांजकडे लक्ष गेलें असतां, सहज खात्री पटते. कारण प्रभु आपल्यापाशीं सदोदित

आहे, हें ज्यास माहित असेल, त्याचेकडून अनीतीची कल्पना अथवा कृत्य घडणें अशक्य.

४. अर्थात् मनुष्यत्वाचीं जीं मुख्य दोन लक्षणें कीं, (१) प्रभु सदोदित सर्व ठिकाणीं उभा आहे, ही जाणीव. आणि (२) त्याच्या समक्ष चुकून सुद्धां केव्हांही अनीति घडतां कामा नये, अशी वाणी. यांचा बऱ्याच प्रमाणानें लोप झाला आहे, म्हणून या निबंधाचा हा प्रयत्न आहे.

५. वरील विचारसरणी यच्चावत मनुष्यवर्गास लागू आहे यांत स्त्री व पुरुष या दोघांचाही समावेश होतो. याच समजुतीनें मी समाजसेवेप्रीत्यर्थ हा निबंध लिहिण्याचा विचार मनांत आणिला. तो लिहिण्यांत ज्या महात्म्यांच्या ग्रंथांचा प्रसाद मला मिळाला, त्यांचे, तसेंच ज्या महाशयांकडून मला अनेक वेळां या विषयासंबंधीं ग्रंथाधारासह श्रवण करण्याची सुसंधि मिळाली त्या सर्वांची मी अत्यंत ऋणी आहे.

६. आजपर्यंत आमच्या समाजांतील विद्वान, अधिकारी, साधुसंत अतएव वंदनीय, अशा अनेक पुरुषांनीं या विषयावर उत्कृष्ट ग्रंथ लिहून आम्हांवर अत्यंत उपकार केले आहेत. परंतु निबंधांत सांगितल्याप्रमाणें सर्वांस सुगम व एकत्र माहिती मिळण्याजोगे ग्रंथ नसल्यामुळें निरनिराळीं पुस्तकें वाचून व शक्य तितकें श्रवण करून त्याचा मेळ सुसंबद्ध रीतीनें घालून आपला कार्यक्रम ठरविण्यास जसें मला कठीण पडलें, तद्वतच ही अडचण इतरांस पडण्याचा संभव आहे, असें वाटणें साहजीक आहे: म्हणून अशा प्रयत्नांत ईशकृपेनें जो प्रसाद मिळाला, त्याचें आदर बुद्धीनें मनन करून त्यावर मला सुचलेले विचारमुद्दे आपल्या बंधु भगिनींस अर्पण करण्याचा विचार मनांत आला. हें जरी खरें, तरी निबंध लिहिण्याचें बायकांनीं धाडस करणें हें असांप्रत आहे, असें मला वाटलें. कारण अशा महत्वाच्या विषयावर आम्हा बायकांनीं एकादा निबंध लिहिल्यास, वाचक केव्हांही असेंच म्हणतील कीं, निबंधांत सांगितलेलीं तत्वें सांगणाऱ्याच्या अधिकारानुरूप त्याचा वाचकाच्या मनावर परिणाम होणार. मग हा निबंध तर एका साधारण बाईनें लिहिला आहे. यांत काय असणार ? आणि ही गोष्ट अगदींच खरी आहे; परंतु सुज्ञ वाचकांस माझें विनयपूर्वक इतकेंच सांगणें आहे की, हा माझा निबंध म्हणजे एक श्रीहरीचें कीर्तन आहे; व तें आस्थेनें केलें आहे. ज्या प्रभूचें हें कीर्तन आहे त्याजवर माझें अत्यंत प्रेम असल्यामुळेंच व तो ज्या समाजांत

ओतप्रोत भरून राहिला आहे, त्याजबद्दलही तितकाच आदर व प्रेम असल्या-मुळें मला जें अत्यंत सुखकर वाटलें, तें मी आमरणाच्या सद्भावानें समाजास त्यांची सेवा म्हणूनच, व त्यासही तें तितकेंच सुखकर होवो, या मनोभावानेंच अर्पण करीत आहे. ही आमरणाची खूण ओळखून हें आपलेंच आहे; मग तें असंस्कृत कां असेना? अशा भावनेनें वाचक या निबंधाचा आदर करितील अशी मला पूर्ण आशा आहे. या निबंधांत अनेक दोष असणारच. ते नसणें शक्यच नाहीं; कारण, मी स्त्री, तशांत अनधीत आहें. परंतु तसें झालें असलें तरी सत्कुलांत जन्म, परम पूज्य मातापितरांचा सत्समागम, तसेंच त्यांची व इतर श्रेष्ठ जनांची कृपा असूनही, तसे असलेलें दोष राहण्याचें कारण मात्र मी नव्हे. स्त्रियांस विद्येचा संस्कार मिळणें ज्यांनीं दुर्लभ करून ठेविलें आहे, त्यांजवरच तो दोष येण्याचा संभव आहे.

७. वरील दोषांस आमच्या मर्मज्ञ व सुजाण समाजानें पात्र न होण्याची अवश्यकता त्यांस पटावी, अशी माझी इच्छा आहे. तसें घडून येण्याचा खरा व 'रामबाण' उपाय या निबंधांत व त्याच्या उपसंहारांत सुचविलाच आहे. तथापि या निबंधांतील विचारांत, व ते बरोबर मांडण्यांत, वापरलेल्या भाषेंत, जे जे दोष असतील, ते सर्व ज्या करुणासागर प्रभूच्या विभूतीनें भरलेल्या समाजाच्या सेवेंकरितां हें कार्य मी हातीं घेऊन, ही पुष्पांजलि सप्रेम अंतःकरणानें त्याच्या चरणीं अर्पण करित आहे, तेथें त्या दोषाचा लय होऊन त्यास खचित गोडी येणार आहे, असा माझा पूर्ण भरंवसा आहे. कारण—

## अभंग

परिस लागे लोखंडासी । करी सोनें बावन्न कशी ।
मार्गी वाहे तें उदक । मिळतां गंगे पुण्योदक ।
बहु जन्माचीं पातकें । तेणें मन पापी भके ।
प्रेमें जडे चरणीं जरी । शुद्ध कां तें न हो तरी ॥

सांगली,
गणेशचतुर्थी शके १८४४.

सौ. कृष्णाबाई आपटे.

॥श्रीराम समर्थ॥

# ईश्वरोपासना

अथवा

# समाज सेवा.

## प्रास्ताविक विचार–निबंधाचा उद्देश.

विश्वासि जो व्यापुनि विश्वरूपी । राहे परी अव्यय चित्स्वरूपी ॥
देहाकृती उद्धरि दीन पापी । सोडी न मी त्या चरणा कदापि ॥१॥

सूर्याची प्रखरता, व चंद्राची आल्हादकता, समुद्राचे गांभीर्य, आणि पर्वताचें स्थैर्य, पृथ्वीचा विस्तार व तारांगणाचा प्रसार, पंडितांचें पांडित्य आणि सज्जनांची भक्ति, कवींची उक्ति आणि मातेची प्रीति, इत्यादि गोष्टी मनांत आल्या ह्मणजे, अंतःकरण आश्चर्यानें थक्क होतें, डोळयांतून प्रेमाश्रु येतात, आणि वाटतें कीं, देवा! काय रे तुझी सृष्टि अगाध आहे! खरोखरच श्रीमत् आद्य शंकराचार्यांनीं सुद्धां आपल्या ब्रह्मसूत्रशारीरभाष्याच्या आरंभीच 'मनसाप्यचिंत्यरूपस्य जगतः' ह्मणजे मनानें सुद्धां ज्या जगताच्या स्वरूपाची कल्पना करितां येत नाहीं, असें जें ह्मटलें आहे, त्याची साक्ष पटतें. अशा अपार आणि अगाध विश्वाचा जो अधिपति त्याला अनन्यभावानें शरण जाऊन, त्याचीच उपासना ह्मणजे सेवा या निबंधरूपानें मी करीत आहे.

२. जगतांतील दृश्य आणि क्षणभंगुर वस्तूवर आसक्ति ठेऊन त्यांची उपासना केल्यानें अंतःकरणास चिरंतन शांति आणि सौख्य मिळत नाहीं, असा विद्वज्जनांचा आणि सज्जनांचा अनुभव आहे; व तो त्यांनीं

आपल्या ग्रंथांतून हजारों वेळां प्रकटही केला आहे. यासाठींच, शाश्वत, विश्वव्यापी आणि आनंदघन परमात्म्याची यथामति अनन्यभावानें सेवा करून शाश्वत आनंदाचें यथाशक्ति स्वतः भागीदार व्हावें, व इतरानांही करावें, अशा हेतूनें मी हा निबंध लिहिण्याचें धाडस करीत आहे.

३. चार वेद, सहा शास्त्रें व अठरा पुराणें इत्यादि प्राचीन ग्रंथांतून व्यासवाल्मीकादि महर्षींनीं व श्रीशंकराचार्यांसारख्या धर्मसंस्थापकांनीं, ईश्वर ह्मणजे काय, व त्याची उपासना ह्मणजे काय, आणि ती कशी करावी, इत्यादि गोष्टींची चर्चा पूर्णपणें केलेलीच आहे. तसेंच, श्रीतुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर, एकनाथ, कबीर प्रभृति अनेक संतांनीं या विषयाचा उहापोह आपापल्या ग्रंथांत अमृततुल्य वाणीनें यथासांग केला असतांना सुद्धां, मीं जो हा विषय चर्चेसाठीं घेतला आहे, त्यांतील हेतु इतकाच कीं, ज्यांच्या बुद्धींत मोठमोठे संस्कृत ग्रंथ वाचून त्यांतील अर्थ व रहस्य समजून घेण्यास इतर व्यवसायांमुळें सामर्थ्य नाहीं, तसेंच ज्यांना मराठी मोठमोठे ग्रंथ सुद्धां वाचून त्यांचें अध्ययन करण्यास, या संसारचक्रामुळें वेळ मिळत नाहीं, अशा माझ्या देशभगिनींना आणि बांधवांना अगदीं थोडक्यांत, ईश्वर ह्मणजे काय? व त्याची उपासना ह्मणजे काय? तसेंच ईश्वरोपासनेचा आणि समाजसेवेचा कांहीं संबंध असूं शकेल काय? इत्यादि विषयांची सरळ मराठी भाषेतून माहिती करून द्यावी, हाही एक निबंध लिहिण्याचा माझा हेतु आहे.

प्रकरण १लें.

## समाजाची सद्यःस्थिति.

शुचि नाहीं स्वधर्म नाहीं । आचार नाहीं विचार नाहीं ।
अरत्र नाहीं परत्र नाहीं । मुक्त क्रिया मनाची ॥
कर्म नाहीं उपासना नाहीं । ज्ञान नाहीं वैराग्य नाहीं ।
योग नाहीं धारिष्ट नाहीं । कांहींच नाहीं पाहतां ॥
उपरति नाहीं त्याग नाहीं । समता नाहीं लक्षण नाहीं ।
आदर नाहीं प्रीति नाहीं । परमेश्वराची ॥

दासबोध—रामदास.

४. **संसाराची प्रस्तुतची स्थिति; धर्म व आचार यांची अवनतावस्था**— जिकडे पहावें तिकडे आजकाल सर्व लोक बाह्य प्रवृत्तीला बळी पडलेले दृष्टीस पडतात. यांत सुद्धां शेंकडा नव्याण्णव असे आहेत कीं, त्यांना आपल्या या साऱ्या व्यापाचें ध्येय काय आहे, हेंही माहित नाहीं. द्रव्यार्जनाकरितां आणि स्वकीयांच्या पालनपोषणाकरितां आपण इतका अखंड व्याप कां करितों? या प्रश्नाकडे साधारण मनुष्याची (मग स्त्री असो कीं पुरुष असो) बुद्धि जात नाहीं; व जन्मभर कितीही केलें तरी त्यांच्या अंतःकरणाची तळमळ नाहींशी होत नाहीं.

५. **या सद्यःस्थितीचें तात्विक कारण**— यांतील तात्विक इंगित हेंच आहे कीं या संसारांत ऐहिक सुखोपभोगाकडे मनुष्यांच्या वृत्ती गुंतल्यामुळें वासना प्रबल असतात, व यामुळें ईश्वरोपासनेकडे लक्ष जात नाहीं. याचें कारण, पूर्व जन्माचे ऋणानुबंधाची फेड करणें, व करून घेणें, या करितांच प्रस्तुत जन्म असल्यामुळें तदनुसार ज्या त्या मनुष्याच्या वासना तयार होतात. शिवाय, फलाच्या इच्छेनें केलेल्या पुण्यकर्मांचीं फळें भोगणें व दुष्कृत्याबद्दलचीं प्रायःश्चित्तें सोसणें, यांचीही या जन्माशीं सांगड असते. अशा या शरीर यात्रेंत सुखदुःखांचा मिलाफ होतो; आणि, ज्ञानाचे अभावीं

बरीं वाईट भोगांचीं फळें भोगित असतां त्या त्या फळांच्या पोटीं पुनः नवीन बीजें याच फळांचे संपूर्ण अगर त्र्याच अंशानें गुण धारण करून मनुष्याचे हातून त्याच मासल्याचें कर्में घडवितात. अशा कर्मचक्राच्या फेऱ्यांत वासना वाढतात; आणि त्यामुळें ईश्वरोपासनेस वांवच सांपडत नाहीं; व जन्म-मरणाच्या फेऱ्यांत तो सांपडतो. परंतु दुष्कर्मांच्या प्रायाःश्चित्तांनीं मन पोळल्यास पश्चात्ताप उत्पन्न होतो, आणि या संसारांत कसलेंही शाश्वत सुख नाहीं, अशी खात्री पटूं लागते, व वैराग्याची जरूरी भासूं लागते; परंतु असें वैराग्य पूर्णपणें प्राप्त होईपर्यंत अहंकार, वासना वगैरेंचे कह्यांत मनुष्य सांपडून त्रिविध ताप सोसून सुद्धां संसारांत निमग्न रहातो.

६. **धर्माचार्यांचा अवतार**—याप्रमाणें जनतेची अत्यंत शोचनीय स्थिति एका कालीं झाल्यामुळें, श्रीशंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य वगैरे धर्माचार्यांना अवतार घ्यावा लागून, अवनत झालेल्या धर्माची पुनः स्थापना करण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं या संसाराचें स्वरूप श्रीमत् शंकराचार्यांनीं भगवद्गीताभाष्याच्या आरंभीं याप्रमाणें लिहिलें आहे:—

**संसारमेव निःसारं दृष्ट्वा सारदिदृक्षया ।**
**प्रव्रजन्त्यकृतोद्वाहाः परं वैराग्यमाश्रिताः ॥**

**अर्थ**:— संसार निःसार आहे असें पाहून खरें सार काय आहे तें पहाण्याकरितां विवाह न करितां वैराग्य संपन्न होऊन कित्येक संन्यासाश्रम घेतात. तसेंच उपनिषत् भाष्यांत— 'स चायं संसारो जन्मजरामरण-शोकाद्यनेकानर्थात्मकः ।' ह्मणजे, हा संसार, जन्म, जरा, मरण, शोक इत्यादि अनेक अनर्थांनीं पूर्ण भरलेला आहे, असेंही त्यांनीं लिहिलेलें आढळतें. वरील प्रमाणें संसाराचें भेसुर स्वरूप अधिकारयुक्त वाणीनें श्रीशंकराचार्यांनीं समाजाचे मनावर उत्कृष्ट रीतीनें पटविल्यामुळें, त्याकालीं बौद्धधर्माचे–निरी-श्वरवादी मताचे–जोरावर 'मनःपूतं समाचरेत्' या तत्वावर विषयलोलुपता जी अत्यंत बोकाळली होती, तिचा बराच नायनाट झाला, आणि बराच कालपर्यंत संसारास योग्य तितकाच मान मिळून ईश्वरोपासनेकडे जास्त लक्ष पोचूं लागलें. परंतु ही स्थितिही फार काळ टिकली नाहीं. पुनः समाजास

भक्तिमार्गाचें चांगलें वळण मिळण्याची अवश्यकता भासूं लागली. श्रीमत् शंकराचार्यांनीं ज्या मतांची स्थापना केलीं, तीं मतें साधारण जनतेचे उपयोगीं पडण्याजोगीं नसल्यामुळेंच, त्याचा शाश्वत परिणाम समाजावर झाला नाहीं, आणि वैदिक धर्माची व आचारविचारांची सत्ता व शिस्त जशी बसणें अवश्य होते, तशी न बसल्यामुळें ईश्वरोपासनेचें वळण जसें मिळावें तसें मिळालें नाहीं. सुखानें संसार तर चालावा, आणि त्यांत भक्तिमार्गाचें अवलंबन करून ईश्वरोपासना वडावी, तरच समाजाचे कल्याण होणार व धर्माची उन्नति होईल, अशा भावनांनीं बऱ्याच साधुसंतांच्या विभूतींचे अवतार झाले. वरील उपायांची योजना क्रमाक्रमानें अमलांत आल्यास त्याचे परिणाम सुखद होणार, अशी समाजाची परिस्थिति असल्यामुळें ईश्वराची कल्पना व उपासना मनुष्याच्या मानासिक योग्यतेस अनुसरूनच झाली पाहिजे, या तत्वाचें धोरण राखूनच सुरू करण्यांत आली. संसारांत इष्ट प्राप्तीकरितां व्रतें, वैकल्यें वगैरेचे उपाय उपासनेचे पद्धतींत घाढून काम्य-कर्माचे मार्गानें कां होईना ईश्वरसेवा घडो या हेतूनें तसें वळण समाजास देण्यांत आलें.

७. **धर्ममार्गाची उपेक्षा**— परंतु हा हेतु सिद्धीस गेला नाहीं. गरज पडली कीं त्या वेळे पुरती देवाची आठवण करावी, आणि काम झालें कीं आपल्या नित्यक्रमांत गुंतावें, असाच क्रम आजपर्यंत चालला आहे. धार्मिक व नैतिक कर्तव्याचीं शास्त्रें जरी लिहून ठेविलीं असलीं, तरी तीं अमलांत येतात किंवा नाहीं, या गोष्टीवर देखरेख असणें अत्यंत अवश्य आहे. व यासाठीं धर्ममताचे अनेक मठ आहेत. त्या मठांवर धर्माचार्य आहेत. त्यांस जाहागिरी व इनामें आहेत. ते आपआपल्या प्रांतांतून संचार करितात परंतु त्यांचें कोणी ऐकत नाहींत, व तसें त्यांस ऐकविण्यास लावण्यास त्यांजकडे सत्ता ही नाहीं. अशा स्थितींत मठाधीशांचें तरी काय चालणार?

८. आतां व्यक्तिमात्र धर्माचरणाच्या बाबतींत येथें चार शब्द लिहिणें अत्यंत जरूर आहे. हें धर्माचरण म्हणजे स्ववर्णाश्रमधर्म, अर्थात ज्या वर्णांत आपला जन्म असेल, त्या वर्णाकरितां ईश्वरदत्त वेदांत व धर्म-

शास्त्रांत विहित धर्मकर्मे ह्मणून जीं ठरलीं आहेत तीं करणें. अलीकडे कलीयुगाची सत्ता, या धर्मकर्माचे बाबतींत, अतिशय वाढली असल्यामुळें धर्माचा व कर्माचा ही लोप होत आला आहे धार्मिक व कार्मिक मनोवृत्तींवर कोणाचें नियंत्रण राहिलें नाहीं. या मनोवृत्ती स्वैर वर्तन यथेष्ट करतात; पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, या पुण्यभूमींत जन्म मिळाला तो पूर्व पुण्याईनें मिळाला आहे, तो ईश्वराचा कृपाप्रसाद आहे. या पुण्य भूमींत जन्माचें सार्थक करून घेऊन मोक्षाचा दारवंटा गांठण्याचीं साधनें यथेच्छ भरून ठेविलीं आहेत. असें असून जनतेस, आत्महित साधण्याची उत्कृष्ट संधी प्रभूनें आपल्या पुढें सहजीं मांडली आहे, आणि सर्व अवश्य साधनसंपत्ति प्रेमानें दिली असून त्यांजकडे डोळे उघडून पाहण्याची देखील बुद्धि जनतेस होईनाशी झाली आहे. आत्महित खरें कशांत आहे, हे पाहणें आपलें कर्तव्य आहे. याची जाणीवच विसरण्याची वृत्ती पहावें तिकडे दिसते. हें पाहून मन उदास होतें! आत्महिताकडे पराङ्मुखता झाल्यास त्याचे उलट बाजूसच आपला रस्ता पडतो. त्या बाजूस गेलें असतां आत्महिताचे ऐवजीं आपला घात आहे. याचा विचार सुबुद्ध ह्मणविणाऱ्या मनुष्यानें केला नाहीं तर कोणी करावयाचा?

९. आपल्यास मिळालेल्या जन्मांत कांहीं तरी ईशसंकल्प नाहीं काय? खचित् आहे. मग तो काय संकल्प असावा? चौऱ्याऐंशीं लक्ष योनींतून धक्के चपेटे खात खात त्या दीर्घ व कष्टदायक प्रवासाचें सार्थक करून घेऊन हा जन्म मिळविला. तो काय फक्त कसें तरी आपलें व आपल्या कुटुंबाचें उदरपोषण करीत करीत हा बिनमोल नरदेह टाकून जाण्याकरितांच मिळविला? नाहीं, खचित् नाहीं. वाचक हो, येथें आपल्यास माझी पदर पसरून विनति आहे कीं, थोडे स्थिर व्हा. मनोवृत्ती थोड्या शांत करा, त्या स्वत: अत्यंत उच्छृंखल असून त्यांच्या जोरदार लाटा तुम्हांस ओढून नेत आहेत. त्या तुमचा घात करित आहेत, हें डोळे उघडून पहा. त्यानीं पुरुषापरी पुरुष नागवले मग स्त्रिया तर तुमच्या वर सर्वस्वी अवलंबून असणार. त्या तर जाणून बुजून अबला. हीं धाड

आपलें घड करित नाहीं. 'मनः पूतं समाचरेत्' ही वृत्ति वैदिक धर्माची नव्हे. यांत सर्व जगाचा मालक व चालक कोणी आहे, तो आपल्यास पहातो आहे ही कल्पनाच अजीबात नष्ट होते. ज्यानें आपल्यास जन्म दिला, जो आपलें योगक्षेम चालवितो, त्याचीच आठवण, जाणीव, व पर्वाच नाहींशी होत आहे. त्याजबद्दल आदर, त्यानें केलेल्या अनंत उपकाराबद्दल कृतज्ञता व त्यानें आमच्याच हिताकरितां करून ठेवलेल्या वेदाज्ञेप्रमाणें वागणें, यांस वाव कोठची ? या सर्व वृत्ती आपलें भलें करणार काय ? कीं त्या आम्हांस अधोगतीस नेतील याचा विचार होणें अवश्य नाहीं काय ? आपण असे भ्रांत व अंध कशानें झालों आहो ? आपलें कर्तव्य काय ? इहलोकची यात्रा आमची कशासाठीं आहे ? कोणाच्या इच्छेनें अगर आज्ञेनें आह्मी येथें आलों ? आमचें ध्येय काय ? आमचा मालक कोणी आहे कीं आम्हींच आमचे मालक ? मालक दुसरा कोणी असल्यास त्याची आज्ञा काय आहे ? तो मालक कोण आहे ? वगैरे गोष्टींचा विचार झालाच पाहिजे; आणि विचाराअंतीं असें खास दिसून येईल कीं आम्ही स्वतंत्र नाहीं, कांहीं इष्ट हेतू, ज्यांत आपलेंच हित आहे, असे, प्रभूची आज्ञा म्हणून साधण्यास, त्यानें दिलेल्या मार्गाचें अवलंबन करून आपले धर्माचार व व्यवहार करीत करीत येथील देहयात्रा संपविण्याकरितांच येथें आलों आहो. काकतालीयन्यायानें आमचा जन्म नाहीं हे खास. आमच्या बरोबरच आमच्या पूर्व जन्माचे हिशेबाचें खातें आहे. त्यांत त्या जन्माचें देणेघेणेचा हिशेब आहे. 'ऋणें यावया घ्यावया जन्म घेती' हें समर्थांचे वचन अन्यथा नाहीं ; हे हिशेब आपला चित्रगुप्त नेहमीं जेव्हांचे तेव्हांच टिपून ठेवितो. त्याचा आपल्यावर अक्षय्य पहारा आहे. तो स्वकर्तव्यांत अत्यंत दक्ष आहे. त्यास कसलीही दयामाया नाहीं. तो दरएक शरीरांत आहे. सुष्ट असोत वा दुष्ट असोत आमच्या कल्पना, विचार व कर्में क्षणोक्षणीं जीं आमच्या देहांत चालतात त्या सर्वांची खतावणी तो बिनचूक करित असतो; याप्रमाणें आमच्या जन्मापासून तों आमचा देह पडेपर्यंत त्याचें हें काम सरहा चालतें. याच आमच्या बख-

रींतून आमचें कर्मसंचित व भोक्तृत्व तयार होतें व तेंच भोगण्याकारितां आमचा जन्म आहे. या गोष्टीची सत्यता अनुभवपूर्ण फलज्योतिषशास्त्र आज देत आहे. याच हिशेबानें आह्मीं बद्ध आहों. या ऋणानुबंधांतून मुक्त होण्याकरितांच म्हणून वेदविहित धर्माचरणाविषयीं शास्त्रें आहेत. इतक्या कृपाळुपणें, आमचें कल्याण व्हावें म्हणून, या बंधांतून मोकळें होण्याकरितां तजवीज करून ठेविली असतां ही जर आह्मां त्यांचा अव्हेर केला तर त्याचीं कटु फळें आमचेकरितां दुसरा कोण भोगण्यास तयार होणार ? ज्याचें त्यानेंच भोगिलें पाहिजे, हें ओघानेंच प्राप्त होतें.

१० येथें इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं या संसार अटवींत वाटमारे, दरोडेखोर व आपले हितशत्रू अनेक आहेत. त्यांसच षड्रिपू ह्मणतात. हे गुप्त रूपानें संचार करितात. ते प्रत्यक्ष कधींच प्रगट होत नाहींत. ते अत्यंत मायावी आहेत. ते आपल्यास कांहींच समजूं न देतां अत्यंत चतुराईनें आमच्या मनास आपला गुलाम बनवितात. आणि नियम असा आहे कीं, ‘ मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ’ ह्मणजे आमच्या ऋणानुबंधांचें मूळ कारण आणि मुक्त होण्याचें साधन मनच होय. दुसऱ्याच्या ऋणांतही तेंच पाडील, मोहपाशांतही तेंच घालील, पापाचरणही तेंच करवील ; आणि तेंच मन योग्य ताब्यांत ठेऊन त्याचे कडून काम घेतल्यास मुक्ति सुसाध्य करील. या मनाला ‘ चित्ततुरग ’ असेंही कोणी म्हटलें आहे, तें यथायोग्य आहे. हें घोडे चांगलें लगामांत ठेवल्यास तें उत्कृष्ट काम देईल ; ईश्वरी उपासनेकडे लाविल्यास व त्यास यमनियमाच्या लगामांत ठेवल्यास तें साधी वाणी व उच्च विचार याचे संगतींत राहील, विहित धर्माचाराकडे लागेल, आणि अशा स्थितींत आपल्या जीवदशेंत आपलें आयुष्य सुमार्गानें क्रमण्यास सोईचें होईल.

११. एखादें आम्रवृक्षाचें रोप लावावें, त्यास पाणी व खत मसाला वगैरे घालून तें वाढवावें, त्याचा मोठा वृक्ष करावा, आणि नंतर त्याच्या मधुर व रसाळ अशा परिपक्क फलाचा आस्वाद घेण्याचें टाळूक नसल्यानें

जसें 'सारें व्यर्थ झालें ' ह्मणून उदासपणें स्वस्थ बसावें, तद्वतच संसाररूपी आम्रवृक्षाचें ईश्वरोपासनारूपी परमार्थफल हें माहित नाहीं ह्मणून अनेकांना शेवटीं संसाराचा वीट आल्यासारखें वाटतें. परंतु जे कोणी भाग्यशाली असतात ते मात्र निरंतर स्वार्थी संसारांतच न घुटमळता चटकन् आपल्या ध्येयाकडे वळतात, व स्वार्थी संसारांत राहूनच ईश्वरोपासनारूपी परमार्थ साधतात.

बृहदारण्यकोपनिषदांत महर्षि याज्ञवल्क्य आणि त्यांच्या कात्यायनी व मैत्रेयी या नांवाच्या दोन स्त्रिया यांचा संवाद सांगितला आहे. याज्ञवल्क्य ऋषी जेव्हां गृहस्थाश्रम सोडून संन्यासाश्रम घ्यावयास निघाले, तेव्हां त्यांनीं आपल्या दोन्ही स्त्रियांस जवळ बोलाविलें, आणि सांगितलें कीं मी आतां हा गृहस्थाश्रम सोडून संन्यासाश्रम घेणार आहें ; तेव्हां माझ्या पाठीमागें तुह्मां दोघींत भांडण तंटा न व्हावा या हेतूनें, मीच तुमची वांटणी करून देऊन जातों, त्या प्रमाणें तुह्मी दोघीही आपली संपत्ती घेऊन सुखानें स्वस्थ रहा. हें याज्ञवल्क्याचें भाषण ऐकून कात्यायनी नावाची स्त्री कांहीं विशेष बोलली नाहीं. परंतु मैत्रेयी मात्र तत्काल ह्मणाली कीं, महाराज आपण मला संपूर्ण पृथ्वी जरी सुवर्णमय करून दिली, तथापि त्यापासून मला अजरामरत्व प्राप्त होईल काय ? या प्रश्नास याज्ञवल्क्यांनीं उत्तर दिलें कीं, हे मैत्रेयी, संपत्तीनें तुला इतर संपत्तिमान लोकांसारखें थाटमाटानें राहातां येईल परंतु अमृतत्व ह्मणजे अमरत्व मात्र मिळणार नाहीं; त्याची आशा सुद्धां नको. इतकें पतीचें भाषण ऐकतांच मैत्रेयी ह्मणते कीं, महाराज, मला जर अमृतत्व ह्मणजे परमपद अथवा परमार्थ या संपत्तीनें मिळणार नाहीं, तर मग ही संपत्ति घेऊन काय करावयाचें आहे ? ज्यानें परमपद अथवा परमार्थ प्राप्त होईल तें मला आपण द्यावें इतर कांहीं मला नको आहे. अशा रीतीची तिची जिज्ञासा पाहून पुढें याज्ञवल्क्यांनीं तिचे मनोरथ पूर्ण केल्याचें वर्णन उपनिषदांत फार बोधप्रद दिलें आहे.

१२. आह्मीं आपलीं पूर्व जन्मींचीं ऋणें फेडून व फेडून घेऊन, ज्या भूमींत आपले जन्म तिचें ही ऋण फेडून, ज्यांचे उदरीं जन्म घेतों

त्यांचें ऋण फेडून, आणि ज्यांचे पासून ज्ञान संपादन करितों त्यांचें ऋण फेडून व ज्या समाजाचे आश्रयानें आपण राहतों त्याच्याही ऋणातून मुक्त होऊन ज्या प्रभूपासून येथें आलों तिकडे परत जाण्याचा संकल्प अजीबात विसरून गेलों तर जन्ममरणाच्या चक्रापासून आमची सुटका होणेंच शक्य नाहीं.

आतां, ज्या भूमींत ज्याचें जन्म तेथेंच त्यास सुखदायक उदरनिर्वाहाचीं साधनें, त्याच्या अनुरूपच धर्मकर्में त्यास जोडून ठेविलीं आहेत. या पुण्यभूमीवर ज्याचें जन्म त्याची पुण्याई श्रेष्ठ आहे असें वर सांगितलेंच आहे. त्या पुण्याईचा पुढील फायदा घेणें त्याचेंच कल्याणार्थ आहे. हें या आर्यभूमींतील प्रत्येक मनुष्य प्राण्यानें आपल्या हृदयांत पक्कें समजलें पाहिजे. येथें त्याचा जन्म कांहीं उगीच झाला नाहीं. त्याच्या कल्याणाकारितांच झाला आहे. याच ठिकाणीं त्याच्या मोक्षाची वाट आहे. आणि त्या वाटेस त्यास लागतां यावें म्हणूनच त्याचे वर्णाश्रमास अनुरूप असे धर्म व कर्म याविषयीं ईश्वरानें त्यास नियम घालून दिले आहेत. जसें शरीरपोषणाकारितां अमुक खावें अमुक प्यावें म्हणजे शरीर निरोगी राहतें, बल वाढतें वगैरे गोष्टीबद्दल नियम, तसेंच या जीवयात्रेंत आपला परमार्थ साधण्याचा मार्ग काय व तो कसा आक्रमावा या विषयींही ज्या त्या वर्णाश्रमास नियम घालून दिले आहेत. प्रत्येक मनुष्याचे पाठीं निसर्गकर्में आहार, निद्रा वगैरे व तत्प्रीत्यर्थ चालणें, बसणें, खाणें, पिणें, बोलणें इत्यादि कर्में आपण करित आहों, तद्वतच हीं धर्मकर्में आहेत. ईश्वरप्राप्तीचा हीं धर्मकर्में पाया आहेत. भक्ति व ज्ञानावांचून ईश्वरप्राप्ती नाहीं. चित्तशुद्धी शिवाय भक्ति व ज्ञान प्राप्त होणें शक्य नाहीं. आणि ही चित्तशुद्धि विहित म्हणजे ज्या त्या वर्णाश्रमास सांगितलेल्या कर्माचरणाशिवाय शक्य नाहीं. म्हणून ज्यास ही चित्तशुद्धि प्राप्त झाली नाहीं, म्हणजे ज्याचें चित्त ईश्वराकडे एकदम लागत नाहीं, अशांस कर्माची अत्यंत अवश्यकता आहे. जसें शरीर दृढ व कार्यक्षम होण्यास त्यास व्यायामादि वळण देणें जरूर आहे, तद्वतच चित्तास उपासनेच्या द्वारें ईशप्राप्ती करून घेण्याची

योग्यता आणण्यास धर्मकर्माची अत्यंत अवश्यकता आहे. हें त्रिवार सत्य. या शिवाय गत्यंतरच नाहीं. कर्मापासून कांहीं ज्ञानप्राप्ती नाहीं. ज्ञानप्राप्ती ही पुढील पायरी आहे. कर्मापासून चित्तशुद्धि होते, मग तें साधण्यास कर्म करणें अवश्य नाहीं काय ? मोठमोठ्या परीक्षा व्यवहारीकविद्या संपादन करण्याकारितां देण्यांत जसें प्रथम लहान परिक्षा द्याव्या लागतात तद्वतच ह्या कर्माचा अभ्यास आहे. चित्तशुद्धि ही परमार्थविद्याभ्यासक्रमांत 'म्याट्रिक्युलेशन'ची परीक्षा आहे. ती झाल्याशिवाय जसें वरिष्ठ विद्यापीठांत प्रवेश होणें कठिण, तद्वतच परमार्थज्ञानप्राप्त्यर्थ जी उपासना तीच चित्तशुद्धीची प्रवेश परीक्षा अत्यंत अवश्य आहे. वरील विवेचनावरून धर्मकर्माची या कामीं किती महती आहे हें सूज्ञ वाचकांचे सहजीं ध्यानीं येणार आहे. आतां अशीं वेदविहितकर्में करित असतां भगवंतांनीं गीतेंत विशेष ध्यानांत ठेवण्याच्या गोष्टी ह्मणून सांगितल्या तिकडे वळूं

**तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचार ।**
**असक्तो ह्याचरन् कर्म परमाप्नोति पूरुषः ॥**
**लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि ॥**
**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरोजनः ।**
**स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥**

गीता—३, १९ ते २१

केव्हांही फलासक्त न होतां कर्माचें आचरण करावें, तसें केलें असतां परमपुरुषार्थ मिळतो. जें जें कर्म करण्याचें तें ईश्वरार्पण करावें. लोकांस सन्मार्गास लावण्याकारितांहि कर्म करावें. श्रेष्ठ जसें वागतात याचप्रमाणें इतर लोक वागतात. असे श्रेष्ठ ज्या नियमानें वागतात त्याच मार्गानें लोकही वागतात. कर्में करण्याचे बाबतींत त्यांतील भेद लक्षांत ठेविले पाहिजेत. ते भेद असेः—

१. स्ववर्णाश्रम 'विहित' असें जें त्यास कर्म ह्मणतात; 'विहित' ह्मणजे करावी हेंच योग्य असें सांगितलेलें.

२. शास्त्रांत जीं पातकें - म्हणून करणें योग्य नव्हे — अशी जीं कर्मे त्यांस अकर्मे म्हणतात.

३. वेदांत जीं निषिद्ध म्हणून ठरलेलीं कर्मे त्यास विकर्मे म्हणतात.

हीं तीन कर्में सुखदुःखाचीं बंधनें तयार करितात म्हणून शेवटची दोन जीं अकर्म व विकर्म हीं त्याज्यच असें ठरलें असल्यामुळें ती करूंच नयेत; आणि 'विहित' म्हणजे करणें योग्य अशी मानलेलीं कर्मे तर करावीं पण तीं ईश्वरार्पण करावीं, म्हणजे त्याचें फल न मागतां ईश्वरप्रीत्यर्थ म्हणून तीं करावीं. येथपर्यंत कर्माचें विवेचन झालें. यांत वेदविहित कर्में वर्णाश्रमधर्माप्रमाणें करून चित्तशुद्धि प्राप्त होते हे सांगण्यांत आलें. आतां या भवसंसारांत आपल्या संसाराची म्हणजे कुटुंबीय व सामाजिक व्यवहाराची आपल्यास परमार्थाचे मार्गांत कशी मदत करून घेतां येते या विषयाकडे वळूं.

१३. **संसाराची परमार्थास मदत अतएव त्याची जोपासना**— अशा परिस्थितींत संसाराची उत्तम जोपासना ही ईश्वराच्या उपासनेकरितांच आहे, हें मर्म जनतेच्या चटकन् ध्यानीं येत नाहीं.

**आधीं संसार करावा नेटका । मग घ्यावें परमार्थ सुखा ॥**

यांत 'नेटका संसार' म्हणजेच समता व दया हृदयीं ठेवून केलेला संसार. वरील श्रीसमर्थोक्तीचें रहस्य न समजलेमुळें बहुतेक सर्वांना जन्मभर धडपडावें लागतें. मागे, संसार निःसार आहे, यांतच दंग झालें असतां 'मी व माझें' याच्या सत्तेखालीं मनुष्य सांपडल्यामुळें मनुष्य कसा जेरीस येतो, या विषयीं विवेचन झालेंच आहे.

वैदिक कालांतील गोष्टीवरून सुद्धां आपल्या सहज लक्षांत येईल कीं संसारी लोकांचा संसार केवळ उपजीविके करितां नसून ईश्वरोपासनेकरितां आहे; अर्थात् परमार्थाकरितां आहे. पौराणिक कालांत सुद्धां राजा-

पासून रंकापर्यंत सर्वांच्या संसारांची उभारणी परमार्थाकरितां आणि परोपकाराकरितांच होती, असेंच त्यांच्या इतिहासावरून दिसून येतें. रघुराजाच्या वंशाचें वर्णन करितांना महाकवि कालिदास काय लिहितात तें पहा.

> त्यागाय संभृतार्थानां सत्याय मितभाषिणाम् ।
> यशसे विजिगीषूणाम् प्रजायै गृहमेधिनाम् ॥
>
> रघु. १-७

अर्थ—सूर्यवंशांतील राजे सत्पात्रीं दानाकरितांच संपत्ति मिळवित असत. सत्यत्वाच्या पालनाकरितांच ते मितभाषण करित असत. सुकीर्तिकरितांच शत्रूंचा पराभव करित असत. आणि सुसंततीकरितांच गृहस्थाश्रम असे. येथें त्याग, सत्य, यश, हीं परमार्थप्राप्तीची साधनसंपत्ति आहे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे

१५. युद्धांत विजयी होऊन राज्यरूपी संसार वाढविण्यापेक्षां संन्यास घेऊन भिक्षा मागण्यास तयार झालेल्या अर्जुनास बोध करून, तसें करण्यापासून परावृत्त केल्याचें भगवद्गीता वाचणारांना माहित आहेच. बुद्धिवैभव प्राप्तकरून घेण्यासाठीं जसें जात्याच घाणेरड्या, त्याज्य व विनाशी अशा देहाचेंही संगोपन करावें लागतें, तसेंच ईश्वरोपासना चांगली होण्यासाठीं संसाराचेंही संगोपन केलें पाहिजे. अर्थात् अशा संसारी मनुष्याना शेवटीं सुखद असलेल्या विषयाचें विवेचन करून अंशतः तरी समाजऋणांतून मुक्त होण्यासाठींच मी हा विषय घेतला आहे.

प्रकरण २ रें.

## ईश्वराविषयीं कल्पना — ईश्वर म्हणजे काय ?

सर्व कर्ता तोचि देव। पाहूं जाता निरवयव।
ज्याची कळा लीला लाघव। नेणतो ब्रह्मादिक॥

रामदास — दासबोध.

१६ प्रथम आपण ईश्वर ह्मणजे काय ? याचा विचार करूं. व नंतर त्याची उपासना ह्मणजे काय ? व ती कशी करावी ? इत्यादि गोष्टीं-कडे वळूं. कोणी म्हणतील कीं, 'ईश्वर ? ईश्वर ह्मणजे कांहीं जगताच्या अपरिचयाची वस्तु नव्हे कीं जिची माहिती तुम्हीच करून द्यावयास पाहिजे. प्रत्येक देशांत प्रत्येक समाजांत, मग तो सुधारलेला असो किंवा रानटी असो, तेथें ईश्वर म्हणा किंवा देव म्हणा, कांहीं तरी असावयाचाच. व त्याची उपासनाही करितातच. मग हा तुमचा विवेचनाचा खटाटोप कशाला ?' होय, मी जें ईश्वरस्वरूपाचें विवेचन करणार आहें, तें कांहीं ईश्वराच्या सिद्धीकरितां नसून सर्वत्र सर्वानुभवसिद्ध असलेल्या ईश्वराच्या स्वरूपाचेंच वर्णन करीत आहे, इतकेंच.

१७. ईश्वर, देव आणि देवता हे शब्द जवळ जवळ सारख्याच अर्थाचे आहेत. ईश्वर जसा रोजच्या रोज आपल्याशीं बोलत बसण्याकरितां येत नाहीं, तसेंच देव व देवताही येत नाहींत. ईश्वराचें सामर्थ्य अलौकिक आहे. असें जसें आपण ह्मणतो तसेंच देवांचे व देवतांचेंही सामर्थ्य अलौकिकच आहे असें आह्मी समजतों. मात्र आह्मा आर्य वैदिकांची अत्यंत प्राचीन कालापासून अशी समजूत आहे कीं, ईश्वर ह्मटलें कीं तो एकच आहे, सर्व जगताची उत्पत्ति, स्थिति आणि लय करणारा, व अवि-नाशी आहे. इतक्या गोष्टी आमच्या लक्षांत येतात, व देव ह्मटलें कीं वरील अर्थ लक्षांत येऊन शिवाय तेहेतीस कोटि देव आणि अवतारभूत राम-कृष्णादि देवांचाही बोध आम्हांस होतो. तसेंच देवता म्हणजेही, सरस्वती,

लक्ष्मी वेगैरे अनेक रूपानें देवता आमच्या लक्षांत येतात ही झाली आमची साधारण समजूत.

१८. **देवाबद्दल शोध**—परंतु देव शोधावा कसा याचा विचार करणें अत्यंत जरूर आहे. हा विचार करितांना असें मनांत आणलें पाहिजे कीं साधारण एका गांवांत आपण राहिलों, तर तेथील मुख्य अधिकारी जो पाटील त्याची आपण ओळख करून घेतों, कारण त्याची ओळख असली म्हणजे आपलें क्षेम चालतें. त्या पाटलापेक्षां ज्या राज्यांत तो गांव असतो, त्याचा राजा मोठा. त्याचेहून चक्रवर्ती राजा मोठा, याप्रमाणें एकाहून एक मोठे असे शोधीत शोधीत, या सर्व राजांस ज्यानें केलें तो ब्रह्मदेव मोठा, त्यासही ज्यानें केलें तो जगदीश्वर सर्वांत मोठा. असें मानणें ओघानेंच प्राप्त आहे. त्या ब्रह्मांडनायकाची ओळख जर नाहीं तर आपल्यास शाश्वत सुख कोठचें? ज्यानें संसारांत आह्मांस घातलें, आमच्याच कर्मभोगाच्या ऋणानुबंधानें बांधिलें, ज्यानें हे सर्व अनंतकोटी ब्रह्मांड रचलें, त्याची ओळख अत्यंत अवश्य आहे. पोटभरू विद्या कितीही आह्मी शिकलों तरी त्याची ओळख त्यानें होते काय? अशा विद्यांस सद्विद्या म्हणत नाहींत. सद्विद्या ह्मणजे देवाचें ज्ञान मिळविण्याची विद्या. ती ज्या गुरूपाशीं असेल त्याचेकडेच धांव मारिली पाहिजे असें नाहीं कां होत?

१९. **नाशवंत सृष्टि देव नव्हे**—परंतु ईश्वर ओळखण्यास विचार हा प्रथम केलाच पाहिजे. येथें आपल्यासच असें विचारावें कीं ज्या सृष्टीपैकीं आम्ही एक आहों, ती कशी झाली आहे? त्यास विचारा अंतीं पंचमहाभूतांची झाली आहे, असें सांगतात. परंतु ही सृष्टीही शाश्वत टिकत नाहीं. तिचा क्षणक्षणीं नाश होत आहे. तिला देव ह्मणतां येईल काय? नाहीं. याच पंच महाभूतांस व्यापून जो जगदात्मा आहे, असें सांगितलें आहे, त्या चैतन्यघन जगदात्म्यास नाश नाहीं. परंतु सृष्टींतील हरएक वस्तु ज्या पंचमहाभूतांची झाली आहे, व ज्या वस्तूस नाम रूप आहे, त्या सर्वांस नाश आहे. या नामरूपास प्रत्येक सृष्ट चराचर पदार्थ पात्र आहे. मग

या नाशवंत सृष्टीपैकीं कोणासही देव ह्मणता येणार नाहीं. या प्रमाणें देवाचा शोध करीत करीत आपल्यास, येथपर्यंत देव मिळत नाहीं, असें आढळून आलें. हा देव नव्हे, तो नव्हे असेंच म्हणत म्हणत येथवर आह्मी पोंहचलों. तर मग देव कोण? आधीं नाशवंत जें आहे तो देव नव्हे, असें ठरविलें.

२०. **अनादि व अव्यक्त वस्तूच देव**—अर्थात ज्यास नाश नाहीं तोच आमचा देव, असेंही कबूल करणें ओघानेंच प्राप्त होतें. पण असें म्हणूनच आमचें कार्य भागत नाहीं. ज्याचा नाश नाहीं असा कोण आहे, कोठें आहे व त्यास कसें ओळखावें हे महत्वाचे मुद्दे राहिलेच. त्याचें उत्तर श्रीकृष्णानीं अर्जुनास जी गीता सांगितली तींत असें दिलें आहे.

**अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम्।**
**विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति॥**

**अर्थ**—'ज्या वस्तूनें हें जड जग व्यापिलें आहे, ती अव्यय ह्मणजे अभंग आहे. याचा नाश करण्यास कोणीही समर्थ नाहीं.' हाच मनुष्याच्या देहांत चिदंशरूपानें असतो. तोच आत्मा. यासच जीवात्मा ह्मणतात. मग तो जगदात्मा कोण? याचेंही उत्तर वरील श्लोकांत आहे त्या श्लोकावरून असें दिसेल कीं जगास व्यापून ती 'वस्तू' आहे. अर्थात ती 'वस्तू' म्हणजे जगदात्मा, जग सोडून नाहीं. कारण 'स्थिर चर व्यापुनि अवघा तो जगदात्मा दश गुलें उरला' (मोरोपंत), 'सभूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठत् दशांगुलं' (पुरुष सूक्त) असें सांगितलें आहे परंतु आकाशाप्रमाणें तो निराकार आहे. चहूंकडे भरला आहे. असेंही शास्त्रकार सांगतात. तसेंच समर्थ रामदास म्हणतात कीं—

**निर्गुणी आत्मा तो निर्मळ। जैसें आकाश अंतराळ।**
**घनदाट निर्मळ निश्चल। सदोदित.॥**
**जें खंडिलें चि नाहीं, अखंड। जे उदंडाहूनि उदंड।**
**जें गगनाहूनि वाड। अतिसूक्ष्म॥**

जें दिसेना ना भासेना । जें उपजेना ना नासेना ।
जें येईना ना जाईना । परब्रह्म तें ॥
जें सन्मुखचि सर्वकाळ । जें निष्कलंक आणि निश्चळ ।
सर्वांतर आकाश पाताळ । व्यापुनि असे ॥

अशा स्थितींत देव पहाणें तर,

दिसेना तरी काय झालें । परंतु सर्वत्र संचलें ।
सूक्ष्म चि कोंदाटलें । जेथें तेथें ।
गुप्त तें जाणावें सार । गुरुमुखें हा विचार ।
उमजों लागे ॥ दासबोध द. ६.

विख्यात तत्वज्ञानी इमर्सन म्हणतात, म्हणें कीं, जग हें एक वर्तुळ आहे. याचा मध्यबिंदु प्रत्येक ठिकाणीं आहे आणि परिघ अनंत आहे. विचाराअंतीं ही गोष्ट सत्यपूर्ण असल्याचें सहज पटणार आहे. हेंच सत्य पटण्यास सृष्टिरचनेंत ईश्वरी योजना कशी आहे या विषयीं लक्षपूर्वक विचार अवश्य आहे. या विचाराअंती त्या योजनेंत देव पहाण्याचीं साधनें मिळतात काय पाहूं.

## प्रकरण ३ रे.

# सृष्टिरचनेंतील ईश्वरी योजनेंत देव पहाण्याचीं साधनें

सत्कर्म आणि समता सदयत्वरीति ।
हा मुख्य धर्म निगम स्फुट हे करीति ।
वैषम्य निर्दयपणाविण लोक सारे ।
झाला स्वयें जगचि धर्महि तो असा रे ॥

गीतार्णव व सुधा—वामनपंडित.

२१. **सृष्टींत प्रभूचें सच्चिदानंदत्व**— 'परमेश्वर', 'जगदात्मा' अथवा 'परब्रह्म' अशीं नांवें ज्या जगन्नियंत्याप्रभूचीं आहेत, तो 'सत्' 'चित्' 'आनंद' स्वरूपी आहे. या अनंतकोटिब्रम्हांडांत जसें, तसेंच अणुमात्रपिंडांतही त्याचें सच्चिदानंदत्व आहे. हे सच्चिदानंदत्व एकरूपी आहे; म्हणजे हे तीनही गुण एकमेकांत मिसळून आहेत, असें विचारा-अंतीं कळून येईल. 'सत्' यांत त्याचें आस्तित्व सत्य रूपानें आहे; 'चित्' यांत त्याचा शाश्वतता आहे; 'आनंद' यांत त्याचें शुद्ध प्रेम भरलें आहे. हीं तीनही एकमेकांत इतकीं मिळून आहेत कीं त्यांपैकीं एकही दुसऱ्यास सोडून नाहीं, म्हणजे जणू काय, त्यांचा एकजीवच झाला आहे. हें मिश्रण ज्यांत नाहीं, तेथें खरें सच्चिदानंदत्व नाहींच असें समजावें. आहे असें वाटल्यास तेथें सच्चिदानंदत्वाचा भास मात्र असेल. अर्थात या मायिक सृष्टींत खरें सच्चिदानंदत्व जेथें नाहीं तें जड, विनाशी, अंतवंत समजावें. उलट पक्षीं ज्यांत खरें सच्चिदानंदत्व आहे, तें अखंड सुखमय आहे.

२२. **जड चैतन्य विचार**—या सृष्टींत ज्या ज्या वस्तूंस उत्पत्ति व नाश आहे व ज्या नामरूपानें दिसतात त्या सर्वांस जड ही संज्ञा आहे. उलट पक्षीं ज्या वस्तूस उत्पत्ति नाहीं व नाशही नाहीं, व जी या अखिल सृष्टींत तिचा आधार म्हणून भरून उरलें आहे, त्याचें नांव चैतन्य. या चैतन्या-पासूनच जडाची उत्पत्ति आहे. आणि या उभय साधनांनींच प्रभूनें हा

सृष्टीचा खेळ लीलेनें उभारला आहे. तो खेळ रचण्याच्या कामीच त्याचें षड्गुणैश्वर्य प्रगट झालें आहे. जसें जड व चैतन्य दोन्हीही सृष्टींत आहेत, तसेंच चांगलें व वाईट हीं भरलें आहे. असत्य जडाची व वाईटाची उत्पत्ति सृष्टींतील व्यवस्था समतोल राखण्याकरितां आहे, त्यामुळें व्यक्तिमात्रांचे अन्योन्य संबंध चालतात. त्यांतील अशुद्धत्वाचा आपाआप नाश, त्यामुळें होऊन सच्चिदानंदत्वांत त्यांचा शेवटीं योग होतो. कारण वाईटाचा उपयोग प्रायश्चित्तांत होतो, आणि प्रायश्चित्तानें पापें जळतात.

२३. **नरतनूच मोक्षमार्गाची पायरी**—ही योजना या सृष्टींतील प्रत्येक व्यक्तिमात्राच्या मोक्षार्थ आहे. हा मोक्ष म्हणजे संसारांतील बंधनें सुटून परब्रह्मांत लीन होणें होय. प्राण्यास नरतनु प्राप्त झाली म्हणजे तेथूनच त्याच्या मोक्षाचा मार्ग सुकर व समीप होतो. हा मोक्ष मार्ग सुकर होण्यास ईश्वरानें त्यास मुख्य दोन साधनें दिलीं आहेत. एक सत् आणि असत् यांमधील भेद समजण्याची शक्ति; आणि दुसरें विषयवृत्तींपासून मन स्वतंत्र ठेवणें पहिल्या साधनास 'विवेक' आणि दुसऱ्यास 'स्वातंत्र्य' म्हणतात. या दोन साधनांनीं मोक्षाची वाट सोपी होते. ती कशी याचें विवेचन करूं.

२४. **नित्यानित्य विवेक व स्वातंत्र्य हींच भक्तीच्या बरोबरीचीं मोक्ष प्राप्तीची साधनें**—वरील साधनांच्या जोडीपैकीं ईश्वरोपासनेच्या तयारीप्रीत्यर्थ अवश्य असें 'विवेक' हें साधन मुख्य आहे. हा विवेक आपला संसार चांगला करण्याचे कामीं, तसाच परमार्थप्राप्तीचे कामीं हीं उत्कृष्ट रीतीनें उपयोगी पडतो. म्हणूनच तो मुख्य गणला आहे. या विवेकाचें विवेचन करण्यापूर्वीं येथें इतकें सांगणें अवश्य आहे कीं मनुष्यानें 'स्वतंत्र' होणें म्हणजे आपल्या तंत्रानें वागणें हें होय. 'स्व' म्हणजे आपण. मग 'आपण' कोण? या गोष्टीचा विचार झाला म्हणजे त्याचें 'तंत्र' म्हणजे ताबा पत्करणें सोईचें होईल. म्हणून श्रीशंकराचार्य यांनीं नित्यानित्य विवेकाचा विचार येथूनच सुरू केला आहे. ते आपल्या अधिकारयुक्त वाणीनें प्रथम असें सांगतात:—

**कोऽहं? कथमिदं जातं? को वा कर्ताऽस्य विद्यते।**
**उपादानं किमस्तीह विचारः सोऽयमीदृशः ॥ १२ ॥**

**अर्थ**- मी कोण? हें (विश्व) कसें झालें? याचा कर्ता कोण? ते विश्व करण्याचें येथें साधन काय? असा विचार केला पाहिजे.

असा विचार करित असतां,

**नाहं भूतगणो, देहोनाहं, अक्षगणस्तथा।**
**एतद्विलक्षणः कश्चित् विचारः सोयमीदृशः ॥ १३ ॥**

**अर्थ**— 'पंचमहाभूतें, देह, इंद्रियें यांपैकीं मीं कोणीही नव्हे. त्या सर्वांहून विलक्षण कोणीतरी मी आहें.' असे विचार येतात.

**अज्ञानं प्रभवं सर्वं ज्ञानेन प्रविलीयते।**
**संकल्पो विविधः कर्ता विचारः सोयमीदृशः ॥ १४ ॥**

**अर्थ** — 'हें सर्व अज्ञानानें झालें आहे. ज्ञानानेंच त्याचा नाश होत आहे असें समजतें, आणि समजून येतें कीं, विविध कल्पनाच त्याचा कर्ता आहे. अर्थात् जग आणि कल्पना दोनीही अनित्य व मिथ्या आहेत. याप्रमाणें विचार करित असतां असें समजून येतें कीं ज्याला आपण मी असें देशाभिमानानें म्हणतों तें अथवा ही सर्व सृष्टि या कशांतही सत्, चित् अथवा आनंद नाहीं.

तर मग मी कोण? हा विचार अद्यापि बाकी राहिला. त्याविषयीं आचार्य म्हणतात—

**अहमेकोपि सूक्ष्मश्च ज्ञाता साक्षी सदव्ययः।**
**तदहं नात्र संदेहो विचारः सोयमीदृशः ॥ १६ ॥**

**अर्थ**—मीच एक आहें. आणि सूक्ष्म (सहज न दिसणारा), जाणता सर्वसाक्षी, खरा, शाश्वत् असा जो, तोच मी आहें, यांत संशय नाहीं. असा विचार ठरतो.

यापुढें देहच मीं अशा समजुतीचा फोलपणा दाखविण्याकारितां आचार्य म्हणतातः—

आत्मा विनिष्कलो ह्येको देहो बहुभिरावृतः ।
तयोरैक्यं प्रपश्यंति किमज्ञानमतः परम् ॥ १७ ॥

अर्थ— पंचप्राण, दशेंद्रियें, चित्तचतुष्टय आणि पंचमहाभूतें यांचा देह हा काला आहे. आणि आत्मा या सर्वांहून भिन्न आणि एकाकि शुद्ध आहे. असें असून देह आणि आत्मा हे एकच आहेत, असें मानण्यापेक्षां दुसरें अज्ञान कोणतें ?

त्यानंतर आत्मा हा शरीरांत अंतर्नियामक आहे, आणि देह बाहेरच्या गोष्टींवर सत्ता चालवितो, आत्मा ज्ञानमय व पवित्र आहे, आणि देह अज्ञानमय व अशुद्ध आहे, आत्मा प्रकाशरूपी आहे, तसा देह नाहीं, आत्मा नित्य आहे, देह अनित्य आहे, असें परस्पर भिन्नत्व दाखवूनः—

ब्रह्मैवाहं समः शांतः, सच्चिदानंदलक्षणः ।
निर्विकारो निराकारो, निरवद्योऽहमव्ययः ॥
निरामयो निराभासो निर्विकल्पोऽहमाततः ।
निर्गुणो निष्क्रियो नित्यो नित्यमुक्तोऽहमच्युतः ॥
निर्मलो निश्चलोऽनंतः शुद्धोऽहमजरोऽमरः ।

अर्थ— ब्रह्मच मी. मजमध्यें समत्व, शांति, सच्चिदानंदत्व आहे. मला विकार नाहीं, आकार नाहीं, आणि दोष नाहीं मी सत्य आहे. मला नाश नाहीं. मी निरोगी आहे, अगम्य आहे, कल्पनारहित आहे. सर्वव्यापी आहे. मी निर्गुण, अक्रिय, नित्य, सदामुक्त, अजिंक्य आहे. तसेंच, मी निर्मल, स्थिर, अनंत, शुद्ध, असून मला जरा मरण नाहीं.

असेंच विचाराअंतीं ठरणार यावरून आपण खरोखर कोण हें उमजतें, आणि आत्माच देव अशी खरी स्थिति पटल्यावर देहावरील व जीवावरील प्रेम क्रमाक्रमानें कमी होतें. अर्थात त्यांत उठणाऱ्या वृत्तींपासून स्वतंत्र म्हणजे त्यांचे ताब्यापासून सुटून ‘ स्वातंत्र्य ’ मिळतें.

२६. याप्रमाणें ‘ विवेक ’ व त्यामुळें प्राप्त झालेलें ‘ स्वातंत्र्य ’ या दोन साधनांनीं आत्मत्वाची कल्पना प्रथम व नंतर जाणीव येऊं लागते.

ओघानेंच आत्मत्व सच्चिदानंदस्वरूपी आहे, असें वाटूं लागतें. इतकी तयारी झाल्यावर याचा पूर्ण अनुभव मिळविण्यास व त्याचें खरें ज्ञान होण्यास सद्गुरूंचीच कृपा संपादन केली पाहिजे. त्यांजकडून पुढील कार्यभाग होईपर्यंत जो विवेक होतो व ज्ञान होतें त्यांत या विश्वरचनेंत परमेश्वरी योजना कशी आहे, हें समजूं लागतें.

२७. याप्रमाणें २ रें प्रकरणांत ईश्वर म्हणजे काय? याचा विचार सुरू होऊन या तिसरें प्रकरणांत त्याचे शोधांत या सृष्टीमध्यें ईश्वरी योजना कशी आहे याचें निरीक्षण केल्यास देव म्हणजे काय याचें उत्तर सांपडतें काय तें पहावें म्हणून हा वेळ पर्यंत त्या योजनेंत शोध झाला आणि पहातां पहातां आत्माच देव असें ठरलें व तो आत्मा जगभर पसरलेला सर्वव्यापी आहे असेंही कळून आलें.

## प्रकरण ४ थे.

# ईश्वराचें स्वरूप.

तें भगवद्रूप जग हेंचि

वामनपंडित—गीता.

आतां आपण वेदशास्त्रादिकांत ईश्वराच्या स्वरूपाविषयीं काय सांगितलें आहे, तें पाहूं:—

**ऋचो अक्षरे परमे व्योमन्। यस्मिन् देवा अधिविश्वे निषेदुः।**
**यस्तं न वेद किं ऋचा करिष्यति। य इत्त द्विदुस्त इमे समासते॥**

ऋग्वेद १–१६४–३९.

या वैदिक ऋचेच्या अर्थांत ईश्वर हा आकाशासारखा सर्वत्र व्यापक असून तो सर्व विश्वाला आधार आहे, असें आपल्या ध्यानीं येतें. तसेंच ईश्वरास न मानणारे जीवंत असूनहीं त्यांचा कांहीं उपयोग नाहीं, ह्मणून त्यांच्या गुणांचाही उपयोग नाहीं, असेंच वरील ऋक् मंत्रांत सांगितलें आहे.

ईश्वराला न मानणाऱ्या लोकांनां नास्तिक असें ह्मणतात. असें लोक आधींच फार थोडे. आणि कांहीं कालानंतर हे नास्तिक खात्रीनें आस्तिक होतील. याचें मुख्य कारण असें कीं, ईश्वरापासूनच मनुष्य निर्माण जाहल्यानें त्या मानवी प्राण्याला थेट ईश्वरापर्यंत धांव घेतल्यावाचून चैनच पडणार नाहीं. तो मध्यंतरीं थांबू शकत नाहीं. समुद्राच्या पाण्याचे सूर्यकिरणानीं ढग होतात. नंतर त्यांतून पर्जन्यरूपानें तें जल पृथ्वीवर पडून नदीच्या रूपानें पुनः जसें समुद्रासच मिळतें, तद्वतच ईश्वरापासून निघालेला प्राणी अनेक जन्मरूपी संसार प्रवाहांतून शेवटीं ईश्वरस्वरूपास मिळलाच पाहिजे. अर्थात मानवी प्राण्यांला कांहीं तरी एका शाश्वत वस्तूचा आधार अत्यंत आवश्यक होतो; व जी वस्तु शाश्वत असते, ती सर्वव्यापी असलीच पाहिजे, असा शास्त्राचा सिद्धांत असल्यानें, सर्वव्यापी ईश्वरच शेवटीं सर्वांचा आधार ठरतो. ऋग्वेदांत सांगितलेला एक मंत्र मला मिळाला आहे. तो असाः—

अहमभुवं वसुनः पूर्व्यस्य तिरहं धनानि संजयामि शश्वतः ।
माहवन्ते पितरं न जंतवोऽहं दाशुषे विभजामि भोजनम् ॥ १ ॥
अहमिंद्रो न पराजिग्य इद्धनं न मृत्यवेऽवतस्थे कदाचन ।
सोममिन्मा सुन्वंतो याचता वसु न मे पूरवः सख्यरिषाथन ॥ २ ॥

ऋग्वेद मंत्र–१०–४८

या मंत्रांत ईश्वर स्वतः सर्वांना उपदेश करितो आहे, असें दाखविलें आहे. त्याचा अर्थ विचारून घेतां त्यांत–' मी सर्व जगताच्या पूर्वीं पासूनच आहे. याचा पालक मी सर्व प्रकारची धनदौलत मी माझ्या भक्तांना देतो; व अनादि कालापासून मी विजयी आहे. मी सनातन जगत्कारण आणि सर्व धनांचा विजय करणारा व दाता आहे. मलाच सर्व जीवांनीं पित्याप्रमाणें हांक मारावी. मी दानशील आहें ह्मणून, सर्व जीवांच्या सुखासाठीं मी जगतांतील भोग्य पदार्थांचा विभाग करितो. मी सर्वांचे पालन करितो. मी परम ऐश्वर्यवान् आहे. ह्मणून सूर्याप्रमाणें सर्व जगतांचा प्रकाश करणारा आहे. माझा कधींही पराजय होत नाहीं. मला कधींही मृत्यु नाहीं मी जगत्रूपीं धनाचा निर्माणकर्ता आहे. मी सर्व जगाची उत्पत्ति करणारा आहें, असें समजा. हे जीव हो! ऐश्वर्य प्राप्तीसाठीं यत्न करून तुह्मी माझ्याकडे विज्ञानादि धनाची याचना करा. माझ्या प्रेमाआड होऊं नका. मी सत्यभाषण व स्तुति करणाऱ्यांनां सनातन ज्ञानधन देतो ' या एका ऋग्वेदाच्या मंत्रावरून ईश्वराविषयीं बराचसा बोध होण्यासारखा आहे. यजुर्वेदांतही याविषयीं विचार कांहीं आहे काय? असा तपास करीत असतां पुढील मंत्र मिळालाः—

ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।

यजु. ४

अर्थः—' जगतांत जें जें काय दिसतें तें सर्व ईश्वरानें व्यापिलें आहे ' असा या मंत्राचा अर्थ असल्याचें समजतें. हें जसें वेदांत सांगितलें आहे तसेंच गीतेंतहीः—

मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥
गीता अ. ७ । ७.

अर्थ—'दोऱ्यांत जसे मणी ओंविलेले असतात त्याप्रमाणें अर्जुना, माझ्यामध्यें संपूर्ण ब्रह्मांड गोंविलेले आहे.' या श्लोकाची ज्ञानेश्वरी खालील प्रमाणें आहे:—

हें रोहिणीचें जळ । तयाचें पाहता येई मूळ ।
तैं रश्मी नव्हती केवळ । होय ते भानु ॥ १ ॥

तयाचि परी किरीटी । इया प्रकृति जालिये सृष्टि ।
सें उपसंहरुनी कीजे लठी । तैं मीच आहें ॥ २ ॥

ऐसें दिसे न दिसे । हें मजचि माजी असे ।
मी यां विश्व धरिजे जैसें । सूत्रें मणी ॥ ३ ॥

सुवर्णाचे मणी केले । ते सोनियाचे सुतीं ।
ओंविलें तैसे म्यां जग धरिलें । सबाह्याभ्यंतरी ॥ ४ ॥

पुस्तकांत दिलेला याचा अर्थ:— 'हें दृश्य विश्व, मृगजळासारखें आहे. मृगजळाचें मूळ पाहूं गेलें असतां, तें केवळ सूर्यकिरण नसून सूर्यच होय, त्याचप्रमाणें, अर्जुना, ज्या प्रकृतीपांसूनही सृष्टि झाली आहे, ती प्रकृति आणि सृष्टीही दिसत असूनही ती खोटी आहे. असा दृढ निश्चय झाला असतां, त्यांचे अधिष्ठान तत्व मीच आहें. अशा प्रकारें जें उत्पन्न होऊन दिसतें व नाहींसें होतें, तें माझ्याच ठिकाणीं होते. ज्या-प्रमाणें दोऱ्यानें मणी ओंविले असतात्त, त्याप्रमाणें मीही विश्व धरिलेलें आहे. सोन्याचे मणी करून सोन्याच्याच तारेंत ओंवावेत, त्याप्रमाणें हें सारें जग अंतर्बाह्य मीच व्यापिलें आहे.' याचप्रमाणें तुकाराम महाराजांनींही,—'सर्वांभूतीं असे देव विठ्ठल माझा वासुदेव।' असें आपल्या अभंगांत सांगितलें आहे. या प्रमाणें थेट वेदांपासून ते मराठी ग्रंथांपर्यंत ईश्वराचें वर्णन एकाच प्रकारचें केलेलें आढळतें तें असें कीं, ईश्वर सर्वांनुभूती आहे. परंतु तो आपल्या चर्म चक्षूंना दिसण्याजोगा नाहीं.

२९. **सत्य ज्ञानमनतम्**—परंतु येथें मोठा व सर्व साधारण प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, या तुमच्या सर्वव्यापी शाश्वत ईश्वराचें ज्ञान आह्मास कसें होणार? तो जर आह्मास दिसत नाहीं, आमच्याशीं बोलत चालत नाहीं, तर मग तो आहे हें शब्दावरूनच केवळ समजावयाचें कीं काय? व जर ईश्वराचें ज्ञान आह्मांस प्रत्यक्ष कधींच होत नाहीं, तर त्याची उपासना तरी कशी करावयाची? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, ईश्वराच्या स्वरूपाचें ज्ञानहीं इतर वस्तूंसारखेंच होऊं शकतें. ईश्वर स्वरूपाचें वर्णन सत्य, ज्ञान, अनंत, अशा रीतीनें केलें आहे. व या स्वरूपाच्या ईश्वराचें ज्ञान मनुष्यास होतच असतें. आमच्या बुद्धिचे सहायानें आह्मांस सत्यत्वाचें ज्ञान होऊं शकतें. कोणीं खरें बोललें म्हणजे तो खरें बोलतो, असें आपण म्हणतों. तसेंच, मला अमुक गोष्टीचें ज्ञान आहे, तमुक समजतें, असेंहीं आपण बोलतों. अर्थात, ज्ञान हा पदार्थ काय आहे, हेंही आमच्या नित्य अनुभवांतील आहे. आतां काय तें ईश्वराचें सर्वव्यापित्व आपल्या अनुभवास येत नाहीं, असें आपण कांहीं थोडा वेळ म्हणूं शकूं. परंतु थोड्या विचारा अंतीं ही शंकासुद्धां टिकणार नाहीं.

३०. **चक्षुर्वैसत्यं याचा फोलपणा**—असेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, चक्षुर्वैसत्यं या व्यवहारिक म्हणीस प्राधान्य देण्याचें बाबतींत एका गोष्टीचा विचार अवश्य आहे. मनुष्यमात्राच्या दृष्टीची रचना मर्यादित आहे. त्याची शक्तीही मर्यादित आहे. चर्मचक्षूंचा नुसता उपयोग केला असतां, एकादी वस्तू त्याला ज्या आकाराची दिसते, तोच आकार शास्त्रीय उपयोगाकरितां केलेल्या कांचांनीं, म्हणजे दुर्भिणीनें, कमी जास्त दिसतो. साध्या डोळ्यांनीं जो पदार्थ दिसत नाहीं, तो सूक्ष्मदर्शक यंत्रानें दिसतो. अशा शक्तीची कांच आपल्या चर्मचक्षूंत सहजसाध्य नाहीं. त्यामुळें या सृष्टींत खरोखरच सत्यत्वानें ज्यांचें अस्तित्व आहे ते पदार्थ अथवा जीवसुद्धां साध्या डोळ्यांनीं आपल्यास दिसत नाहींत. नित्यपरिचयाचें आमच्या तुमच्यामधील आकाश तें देखील आपल्या डोळ्यांस दिसत नाहीं. मग जगद्व्यापी जी परब्रह्म वस्तु तिचें ज्ञान सहज होणें शक्य कसें? सूक्ष्मदर्शक

यंत्राचे साह्यानें एक चमत्कार सर जॉन हिल्ल या एका युरोपियन गृहस्थांस पाहाण्यास मिळाला; आणि त्यानीं तो पाहिल्यानंतर त्याची हकीकत प्रसिद्ध केलेली माझ्या जवळच्या एका मुलानें मला वाचून सांगितली. ती वाचकांसही कळावी म्हणून येथें देत आहे.

३१. हे गृहस्थ एके रात्रीं एका समारंभास गेले होते. तेथें त्यांस एक पुष्पगुच्छ देण्यांत आला. त्याचा त्यानीं वास घेतला. तो त्यांस अत्यंत मनोहर वाटला. म्हणून पुनः पुनः त्याचा वास घेत असतां, त्यांस असें वाटलें कीं, त्यांत सुगंधा शिवाय कांहीं बारीक मधुर ध्वनीही ऐकूं येत आहे. या गोष्टीची खात्री करून घेण्याकरितां तो गुच्छ त्यांनीं तेथील इतर दोघांतिघांसही दाखविला. त्यांनाही त्यांतून मधुर ध्वनि येत असल्याचें आढळून आलें. असें पाहून त्यांतील चमत्कार काय आहे हें पाहण्या करितां, त्यांनीं तो गुच्छ संभाळून काळजीनें आपल्या घरीं नेला. आणि प्रातःकाळीं ज्या मधुर फुलांतून हा मधुर आस्वाद व विशेषतः मधुर ध्वनि येई, तें फूल काढून एका स्वच्छ टेबलावर ठेऊन तें फूल चाकूनें उघडिलें. तरी त्यांच्या साध्या नेत्रांस त्यांत कांहीं दिसलें नाहीं. मग एका सूक्ष्मदर्शक यंत्रानें त्यांत पाहतां, त्यांस अत्यंत आश्चर्यकारक प्रकार दिसून आला. तो असा; त्या फुलांत अत्यंत सूक्ष्म प्राणी आहेत. ते त्या पुष्प प्रांतांत पाकळ्याच्या बाजूनीं व मकरंदांत करून दिलेल्या निरनिराळ्या क्रीडाभुवनांत आनंदानें इतस्ततः उड्या मारीत आहेत. असें पाहून त्या गृहस्थास वाटलें कीं काय सुगंधमय या प्राण्यांचें जग हें! त्यांतील त्यांचा वास किती तरी सुखी व निरामय! त्यांचा त्यातील संसार, रहाणी, व्यवस्था, त्यांच्या वृत्ती वगैरेंचें त्यांनीं वर्णन फार वहारीचें केलें आहे. तें थॉमस डिक् एल एल. डी. यांचें 'क्रिश्चन फिलासफर' या नावचे पुस्तकांत आहे. ही गोष्ट सांगण्याचा हेतु इतकाच कीं आमच्या या जड परंतु निसर्गनेत्रांच्या अवलोकन शक्तीच्या बाहेर अशीं अनेक जगें आहेत; व तीं या साध्या दृष्टीस दिसणें शक्य नाहीं. ईश्वर जगद्रूप आहे. परंतु तोच अनंत असल्यामुळें आमच्या साध्या डोळ्यांस तो दिसावा अशी हक्कानें इच्छा करणें शहाणपणाचें नव्हे.

असें पहा की, आपल्या नित्य अनुभवांत ज्याचें आपणास प्रत्यक्ष ज्ञान होतें असें समजतो, व जें डोळ्यानें दिसतें असें म्हणतो, तीं एकादी लहानशी खुर्ची तरी पाहतांच संपूर्ण आपणांस दिसते कां? एकाद्या बंगल्यासमोर आपण उभे राहिलों म्हणजे तो बंगला आपणास दिसतो, असें आपण म्हणतो; परंतु तो सर्वच बंगला आपल्या डोळ्यांस दिसतो कीं, बंगल्याचा पुढील थोडासा भागच आपल्यास दिसतो? याचा कधीं आपण विचार केला आहे काय? ज्या ज्या वस्तू आपल्यास प्रत्यक्ष डोळ्यानें दिसतात त्या त्या संपूर्ण दिसत नसून त्यांचा कांहींसा भागच आपल्यास दिसतो: व तेवढ्या मुळेंच आपण त्या वस्तू आपणास दिसतात असें म्हणतो. तद्वतच ईश्वराच्या स्वरूपाचा भाग जें सत्य, व ज्ञान, हे जर आपल्या प्रत्यक्ष अनुभवास येतें, तर मग ईश्वराचा अनुभव नाहीं, असें कसें म्हणता येईल? या वरून हें सत्य आणि ज्ञान, या जड सृष्टींत सर्व व्यापी आहे, हेंहीं सहजच सिद्ध होत नाहीं काय? कारण प्रत्येक वस्तूंत खरेपणा व खोटेपणा ही, आहेच. जसें बोलणें खरेंही असतें व खोटेही असतें, तसेंच रूपया खराही असतो व खोटाही असतो, नोट खरीही असते व खोटीही असते. तात्पर्य काय कीं खरेपणा सर्वत्र आहे. अणुरेणूंतही आहे. तो कोठें नाहीं असा नाहीं; तर मग, ईश्वर सर्वव्यापी आहे, असें म्हणण्यास काय हरकत आहे? यावर कोणी असें विचारतील कीं जर तुमचा ईश्वर समजण्यास येवढा सोपा आहे, तर त्या ईश्वराच्या ज्ञानासाठीं एवढीं शास्त्रें व पुराणें आणि गुरुकृपा कशास पाहिजे? खरें काय आहे हें आम्हास सहज समजतें; व ज्ञान कशास म्हणतात. तेंही ठाऊक आहे. मग तें तुमचें गीता वाक्य असें विपरीत कां सागतें तें पहा—

> **बहूनां जन्मनामंते ज्ञानवान् मां प्रपद्यते ।**
> **वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥**

गीता अ. ७

अर्थः—‘अनंत जन्मानंतर ईश्वर सर्वात्मक व सर्वांतर्यामी आहे, असें ज्ञान प्राप्त होतें हें ज्ञान होणारा महात्मा अत्यंत दुर्लभ आहे.’ अशा प्रकारें

भगवंतांनीं ईश्वरज्ञान झालेल्या लोकांची दुर्लभता कां सांगितली? तसेंच 'स गुरुमेव अभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठं।' म्हणजे ब्रह्मज्ञान किंवा ईश्वरज्ञानासाठीं सद्गुरूलांच शरण गेलें पाहिजे, असें वेदांत सांगण्याचें कारण काय? ह्या शंकेचें निवारण छांदोग्योपनिषदांत इंद्र व विरोचन यांनां प्रजापति कडून ईश्वर ज्ञान (ब्रह्मज्ञान) प्राप्त होण्याच्या बाबतींत जी हकीकत सांगितली आहे त्यांत केलेलें आहे.

३२ **ब्रह्मस्वरूपाचे ज्ञानार्थ इंद्र व विरोचन यांची तपश्चर्या**— देवाच्या तर्फे इंद्र, व दैत्याच्या तर्फे विरोचन असे दोघे मिळून प्रजापतीकडे ब्रह्मज्ञानाकरितां गेले. कारण एक ब्रह्मज्ञान झालें म्हणजे सर्व कामना पूर्ण होतात, अखंड आनंद प्राप्त होतो, असें त्यानी ऐकिलें होतें, त्यास अनुसरून इंद्र व विरोचन या उभयतांनीं प्रजापतीकडे जाऊन ब्रह्मज्ञानाचा आपल्यास उपदेश करावा अशी विनंति केली. ही विनंति ऐकून 'बत्तीस वर्षेपर्यंत ब्रह्मचर्य व्रतानें एथें रहा म्हणजे ज्ञानोपदेश करीन,' असें त्या उभयतांस प्रजापतींनीं सांगितलें. आज्ञानुसार बत्तीस वर्षे पर्यंत ब्रह्मचर्यानें वास केल्या नंतर, 'डोळयाच्या बुबळांत जें आपलें प्रतिबिंब दिसतें तेच ब्रह्म' असें सांगितलें. नंतर ह्यानां उत्तमोत्तम पोषाक करून एका भांड्यांत पाणी घेऊन 'ह्यांत जे प्रतिबिंब दिसतें, तो आत्मा आहे' असें नीट समजाऊन दिलें. या एवढ्याच ज्ञानानें विरोचनाचें समाधान झालें, आणि तो दैत्य लोकास चालता झाला. इंद्र मात्र, या असल्या ज्ञानानें तृप्त झाला नाहीं. त्यास वाटलें कीं प्रतिबिंब जर आत्मा किंवा ब्रह्म आहे, तर मग तें नाश कां पावतें? तसेंच, देहाचा एखादा हात पाय अथवा कोणतेंही इंद्रिय नाहींसें झालें कीं प्रतिबिंबही लुलें पांगळें होते. तेव्हां य अशा ब्रह्मापासून आनंद तो कसला? व शाश्वत सुख तरी कसलें? असा विचारकरून इंद्र पुनः प्रजापतीकडे बत्तीस वर्षेपर्यंत ब्रह्मचर्यव्रतानें राहिला. तें त्याचें व्रत पाहून प्रजापतीनें 'स्वप्नामध्यें ज्याला सर्व प्रकारचे सुखानुभव मिळतात, तो आत्मा तेंच ब्रह्म' असा उपदेश केला. परंतु यानेंही इंद्राचें समाधान झालें नाहीं. स्वप्नांत जसें आपल्यास सुखानुभव मिळतात, तसेंच एखादे वेळीं हात पायही

आपेल तुटलेले आहेत असेंही अनुभवास येतें. अर्थात् असला आत्मा कांहीं शाश्वत नव्हे असें त्यास वाटून पुनः त्यानें बत्तीस वर्षें प्रजापतीकडे ब्रह्मचर्यानें वास केला. नंतर प्रजातींनीं 'गाढ झोंपेंत शांतपणाचा जो उपयोग घेतो, तोच आत्मा, तेंच ब्रह्म,' असा उपदेश केला. झोंपेंत शांत पणाचा अनुभव घेतो खरा, परंतु तो अनुभव घेत असतांनां, आपण अमुक आहोंत असें भान नसतें. तेव्हां गाढ झोंपेंत आत्म सुख किंवा सुख जरी असलेंच तरी त्याचा आम्हास काय उपयोग? अशी शंका येऊन इंद्रानें पुनः प्रजापतीकडे जाऊन विनंति केली कीं, महाराज, हा गाढ झोंपेंतील आत्मा मला पटत नाहीं. यावर प्रजापतीनें उत्तर दिलें कीं आतां पांच वर्षें ब्रह्मचर्य व्रतानें रहा. म्हणजे मी तुला ब्रह्मज्ञानाचा म्हणजे ईश्वरज्ञानाचा उपदेश करितों. अशा रीतीनें इंद्रानें जेव्हां १०१ वर्षें गुरुगृहीं व्रतस्थ राहून त्याची सेवा केली. तेव्हां त्यास क्रमाक्रमानें सर्वांतर्यामी ब्रह्मज्ञान म्हणा, किंवा आत्मज्ञान म्हणा, ईश्वरज्ञान म्हणा, प्राप्त झालें. या गोष्टीवरून सर्वांतर्यामी ईश्वरज्ञानास केवढा खटाटोप पडतो, हें जर सिद्ध होतें. तर नुसतें, सत्य म्हणजें काय? किंवा ज्ञान म्हणजे काय? हें समजलें कीं, ईश्वरज्ञान झालें असें कसें म्हणतां येईल, अशी शंका कायमच राहते.

३३. **सत्यासत्याचा विचार**—यावर उत्तर असें आहे कीं, आम्हास सत्य व ज्ञान याचा तत्वतः बोधच नसतो सामान्यतः आम्ही ज्यास सत्य म्हणतों, तें सत्य खालच्या प्रतीचें आहे; खरें सत्य तें नव्हे. शास्त्रकारांच्या भाषेंत त्यास व्यवाहारिक सत्य म्हणतां येईल. आतां अंधारांत एखादा लांकडाचा ठोकळा पाहिला म्हणजे, तें भूत आहे, असें आपल्यास खरेंच वाटतें; व अंगास दरदरून घामही सुटतो; हात पाय लटपटतात; बोबडी वळते; एक पाऊलही पुढें टाकवत नाहीं; आणि कदाचित् बेशुद्धही होण्याची वेळ येते. हें जें सर्व होतें तें त्यावेळीं तो लांकडाचा ठोकळा खरोखरच भूत आहे असें आपल्यास वाटतें म्हणूनच होय तेव्हां त्या वेळेपुरतें त्या भूताजें सत्यत्व मानण्यास कांहीं हरकत नाहीं. मात्र त्या सत्यास शास्त्रकारानीं 'सत्याचा भास' असें म्हटलें आहे. हें सत्य वर

सांगितलेल्या व्यवाहारिक सत्यापेक्षां कमी प्रतीचें आहे. कारण कोणीतरी मनुष्यानें, बाबारे, तें भूत नव्हे, लांकूड आहे, असें सांगतांच त्या मनुष्याचें भय नाहींसे होतें; धैर्य येतें; व तो सुखानें चालून आपल्या घरीं जातो. याप्रमाणें सत्याचा मनुष्याला भ्रम होऊन भासणारें, व व्यवाहारिक म्हणजे आपल्या नित्य व्यवहारांतील सत्य, असे दोन भेद आपल्या अनुभवावरून सिद्ध झाले; तद्वतच या व्यवहारिक सत्यापेक्षां उच्च दर्जाचे पारमार्थिक एक तिसऱ्या प्रकारचें आहे. हेंही सहजच सिद्ध होते. भासणारें सत्य जसें, कोणीतरी जाणत्या व धीट मनुष्यानें सांगितल्यानंतर खोटें ठरतें, तसेंच ज्ञात्या गुरूंनीं बोध केल्यानंतर, व वेदशास्त्रादिकांच्या अभ्यासानंतर, व्यवहारिक सत्यही खोटें ठरतें, व ह्यापेक्षां उच्च दर्जाचें पारमार्थिक सत्य आपल्या बुद्धीं पटूं-लागतें. आमचे व्यवहारांतील सत्य म्हणजे कांहींतरी द्रव्याचा वगैरे इच्छित वस्तूंचा प्रत्यक्ष लाभ झाला कीं आम्हास आनंद होणें व तें द्रव्य माझें आहे, असें म्हणणें; तसेंच काहीं थोडी हानी झाली कीं त्यासाठीं दुःख होणें आणि तळमळणें, अशा प्रकारचें आहे. आमचें घर आमची संपत्ती हें सर्व आम्हास खरेंच वाटतें. तसेंच आमचें मामा, आमचें बंधू हें सारें आपण खरें समजतों. परंतु त्याचा थोडा सूक्ष्म विचार केला कीं सत्य म्हणून मानली गेलेली ही आमची कल्पना साफ खोटी ठरते; व त्या त्या वस्तूंचें सत्यत्व निराळें भासूं लागतें. आम्ही ज्या व्यक्तीस मामा म्हणतो त्या व्यक्तीस त्यांचे निरनिराळे आप्त त्यास काका, बाबा, भाऊ, भाचा, अशी हाक मारितात; व तेंच खरे धरून चालतात. परंतु सर्वांच्या दृष्टीनें मामा किंवा पिता हें रूप कांहीं खरें नानीं सर्वांच्या दृष्टीनें त्या व्यक्तीचें खरें स्वरूप 'मनुष्य' हेंच आहे. हें जसें थोडक्या विचारासें व्यावहारिक सत्य बदललें, त्याप्रमाणें त्याच्याहीं पेक्षां जास्ती विचार केला असतां, थेट परब्रह्म स्वरूपी ईश्वरापर्यंत याची मजल जाऊन पोंचणार; व शेवटीं आपल्या वाणीचीही गति कुंठित होणार, असा हा सत्या सत्यतेचा विचार आहे. नुसतें व्यवहारांतील सत्य आम्हास उमजलें, तथापि ईश्वर स्वरूपाचें ज्ञान झालें असें नसून खऱ्या पारमार्थिक सत्याच्या ज्ञानाकरितां गुरूंचा उपदेश सज्जनांची संगति, व वेद शास्त्राचा अभ्यास यांची अवश्यकता कमी होत नाहीं; व हें

सर्व जुळून येण्यालाच अनंत जन्म लागतात, अशा उद्देशानें भगवंतांनीं गीतेंत, 'बहूनां जन्मना मंते ज्ञानवान् मां प्रपद्यते' असें सांगितलेलें आहे.

३४ आमच्या हिंदुस्थानांतील समाजांत 'सुमुहुर्त सावधान' करून घेण्याची फार उत्तंठ असते. 'माझ्या बाळ्याचे दोनहाताचे च्यार हात झाले कीं आम्ही कृतकृत्य झालों'! असें आईबाप समजतात व ती कृतकृत्यता त्रिकालाबाधित आहे, असेंही त्यानां वाटत असतें आधीं 'आहार' म्हणजे उदरपोषण याची व्यवस्था, मुलांकडील व मुलीकडील पूर्ण असल्या शिवाय, विहाराचें वैवाहिक सुख काय कामाचें आहे? ही व्यवहरांतील गोष्ट सुद्धां त्याच्या ध्यानी येत नाहीं. कोट्यावधी लोकांनीं सुमुहुर्त सावधान करून घेतलें; प्रत्यहीं घेतातही. परंतु 'सावधान' या शब्दाचा खरा अर्थ एक श्रीसमर्थ रामदासानींच ओळखिला अशा अर्थी एक आर्या आहे ती खाली दिली आहे:—

**'द्विज सावधान' ऐसें सर्वत्र विवाह मंगलीं म्हणती ॥**
**तें एक रामदासें आयकिलें त्या भसो सदा प्रणती ॥**

आह्मा संसारी लोकांपेक्षां ते कमी ज्ञानीं होते काय? दासबोधासारखा ज्यांच्या ग्रंथाच्या वाचनानें आम्ही जर आपणास धन्य समजतों, तर ते समर्थ आमच्या पेक्षां कमी कसे! तात्पर्य हेंच कीं आम्हास जें 'सत्य' किंवा 'ज्ञान' म्हणून माहित आहे, याच्याही पेक्षां उच्च दर्जाचें सत्य आणि ज्ञान, हें फार निराळें आहे. यांत तिलप्राय संशय नाहीं. अर्थात त्या ज्ञानाचा व सत्याचा आपल्यास बोध होण्याकरितांच वेद शास्त्रें आणि सद्गुरूंची गरज आहे. मात्र पारमार्थिक सत्याकडे जाण्याकरितां आपल्यास व्यावहारिक सत्याची पूर्ण जाणीव पाहिजे. विद्या शिकतांना जशी प्रथम अक्षरओळख, तसेंच प्रथम व्यावहारिक सत्यालाच आपण देव अथवा ईश्वर असें धरून चालावें. व त्यांच्या आश्रयानें पुढील पारमार्थिक सत्यरूपी परमेश्वराच्या ज्ञानाचा मार्ग क्रमानें आक्रमावा. व्यवहारांत ज्यांच्याशी आपला संबंध होतो, त्यांच्याशीं आपल्या वागणुकींत सत्य भाग कोणता याचा नीट विचार करावा.

---

प्रकरण ५ वें.

# प्रभूच्या सत्यस्वरूपाची व अनंतत्वाची प्रतीति, तत्प्रीत्यर्थ ईश्वरोपासना व तिचीं साधनें.

देव पहायासी आलो । मीच देव होवुनि ठेलो ॥

—तुकाराम.

३५. **उपासनेस योग्य स्थळ, आसन, व मनाची एकाग्रता:—** वरील विचारानें आपल्यास सत्य कोणतें आणि असत्य कोणतें समजल्या नंतर ह्या अंशभूत ईश्वर ज्ञानावरच तृप्त न होतां ईश्वराच्या पारमार्थिक सत्यस्वरूपांची आणि अनंत तत्वाची प्रतीति पाहण्याचे प्रयत्नास लागावें. याकरितां रोज पवित्र ठिकाणीं एकांत वास करण्याची अवश्यकता आहे. अशा एकांत वासास ईश्वरसांनिध्य अथवा उपासना म्हणतात, असें पुढें सांगितलें आहे. श्रीमद्‌भगवद्गीतेंत म्हटले आहे:—

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः ।
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥
तत्रैकाग्रं मनः कृत्वा यत चित्तेंद्रियक्रियः ॥

गीता—

अर्थ—'देवगृहासारख्या शुद्ध ठिकाणीं अति उंच किंवा अति सखल नव्हे असें अर्थात् मध्यम प्रतीचें आसन घालावें. हीं आसनें तीन असावींत; प्रथम जमीनीवर दर्भाचें आसन, त्यावर व्याघ्राचें किंवा हरणाचें कातडें व ह्यावर तिसरें कोणत्याही प्रकारच्या स्वच्छ कापडाचें आसन असावें. अशा प्रकारच्या सोईकर आसनावर बसून, सर्व इंद्रियांचा निरोध करून, अंतःकरणाची एकाग्रता करावी.' प्रथम ही एकाग्रता होत नाहीं. डोळे झांकून बसलें कीं मन स्थिर होण्याचे ऐवजी चंचलच जास्ती होतें. ज्या गोष्टी मनांत यावयास नको आहेत, त्या हटकून येतात; व ईश्वर चिंतनाकडे मन लागण्याच्या ऐवजीं प्रपंचाचा विचारच जास्ती चालूं लागतो.

एक गृहस्थ देवपूजा करीत असतां, त्याचे चित्त चांभाराच्या घरीं आपल्या जोड्याकडे गेलें. त्याबद्दल त्याच्या ज्ञानी सुनेनें त्याची त्यास लागलीच कशी आठवण दिली, ही गोष्ट बहुश्रुत आहेच. गोष्ट खरी असो कीं काल्पित असो, परंतु तींतील मर्म मात्र लक्षांत ठेवण्याजोगें आहे.

**मनसैवकृतं राम न शरीरकृतं कृतम् ।**

**योगवासिष्ठ—**

**अर्थ**—वसिष्ठ म्हणतात 'रामा मनापासून जें केलें तेंच खरोखर केल्यासारखें होतें नुसत्या शरीरानें नित्यक्रमांत जें कांहीं करितात, तें कांहीं खरें करणें नव्हे.' अर्थात् ईश्वराच्या चिंतनांत मनास स्थिर व एकाग्र करण्याचा मुख्य प्रयत्न केला पाहिजे मन स्थिर व एकाग्र करण्याकारितां पातंजल योगसूत्रांत

**अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः ।**

असें सांगितलें आहे.

**अर्थः**— अभ्यासानें आणि वैराग्यानें त्या मनाचा निरोध होऊं शकतो. हा जो ईश्वर चिंतनाचा अभ्यास ह्यासच—

३६. **'ईश्वरोपासना'** असें नांव देण्यात आलें आहे. 'उप' म्हणजे जवळ आणि 'आसन' म्हणजे बसणें, असा उपासना शब्दाचा अर्थ आहे ईश्वराचें सांनिध्य संपादन करण्यासाठीं, तसेंच तो सदा व सर्वत्र आहे, इत्यादि गुणांचा साक्षात्कार करून घेण्याकरितां जीं कांहीं कृत्यें करावीं लागतात, त्या सर्वांना 'उपासना' म्हणतात.

३७. **उपासनेचीं अवश्य साधनें**:—उपासना आपल्या हातून उत्तम रीतीनें पार पाडण्यासाठीं अवश्य साधनें म्हणजे वैराग्य, मुमुक्षा, शम-दमाची जोडी, निवृत्ति, तितिक्षा, श्रद्धा, व समाधान. अशा साधनांची आणि यम व नियमांची अत्यंत अवश्यकता आहे. वैराग्य म्हणजे ऐहिक वस्तूवर प्रेम नसणें; मुमुक्षा, म्हणजे मोक्षाची अर्थात ईश्वरप्राप्तीची इच्छा; शम म्हणजे वासनेचा त्याग; दम म्हणजे इंद्रियावर ताबा; निवृत्ति म्हणजे विष-

यांवर अप्रीति; तितिक्षा म्हणजे दु:खें सोसणें; श्रद्धा म्हणजे सद्गुरूंच्या वचनांवर आणि वेदांवर विश्वास. समाधान म्हणजे मनाची एकाग्रता; यांत मुमुक्षा हा संसार बंधनापासून सुटणेची इच्छा, महत्वाची आहे.

३८. **वैराग्य**—वरील उपासनेच्या साधनांत अग्रस्थान वैराग्यास दिलें आहे. 'वैराग्य' या शब्दाचा अर्थ खोट्यावस्तूंवर प्रेम न ठेवणें; त्यांचा खोटेपणा ओळखणें; त्यांच्याबद्दल उदासीनवृत्ति असणें; पण अशी स्थिति होण्यास त्यांचा खोटेपणा पटावा लागतो. हा पटतो केव्हां? जेव्हां त्या वस्तूच आपल्यास दु:खद होतात, अथवा त्यांत खरें नाहीं असें जेव्हां आपल्यास अनुभवास येते तेव्हां. हा अनुभव केव्हां येतो? आपल्या आपत्कालीं. अशा आपत्कालांत सुद्धां जेव्हां आपल्यास चांगलीच ठेंच लागते व असें कळून येतें कीं ज्या वस्तू अगर मनुष्यें आपलीं, व जीं आपणाला सुख देणारीं आहेत, असें आपण मानलें त्या पैकीं दर एक आपआपल्या पूर्तीं आहेत, आणि संकट समयीं त्यांत एक ही उपयोगी पडणारें नाहीं. असें अनुभवास आल्यावरच त्यांचा खोटेपणा पटतो. आणि मग विचार होतो कीं या सर्वांवर प्रेम मीं व्यर्थ केलें. यांत माझा काल, द्रव्य, सामर्थ्य, आणि पुण्याई व्यर्थ खर्च केली. या सर्वांचा गड्डाच जर खोटा तर हें सर्व त्याचेवर रचलें गेल्या मुळें तें सर्व खोटें होणारच. हा गड्डा म्हणजे मीपण या मींपणास मी, मला, म्यां, मजसाठीं, मजपासून, माझें, माझ्यांत, इतक्या विभक्ती लावून, त्याच्या धुंदीत आयुष्याची हानी झाली, हें सर्व एकां 'मी' नें मला फसविलें मुळेंच संबोधन विभक्तीने पश्चात्तापांत 'अरे मी' यांत पर्यवसान होऊन आपले हा वेळपर्यंत गेलेलें आयुष्य फुकट गेलें अशी खात्रीच पटतें. अशी ठेंच लागल्यानें शाहणा मनुष्य विरक्त होतो; व आपल्या मागील व्यर्थ गेलेल्या दिवसांत कोठेंतरी व कांहींतरी आपल्यास खरें सुख मिळालें काय? व गर्भावस्थेपासून कसा संकटांच्या व नजरभूलींत आपला काल गेला, याचें सिंहावलोकन करीत त्याला पश्चात्ताप होतो. अशा स्थितींत तो पूर्वक्रमापासून उलट खातो, आणि मग अविचार सोडूना विवेकी बनतो; आणि मग, अखंड सुखदाता जो प्रभू, त्याच्या उपासनेकडे वळून त्या कार्यास

अवश्य असणारी साधनसंपत्ति मिळविण्याचा प्रयत्न करितो. हेतु काय कीं या संसाराच्या म्हणजे जन्म मरणाच्या चक्रांतून सुटावें. याप्रमाणें 'वैराग्य' उत्पन्न झाल्यावर तें उत्तम रीतीनें टिकलें पाहिजे म्हणून—

**विरक्तें विवेकें असावें । विरक्तें आध्यात्म वाढवावें ।**
**विरक्तें धारिष्ट वाढवावें । दमना विषयीं ॥**

**विरक्तें करावें साधन । विरक्तें लावावें भजन ।**
**विरक्तें विशेष ब्रह्मज्ञान । प्रगटवावें ॥**

**विरक्तें भक्ति वाढवावी । विरक्तें शांति दाखवावी ।**
**विरक्तें यत्नें करावी । विरक्ती आपली ॥**

**विरक्तें सत्क्रिया प्रतिष्टावी । विरक्तें निवृत्ती विस्तरावी ।**
**विरक्तें नैराश्यता धरावी । सद्दढ जीवीं ॥**

दासबोध—

याचप्रमाणें त्यानें नीतीनें चालावें क्षमा धरावी ; सन्मार्ग व सत्वगुणाचा अंगीकार करावा ; अत्यंत दक्ष असावें; अंतर्मुख व्हावें. अभ्यास करून क्रमाक्रमानें परमार्थ संपादन करावा ; आणि त्या करितां आपला निश्चय अढळ ठेवावा. हें सर्व करणे तें मोक्षाप्रीत्यर्थ जी उपासना ती साधण्या करितांच आहे. त्या मोक्षाची इच्छा उत्कट असावी लागते. तिलाच,

३९. **मुमुक्षा**—असें नांव आहे. 'मोक्ष' याचा अर्थ यापूर्वी वर दिलाच आहे. तो क्षणभंगुर विषयांच्या वृत्तींतून सुटणें इतकाच समजण्याचा नाहीं मुमुक्षा यांत मोक्षाची इच्छा असा अर्थ आहे. विषयांच्या पाशांतून सुटून प्रभूच्या सांनिध्याची व प्रेमाची अपेक्षा करणें, इतका व्यापक 'मुमुक्षा' या शब्दाचा अर्थ समजण्याचा आहे. येथें मुमुक्षत्व जोरानें येण्यापूर्वी, साधक, संसारानें पूर्ण दुखावलेला असतो; त्रिविधतापानें पोळलेला असतो; अंतःकरणांत त्याची वृत्ति पालटलेली असते; अर्थात प्रपंचांत तो उदास होतो; विषयांस त्रासलेला असतो; आणि पुरे पुरे हा संसार, असें त्यास होऊन गेलें असतें. कारण, त्याची खातरी होऊन गेली असते कीं, संसार हा नाशवंत आहे, यांत केलेलें श्रम व्यर्थ झालें, आयुष्य त्याचेंकरितां

व्यर्थ वेंचलें. अशा पश्चात्तापानें, आतां यांतून सुटून प्रभूचे चरणीं लीन होऊन, आपल्या जन्माचें सार्थक करून घेणें अत्यंत जरूर आहे असें त्यास वाटते. व ही इच्छा अत्यंत प्रबल होते. त्याचा अहंभाव गळून गेला असल्यामुळें सर्वस्वी ईश्वराकडे त्याचें चित्त वळतें आणि तो सत्संगति मिळविण्याच्या खटपटीस लागतो आणि सद्गुरूस शरण येतो. येथें तो खरा 'साधक' बनतो; आणि परमार्थाची उत्कट इच्छा धरून, तो आपल्यास मिळावा अशी सद्गुरूस प्रार्थना करितो. परमार्थप्राप्तीची त्यास हांव सुटते. उद्विग्न मनास शांति केव्हां मिळेल असें होते. त्याचा संसाराचा आधार सर्वस्वी सुटलेला असतो. म्हणून खरा आधार जो परमार्थ त्याचे प्राप्ती करितां तो अत्यंत आतुर होतो. अशी जी मोक्षाकरितां अत्यंत आतुरता तिलाच मुमुक्षा म्हणतात. अशी आतुरता असल्या शिवाय उपासना कसली ?

४० अशा रीतीनें वैराग्य व मुमुक्षा या दोन साधनानीं युक्त होऊन साधक सद्गुरुपाशीं आला म्हणजे, लागलींच त्यास परमार्थ मिळतो असें थोडेंच आहे. सोन्याची परीक्षा करण्याकरितां परीक्षक जसा निकषावर सुवर्ण घांसून, अग्नींत तापवून सुलाखून, तें खरें उत्तम सोनें आहे काय, याची खातरी करून घेतो, त्याचप्रमाणें सद्गुरुकडची स्थिति आहे. कारण, वैराग्य व मुमुक्षा साधकास खरी बाणली आहे किंवा नाहीं, याची सत्वपरिक्षा करणें अवश्य आहेच. कारण ज्या षड्रिपूंच्या तडाख्यास साधक त्रस्त होऊन वा भिऊन विरक्त व मुमुक्षु बनला असतो ते षड्रिपू कांहीं सामान्य शक्तीचे नव्हेत. त्यांची पकड मोठी कठीण आहे. विषयी मनुष्य जसा विषयांच्या आघातामुळें त्रस्त होऊन बराच कालपर्यंत त्यांच्यापासून अलग राहिला असतां त्याचे विषयी स्नेही त्यास पुनः त्याला आपल्या मंडळीत खेचून आणूं पहातात, तद्वत्तच हे षड्रिपू साधकाची अखेरपर्यंत पाठ पुरवितात असा अनुभव आहेच. म्हणून साधकानें त्यांच्या आहारीं पडू नये म्हणून शमदमाचे साधनाची मूस करून गुरु त्यांत त्यास तापवितात. या दोन साधनापैकीं,

४१. **शम—** म्हणजे वासनेचा क्षय, वासनेचा नाश. तिला जाळून टाकणें याचें नांव शम. आतां संसारांत मनुष्य असतांना या वासनेची संगति त्याच्या बालपणापासून त्यास असते. त्या संगतीचे परिणाम त्याचे रक्तांत रोम रोमीं भरले असतात. तिचा नाश करणें अत्यंत दुर्घट काम आहे. आणि परमार्थाच्या साधनांत तर ती अगदींच उपयोगी नाहीं. विश्वामित्र पराशरांसारख्या तपोनिधींस सुद्धां या वासनेनें जेरीस आणलें. इतकें या वासनेचें सामर्थ्य आहे. तिचा त्याग होणें अत्यंत दुर्घट आहे. ती पूर्णपणें नाहींशी करण्यास बळकट व निश्चयाचा अभ्यास लागतो. ती निर्मूळ झाल्याशिवाय शम म्हणजे शांति येत नाहीं. आणि मनांस अर्थात विषयेंद्रियांस शांति प्राप्त झाल्याशिवाय पुढील साधनें दुष्प्राप्य आहेत, म्हणून सद्‌गुरूकडे आल्यावर पहिली साधनतपश्चर्या या शमाची करावी लागते. ती तपश्चर्याकरून साधक तयार झाला असतां पुढील साधन उपासनेच्या कार्यांत,

४२. **दम.—** म्हणजे, विषयेंद्रियांवर ताबा मिळणें. हीं इंद्रियें सुद्धां अनावर असतात. बहु कालपर्यंत त्याच्या स्वैर वर्तनानें त्यानीं मनावर आपली सत्ता गाजविली असते. ती सत्ता एकाएकी कमी होणें सुसाध्य नसतें. यमनियमांनीं त्यांस हस्तगत करावें लागतें. हे यमनियम पुढें सांगण्यात येतीलच. येथें इतकेंच सांगितलें म्हणजे पुरें आहे कीं पंच कर्मेंद्रियें व पंच ज्ञानेंद्रियें, यां शिवाय 'मन' हें एक इंद्रियच आहे. याचा निग्रह करणें कठिण आहे. तथापि वैराग्य, मुमुक्षा व वासनाक्षय या दर एक साधनांत मनोनिग्रहाचा भाग विशेष आहे.

४३. आतां मनुष्याच्या देहांत मन हें यंत्र फार महत्वाचें आहे. हें अंतःकरणपंचकांपैकीं विशेष खेळ करणारें मुख्य इंद्रिय आहे. हें स्वतः नादान असून ज्याच्या हातांत सांपडेल त्याच्या सारिखें वागण्याचा याचा स्वभाव आहे. याची चार रूपें आहेत. मन, बुद्धि, चित्त व अहंकार असे ते प्रकार आहेत. ज्याच्यांत अनेक कल्पना व संशय उत्पन्न होतात, अमुक

होय, अमुक नव्हे असें ज्यास वाटतें, तेंच मोठें खोटें मन होय. ज्या स्थितींत अमुक गोष्ट होय किंवा नाहीं याचा निश्चय होतो, त्या स्थितींत त्यास बुद्धि असें म्हणतात. ठरलेल्या गोष्टींचें चिंतन करणारें चित्त आहे. आणि हरएक व्यवहारांत या देहाचा चालक अहंकार आहे. ही चारीं रूपें घेतलेलें मन खोटें आहे. पण याच्याच संगतीमुळें जीव संकटांत सांपडतो. या एकाला ताब्यांत ठेवल्यास सर्व इंद्रियें ताब्यांत राहतात. श्रीशंराचार्यांनीं आपल्या उपदेशसाहस्री नामक ग्रंथांत 'आत्म्याचा मनास उपदेश' नामक प्रकरणांत या मनानें शांति वरावी म्हणून बोध केला आहे. त्यांत मन योग वाही आहे, 'मी व माझें' अशा व्यर्थ भावनांनीं दुसऱ्याचें ओझें हें मन वाहत असतें, त्यांत त्याचा अगर आत्म्याचा दोघांचाही फायदा नसतो, कारण आत्मा सदा तृप्त असून त्याला कसलीही इच्छा नाहीं, आणि हावऱ्या मनास कधींही शांति नाहीं, मग कसलीही व्यर्थ खटपट न करितां मनानें शांत रहावें, हेंच सुखावह आहे, याप्रमाणें इंद्रियें व मन यांजवर ताबा मिळाला म्हणजे विषयाची सत्ता बंद पडते, ते पंगू होतात, उपासना शांत चित्तानें होते, इत्यादि म्हटलें आहे. मग अर्थात्

४४. निवृत्ति—प्राप्तहोते. 'निवृत्ति' म्हणजे वृत्ती मनावर न उठणे. विषयांपासून मन परतविलें तर त्यांबद्दल कल्पना अगर त्यांचे चिंतन तरी कसें होणार? वृत्ती म्हणजे 'लाटा' मनांत उद्भवत नाहींत. साधारणपणें मन कोणत्याना कोणत्या तरी व्यापांत असल्या मुळें त्यांत अनेक तऱ्हेच्या क्षणोक्षणीं कल्पना येतात. मन केव्हांही रिकामे असत नाहीं. असंख्य कल्पना येतात जातात. सर्वच कल्पनांत मन गुंतून राहत नाहीं. परंतु ज्या विषयाचा त्यास विशेष परिचय, त्याबद्दलच्या कल्पनांत तें रमतें. म्हणून व्यावहारिक विषयांत तें मन गुंतूच नये, म्हणून शम दमाचें साधन सांगितलें. त्याच्या अभ्यासानें हळू हळू वृत्ती बंद पडत जातात. परंतु कोणत्याही दोन वृत्तींमध्यें अंतर, अगदीं कमी कालाचें असेना, असतेंच. हें अंतर कमी कमी न होतां वृद्धिंगत होत जातें. असें अंतर वाढत जातें, आणि त्या कालांत ईश्वर चिंतन होत गेलें म्हणजे विषयां कडून मन परततें. अशा

स्थितीला 'निवृत्ति' म्हणतात. याच्या नंतरचें साधन,

४५. तितिक्षा—म्हणजे संकटें, धक्के शांतपणें सोसणें, मनुष्याचे प्रारब्धानें त्याच्या आयुष्यांत त्यांस अनेक संकटें प्राप्त होतात. द्रव्यनाश, प्रकृतीस विकार, अपमान, प्रियजनाचा वियोग वगैरे अनेक विषम विकार मनास उद्विग्नता उत्पन्न कारितात. अशा कालीं ते निमूटपणें सोसणे याचें नांव 'तितिक्षा.' असे प्रकार ऋणानुबंधांची फलें होत. ही फलें सोसतांनां आपल्या हिशेबांतले एकेक ऋण फिटत आहे, अशी खरी भावना दृढ केली तर, आपल्या वरचा एकेक बोजा निघून जात आहे ही जाणीव येते. व अशा जाणीवेनें दुःख हलकें होतें. याप्रमाणें वर सांगितलेलीं साधनें, म्हणजे वैराग्य, मुमुक्षा, शम, दम, निवृत्ति, आणि तितिक्षा, अशीं संपादन झाल्या-नंतर, परमार्थ मिळविणेंसाठीं जी ईश्वरोपासना ती उत्तमरीतीनें घडावी म्हणून सद्गुरूचा आश्रय करण्यांत येतो. त्याकालीं सद्गुरूवर व त्यांचे वचनावर जी अत्यंत निष्ठा असावी लागते तिला

४६. श्रद्धा—असें म्हणतात. त्या सद्गुरूची महती वर्णावी तितकी थोडी आहे. त्यांचेवर संपूर्ण विश्वास असल्याशिवाय त्याजकडून मिळणारी विद्या व ज्ञान फळास येत नाहींत. देवाविषयीं प्रत्यक्ष ज्ञान व अनुभव करून देण्याचें ज्यांचें सामर्थ्य, त्यांची कृपा संपादणें झाल्यास तदनुरूप निष्ठा नसली तर ती मिळणार. सद्गुरूंचे महत्व व त्यांची योग्यता देवा इतकी किंबहुना त्याहून अधिक आहे. देवालासुद्धां ज्यांची इच्छा मानावी लागते, त्यांचा अधिकार किती असेल, याची कल्पना करावी. अशा रीतीनें त्यांस अनन्य शरण जाऊन त्यांचे वर पूर्ण श्रद्धा ठेविली असतां ते प्रसाद कारितांत. त्यांच्या सेवेनें चित्तास समाधान वाटते. व उपासना निर्विघ्नपणें होते.

४७. यम—यमाची अवश्यकता सांगतांनां पतंजलि म्हणतात,

तत्राऽहिंसा सत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः ।

योगसाधन ३०.

या प्रमाणें पांच यम सांगितले आहेत 'अहिंसा' म्हणजे आपल्या मनानें वाणीनें, वा कृतीनें कोणासही दुःख न देणें; 'सत्य' म्हणजे मनांत वाणींत व कृतींत खरेपणा असणें. 'अस्तेय' म्हणजे कोणत्याही वस्तूचा अपहार न करणें; तसेंच मनानें सुद्धां अपहार करण्याची इच्छा न करणें; इंद्रियनिग्रहास-'ब्रह्मचर्य' असें नांव देण्यात आलें आहे, आणि निर्लोभी-पणांस 'अपरिग्रह' असें म्हटलेलें आहे. हे पांचही यम पूर्णपणें समजावे एतदर्थ दर एकाचें विवेचन करणे जरूर आहे.

४८ **अहिंसा**--अहिंसा या शब्दांत हिंसा म्हणजे दुखविणें असा बोध होतो. आपल्यास कोणी दुखविलें तर आपल्यास जसें वाटतें तसेंच आपण इतरांस दुःख दिल्यास, त्यांस अर्थांत वाटणार. मग जें आपल्यास विषम वाटतें, तसें दुसऱ्यास होऊं न देण्याची खबरदारी घेणें अवश्य आहे. दुसऱ्याचें वाईट व्हावें असा विचार सुद्धां मनांत आणणें हिंसा आहे. 'अहिंसा परमो धर्मः' हे बौद्ध मतांतील नीतितत्व हृदयांत कोरून ठेवण्या इतकें मौल्यवान आहे मनुष्यास मन, बुद्धि, वाचा व इतर कर्मेंद्रियें शक्य तितक्या परोपकाराकरितां व सत्कार्याकडे लावण्या करितांच दिलीं आहेत. त्यांचा उपयोग कोणत्याही कारणानें इतरांस दुःख देण्याचे कामीं करू नये. अहिंसा हा मनास लगाम आहे. 'जशास तसें' हे तत्व उपासकांस लागू नाहीं. आपणच जर कोणास जाणून बुजून वा पर्यायानें त्रास देण्याची गोष्टच मनांत आणली नाहीं तर दुसरें तरी आपल्यास विनाकारण कोण दुखविणार असा जो विचार त्यांस अहिंसा म्हणतात

४९. **सत्य**,— आता दुसरें साधन 'सत्य' हें सांगितलें आहे. 'सत्यापरता नाहीं धर्म' हें महावाक्य फार लक्षांत ठेवण्या जोगें आहे. एकंदर व्यवहारांत 'सत्य' हें यश संपादण्याचें कामीं अत्यंत अवश्य म्हणून अत्यंत उपयोगी साधन आहे. सत्याचरणांत, सत्यभाषेंत, सत्यकल्पनेंत, ईशसांनिध्य मिळतें तो आपला अतिशय मोठा आधार आहे. सत्यव्रत मनुष्यास प्रत्येक ठिकाणीं मान आहे. अशा मनुष्यावर जग प्रेम करितें व देवही प्रेम करितो. व सत्याची इतकी मोठी शक्ति आहे की त्यानें ईश्वरप्राप्ति

फार लवकर होते. सत्यावर जगाचा विश्वास बसतो. विश्वासानें कार्य होतें. सत्यांत पवित्रता आहे. पुण्याचरणांत सत्याची गणना आहे. आचार व विचार सत्यपूर्ण होण्यास सत्संगतीची गरज आहे सत्यांत सत्संगती आहे. त्या सत्संगतीचें मनास वळण अवश्य आहे.

५०. **अस्तेय**— परद्रव्यापहार करण्याची इच्छा ज्या मनुष्यास होतें त्याचें मन दुर्बल व नादान असतें. तें शुद्ध असत नाहीं. ज्या वस्तूवर आपला कशाही प्रकारें अधिकार किंवा सत्ता नाहीं, तशी वस्तु तिचे मालकाकडून हरण करण्याची इच्छा फार खोटी आहे. अशा अपहारास व्यवहारांत चोरी असें म्हणतात. मग ती करणें अगर करण्याची इच्छा करणें हें ईश्वरोपासकांस, त्यांच्या उपासनेंत मोठेंच विघ्न होणार. तशा वृत्तीस नीच वृत्तीच म्हटली पाहिजे. अशा वृत्तीनें ईशसांनिध्य कसें मिळणार? ज्याच्या द्रव्याचा अपहार होतों, त्यास दुःख होतें. व आपल्या मनोदेवतेच्या इच्छेविरुद्ध वागल्यामुळें तिचा अपमान होतो. उभय रीतीनेंही अपराध केल्याचें पाप होतें. शिवाय साधक दुर्वृत्तीला बळी पडण्याचा संभव आहे तसें झाल्यास साधण्याचें ध्येय हातीं येणें शक्यच नाहीं. म्हणून परद्रव्य लोष्टवत् मानण्याच्या निश्चयालाच अस्तेय म्हणतात.

५१. **ब्रह्मचर्य**— हें व्रत बहुमोल आहे. याचें महत्व किती सांगावें तितकें थोडेंच होईल. सर्व सुखांच्या प्राप्तीचें मूळभूत साधन ब्रह्मचर्य आहे. शारीरिक व मानसिक स्वातंत्र्य या ब्रह्मचर्यांत आहे. शरीरयष्टि पवित्र राखल्यापासून अंतःकरणपंचक जोमदार राहतें. ब्रह्मचर्य या शब्दांत केवळ निर्विकार व निर्गुणाचा समावेश होतो. हें ब्रह्मचर्य उत्कृष्ट रीतीनें संभाळल्यास शरीरास व मनास तेज चढतें. उपासनेचे कामीं बुद्धि शुद्ध असावी लागते, मनाची एकाग्रता असावी लागते, विषयवृत्ती फेंकून द्याव्या लागतात. परंतु हें सर्व ब्रह्मचर्यावाचून साध्य नाहीं. तें ब्रह्मचर्य म्हणजे इंद्रियांच्या वृत्तीस केंव्हाहीं हार न जाणें, त्यांस पूर्णपणें कह्यांत ठेवणें. षड्रिपू अत्यंत बलवान् आहेत हें अन्यत्र याच निबंधात विस्तृत रीतीनें सांगितलें आहे. त्या शक्ती ईशनिर्मित आहेत. त्यांचेवर सत्ता गाजविणें फार कठीण आहे. हें सर्व तप व सत्संगतीनेंच साध्य आहे. तशाच प्रतीचे,—

५२. **अपरिग्रह**— हें व्रत आहे लोभ हा षड्रिपूंपैकींच एक मनुष्याची दानत मारून टाकणारा जबरदस्त शत्रु आहे. आपल्या गरजा अवश्य प्रमाण पेक्षां जास्त वाढू न दिल्यास हा लोभ जागच्या जागींच थंड पडतो. साधी राहणी व उच्च विचार हें मनुष्यास मोठें स्पृहणीय भूषण आहे. साध्या राहणींत याचनेचा प्रसंग कधींही येत नाहीं. दुसऱ्याचे उपकारांत बद्ध होणें कांहीं चांगले नव्हे. परिग्रह अनेक प्रकारें होतो. याचकवृत्तींतच होतो असेंच केवळ नव्हे. आत्मकार्यार्थ धोरणी लोक उपकारानें आपल्यास बांधतात; आणि प्रसंग विशेषीं अकार्याचे कामीं तें आपल्यास करण्यास भाग पाडितात. दानाचा स्वीकार देखील मोहक आहे. त्याच्या पोटीं लोभ असल्यामुळें दानाच्या लोभा बरोबर दात्याची पातकें हीं येऊन आपल्यावर आदळतात. म्हणून साधकाच्या उपासना-मार्गांत हे भयंकर विघ्न आहे.

या प्रमाणें हें यमपंचक अत्यंत काळजीपूर्वक संभाळणें अवश्य आहे.

५३. **नियमपंचक**—या प्रमाणें 'यमाचे' परिपालन करून नंतर 'नियमाचे' व्रताची अवश्यकता ऋषिवर्य पतंजलि सांगतात. नियमाची व्यवस्था त्यांनीं

**शौचसंतोषतपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः ।**

—योगसाधन.

अशी केली आहे. 'शौच' म्हणजे शारीरिक व मानसिक शुद्धता; 'संतोष' म्हणजे आनंदीवृत्ति; 'तप' म्हणजे ईश्वर प्राप्तीकरितां तेंच ध्येय धरून शरीरयष्टीस व मनास विविक्षित मार्गानें वागविणे. 'स्वाध्याय' म्हणजे ब्रह्म प्राप्ती करितां सद्गुरूंनीं शिकविलेल्या वेदांताचा व शास्त्राचा सतत अभ्यास आणि 'ईश्वरप्रणिधान' म्हणजे तन-मन-धन ईश्वरार्पण करणें. असा या वरील नियमांचा थोडक्यांत इत्यर्थ आहे. येथें या नियमपंचकाचें विवेचन थोड्या विस्तारानें करणें अवश्य आहे. कारण उपासकांच्या मार्गांत ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत त्या न केल्यास उपासना सिद्धीस जाणार नाहीं, अशा महत्वाचें हें नियमपंचक आहे.

५४. शौच—म्हणजे पवित्रता. ब्रह्मचर्यानें शरीरास शुद्धता प्राप्त होतें. शरीर जात्याच कांहीं शुद्ध आहे असें नाहीं. तथापि साधकांनीं तें आंत बाहेर शुद्ध केलें पाहिजे व राखलें पाहिजे. हें त्यांचें आद्य कर्तव्य आहे. शरीर शुद्ध असल्या शिवाय उपासना सर्वथैव अशक्य आहे. शरीराचें पोषण पालन अन्नावर अवलंबून आहे. ज्या अन्नापासून मनोविकार बळावणार नाहींत, वृत्ती सात्विक राहतील अशाच अन्नाचें सेवन मितप्रमाणानें झालें पाहिजे. सर्व तऱ्हेचे रोग, अन्नोदक सेवनाचे कामीं निष्काळजी झाली म्हणजेच होतात. त्याकामीं अत्यंत दक्षता अवश्य आहे. भिक्षा देखील अपवित्र अन्नाची घेऊं नये. ज्याचें अन्न असेल त्याचें गुणधर्म त्यांत असतात; आणि ते आपल्यास बाधतात. याविषयीं एक लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. एक सन्याशी प्रवास करीत एका खेड्यांत आला. त्यास तेथील कुलकर्ण्यानें पुढील आमंत्रण दिलें त्याप्रमाणें भोजन झालें. आणि उठण्याचे पुर्वी स्वामीमहाराजांस त्यांचे हातावर 'हस्तोदक' घालण्यास कुलकर्णी घरांत झारी आणण्यास गेले; तों इतक्यांत स्वामींकारितां ठेवलेली रुप्याची वाटी त्यांनीं उचलून आपल्या झोळींत घातली. त्यानंतर कुलकर्ण्यानीं स्वामींच्या हातावर हस्तोदक घातलें. हात तोंड धुवून स्वामी मार्गस्थ झाले. ते गेल्यानंतर कुलकर्ण्याचें लक्ष वाटी जाग्यावर नाहीं या गोष्टीकडे गेलें. ती नाहीं असे पाहून शोध केल्यांत ती कोणीही काढल्याचें सांगेना. घरांत दंगा उडाला. इतक्यांत स्वामी परत आले. तों दंगा चालला आहे. कुलकर्णी ज्याच्या त्याच्यावर तोंड सोडित आहे. स्वामीनीं त्यास बाहेर बोलावलें. आणि दंगा वाटी बद्दलच चालला आहे काय? असा प्रश्न करून त्याचेसमोर ती वाटी ठेवली. आणि विचारलें, बाबा माझ्या जन्मांत मजकडून जी गोष्ट घडली नाहीं, ती मी संन्याशी असून आज मजकडून घडली याचें कांहीं तरी विशेष कारण असलेंच पाहिजे. मग तपास करितां एका दरोडेखोर अशा त्याच गांवच्या बेरडानें दिलेल्या तांदळाचा भात स्वामीमहाराजांस घातला होता असें कळलें! स्वामी म्हणाले, हा प्रसाद या तांदळाचा आहे. यानंतर तुम्हीही फार जपून असावें. ही वाटी माझ्या झोळींत मीच घातली

असली पाहिजे खास. आणि ती तरी मी जातां जातां माझा दंड त्यास लागून अवाज झाल्या मुळेंच मला कळली!

वरील गोष्टींचें सारभूत मर्म लक्षांत ठेवलें पाहिजे. शरीरांत षड्रिपूंस येण्यास वाटा हेंच अन्न करितें. म्हणून शारीरिक आणि त्याच्याच बरोबर मानसिक शुद्धता राखणें किती अवश्य आहे हें जास्त सांगण्याची आतां अवश्यकता राहिली नाहीं.

५५. **संतोष**—आतां 'संतोष' या नियमाचें स्पष्टीकरण करूं लागल्यास आपल्यास असें दिसून येईल कीं, संतोष म्हणजे मनाची समता; याचा हजारांत नउशें नव्याण्णव लोकांच्या अंतःकरणांत लेशही दिसून येत नाहीं. जो तो आपल्या स्थितीला, धंद्याला, उद्योगाला, योग्यतेला कंटाळलेला व अतृप्त आहे. व यामुळेंच त्याच्या अंतःकरणावर उदासीनता व भित्रेपणाचा पूर्ण अम्मल जाहला आहे.

**यदृच्छालाभसंतुष्टः।**

—गीता अ. २. श्लोक ११.

**अर्थः**—मिळेल त्यांत संतुष्ट असणें.

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।**

—गीता अ. २ श्लोक

**अर्थः**—फलाची इच्छा न करितां स्ववर्णाश्रम धर्म करीत असावें.

**सुखदुःखे समे कृत्वा लाभाऽलाभौ जयाऽजयौ।**

**अर्थः**—सुखदुःख, लाभ नुकसान, जय अपजय सारखेच मानावे.

**कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषयेत् शतं समाः**

—यजुर्वेद

**अर्थः**—आपआपलीं कर्मे करीत शतायुषी रहावें.

इत्यादि सर्व जीवांना जीवन देणारीं तत्वें आमचा समाज विसरला आहे. विवेकबुद्धीस पटलेलें, परिस्थितीस अनुकूल असलेलें, व सत्यत्वानें भरलेलें,

असें कोणतेंही कर्म केलें कीं, तें स्वपरहितकारी जाहलेंच पाहिजे. त्याचें फळही आलेंच पाहिजे; मग आज येईल किंवा दहा वर्षांनीं येईल. आपण त्या विषयीं हर्ष किंवा विषाद बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. असा वरील सर्व वाक्यांचा तात्पर्यार्थ आहे. परंतु तो आम्ही समजतों कोठें? व समजला तरी तो उमजतों कोठें? पोथ्या, पुराणें रोज चाललेलींच आहेत. गीता वाचल्याशिवाय तर कित्येक अन्नही ग्रहण करीत नाहींत; परंतु उपयोग विचारल तर मात्र आंवळ्या एवढें पूज्य. दहा रुपये मिळाले कीं, आमचा आनंद गगनांत मावत नाहीं, व तेच दहा रुपये गेले कीं प्राण कासावीस होतो. ही आमच्या मनाची दृढता. मग 'संतोष' म्हणजे विद्यमान स्थितींत मनाची तृप्ति अथवा समता आमच्या मनास कशी असावी? रात्रंदिवस चिंता व उदासीनता याखालीं मन दडपून गेलेलें असतें. अशा मनाकडून ईश्वरोपासना कशी व्हावी? ज्याच्या अंतःकरणांत स्वतःच्या पात्रतेची जाणीव तिला अनुसरून स्वस्थितीची तृप्ति व कोणत्याही संकट समयीं स्वकर्तव्यतत्परता असते त्यालाच शेवटीं यशोदेवता माळ घालते. असा सर्व वेदशास्त्रांचा सिद्धांत आहे. एका साधूनीं एका राजास एक मंत्र सांगितला त्यांत 'जो कुच होएगा सो होएगा लेकिन् हम् अपना काम नहि छोडेगा' व असेंच 'यदभावि न तद् भावि। भाविचेन्न तदन्यथा' हाही मंत्र ध्यानांत ठेविण्याजोगा आहे. यांत न घडण्याचें घडतच नाहीं व घडणार तें टळत नाहीं, हें सत्य तत्व लक्षांत ठेवून आपल्या कर्तव्यास तत्पर असावें, असेंच खरें आहे. तात्पर्य काय कीं, कोणत्याही स्थितींत अंतःकरणाची समता ढळूं देतां कामा नये. मनाची समता वाटेल त्या प्रसंगीं स्थिर ठेवणें अवश्य आहे. म्हणून पतंजली महर्षीनीं 'नियमांत' तिचा दुसरा नंबर लाविला आहे

५६. **तप व त्याचे प्रकार**— यानंतर 'तप' हा तिसरा नियम सांगितला आहे. 'तप' या शब्दाचा अर्थ तापविणे. कोणतीही धातू घ्या. तींतील मळ काढून, शुद्ध करून, मृदु करून वांकविणें झाल्यास ती तापवावी लागते. त्याच प्रमाणें मन, बुद्धि, देह या सर्व यष्टीस उत्कृष्ट वळण देणें जाहल्यास त्यास परिश्रम अवश्य आहेत. यासच तप म्हणतात.

याच तपानें शारीरिक व मानसिक मल नाहींसा होऊन चित्त चतुष्टय शुद्ध होतें. ईश्वरोपासनेचा मार्ग सुलभ होतो. या तपाचे महत्व ग्रंथकारांनीं फार सांगितलें आहे; व त्याचें स्वरूपही निरनिराळ्या व्यक्तींच्या योग्यते प्रमाणें निरनिराळें ठरविलें आहे. जें जें आपल्याला पाहिजे असेल, तें सर्व तपावांचून म्हणजें श्रमावांचून मिळणार नाहीं: असा शास्त्रकारांचा सिद्धांत आहे. व्यवहारांत सुद्धां विद्यार्जन करावयाचें किंवा कोणताही व्यापार धंदा करवयाचा असो, त्याला तप हें पाहिजेच आहे. नुसत्या चुटकी सरशीं कोणतीहीं कामें होत नसतात. कांहीं लोक कांहीं एक परिश्रम न करितां एकदम श्रीमान् जाहलेले व वैभवास चढलेले आपण पाहातो; परंतु, तो कांहीं सर्वांना लागू होणारा नियम नव्हे. शिवाय ज्यांना म्हणून एकदम वैभव मिळालें आहे त्यांचें सुद्धा या जन्माचें कांहीं तप नसलें, तथापि पूर्व जन्मीं खरोखरीच त्यांनीं कांहीं तरी तप हें केलें असलेंच पाहिजे. मग अगदी क्षुल्लक गोष्टीं सुद्धां सिद्ध होण्यास जर तपाची आवश्यकता आहे, तर ईश्वराच्या उपासनें करितां तपाची अवश्यकता किती आहे हें निराळें सांगावयास नकोच.

९७. या तपामध्यें व्यावहारिक नीतीचाही अंतर्भाव होतो व करावा असें मला वाटतें. साधकाच्या विचारांत आचारांत व इतरांशीं वागण्यांत नीति अवश्य असली पाहिजे. 'नीति' म्हणजे ज्याला भले लोक चांगुलपणा म्हणतात, व बहुमतानें ज्यास न्याय, सत्योक्ति, सदिच्छा व सत्कर्म असें मानतात ती. अशा आचार विचारास 'नीति' अशी संज्ञा आहे. या सर्वांत सद्वर्तनावर तिचा विशेष रोंख आहे. ही नीति आंगांत मुरली असली पाहिजे. तिचें शील बनले पाहिजे. ती नुसती दिखाऊ उपयोगी नाहीं. अशा बाणलेल्या सद्वृत्तीलाच खरी 'नीति' म्हणतात. तिलाच जगांत व देवा कडे खरी किंमत आहे.

९८. चांगलें व खरें, या दोहोंमध्यें निवडकरण्याचा जेव्हां प्रसंग येतो, तेव्हां निवडकरणाऱ्याच्या मनांत इतर सर्व गोष्टी पेक्षां जगांत खरी मानलेली जी नीति तिला कोणतें पटतें, हेंच पहावे लागतें. अर्थात नीतीला

धरून जें असेल तेंच श्रेष्ठ मानिलें जातें. सृष्टींतील सर्व व्यापार भल्याकरितांच आहेत त्यांत भलेंच निष्पन्न झालें पाहिजे. खरेंच पाहूं गेलें असतां अमुक गोष्टींत सत्य काय हें निवडून सिद्धकरित बसण्यापेक्षां त्यांत चांगलें काय आहे, हेंच पहाणें अधिक श्रेयस्कर नाहीं काय?

५९. नीतींत मनाचें स्वातंत्र्य आणि इच्छा अशा दोन आहेत. मनुष्याचें सर्वस्व इच्छेंत आहे. इतर प्राण्याप्रमाणें तोही एक प्राणी आहे. परंतु निसर्गतःच त्यास आवड निवडीची बुद्धिमत्ता दिली आहे. हीच त्याच्या स्वातंत्र्याच्या हक्काची सनद. जो योग्य निवड करील तोच मनुष्य. त्याच्या सारखीं निवड करण्यास इतर प्राण्यांस येत नाहीं. सारासार विचाराची आणि शुद्ध अशीच ही निवड करण्याचे कामीं इच्छा असावी लागते ती उच्छृंखल असतां कामां नये. जेव्हां एकादा मनुष्य, अमुक गोष्ट करण्याचा दुराग्रह घेतो, आणि अशी गोष्ट प्रथम दर्शनीच गैर अगर लहरीची असते, तेव्हां तो दुर्बल होतो. आपली इच्छा दुसऱ्यावर लादेन, आपल्या इच्छेप्रमाणेंच इतरानीं वागलें पाहिजे असें जेव्हां त्यास वाटूं लागतें तेव्हां तो आपल्यावर आपणच एकादें संकट ओढून घेतो यांत शंका नाहीं. आपणच आपला घातकरून घेण्याची ही वृत्ति आहे. ही नीति नव्हे. यांत मनाचा कोतेपणा दिसतो. म्हणून व्यवहारांत यमनियमाचें आचरण करित असतां नीतीला विसरतां कामां नये.

व्यावहारिकदृष्ट्या हें तपाचें विवेचन झालें. आतां शास्त्रीयदृष्ट्या तपाची व्याख्या आणि त्याचें महत्व या विवेचनाकडे मी वळतें.

६०. **शास्त्रीयदृष्ट्या तपाचें विवेचन**— स्वतः व्यास महर्षींनीच वरील 'शौचसंतोषतपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः' या योग सूत्राच्या व्याख्यानावसरीं 'तपः द्वंद्व सहनम्। द्वंद्वाश्च जिघत्सा पिपासे, शीतोष्णे, स्थानासने, काष्टमौनाकारमौने च। व्रतानि चैषां यथायोगकृच्छ्र चांद्रायणसांतपनादीनि' असें सांगितलें आहे. याचा अर्थ असा आहे कीं 'तप' म्हणजे द्वंद्वाचें सहन करणें, व द्वंद्व म्हणजे भूक, तहान, थंडी, ऊन, उभें राहणें, बसणें; व खुणेनें सुद्धां स्वतःचा अभिप्राय न सांगणें याचें

नांव 'काष्टमौन', काष्ठासारखें स्तब्ध असणें याचें नांव 'काष्ठमौन', अर्थात एकाद्या लांकडाच्या खांबासारखें, असें ठरणें. 'आकार मौन' म्हणजे फक्त बोलावयाचें नाहीं. बाकी खुणेनें कांही सांगितल्यास हरकत नाहीं. तसेंच 'कृच्छ्र' 'चांद्रायण' 'सांतपन' इत्यादि धर्मशास्त्रोक्त व्रतें या सर्वांची तपामध्यें व्यास महर्षी गणना करितात. व हें बरोबर आहे. कारण कोणतेंही ध्येय गांठावयाचे म्हटलें कीं, त्यासाठीं प्रसंग विशेषीं तहान भूक आवरली पाहिजे, उभें राहिलें पाहिजे, स्वस्थही बसलें पाहिजे, ऊनही सोसलें पाहिजे, आणि थंडीही सहन केली पाहिजे; तेव्हां तें कार्य सिद्ध होणार. याचेंच नांव तितिक्षा.

६१. तैत्तिरीय आरण्यकांत निरनिराळ्या आश्रमांतील लोकांना भिन्न भिन्न प्रकारचें तप सांगितलें आहे. ब्रह्मचर्याश्रमांतील विद्यार्थ्यांना स्वाध्यय. ('तपो हि स्वाध्ययः इति ब्रह्मचारिधर्मः); गृहस्थाश्रमधर्मानें राहणाऱ्या लोकांना स्वकष्टार्जित द्रव्याचें 'दान करणें' ('एतत्खलु वावतप इत्याहुः यः संददाति इति गृहस्थ धर्मः'); वानप्रस्थांना उपवास ('तपो नानशात् परं'); आणि संन्याशांना इंद्रिय दमन व एकाग्रता. ('मनसःश्चेन्द्रियाणां च ह्येकाग्रं परमं तपः तज्यायः सर्व धर्मेभ्यः स धर्मः परमुच्यते इति यति धर्मः') अशा प्रकारें चारी आश्रमांतील लोकांना चार प्रकारचें तप वेदांत सांगितलें आहे. या वैदिक तपाहून थोडें निराळें परंतु सर्व स्त्री पुरुष अबाल वृद्धांनीं आचरण करण्यासारखें तप महाभारतांतील शांतिपर्वांत सांगितलें आहे कीं,

> **अहिंसासत्यवचनमानृशंस्यं दमो घृणा।**
> **एते तपा विदुर्धीरा न शरीरस्य शोषणं ॥**

याचा अर्थ असा आहे कीं, अन्यायानें आपण कोणाच्याही अंतःकरणास न दुखविणें, खरें आचरण करणें, आणि बोलण्यांत क्रूरपणा नसणें, इंद्रियांचा निग्रह करणें, अंतःकरणांत इतरांविषयी दया ठेवणें; इतक्या प्रकारच्या गोष्टींना तप असें म्हणतात. केवल शरीरकष्टाला तप हें नांव योग्य नाहीं.

**वनेऽपि दोषाः प्रभवंति रागिणां । गृहेऽपि पंचेंद्रियनिग्रहं तपः ।**
**अकुत्सिते कर्मणि यः प्रवर्तते । निवृत्तरागस्य गृहं तपो वनम् ॥**

—भागवत. स्कं. ६

याचा अर्थ असा आहे कीं ज्यांच्या अंतःकरणांत कामक्रोधादि विकार आहेत, असे लोक वनांत गेलें तथापि, त्यांच्या हातून दोष घडणारच. यासाठीं वाईट कार्याकडे प्रवृत्त न होतां ज्यानें कामक्रोधादिकांवर दाब ठेवला आहे, अशा मनुष्यास त्याचें घर सुद्धां तपोवनच आहे. व तो जें जें करितो तें सर्व तपच आहे. या श्लोकांत सुद्धां वनांत जाऊन केलेल्या शारीर शोषणात्मक तपाला कमी प्रतीचें लेखिलें आहे.

६२. **तपाचे प्रकार**—या तपाचे भेद तप करणाऱ्याच्या प्रकृतींत असलेल्या सत्वरजतम या गुणांवर अवलंबून आहेत. या तीनही गुणाची उत्पत्ति मूल प्रकृती पासून आहे. असेंच

**सत्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः**

—गीता. १४–६

म्हणून गीतेंत सांगितलें आहे सत्व निर्मल असून प्रकाशक आहे. रज विषयलोलुप आहे यांत वासना, आशा, तृष्णा, प्रबल असतात. तमो गुण अज्ञाननें मूढ असतो. यांत प्रमाद, आलस्य, व निद्रा, यांची सत्ता असते. या तिन्ही गुणांची उत्पत्ति जड प्रकृती पासून आहे. समर्थ म्हणतात—

**सत्वगुणें भगवद्भक्ति । रजोगुणें पुनरावृत्ति ।**
**तमोगुणें अधोगति । पावती प्राणी ॥**

तसेंच भगवद्गीतेंत—

**उर्ध्वं गच्छंति सत्वस्थाः मध्ये तिष्ठंति राजसाः ।**
**जघन्यगुणवृत्तिस्थाः अधोगच्छंति तामसाः ॥**

—गीता १४–१८

अर्थः—'जे नर सत्वगुणांत स्थिर रहातात, ते ऊर्ध्व म्हणजे उच्च गति पावतात. जनलोक, तपलोक, सत्यलोक हे ऊर्ध्व लोक होत. सत्वस्थ

साधक या लोकांस पावतात. स्वर्गलोकास मध्यलोक म्हणतात. तेथें रजोगुणी तापसी जातात, कारण रजोगुणाची तपश्चर्या स्वर्गार्थच असते. या दोनही गुणाच्या वृत्तींस वरील श्लोकांत अधम म्हटलें नाहीं. रजोगुणांत सात्विकाची संगति असते, म्हणून ते अमान्य होत नाहींत परंतु या त्रिगुणांत जघन्य म्हणजे निंद्य अवलक्षण असा जो तमोगुण तो अज्ञानानें भरला असल्यामुळें त्यांत क्रोध, हिंसा, आळस, स्वतःच्या हितांत असावधपणा इत्यादि वृत्ती असतांत. अशा वृत्तींत तमोगुणी लोक अत्यंत रंगतात त्यामुळें त्यास अधोगति प्राप्त होते. आता 'गुण' म्हणजे बंध असा अर्थ समजण्याचा असून वर लिहिल्या प्रमाणें आत्मा स्वतः अक्रिय असल्यामुळें कर्तृत्व सर्व या त्रिगुणांचेंच आहे; व यांच्याच संगतीनें निरानिराळ्या प्रसंगीं क्षय, वृद्धि, गति व योनि प्राप्त होण्याची असते, असें साधकाच्या ध्यानीं आल्यावर ईश्वर प्राप्तीची इच्छा होते, आणि तत्प्राप्त्यर्थ तपश्चर्याची अवश्यकता भासूं लागते. तेव्हां या त्रिगुणांशिवाय कर्मे आपल्या हातून घडविणारा दुसरा कोणी नाहीं असें साधकाच्या नजरेस दिसूं लागतें तेव्हां

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥

या त्रिगुणां पेक्षां परात्पर कोणी आहे असें त्यास स्पष्ट समजतें आणि असा जो प्रभु त्याच्या प्राप्ती करितां त्यास तपश्चर्येनें शरण जातो. प्रभु षड्गुणैश्वर्य संपन्न आहे. या षड्गुणैश्वर्यांतील 'गुण' शब्द आणि 'त्रिगुण' यांतील 'गुण' हे एकाच अर्थाचे नव्हेत. त्रिगुणांतील 'गुण' बंधक आहेत, ते कर्मबंध उत्पन्न करितात. आणि षड्गुणैश्वर्ययुक्त जो प्रभु त्याच्यांतील जे गुण ते या त्रिगुणांच्या पाशांतून मुक्त करितात. म्हणून प्रभूचे प्राप्त्यर्थ तप सांगितलें आहे. हें तप (१) सात्विक (२) राजस आणि (३) तामस या प्रमाणें तीन प्रकारचें आहे. गीतेंत तपाच्या व्याख्या दिल्या आहेत. त्यांत–

श्रद्धया परया तप्तं तपस्तत् त्रिविधं नरैः ।

अत्यंत श्रद्धेनें व आस्तिक बुद्धीनें जें तप केलें जातें तें तीनप्रकारचें आहे,-सात्विक, राजस, व तामस. अर्थात कोणत्याही तपामध्यें श्रद्धा व आस्तिक-बुद्धि यांची अवश्यकता आहे. परंतु -

**अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्विकं परिचक्षते**

—गीता १७-१७

फलाची इच्छा न ठेवतां ईश्वराप्रीत्यर्थच, व त्याचेच ठिकाणीं स्थिरचित्त करून जें तप केलें जातें, त्यासच सात्विक तप म्हटलें आहे. यांत मुख्यत्वें फलाकांक्षा असतां कामां नये. आणि असें करणें सत्वाशिवाय इतर दोन्ही गुणास शक्य नाहीं म्हणून याप्रकारच्या तपाचे नांव

६३. **सात्विक तप**—आतां सात्विक तपाचें विवेचन करण्या पूर्वीं त्रिगुणां पैकीं जो अत्यंत महत्वाचा सत्वगुण तो काय आहे, हे पहाणें अवश्य आहे यांत 'सत्व' आणि 'गुण' असे दोन शब्द येतात. 'सत्व' म्हणजे 'सत्' पणा. 'सत्' हा प्रभूच्या सच्चिदानंदातील पहिला भाग आहे. तो प्रकाशरूपी अथवा ज्योतिस्वरूपी आहे. त्या परब्रह्माच्या स्वरूपाचें जें तेज त्याचेंच नांव सत्व. हें सत्व शुद्ध आहे. अशा स्थितींत त्यास शुद्धसत्व अशी संज्ञा आहे. परंतु प्रकाश हा आपोआप प्रगट होत नाहीं त्यास कांहीं तरी साधनाची अवश्यकताही आहेच. जसें दिवा लावावयाचा उद्देश प्रकाश प्राप्त करून घेणें, व त्यास वात पाहिजे तेलही पाहिजे; तसेंच अग्नि पाहिजे असल्यास काष्ठाची जरूर लागते; पहाणें झाल्यास डोळ्याची जरूरी लागते, तद्वतच परब्रह्माचे ज्योति स्वरूपाचा प्रकाश पडण्यास सत्वगुणाची अवश्य-कता आहे. म्हणून भगवंतानीं सत्वगुणाची व्याख्या करितांना गीतेंत

**तत्र सत्वं निर्मलत्वात् प्रकाशमानामयम् ।**

—गीता १४-६

असे सांगितलें आहे.

वामन पंडितानीं या श्लोकाचा अर्थ देतांना असें म्हटलें आहे.

**त्या तिहीं गुणांत । सत्व निर्मल अत्यंत ।**
**निर्मलत्वास्तव म्हणे भगवंत । प्रकाशक म्हणोनि ॥**

प्रकाशक एकचि आत्मा । सत्वजड अनात्मा ।
तथापि प्रकाशक म्हणे परमात्मा । निर्मत्वें करोनि ॥
तैलयुक्त एकचि वाति । तिच्या योगें अंगुष्टमात्र दीप्ति ।
प्रकाशती संपूर्ण दिसती । घटपटादिक ॥
ऐसें निर्धर्म । चित्स्वरूप शुद्धब्रह्म ।
परंतु सत्वा वांचूनि तें अगम्य । प्रत्यया नये ॥

अर्थात् परब्रह्मज्योतिस्वरूपाची प्राप्ति होण्याकरितां जें तप त्यास सत्वगुणाची अवश्यकता अत्यंत आहे. त्या गुणावाचून त्या ज्योतिस्वरूपाचें ज्ञान होण्यास अन्य मार्ग नाहीं. या विवेचनावरून या सत्व गुणाची महती किती आहे, हें सहज ध्यानीं येणार आहे.

६४. आतां हा सत्वगुण कसा ओळखावा, त्याचें स्वरूप काय आहे या विषयीं श्रीसमर्थ रामदास यांनीं काय म्हटलें आहे तें पहाः—

जेणें होय उत्तम गति । मार्ग फुटे भगवंतीं ।
जेणें पाविजे मुक्ति । सायुज्यता ती ॥

जो परम सुखकारी । जो आनंदाची लहरी ।
देऊनिया निवारी । जन्म मृत्यू ॥

जो ज्ञानाचा शेवट । जो पुण्याचें मूळ पीठ ।
जयाचेनि सांपडे वाट । परलोकाची ॥

ऐसा हा सत्वगुण । देहीं उमटतां आपण ।
तया क्रियेचें लक्षण । ऐसें असे ॥

ईश्वरी प्रेम अधिक । प्रपंच संपादणें लौकिक ।
सदा संनिध विवेक । तो सत्वगुण ॥

अंतरीं देवाचें ध्यान । तेणें निडारले नयन ।
पडे देहाचें विस्मरण । तो सत्वगुण ॥

देहाभिमान गळे । विषयीं वैराग्य प्रबळे ।
मिथ्या माया ऐसें कळे । तो सत्वगुण ॥

अंतरीं स्फूर्ति स्फुरे । स्वस्वरूपीं तर्क भरे ।
नष्टसंदेह निवारे । तो सत्वगुण ॥

शांति क्षमा आणि दया । निश्चय उपजे जया ।
सत्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ॥

वरील अवतरणावरून सत्वगुणाची ओळख सहज पटण्याजोगी आहे. परब्रम्हाचें स्वरूप (चैतन्य) जोतिर्मय आहे. त्यामुळें त्यांचा संयोग होतो. पण जड व नाशवंत वस्तूंशी कशानें सख्य होणार? त्यांत देवावर प्रेम, विवेकदृष्टि, पुण्याचार, वैराग्य, शांति, क्षमा, दया, या गुणांचींश त्याचें सख्य असणार. शुद्ध बुद्ध स्थितींत ज्ञान संपादण्यास सात्विक वृत्तीच्या साधकास सहज सोपें असतें. अशा उत्कृष्ट रीतीनें सत्वगुण अंगीं बाणला असतां प्रभूचे प्राप्तीं करितां साधक जें तप करितो, त्या तपांतील सामर्थ्य, त्याचे परिणाम व त्याचें तेज यांचें वर्णन श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं आपल्या ज्ञानेश्वरींत फारच हृदयंगम केलें आहे. सात्विक तपाची महती ते अशी सांगतात.

जे प्रज्ञा आंतुलीकडे । न समात बाहिरी ओसंडे ।
वसंतीं पद्मखंडें । द्रुति जेंवि ॥

सर्वेंद्रियां आंगणीं । विवेकु करी राबणी ।
साचि करचरणीं । होती डोळे ॥

राजहंसा पुढें । चाचूंचेंचि आगरडे ।
तोडी जेंवि झगडे । क्षीर नीरांचे ॥

तेंवि दोषादोष विवेकीं । इंद्रियेंचि होतीं पारखीं ।
नियमु बारे पायिकीं । ओळगे तें ॥

नायिकणें तें कानुचि वाळी । न वाहणें तें दिठीचि गाळी ।
अवाच्य तें तें टाळी । जीभचि गा ॥

वाती पुढां जैसें । पळों लागे काळवखें ।
निषिद्ध इंद्रियां तैसें । समोर नोहे ॥

धाराधर काळें । महानदी उचंबळे ।
तैसी बुद्धि पघळे । शास्त्रजातीं ॥

अगा पूर्णिमेच्या दिशीं । चंद्रप्रभा आकाशीं ।
ज्ञानवृत्ती तैशी । फांके सैंध ॥

वासना एकावटे । प्रवृत्ति ओहटे ।
मन वावटे । सुखावरी ॥

सत्वगुण बाणलेल्या साधकाच्या तपांत ज्ञानबुद्धीचा विकास होऊन साधकाचे चेहऱ्यावर, वसंत ऋतूंत कमळाचा विकास होऊन त्यांतील सुगंध जसा आसमंतात भरून जातो, तद्वत त्याची प्रज्ञा फांकू लागते. त्याची विवेक बुद्धि इतकी तयार होते कीं ती त्याच्या सर्वांगांत मुरते. सर्व इंद्रियें तद्रूप बनतात. सर्व शास्त्रांत त्याची गति सहज होते. आणि पूर्णिमेच्या चांद ण्याप्रमाणें त्याची ज्ञानदृष्टि भरपूर चोहोंकडे पसरते. आणि त्याच्या सर्व वासना एका प्रभूचे चरणीं लीन होतात ! म्हणून भगवान् गीतेंत या सात्विक तपाची व्याख्या करितात ती अशी—

श्रद्धया परया तप्तं तपस्तत् त्रिविधं नरैः ।
अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्विकं परिचक्षते ॥

—गीता १७. १७.

**अर्थ**— ‘प्रभूकडे एकाग्रचित्त लावून अत्यंत श्रद्धेनें व कसल्याही ऐहिक फलाची इच्छा न धरितां ईशप्राप्त्यर्थ जें तप केलें जातें त्यास सात्विक तप म्हणतात.’

अशा प्रकारचें तप शुक्राचार्य, त्यांचे गुरु जनकराजा, ध्रुव वगैरे जे पुराण प्रसिद्ध सत्पुरुष होऊन गेले त्यांनीं करून आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. त्याच प्रमाणें अर्वाचीन सत्पुरुष व साधुसंतांत शिरोमणि होऊन गेलेल्या श्रीज्ञानेश्वर महाराज, तुकाराम, एकनाथ, नामदेव, श्रीसमर्थ रामदास, आणि कबीर, कमाल, शेख महमद वगैरे मंडळींनीं याच सात्विक तपाचें आचरण करून ईश्वरप्राप्ति करून घेतली, आणि समाजावर अत्यंत उपकार करून ठेवलें. या प्रमाणें या सात्विक तपाचें महत्व आहे.

६५. **राजस तप** — आतां आपण दुसरें जें राजस तप त्या तपाचें विवेचनाकडे वळूं. या तपाची व्याख्या भगवान् श्रीकृष्ण अर्जुनास अशी सांगतात —

**सत्कारमानपूजार्थं तपो दंभेन चैव यत् ।**
**क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥**

— गीता १४. १८.

**अर्थ** — 'आपला सत्कार व्हावा, मान्यता मिळावी, लोकानीं आपली पूजा करावी म्हणजे आपल्यास पूज्य मानावें, एतदर्थ ढोंगानें केलेलें तप, यास राजस तप अशीं संज्ञा आहे. असें तप चंचल व फार वेळ न टिकणारें असें असतें.

आतां रजोगुणाची व्याख्या वर दिलीच आहे. आणि सांगितलें आहे कीं रजोगुण कर्मोद्भव असून तो विषयलोलुप आहे. त्या रजोगुणानें पुनर्जन्म प्राप्त होतो. रजोगुणी मनुष्यांचे तपांत फलाकांक्षा असते, म्हणून त्यांस फार झालें तर स्वर्गप्राप्ति नियमित कालापर्यंतच होते. ती पुण्याई संपतींच त्यास पुनः या मृत्युलोकीं जन्म आहेच. आतां या रजोगुणाचे प्रभाव काय आहेत या विषयीं भगवान् श्रीकृष्ण म्हणतात—

**रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवम् ।**
**तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनम् ॥**

— गीता ४. ७.

**अर्थ** — याच श्लोकांवर वामन पंडित म्हणतात—

**अगा कुंतिसुता ।**
**रजोगुण आइक आतां ।**
**तो रागात्मक जाण तत्वता ।**
**विषयप्रीतिस्वरूप त्या गुणाचें ॥**

**प्रीतीस राग म्हणती ।**
**ते भगवत्प्रीति अथवा विषयप्रीति ।**
**परि रजोगुण सांगतो श्रीपती ।**
**तो विषयवासनारूप ॥**

इंद्रियें रजोगुणाच्यावृत्ती ।
इंद्रियांस विषयांची प्रीति ।
अतएव विषयवासनास्वरूप म्हणती ।
रजोगुणाचें ॥

त्यापासून तृष्णा उपजत ।
जे विषयवासना बोलिजे ते ।
कीं ज्याची प्रीति त्याचीच होते ।
भोगवासना ॥

एवं उगीच भोगेच्छा, वासना ।
सद्यभोगेच्छा तो संग, म्हणजे कामना ।
दोहींचाही अगा कुंतिनंदना ।
उद्भव रजोगुणापासुनी ॥

ज्यापासुनि वासना ।
आणि संग तत्काळ भोगाची कामना ।
तो क्रियाशक्ती अगा अर्जुना ।
कर्में करवितो ॥

त्या कर्मैं होय बंध ।
हा रजोगुणाचा ॥

कर्म भोगाचसाठीं ।
तू जन्मलास कुंतीचिया पोटीं ।
हें कर्म अगा किरीटि ।
जन्मांतरीं रजोगुणेंचि करविलें ॥

वरील टीका सुबोध असल्यामुळें त्याचा येथे सारांश देणें अनवश्यक आहे.

या रजोगुणी मनुष्यांत 'मी व माझें' ही वृत्ति प्रबल असते. पुण्य पाप व धर्म याचा विचार राहत नाही. अप्पलपोटेपणा वाढतो. कपट, मत्सर वळावतात. प्राप्त वस्तूंत रमणें, वियोगाबद्दल विषाद होणें, परनिंदा परद्रव्यापहार करण्याची वृत्ति आणि षड्रिपूंचा पक्का गुलाम होणें इत्यादि

स्थिति या रजोगुणानुळें प्राप्त होतात. हा रजोगुण लाघवी व लबाड असतो. तो धूर्तपणें अवश्य प्रसंगी अत्यंत वैराग्य दाखवील—पक्षीं त्याचे मनास त्या वेळ पुरते वैराग्य पटेल. परंतु त्याची अवश्यकता निघून जातांच तो पूर्व-वृत्ति निःशंक धारण करील. हा दगडापेक्षां सुधारण्यास कठीण. वाटोळा दगड चौकोनी केला तर तो चौकोनीच राहतो. पण रजोगुणी मनुष्य पुनः वाटोळा तो वाटोळा! त्याची द्रव्याविषयीं जशी, तशींच इतर विषया विषयीं आशा नेहमी तरुण असते आणि कोणतें हीं कार्य तो लाभाच्या दृष्टीनें करितो. व त्यास किती ही मिळालें तरी तृप्ति असत नाहीं. असा रजोगुणी मनुष्य जें तप करील तें कांहीं इष्ट प्राप्तीच्या लोभा शिवाय करित नाहीं. आणि त्याचें ध्येय ईशप्राप्तीच हें केव्हांही असत नाहीं.

६६. असलें राजस तप करून समाजास फसविणारे, भोंदु तपस्वी आज काल बरेच दृष्टीस पडतात. 'स्नानसंध्या टिळेमाळा। पोटीं क्रोधाचा उमाळा।' तसेंच 'जपाचें निमित्य । झोपेचा पसारू । देहाचा विसरु पडियेला ॥' 'पाय वाळूनि आडवा । काय जपतोसि गाढवा ॥' इत्यादि वाक्यांनीं तुकोबांनीं या दांभिक तपस्व्यांचा खरपूस समाचार घेतला आहे. तसेंच 'वरी भगवा झाला नामें । अंतरि वश्य झाला कामें । तया म्हणूं नये साधू । जनीं विटंबना बाधू ॥' असें श्री मुक्ताबाईनींही म्हटलें आहे. हे असले तपस्वीच समाजाचे खरे विघातक होत; व तपाचें ढोंग माजवून हे लोक स्वतःस व लोकांस फसवितात. या विषयीं एक गोष्ट सांगतात ती अशी— काशी क्षेत्रीं गंगा तीरीं एक ढोंगी बैरागी बुवा राहात होते या साधू बुवांनीं स्वतःची ख्याति होण्याकरितां अगदीं निरपेक्षत्वाचा वरपांगी खूप बहाणा केला होता. त्यांजवर लोकांचा विश्वासही बसला होता. तो ऊर्ध्व बाहू करून असे. त्याचे हात वाळून गेले होते. एके दिवशीं हे साधू बुवा गंगा तटाकीं वाळवंटातून फिरत असतां साक्षात् कैलासनाथ शंकर पार्वती विमानांत बसून अंतरीक्षातून सहज सहल करीत होते. पार्वतीचें लक्ष त्या साधूकडे गेलें. त्याचें वैराग्य पाहून पार्वतीस दया आली. व तिनें तत्काल श्रीशंकरास विचारिलें कीं; महाराज! याला आपण अद्यापि

मोक्ष कां देत नाहीं? व कैलासास कां घेऊन जात नाहीं? यावर शंकरांनीं पार्वतीस हा ढोंगी आहे, असें सांगून त्याचे मनोविकार नष्ट झाले नसल्याची तिची खात्री करण्याकरितां आपल्या माया शक्तीनें त्या साधूच्या पुढें त्याच्या नजरेस येईल अशी एक सोन्याची आंगठी उत्पन्न केली. साधूची आंगठीवर नजर जातांच त्यास मोह उत्पन्न झाला. आणि आपल्यास कोणी पहात नाहींत अशी खातरी करून घेऊन, हात बांधले असल्या मुळें, ती आंगठी दांतांनीं उचलण्यास पालथा पडला. तो जसजसा ती आंगठी दातानें घेण्याचा प्रयत्न करूं लागे, तसतशी ती वाळवंटांत आंत आंतच जाऊं लागली. आणि साधूनेंही आपलें तोंड वाळवंटांत खुपसण्यास सुरवात केली! इतक्यांत बुवांचे शिष्यही तेथ आले. आणि त्यांच्याही दृष्टीस तो प्रकार पडला. पार्वतीची खातरी झाली. तात्पर्य, ढोंगी तपाचें पर्यवसान ढोंगाच्या परिस्फोटांतच व्हावयाचें. या साठींच अशा दांभिक तपाला चल व अध्रुव असें गीताकारांनीं म्हटलें आहे.

६७. **तापस तप** — आतां तामस तप कशास म्हणतात तें पहा.

**मूढग्राहेणात्मनो यत् पीडया क्रीयते तपः ।**
**परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृत् ॥**

—गीता. १७. १९.

अभिमानी मूढ मनुष्य स्वतः क्लेश सोसून सुद्धां दुसऱ्याच्या नाशा करितां जें तप करितो तें तामस तप. हें अगदीं कमी प्रतीचें गणलें आहे. श्रीज्ञानेश्वर म्हणतात—

**केवळ मूर्खपणाचा वारा ।**
**जीवीं घेऊनी धनुर्धरा ॥**
**नाम ठेविजे शरिरा ।**
**वैरीयाचें ॥ १ ॥**

**पंचाग्नीची दगडी ।**
**खोल वीज ती शरिरालागीं ।**
**कां इंधन कीजे हे आगी ।**
**आंतु लावी ॥ २ ॥**

माथा जाळिज ती गुगुळ ।
पाठीं घालिज ती गळ ।
आंग जाळिती इंगळ ।
जळत भीतां ॥ ३ ॥

दवडोनी श्वासोश्वास ।
कीजती वायां चि उपवास ।
कां घेपती धूमाचे घांस ।
अधोमुखें ॥ ४ ॥

हिमोदकें आकंठे ।
खडकें सेविजती नेटें ।
जितां मासाचे चिमुटे ।
तोडिती जेथ ॥ ५ ॥

ऐसी नानापरी हे काया ।
धायसूतां पै धनंजया ।
तप कीजे नाशावया ।
पुढीलाते ॥ ६ ॥

याप्रमाणें ज्ञानेश्वर महाराजांनीं या तापस तपाचें निःसत्व सर्व लोकांच्या नजरेस आणिलें आहे. लोकांची हानी करण्याचा या तपाचा उद्देश असतो व त्यासाठीं आपलीहि थोडी हानी जाहली तरी बेहत्तर अशा दुर्बुद्धीचें जे लोक असतात तेच अशा तपाचें आचरण करितात. जारण मारण उच्चाटणादि ज्या नीच विद्या आपल्या ऐकिवांत आहेत, त्या विद्यांचें साधन करणारे लोक वरील प्रकारचेच होत. 'आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून' अशी जी म्हण आहे ती सुद्धां या वरील तामस तपाचीच द्योतक आहे. याविषयीं एक गमतीचा दृष्टांत मला आठवतो तो मीं एथें देतें. एका दुष्ट मनुष्यानें आपल्या शेजारचें गृहस्थाचें वैभव व सुख पाहून तामसी तपानें तीन वर मिळविले. स्थिति अशी कीं याच्या दुप्पट त्यास असावयाचें. या करितां त्यास पूर्ण अंधत्व येण्या करितां आपलें घरचे मंडळीचा एक एक डोळा जावो असा वर मागितला! आणि शेवटीं त्याचा नाश झाला. हा

तरी तशांतलाच प्रकार आहे. गोष्ट थोडी काल्पित दिसते तरी तिचें तात्पर्य काय कीं तामस वृत्तीच्या मनुष्याच्या अंतःकरणांत जेव्हां दुर्बुद्धीचा प्रादुर्भाव होतो, तेव्हा तो जप करो, तप करो, कांहींही करो, त्याचा परिणाम स्वपरविघातक होतोच. म्हणूनच या तपास शास्त्रकारांनीं अगदीं कमी प्रतीचें ठरविलें आहे. रावणानें तप करून शेवटीं स्वतःचीं दहामस्तकेंसुद्धां श्रीशंकराच्या पिंडीवर समर्पण करून, त्यास प्रसन्न करून घेतल्याचें आपल्यास पुराणावरून माहीत आहे. मात्र या त्याच्या तपांत स्वकल्याणापेक्षां देवादिकांचा छल करण्याचाच हेतु प्रबळ होता. हें त्याच्या पुढील चारित्रावरून स्पष्ट जाहलें; व शेवटीं त्यास स्वतःसह सर्व राक्षस कुळाचा श्रीरामरायाच्या महाहोमकुंडांत बळी द्यावा लागला.

सुभाषितांतील एका श्लोकांत संवाद रूपानें अशा दुष्ट लोकांच्या कृतीचें वर्णन केलें आहे. त्यांत, एका निबिड अरण्यांतून जाणाऱ्या हमरस्त्याचा मध्यावर एक गृहस्थ दररोज अंधाऱ्या रात्रीच्या समयीं बसत असे. त्यास एका चिकित्सक मनुष्यानें विचारलें व त्यानें उत्तर दिलें तें असेः–

पथि तिष्ठसि किं मूढ व्याघ्रोमाम् भक्षयत्विति ।
नरमांसरसाभिज्ञः पथिकान् भक्षयत्विति ॥

याचा अर्थ–प्र०– तूं असा या अरण्यांत रस्त्यामध्यें कां बसतोस ?

उ०– वाघानें मला खावें व त्यास नरमांसाची लालुच लागून त्यानें पुढें येणाजाणाऱ्या सर्वच पांथस्थांना खाऊन टाकावें म्हणून !

वरील तीन गोष्टींत, एक त्याचा संसार सुखानें चालण्यास प्रभुकृपेनें त्यास अवश्य असणारी सर्व सामग्री दिली असून सुद्धां मत्सरानें ग्रस्त होऊन परांचें नुकसान करणारा तामसी तप करितो; दुसरा अत्यंत धर्मज्ञ, भगवद्भक्त, अत्यंत बुद्धिमान, ब्रह्म कुलोत्पन्न असा तसेंच करितो; आणि तिसरा सरसहा मानवजातीचा शत्रु. अशा तीनही प्रकारच्या प्राण्यांतही दुसऱ्याच्या घाताप्रीत्यर्थ उद्योग करण्याची बुद्धि होऊन त्यांचा नाश झाल्यामुळें, असें तप अत्यंत निंद्य आहे, असें दाखविण्या करितांच हीं उदाहरणें दिली आहेत.

६८. **या तपाचे पोटभेद** — आतां तीनही तपें शरीरानें वाणीनें मनानें घडत असतात. म्हणूनच त्यांस 'शारीर' 'वाङ्मय' 'मानस' अशीं नांवें दिली आहेत. या तीनही तपांची व्याख्या गीताकारांनीं पुढील प्रमाणें लिहिली आहे—

६९. **शारीर तप**—

**देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवं ।**
**ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥**

याचा मला सांगितलेला अर्थ :— देव, द्विज, गुरु व ज्ञानी मनुष्य यांची पूजा करणें; स्वच्छता ठेवणें, वागणूकींत सरळपणा असणें, ब्रह्मचर्याचें परिपालन करणें, व कोणत्याही तऱ्हेनें लोकांस न दुखाविणें या सर्व गोष्टींनां 'शारीर तप' असें म्हणतात. या शारीर तपाच्या व्याख्येंत 'आर्जव' असें श्लोकांत आलें आहे. त्याचा अर्थ 'वागणूकींत सरळपणा' असा आहे श्री शंकरानंदांनीं आपल्या टीकेंत 'मनोवाक्कायकर्मणां एकरूपता' म्हणजे मन वाणी व शरीर यांच्या कृतीची निरंतर एकरूपता असा 'आर्जव' शब्दाचा अर्थ केला आहे. जसें मनांत येतें तसेंच बोलावें व शरीरानें वागावें असा याचा तात्पर्यार्थ आहे. मनांत एक, तोंडानें बोलावें दुसरें, व वागणूक पाहिली तर तिसऱ्याच प्रकारची, अशी अव्यवस्था नसावी हें सुचविलें आहे. असेंच खालील श्लोकांतही म्हटलें आहे.

**यथा चित्तं तथा वाचो यथा वाचस्तथा क्रियाः ।**
**चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता ॥**

अर्थ — जसें चित्तांत तसेंच वाणींत, आणि जसें बोलणें तशीच क्रिया. मन, वाणी व क्रिया हीं तीनही सज्जन लोकांचीं एकाच प्रकारचीं असतात. 'बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाऊलें' ही तुकाराम महाराजांची उक्ति सर्वांच्या परिचयांत आहेच.

७०. **वाङ्मय तप**— आतां वाङ्मय तप गीतेंत सांगितलें आहे. तें असें—

प्रभूच्या सत्यस्वरूपाची व अनंतत्वाची प्रतीति.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥

—गीता १७-१५.

अर्थ — सत्य, प्रिय व हितकारक आणि दुसऱ्याच्या अंतःकरणाला दुःख न देणारें अशा प्रकारचें बोलणें, व वेदशास्त्रादिकांचे पठण, यांस वाङ्मय तप असें म्हणतात.

ईश्वरानें मनुष्याला अनेक देणग्या अत्यंत प्रेमानें दिल्या आहेत. त्यांत वाणीची देणगी अत्यंत प्रेमाची आहे. हें देहयंत्रच प्रेमानें कल्पिलेलें, त्यांत घातलेली वाणीही प्रेमाचीच असणार आणि मानवी प्राण्याच्या चरित्राकडे पाहिलें म्हणजे त्याची उत्पत्ति मातापितरांच्या अत्यंत प्रेमांत, गर्भावस्थेंत त्याचें अत्यंत प्रेमानें संरक्षण, जन्म होतांच त्या बद्दल प्रेमोत्साह, त्याचें प्रेमानें संवर्धन इतक्या अनेकपरी प्रेमाच्या सत्संगांत असलेला प्राणी प्रेमळ व मधुर वाणीनेंच भरला असला पाहिजे. निसर्गतःच त्याच्या वाणींत प्रसाद असला पाहिजे. असें असून तिच्यांत कठोरता उत्पन्न होते हें आश्चर्य आहे. हीं दुःसंगतीचींच फळें असलीं पाहिजेत. वाणीचा उत्कृष्ट उपयोग केल्यास व्यवहारांत सर्व कांहीं सत्य होतें. आईच्या प्रेमळ बोलानें मूल सुखावतें. गुरुजींच्या प्रेमळ वाणीनें सच्छिष्य तयार होतो. कुटुंबांत प्रेमळ भाषेनें गृहसुख मिळते. पति पत्नी, बंधु बांधव, मालक चालक, सेनानी शिपाई, वक्ता श्रोता, दुकानदार गिऱ्हाईक, देव व त्याचा भक्त या सर्व अन्योन्य संबंधांत सप्रेम अंतःकरणाची भाषा सद्यःफल देणारी आहे.

७१. **मानस तप** — मानस तप म्हणजे—

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥

—गीता १७-१६.

अर्थः— नेहमी मन प्रसन्न ठेवणें, मनःशांति, अधिक न बोलणें, ईश्वराचें चिंतन करणें, बाह्य विषयांपासून मन परतविणें, तसेंच तें नेहमी

शुद्ध ठेवणें या सर्वांना मानस तप असें म्हणतात. हें तप सर्वांत अत्यंत श्रमसाध्य आहे. या विषयीं अर्जुनानें श्रीकृष्णास प्रश्न केला कीं,

**चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथी बलवत् दृढं ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करं ॥**

—गीता ६–३४.

कृष्णा, मन चंचल आहे. हें इंद्रिय काष्टांचें मंथन करून विवेक जाळून टाकतें. हें महान बलाढ्य आहे. धरूं जातां आवरत नाहीं. वाऱ्याची मोट बांधण्या इतकें त्यांस आवरणें कठीण आहे.

श्रीकृष्णांनीं उत्तर दिलें—

**अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ।**

—गीता १७–३५

अर्थः— अर्जुना, प्रयत्नानें हें आवरणें साध्य आहे. यास अभ्यास आणि वैराग्य अवश्य पाहिजेत. हा मनोनिग्रहाचा अभ्यास वामनपंडितांनीं याच श्लोकाचे टीकेंत फार मार्मिक रीतीनें सांगितला आहे. ते म्हणतात—

**आत्मत्व आधीं कळावें ।**
**मग मन अभ्यासीं वळावें ।**
**अभ्यासीं त्यास कवळावें ।**
**वैराग्ययुक्त बुद्धीनें ॥**

**स्थिर कराया मन ।**
**स्थळ आत्मयाविणा ।**
**मायिकपदार्थीं कांहीं असेना ।**
**वावरोच लागे अन्यत्र ॥**

**ज्यास पाहिजे सुख ।**
**तें चैतन्यावांचूनि नाहीं आणिक ।**
**चित्स्वरूपीं करितां अंतर्मुख ।**
**स्थैर्य पावे ॥**

येथें वैराग्याची आवश्यकता दाखवितांना म्हणतातः—

मन तेथें स्थिरत्व पावें ।
परी पूर्व संस्कार त्याला आठवे ।
म्हणूनी विषयांकडे धांवे ।
विषयजडत्व मानूनि ॥

चित्स्वरूपीं मन ।
लावितांही करी विषयचिंतन ।
तेथें पाहिजें वैराग्यसाधन ।
त्या वैराग्यसाधनें तें परतें ॥

उपाय नाहीं या विना ।
म्हणोनि या उपायें मना ।
न आंवरी त्यास योगसाधना ॥

अशा प्रकारें या तपाचें स्वरूप आहे. या तपाचें आचरण केल्यानेंच कोणतीही गोष्ट सिद्ध होत असतें. म्हणूनच मन महर्षीनीं—

७२. **तपाचा प्रभाव**— सांगितला तो असा :–

**तपोमूलमिदं सर्वं दैवं मानुषकं सुखम् ।**
**तपोमध्यं बुधैः प्रोक्तं तपोन्तं वेददर्शिभिः ॥**

—मनु ११ श्लो. २३४

अर्थः—मनुष्यांना किंवा देवांना जें सौख्य मिळतें, तें सर्व तपामुळेंच होय. व सौख्य जें टिकतें तेंही पण तपामुळेंच आणि सौख्याच्या शेवटीं ही पण तपच असतें. अशा रीतीनें सर्व सुखाच्या आरंभीं, मध्यभागीं, अंतीं तपच आहे असें सांगितलें आहे. सर्व प्राणमात्राची जर सुखप्राप्तीसाटीं सारखी धडपड चालू आहे, तर तें सौख्य मिळण्यास तप हें केलेंच पाहिजे. असा याचा मथितार्थ आहे.

**औषधान्यगदो विद्या दैवी च विविधा स्थितिः ।**
**तपसैव प्रसिध्यंति तपस्तेषां हि साधनम् ॥**

मनु. अ. ११ श्लोक २३७.

अर्थ – सर्व प्रकारचीं औषधें, आरोग्य, दैवी आणि मानवी विद्या, हें सर्व तपानेंच सिद्ध होतें. तप हेंच सर्वांचें साधन आहे.

**यद्दुस्तरं यद्दुरापं यद्दुर्गं यच्च दुष्करं ।**
**सर्वं तु तपसा साध्यं तपो हि दुरतिक्रमम् ॥**

मनु. अ. ११. श्लोक २३.

अर्थ – ज्यांतून पारपडणें कठीण, जें मिळणें कठीण, आणि जें करणेंही कठीण आहे तें सर्व तपःप्रभावानें साध्य होऊं शकतें. तपाच्या शक्तीच्या बाहेर कोणतीही वस्तु नाहीं.

**तपसा देवा देवतामग्र आयन् ।**
**तपसर्षयः सुरवन्वविंदन् ।**
**तपसा सपत्नान् प्रणुदायारातीः ।**
**तपसि सर्वं प्रतिष्ठति ।**
**तस्मात्तपः परम वंदति ॥**

—तैतिरीय अरण्यक १०–६३

याचा अर्थ असा सांगतात कीं, तपामुळेंच सर्व देवतामध्यें देव हे श्रेष्ठ जाहले. त्यामुळें ऋषींनीं स्वर्गलोक मिळविला तपानेंच शत्रूंचें निवारण करतां येतें. तपामध्यें कोणतें वाटेल तें सामर्थ्य आहे. यासाठींच तप हें सर्वांत श्रेष्ठ आहे.

तात्पर्य, ईश्वरोपासनेकरितां तपाचें अशा रीतीनें महत्व वेदशास्त्रांत सांगून, त्याचें महत्व आपल्या अंतःकरणावर बिंबविलें आहे. श्रम सोसण्यास जो भितो त्यास कसल्याही प्रकारचें फळ मिळणार नाहीं. लहानपणीं मुलांनीं वडिलांच्या आज्ञ प्रमाणें वागण्याचें तप केलें म्हणजें, तीं सुमार्गाला लागतात. पुढें अभ्यासरूपी तपानें, तीं विद्यासंपन्न होतात. आणि त्याच्याही पुढें स्वार्थत्यागरूपी आणि तितिक्षा म्हणजे सहिष्णुता, व समाधान, इत्यादि तपांनीं तीं देशोद्धार आणि समाजोद्धार करूं शकतात. इतकेंच नव्हे तर ईश्वरप्राप्ति ही करून घेण्याच्या विशिष्ट साधना पैकीं हें एक

साधन आहे, असें येथपर्यंतच्या विवेचनावरून समजून आलें असेलच. आतां 'स्वाध्याय' म्हणजे काय, याचा विचार करूं.

७२. **स्वाध्याय**—यमनियमांत स्वाध्याय सांगितला आहे. हे नियम ईश्वरोपासने करितां आहेत. या उपासनेचें ध्येय देवाविषयीं ज्ञान व त्याची प्राप्ति हें आहे. तें ज्ञान मिळणारें शास्त्र वेद आहेत. त्यांचें खरें ज्ञान सद्गुरू पासूनच मिळतें. त्या ज्ञानार्थ सद्गुरूनीं जो वेदार्थ सांगितला असेल त्याचें अध्ययन म्हणजे स्वाध्याय. हा स्वाध्याह वाङ्मय तपाचा एक भाग आहे, असें गीतेंतील पुढील श्लोकांत आहे.

**स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ।**

—गीता १७.१५

या श्लोकाच्या टीकेंत वामनपंडित म्हणतात—

**स्वाध्याय म्हणजे वेद । ज्यांत बोलिला आत्मत्वाचा अभेद ।**
**जेथें निषेधिला जडजीवेश्वराचा भेद । युक्तिदृष्टांतअनुभवें ॥**

**ऐसें वेद त्यांचा निर्णय । ज्या ज्या ग्रंथीं बोलिला अद्वय ।**
**त्या ग्रंथांचा अभ्यास होय । तरी वाङ्मय तपचि तें बोलावें ॥**

ईश्वराचें ज्ञान मिळविण्याचा अभ्यास करण्याचा प्रत्येक मनुष्यास, मग स्त्री असो पुरुष असो, अधिकार आहेच. भगवान म्हणतात—

**अपि चेत् सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मंतव्यः सम्यक् व्यववसितो हि सः ॥**
**क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वत् शांति निगच्छति ।**
**कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥**
**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।**
**स्त्रियो वैश्यास्तथाशूद्रास्तेपि यांति परां गतिं ॥**

गीता—७.३१,३२,३३

अर्थ—पूर्वीचा अत्यंत दुराचारी असून ही जर मला अनन्यत्वें शरण येईल तर त्यास साधूंतच गणलें पाहिजे. अशानें तो सत्वरच धर्मात्मा होतो,

आणि त्यास शाश्वत शांति मिळते. अर्जुना, मनुष्य माझा एकदां का भक्त बनला कीं त्यास नाश नाहीं हें पक्कें समज. त्यांच्या पदरीं पूर्वजन्मींचें पाप असून ते जन्मास आले असले तरी मला अनन्यभावानें शरण आल्यास त्यांना उत्तम गतीच मिळेल.

आतां 'स्वाध्याय' याचा शब्दार्थ 'सु अतीव आवृत्त्या स्वार्थं वा परार्थं अध्ययनं स्वाध्यायः' असा सांगितला आहे. याचा मराठींत असा अर्थ सांगतात कीं, वारंवार आवृत्ति करून स्वतः साठीं असो इतरां साठीं असो, जें अध्ययन त्यास स्वाध्याय असें म्हटलें आहे. या अध्ययनाची म्हणजे ब्रह्मविद्यार्जनाची गणना पतंजली महर्षींनें ईश्वरप्राप्तीच्या साधनांत करून, त्याची सर्वांना आवश्यकता आणि महत्व पटवून दिलें आहे. ब्राह्मणांपासून तों अंत्यजांपर्यंत स्त्री पुरुष यांचा भेद न राखिता यथावत् मनुष्यमात्रांनीं या स्वाध्यायरूपी तपाच्या आश्रयानें सद्गुरूंच्या कृपाप्रसादास पात्र होऊन आपआपला उद्धार करून घेण्याविषयीं शास्त्रकारांची भरपूर मुभा आहे. यानंतर,

७३. **ईश्वरप्रणिधान**— या शेवटच्या ईश्वरोपासनेच्या नियमाकडे वळू. ईश्वरप्रणिधान म्हणजे, मन, शरीर, कर्मे आणि त्यांचीं सर्व फलें सुद्धां यांचें ईश्वराचे चरणीं 'प्रणिधान' म्हणजे अर्पण करणें असा अर्थ महर्षि व्यासांनीं केला आहे. श्रीभगवान् गीतेंत अर्जुनास सांगतात—

**मय्यावेश्य मनो ये माम् नित्ययुक्ता उपासते ।**
**श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥**
**ये तु सर्वाणि कर्माणि मयि सन्यस्य मत्पराः ।**
**अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥**
**तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।**
**भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥**
**मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।**
**निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥**

—गीता १२.२,६,७,८

घर, सद्गुरूचा कृपाप्रसाद संपादन करून त्यांचे कडून ईश्वराविषयीं ज्ञान मिळविल्यानंतर त्या ज्ञानाची दृढता होण्याकरितां स्वाध्याय सांगितला. मग प्राप्त झालेला गुरुप्रसाद, देवाचें ज्ञान व त्यांचें मनन व निदिध्यास इतक्या साधनांनीं साधकाचें चित्त ईश्वराकडे लागणें साहजिकच आहे. असें चित्त लागल्यावर 'ईश्वरप्रणिधान' क्रमानें येतें अशा स्थितींत भगवान जें वर म्हणतात, त्यावर वामनपंडित आपल्या यथार्थदीपिकेंत म्हणतात—

आपला आत्मा अनंत अपार ।
त्या चित्स्वरूपींच माझा कल्पूनि आकार ॥
ध्याती त्यांचें मन निर्विकार ।
साकारीं निराकार पाहति ॥
तेव्हां मन तयांचें ।
प्रवेशलें म्हणावें मज माजि साचें ॥
म्हणूनि लक्षण त्याच्या सगुण ध्यानाचें ।
श्लोकाच्या आरंभींच बोलतसे ॥
मग प्रवेशवूंनि मन ।
करिती भगवद्रूपाचें चिंतन ॥
साकार तितके ते भक्तजन ।
निरंजन चिद्वस्तु पाहती ॥
तेव्हां मन तयांचें ।
म्हणावें प्रवेशलें भगवद्रूपीं साचें ।
भजन भगवंत ऐसें बोलतो ॥

याप्रमाणें प्रभूकडे, ज्ञान झाल्यानंतर सुद्धां सदोदित व अत्यंत श्रद्धेनें जे आपलें चित्त अर्पण करितात ते श्रेष्ठ योगी समजावे. जे साधक आपल्या सर्व कर्मांची फलें मला अर्पण करून अनन्य भक्तीनें आपल्या चित्तांत माझें ध्यान व माझी उपासना करितात त्यांचा या मृत्युलोकाच्या भवसागरांतून मी उद्धार करितो. म्हणून अर्जुना, माझ्याच ठिकाणीं तू आपलें चित्त ठेवून दे. तुझी बुद्धि माझ्याच ठिकाणीं राहू दे, म्हणजे तेव्हांपासून तुझा वास सदोदित मजमध्येंच होईल. याचें नांव ईश्वरप्रणिधान.

याप्रमाणें यमनियमांचें विवेचन झालें. त्यांत वेदशास्त्रांतील वचनांच्या अधारादाखल बराच उल्लेख आला आहे. असें करण्यांत मुख्य हेतु हाच आहे कीं, आपल्या प्राचीन शास्त्रांतील गूढ तत्वें शक्य तितकीं समजून घेऊन तीं जिज्ञासू स्त्री पुरुषांना समजाऊन देऊन, त्यांचें महत्व बंधुभगिनींच्या अंत:करणावर पटवावें असा आहे. जुनें तें वाईट, व नवें तें चांगलें, हा ग्रह ईश्वरकृपेनें सध्यांच्या काळीं तरी थोडा थोडा पालटत चालला आहे. अशा वेळां जर चोहोंकडून आपल्या प्राचीन वैदिक सिद्धांताचें विवेचन कालमानानुसार होईल, तर आम्हां आर्यांचें आर्यत्व दृढ होऊन तद्द्वारा देशोद्धार आणि समाजोद्धार जाहल्या वांचून कधींही राहणार नाहीं. ईश्वर निर्गुण निराकार आहे, एकच आहे, सर्वव्यापी आहे, अशा दृष्टीनें जेव्हां जेव्हां त्याची उपासना म्हणजे सेवा कर्तव्य असते त्यावेळीं शरीरास कष्ट देण्याची व बाह्य धूपदीपादिकांची गरज असत नाहीं. फक्त मनास या बाह्य संसारिक वासनेंतून काढून त्या सर्वव्यापी परमात्म्याकडे लावावयाचें, एवढेंच काय तें कर्तव्य असतें.

## प्रकरण ६ वें.

# सगुण उपासना.

मय्यावेश्य मनो ये माम् नित्ययुक्ता उपासेत ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥

—गीता १२–२.

७५. **अव्यक्तांतील सगुणोपासना**—सर्वव्यापी ईश्वराला मानासिक धूपदीप लागतात असें नसून निश्चल अंतःकरणरूपी ज्योतीनेंच त्या परमात्म्याला ओंवाळण्याचें असतें. अंतःकरण समर्पण होणें हींच त्या देवाची धूपार्ती, हींच त्यास पुष्पें, हाच नैवेद्य, आणि हाच नमस्कार. तात्पर्य, सर्व पूजा किंवा उपासना हींच आहे. मानव जातीचें अंतिम ध्येय आमच्या शास्त्रकारांच्या मतें हेंच आहे. हें ध्येय प्राप्तकरून घेण्याची इच्छा करणारालाच 'मुमुक्षु' असें म्हटलें आहे, व या ईश्वरालाच वेदांती लोकांनीं 'ब्रह्म' असें नांव दिलें आहे. तसेंच आत्मा, परमात्मा, इत्यादिही त्याचीं नांवें शास्त्रांतून आढळतात; आणि त्या परमात्म्याशीं ऐक्य संपादन करण्याकरितां उपनिषदांत—

आत्मा वारे द्रष्टव्यः श्रोतव्यो मंतव्यो निदिध्यासितव्यः

म्हणजे आत्मा कसा आहे तें (श्रुतींवरून) पहावें, वारंवार त्या आत्मरूपाचें वर्णन ऐकावें, त्याचें मनन करावें, व नंतर सारखा त्याचाच निदिध्यास करावा अशा रीतीनें त्या निर्गुण देवाचीच उपासना सांगितली आहे. परंतु ही निर्गुण उपासना प्रथमच मनुष्याचा हातून कशीं होऊं शकेल? मन एकदम साकार जगताचा त्याग करून निराकार परमेश्वराकडे कसें धांवेल? रात्रंदिवस मनाला या जगांतील बाह्य जडवस्तूंच्या संबंधानें साकारच होण्याची जास्ती संवय आहे. ज्याचा सहवास घडतो त्याच्या संवयी आंगीं जडतात. संसारी मनाला निर्गुण निराकार परमात्म्याची किंवा ईश्वराची उपासना करणें कठिण जातें. म्हणून भगवंतांनीं गीतेंत तो अव्यक्तोपासनेचा मार्ग कठिण आहे, असें सांगितलें आहे.

क्लेशोऽधिकतरस्तेषाम् अव्यक्तासक्तचेतसां ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥

—भ. गी. १२.५

अर्थ—अव्यक्त सर्वव्यापी आणि निर्गुण अशा परमात्म्याची उपासना करण्यांत क्लेश होतात. कारण कीं अव्यक्त परमात्म्याशीं ऐक्य मिळविण्याच्या प्रयत्नांत देहधारी मानवांस दुःख सोसावें लागतें.

७६. **अव्यक्तांतील सगुण उपासना**—वर हें गीतेंत श्रीकृष्णानीं सांगितलेलें विधान समाजातील सर्व साधारण प्राकृत जनांचें बाबतींत अगदींच खरें आहे. त्यांस 'भगवद्रूप जग हेंचि' ही गोष्ट लवकर पटणें कठीण. मनुष्यास एखादी गोष्ट पटावेणें झाल्यास एखादे वेळीं अगदी साध्या रीतीनें ती समजण्याजोगीं असली तरी, त्याच्या समजुतीस पटण्याजोगीं ती रीत असत नाहीं. त्यामुळें त्याच्याच समजुतीची पद्धत घेऊन त्यास ती गोष्ट पटवावी लागते. जसें व्यवहारांत, तसेंच ईश्वरोपासनेंत आहे. म्हणून हें जगच भगवत्स्वरूप आहे हें पटवून घेण्यास या जगाकडे ज्या दृष्टीनें निरिक्षण करण्याची अवश्यकता आहे, तशी दृष्टि व बुद्धिमत्ता ज्या मनुष्यामध्यें नाहीं तशांस प्रथमच निर्गुणोपासना करणें क्लेशकारक होणारच. अशाच प्राकृत सगुण उपासनेशिवाय गत्यंतर नाहीं. प्राकृत सगुण उपासना व संस्कृत सगुण उपासना अशा दोन सगुण उपासना आहेत. अव्यक्तोपासना ही सुद्धां सगुण उपासनाच. परंतु ती संस्कारा शिवाय सुलभ होणें शक्य नाहीं. या अखिल सृष्टींत देव भरला आहे. व ही सृष्टीच भगवद्रूप आहे. अशी समजूत पटण्यास, बुद्धीस अन्वय व्यतिरेकाचा संस्कार हवा लागतो. असा संस्कार होण्यास ज्याच्या बुद्धीची तयारी आहे, त्यास प्रत्येक ठिकाणीं सृष्टींत प्रभूचें षड्गुणैश्वर्य भरलेलें पाहण्यास शिकतां येईल. अशा अवलोकनांत साधक ईश्वराच्या षड्गुणाचाच उपासक होतो. ते गुण प्रत्यक्ष त्यास दिसू लागतात. त्याची सगुण उपासनाच होते. अशा उपासनेनेंच प्रभूचें सदासर्वदा व सर्वत्र सांनिध्य पटतें. प्रभूचें षड्गुण व त्यांचा जगावर झालेला परिणाम स्पष्ट रीतीनें त्यास पटूं लागतात. त्यामुळें त्याची कृतज्ञता,

समत्ता, सत्‌बुद्धि व प्रभूवर जसें तसेंच जगावर त्याचें प्रेम हीं सर्व दृढावतात. अशा संस्कार झालेल्या बुद्धीनें झालेली सगुण उपासना ‘ संस्कृत सगुण उपासना ’ म्हणावी. अशा उपासनेंत भक्त व देव हा भाव कांहीं ही कमी होत नाहीं. मनाची एकाग्रता करण्यास ही श्रम जास्त पडण्याचा संभव कमी. ध्यान व आवाहन वगैरे, मंत्रांतच रहात नाहीं. प्रभूचें सांनिध्य कल्पावें लागत नाहीं. प्रभूची प्रत्यक्षता हातोहात मिळते, परंतु इतक्या सर्वांच्या मूळांत सद्‌गुरुकृपेची मात्र अवश्यका अत्यंत आहे. त्या शिवाय नुसती बुद्धिमत्ता कांहींच कामाची नाहीं. सद्‌गुरु कृपेंशिवाय जगांत प्रत्येक ठिकाणीं देव पहाण्याजोगीं दृष्टी उघडण्यास अन्य कोणी ही समर्थ नाहीं. सद्‌गुरूंनींच ती संस्कृत केली पाहिजे. त्यांचेच कृपांजनाची जरूर आहे. अशा रीतीनें साधनसंपन्न होण्याच्या लायखीची माणसें समाजांत थोडी कमीच आहेत. आणि प्राकृत जनास त्यामुळेंच अव्यक्तोपासना सुलभ नसल्याचें गीतेंत सांगण्याचा प्रसंग आला. म्हणून त्यांस, ‘ईश्वरोपासना’ तर अवश्य असल्यामुळें प्राकृत सगुणोपासना सोपी म्हणून ती करण्याची तरी जरूर आहे. यांत ईश्वराची, आपआपल्या परंपरेनुरूप जो ज्या देवाला भजत असेल, त्या देवाची मूर्ति कल्पून पूजा करीत जाण्याविषयीं गीताशास्त्रांत सांगितलें आहे.

७७. **प्राकृत साधकांस अव्यक्त उपासना दुःसाध्य** — शिवाय, देह अल्प आहे आणि त्यांतील बुद्धिही अर्थातच अल्प असणार. तेव्हां अशा अल्पाला त्या महान् अव्यक्त ईश्वराचें चिंतन कसें करितां येईल? व त्यास ईश्वरप्राप्ति तरी कशी होईल? एखाद्या महात्म्याची कीर्ति ऐकतांच साधारणतः प्राकृत लोकांना असें वाटतें कीं हे जर महात्मे आहेत व साधु म्हणवितात तर मग आम्हांस एकदम ईश्वरप्राप्ति कां करून देत नाहींत? आम्हांस देव कां दाखवीत नाहींत? परंतु, त्या सर्वव्यापी देवास बघण्यास आपलें अल्प अंतःकरण तयार नाहीं हें यांना समजत नाहीं. आणि अशा रीतीनें आपला दुर्बलपणा महात्म्यावर लादतात. अशा विषयींच एक हकीकत अशीं सांगतात कीं, काशी क्षेत्रीं एका सत्पुरुषा जवळ एक धूर्त गृहस्थ

गेलें आणि 'मला ईश्वर दर्शन करवून द्या' अशी त्यानीं विनंति केली. धूर्तास साधूंनीं ओळखून त्याजकडून एक पेलाभर दूध आणविलें. व तें आंत नेऊन धूर्तास देऊन तें पिण्यास सांगतांना बजाविलें कीं, दूध आणतांना जो उंट तुम्ही पाहिला, तो मनांत न आणितां दूध प्यावें. तें त्याच्यानें होईना. उंटाची आठवण जाईना. हें त्यानें कबूल केल्यावर ते सत्पुरुष त्यास म्हणालें, आतांच्या आतांच पाहिलेल्या एका उंटाला तुम्हाला विसरतां येईना. मग अनंत जन्मापासून मनावर जाहलेले या संसाराचे संस्कार एकदम नाहींसे करून तुम्हास ब्रह्म कसें प्राप्त करून घेतां येईल? माया ममतेचा त्याग करून अनेक जन्म तप करावें तेव्हांच ब्रह्म प्राप्त होत असतें. म्हणूनच गीतेंत भगवंतांनीं

**अनेक जन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ।**

—गीता ६. ४५.

म्हणजे, अनेक जन्मीं तप करीत करीत सिद्ध जाहल्या नंतर परम पदाला मनुष्य प्राप्त होतो, असें सांगितलें आहे.

७८. **ती दुःसाध्य असण्याचीं कारणें**—ईश्वर प्राप्ति किंवा ब्रह्मप्राप्ति या गोष्टी कांहीं सामान्य नव्हेत. निर्गुण परमेश्वराच्या प्राप्तीसाठीं सद्गुरूंची कृपा, श्रुतिस्मृतींचें ज्ञान, पूर्ण वैराग्य आणि निरंतर अभ्यास इतक्या गोष्टी जेव्हां जुळून याव्यात तेव्हां ईश्वरज्ञान होण्याचा संभव. एरवीं कसें होणार? आपण सर्वच पडलों संसारी; मायाममतेचा पगडा आमच्या मनावर पूर्ण बसलेला. धनदौलत हा एक आमचा प्राणच होऊन बसला असल्यानें वैराग्याची वार्ता सुद्धां आह्मांस कडू झार लागते. मग तें वैराग्य आणि तें नियमन, कसें होणार?

याविषयीं ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—

**विषय विषाचा परि पाडू ।**
**गोड परमार्थ तो लागे कडू ।**
**आणि कडू विषय तो गोड जिवाशीं झाला ॥**

एवढ्यासाठींच संसारातील प्राकृत लोकांना सुलभ जावें म्हणून शास्त्रकारानीं निर्गुण परमेश्वराकडे जाण्यापूर्वी 'सगुण देवाची उपासना' सांगितली आहे. व ही उपासना निर्गुण उपासनेपेक्षां सोयीची आहे; व सामान्य माणसांना ती करतां येण्यासारखी आहे. म्हणूनच श्रीमत्‌भगवद्गीतेंत अव्यक्त निर्गुण ईश्वराची उपासना देहधारी प्राकृत मानवांना कठीण आहे असें सांगून, पुढें सगुण उपासना सांगितली आहे. भगवान् काय सांगतात तें पहा--

**ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।**
**अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥**
**तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।**
**भवामि न चिरात् पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥**

—भ. गी. अ. १२.

अर्थ--अर्जुना! जे कोणी सगुण उपासक सर्व कर्में व कर्मफलें मला अर्पण करून निरंतर मजकडेच चित्त ठेवून (माझ्या स्वरूपाशीं एकरूप) होऊन माझी उपासना करतील, त्यांचा या मृत्युलोकाच्या घनघोर संसारापासून मी तत्काल उद्धार करितो. मात्र त्यांनीं निरंतर मजकडेच चित्त ठेविलें पाहिजे.

७९. **सगुण साकार देवाची उपासना**—सगुण देव म्हणजे साकार षड्‌गुणासहित देव. आपण प्राणी जर कोणत्याना कोणत्या तरी आकारानेंच आहोंत, तर आमचा देवहा आमच्या सारखाच कोणत्याना कोणत्या तरी आकारांत आहे असें गृहित धरल्यावांचोन आम्हांस त्याची उपासना म्हणचे भक्ति कशी करितां येईल? व अशा रीतीनें अव्यक्त ईश्वराला एकाद्या व्यक्तरूपानें ओळखण्यास शास्त्रकारांचीही आज्ञा आहे. वेदांतून किंवा उपनिषदांतून आणि इतर पुराण ग्रंथांतून सूर्य अग्नि वगैरे ईश्वराचीं निरनिराळीं रूपें सांगितलीं आहेत. ईश्वर जरी अतिशय मोठा व सर्वव्यापी असला, तथापि त्याच्या भक्तांसाठीं तोही लहान होतो. श्री भगवद्भक्त शिरोमणि तुकाराम महाराज—

**हरि तुका ह्मणे अवघा एकुला, परि हा धाकुला भक्ती साठीं ॥**

असें जें सांगतात, तें योग्यच आहे. देव भक्तासाठीं धाकला होतो इतकेंच सामान्यपणें तुकोबांनीं सांगितलें आहे. तो अमुकच एका प्रकारचा होतो असें सांगितलें नाहीं. यांतील इंगित हेंच कीं मनुष्य प्रेमानें ज्या आकारांत देवाला पाहूं इच्छील त्या आकाराचा देव त्याला दिसतो. देव पाहण्यासाठीं अमुक एक ठरीव आकाराची अवश्यकता नसून प्रेमाचा ओघच खरें कारण आहे. ज्या वस्तूंवर आपण देवाची भावना करूं, तेथें देव हा दिसलाच पाहिजे जड पदार्थ म्हणजे काष्ट, पाषाण, किंवा इतर कोणत्याही धातूंत, उदकादि वस्तूंत सुद्धां देव उत्पन्न होण्यास त्या वस्तूंना कांहीं एक करावें लागत नसून, निव्वळ मनुष्याच्या भावनेच्या जोरावरच त्या त्या ठिकाणीं देवाची प्रतीति होते. मनुष्य प्राण्याचें मात्र तसें नाहीं; त्याला देव होण्यास कांहीं तरी स्वतः प्रयत्न करावा लागतो. मनुष्यप्राणी जीवन कलहांत षड्विकारांच्या जाळ्यांत गुरफटला आहे. त्यांच्या हांतून मुक्त होऊन आपलें व समाजाचें कल्याण करण्याची ताखत येण्यास अनेक जन्माचे तपश्चर्येनें पूर्ण ज्ञान मिळवून ब्रह्मप्राप्ति झाल्यानंतरच त्यास देवत्व मिळतें. श्री रामाचा पिता दशरथ व श्री कृष्णाचा पिता वसुदेव या उभयतांना जी पदवी नाहीं मिळाली, ती देव ही पदवी श्रीराम व श्रीकृष्णांनीं मिळविली. राम कृष्णांचीं मंदिरें लाखों झालीं, परंतु त्यांच्या पित्यांचें–दशरथ वसुदेवाचें–कोठेंही नाहीं. यांतील तात्पर्य इतकेंच कीं वृक्ष पाषाणादि जड वस्तूंना देवत्व प्राप्त करून घेण्यास, त्यांना स्वतःना कांहींच करावें लागत नाहीं. पण मनुष्यास मात्र बरेचसें प्रयत्न करावे लागतात. कसें कां असेना, साकार देवही आहेच. यांत मात्र तिलप्राय संशय नाहीं. रामतापनीय उपनिषदांत—

**उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना ।**

म्हणजे उपासकांच्या, अर्थात् भक्तांच्या कामना पूर्ण करण्या करितां, निर्गुण निराकार ब्रह्मास सुद्धां सगुण साकाररूप घेण्याची अवश्यकता लागते, असें सांगितलेलें आहे. असेंच वामनपंडितही ह्मणतात.

जगीं देव आकारिला भक्तराजें ।
तयाला दिलें भक्तिभावार्थ ओझें ॥

याच मुद्यावर भागवतांतील एक गोष्ट मोठी बोधपर आहे. ती अशी :- द्रौपदीनें श्रीकृष्णाचा धांवा एका संकट समयीं केला. त्यावेळीं श्रीकृष्णास येण्यास बराच विलंब झाल्यामुळें, द्रौपदीनें 'देवा मी किती तरी तुझी वाट पाहिली!' असें म्हटलें. तें ऐकून श्रीकृष्ण म्हणाले कीं, द्रौपदी तुझ्या धांव्यांत तूं जें जें म्हणालीस त्या त्या प्रमाणें मला करणें प्राप्त झालें. तूं म्हणालीस रुक्मिणीचे माहालांत असशील; त्या प्रमाणें तेथें जाणें प्राप्त झालें. तूं असेंही म्हणालीस कीं तूं भक्तांचें हृदयीं असशील; त्या प्रमाणें तेथेंहीं गेलों होतो. त्यामुळें येण्यास अवकाश झाला. सारांश इतकाच कीं द्रौपदीचे भक्ती साठीं श्रीकृष्ण परब्रह्म अनेक रूपें अनेक ठिकाणीं धारण करण्यास तयार झाले. या साकार ब्रह्माच्या आधारानेंच पुढें निर्विकार ब्रह्म स्वरूपाकडे जावयाचें आहे.

८०. **साकार देवाविषयीं भिन्न भिन्न कल्पना**— साकार किंवा सगुण देव हा ज्या त्या मनुष्याच्या कल्पने प्रमाणें असतो. पृथ्वीच्या पाठीवरील अनेक देशांतील अनेक समाजांत निरनिराळे जे देव आणि त्यांच्या उपासना दृष्टीस पडतात; त्यांतील मर्म मुद्दां हेंच आहे. इतर बाबी प्रमाणें या बाबतींतही आपली कल्पना दुसऱ्यावर लादतां येत नाहीं, लादू ही नये. दरएक मनगटाच्या कमजास्ती प्रमाणानें जशीं निरनिराळीं कांकणें असतात, किंवा निरनिराळ्या डोक्याच्या मानानें जशा निरनिराळ्या मापाच्या पगड्या असतात त्याच प्रमाणें भिन्न भिन्न देशांतील लोकांच्या अनेक विध भावनां प्रमाणें ईश्वराचीं सगुण रूपें अनेक कल्पिलीं असल्यास, त्यांत नवल तें काय? आपल्या एका हिंदुस्थानांतच पाहिलें तर, शंकर, विष्णु, गणपति, दत्त, म्हसोबा, विठोबा, खंडोबा इत्यादि देवांच्या मूर्ती, आणि सरस्वती, लक्ष्मी, अंबाबाई इत्यादि देवतांच्या अनेक मूर्ती दृष्टीस पडतात. हे इतके भेद कशानें झाले म्हणाल, तर मनुष्याच्या भावनेनेंच म्हणजे कल्पनेनेंच

हें सर्व जाहलें आहे असें अनुभवावरून सिद्ध होतें. 'भिन्न रुचिर्हि लोकः' हें तत्व व्यवहारांत आणि परमार्थांत सारखेंच लागू आहे.

८१. मात्र केव्हां केव्हां हें तत्व आम्हीं विसरतों. व आह्मीं ज्यास देव किंवा धर्म म्हणतों, तोच देव धर्म इतर सर्व लोकांनीं करावा, असें आह्मांस वाटतें, व त्याबद्दल आमचा दुराग्रहही होतो. व त्यामुळें शेवटीं आह्मांस त्रास आणि दुःख भोगावें लागतें. व्यवहारांतील अगदीं सर्वमान्य सौंदर्याची कल्पना सुद्धां जर भूतलावर एकरूपानें नांदत नाहीं, तर मग देवाची कल्पना तरी कशी एक असेल ? मुख्य मुद्दा हाच आहे कीं, ज्या प्रमाणें मनुष्याची भावना म्हणजे कल्पना त्या प्रमाणेंच तो आपला सांसारिक आणि पारमार्थिक व्यवहार करीत असतो.

८२. धर्माच्या बाबतींत भांडणें होतात तीं तर हास्यास्पदच असतात. त्यावरून सगुण उपासक शैव वैष्णवांचा किंवा वैष्णव रामानुजांचा व गाणपत्यांचा, श्रेष्ठत्वाबद्दलचा तंटा अशाच प्रकारचा आहे. अशा रीतीनें आपल्या बुध्द्यनुसार दुसऱ्याचा देव कनिष्ठ आणि आपला देव श्रेष्ठ असें प्रतिपादन करण्याकडे मनुष्याची प्रवृत्ति असते. परंतु,

जलमृत्काष्ठपाषाणवास्यकुद्दालकादयाः ।
ईश्वराः सर्व एवैते पूजिताः फलदायिनः ॥

—पंचदशी.

म्हणजे प्राणी, मृत्तिका, लांकूड, पाषाण, कुदळ इत्यादि सर्वच ईश्वर आहे. त्याचीं पूजा केली असतां त्यापासून फळ मिळाल्या खेरीज राहणार नाहीं. हें तत्व लोक विसरतात. म्हणूनच आपआपसांत अनेक तंटे बखेडे माजतात. भगवद्गीतेंत मुद्दां हाच अभिप्राय श्रीकृष्णांनीं व्यक्त केला आहे. पहा,

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥

—गीता ७-२१.

अर्थ— कोणत्याही सगुण मूर्तीचा भक्त ज्या मूर्तीची श्रद्धापूर्वक पूजा करण्याची इच्छा करीत असेल ती त्याची श्रद्धा त्याच मूर्तिचे ठिकाणीं मी दृढ करितों. पुढें—

स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।
लभते च ततः कामान् मय्यैव विहितान् हितान् ॥

—भ. गी. ७.२२

मग त्याच भक्तीनें भरून तो त्या सगुणमूर्तीचीच आराधना जास्ती जास्ती करूं इच्छितो; आणि पुढें, त्याच सगुणमूर्तीचे द्वारें मी त्याची सर्व कामना पूर्ण करितों. अशा रीतीनें सर्व इच्छित फळें त्याला मिळतात. या प्रमाणें गीताकारांनीं सांगितलें आहे.

८२. **उपासनेस भक्तीची अवश्यकता—** मात्र त्या पूजनांत भक्ति म्हणजे प्रेम पाहिजे; व श्रद्धाही पाहिजे. त्या बांचून कार्यसिद्धि होत नाहीं. भक्तीचा अर्थ शांडिल्यसूत्रांत ‘सा परानुरक्तिरीश्वरे’ म्हणजे ईश्वराच्या ठिकाणीं जी अत्यंत प्रीति तिचेंच नांव भक्ति असें आहे. संसारांत जसें एकाद्या बस्तूवर अथवा मनुष्यावर अत्यंत प्रेम असतें, तसेंच ईश्वरावर केलें पाहिजे. अनुरक्त होणें म्हणजे त्यांत अंतःकरणापासून रंगणें. एकादा पैसा खिशांतून पडला कीं, जीव जसा तळमळतो, किंवा आपलें प्रेमी माणूस क्षणभर नजरेआड गेलें कीं जीव जसा कासावीस होतो, तद्वतच क्षणभरही देवाच्या सानिध्यावांचून गेला कीं जीवास तळतळ लागली पाहिजे. याचेंच नांव ‘परानुरक्ति’. अशी प्रीति असेल तेव्हांच तिला भक्ति हें नांव शोभतें. या भक्तींत किंवा या प्रीतींत स्वार्थी बुद्धीला बिलकून थारा मिळत नाहीं; आणि तर तम भाव उरत नाहीं. या प्रेमांत स्वार्थ हा आपोआपच साधला जातो. तो साधून घेण्याकरितां भक्ताला निराळी खटपट करावी लागत नाहीं. भक्ताच्या प्रीतीला यश देऊन देव त्यांचें इच्छित मनोरथ तत्काल पूर्ण करितो, आणि त्याच्या सर्व संकटाचें निवाहण करितो. संकट निवारण कर, किंवा अमुक एक मला दे, असें भक्तानें म्हणण्याचें कारणच नसतें. तें सर्व

आपोआपच घडतें. व्यवहारांत सुद्धां जर कोणाची तरी कशाही रूपानें सेवा केली तर ती जशी व्यर्थ जात नाहीं, तद्वतच भगवंताची सेवाही व्यर्थ जात नाहीं. आह्मी सेवा करितों ती देवाला समजत कां नाहीं, मग तो सर्वज्ञ कसला? आह्मी भक्तांनीं मागितल्या नंतर मग देव आम्हांस देतो, असें नसून, न मागतांच आमचें इच्छित मनोरथ तो पूर्ण करणारा आहे. फक्त अनन्य भावानें त्यास शरण जाणें, इतकेंच आमचें काम. हें बरोबर रीतीनें आम्ही पार पाडिलें कीं, भगवान काय सांगतात तें पहा—

**अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥**

—भ. गी. ७.२२

अर्थ—अनन्य भावानें जे माझेंच चिंतन करितात, म्हणजे माझीच आठवण ठेवितात, ते मजमध्येंच गुंग असल्यामुळें त्यांचें पारमार्थिक व व्यवहारिक मनोरथ पूर्ण करण्याचा बोजा मजवर आहे. ही भगवंताची प्रतिज्ञा कधींही खोटी होत नाहीं. मुलावर जशी मातेची नैसर्गिक प्रीति असते, त्याचप्रमाणें भक्तांवर देव प्रेम करितो. मुलांना आमच्यासाठीं घरेंदारें घेऊन ठेवा म्हणून कांहीं मातापितरांना सांगावें लागत नाहीं. आईबाप आपण होऊनच मुलांच्या योगक्षेमाची तरतूद करितात; तसेंच देवही भक्तांच्या योगक्षेमाची व्यवस्था करीत असतो.

**देव भावाचा भुकेला ।**

असें जें तुकोबा म्हणतात, तें अक्षरशः खरें आहे. मात्र भक्तांचें निरतिशय प्रेम देवावर पाहिजे, इतकेंच काय तें. लहान मुलांचें बोबडे बोल किंवा त्यांच्या खोड्या सुद्धां जशा आईबापांना गोडच लागतात, तद्वतच भक्तांचें बोबडे, पण प्रेमळ बोल देवाला भारीच गोड लागतात.

**माझ्या बोबडिया बोला ।**
**चित्त द्यावें गा विठ्ठला ॥**

असें जें तुकोबानीं सांगितलें आहे, तें अक्षरशः खरें आहे.

८४. **भक्तांचे वर्ग**—आतां भक्त कसे असावेत याचा आपण विचार करूं लागलों असतां, माझ्या मतें मी भक्तांचे दोन वर्ग करते. एक 'सापेक्ष' व दुसरे 'निरपेक्ष.' निर्गुण, सर्वांतर्यामी, व अव्यक्त ब्रह्मप्राप्तीसाठीं जशी सगुण ब्रह्माची उपासना करावी लागते, तद्वतच निरपेक्ष म्हणजे निःस्वार्थीपणाची भक्तिही संपादन करण्यासाठीं प्रथम सापेक्ष भक्तीच सामान्य जनतेस करणें भाग आहे; व यांत कांहीं गैरही नाहीं. भक्तीपासून कांहीं तरी लाभ आपल्यास होईल, अशी भावना असल्याशिवाय सामान्य लोक त्या देवपूजनाकडे कसें वळतील? निःस्वार्थी भक्ति असावी असें किती जरी सांगितलें तथापि सामान्य जनतेला तें पटत नाहीं; व पटलें तरी तें कृतींत उतरत नाहीं; व अशा स्वार्थी बुद्धीनें कां होईना परंतु देवाची सेवा करण्यांत भक्ताला किंवा देवाला कांहीं कमीपणा आहे, असेंही मला वाटत नाहीं. एम्. ए. होण्याकरितां जशा प्रथम पहिल्या इयत्तेंत बाराखडीपासून शिकावें लागतें, तद्वतच अव्यक्त ईश्वराशीं तादात्म्य पावण्याकरितां स्वार्थी सगुण भक्तीचीही जरूरी भासली तर त्यांत नवल तें काय? स्वार्थी भक्ति करणें, देवाशीं देववेव होते, असें कित्येक समजतील, परंतु मी म्हणते कीं, अनंत जन्मापासून मनुष्याला जी ही व्यवहारांतील स्वार्थ लोभाची सवय लागली, ती देवाच्या बाबतींत तरी एकदम कशी नाहींशी होईल? श्रीमान्, सत्ताधीश, विद्वान अशा मानवांच्या सहवासापासून जर आपण आपल्या संसारी लाभाची अपेक्षा करितों, तर सर्व शक्तिमान् षड्गुणैश्वर्यसंपन्न प्रभूच्या सेवेपासून तसली अपेक्षा करूं नये हें तत्व सामान्य जनतेला एकदम कसें पटेल? सर्व जगताचा व्यवहारच जर परस्परांच्या सहाय्याच्या अपेक्षेनें चालला आहे, तर देवाच्या दरबारांत तरी हें सापेक्षतेचें नाणें कां चालूं नये? स्त्री असो कीं पुरुष असो ते प्रसंगविशेषीं देवाला नवस करितात, व म्हणतात कीं, देवा माझें हें कार्य झालें कीं, मी तुला अमुक अमुक करीन. यांत ऐहिक रीत्या वावगें कांहीं एक नसून हा सर्व व्यवहार सृष्टिक्रमाला धरूनच आहे. ऐहिक स्वहितासाठीं कां होईना, परंतु देवाकडे चित्त गेलें, हा एक प्रकारें मोठा लाभच झाला असें मी समजते. असें केल्यानें देवावर

प्रेम जडतें. अभ्यासानें तें प्रेम दृढ होतें. देव उणें पडूंनच देत नाहीं. मग वासना आपोआप कमी होतात. मग याचें पर्यवसान निष्काम भक्तींतच होणार.

८५. या प्रमाणें ईश्वराची उपासना दोन प्रकारची आहे असें मीं सांगितलें. ती करणारे भक्त, सगुण उपासक आणि निर्गुण उपासक अशा दोन प्रकारचे ठरलें. या उपासकांचे पुनः चार वर्ग होतात. भगवंतांनींही या सर्व प्रकारांचा उल्लेख गीतेंत केला आहे.

**चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ।**
**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥**

—गी. ७. १६.

अर्थ—अर्जुना, चार प्रकारचे सत्कर्मी लोक माझी सेवा करितात. इष्ट वस्तु प्राप्त करून घेण्याची इच्छा करणारे, दुःखी, जिज्ञासु, व ज्ञानी. व पुढें भगवान् म्हणतात,—

**उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।**

—गी. ७. १८.

अर्थ—हे वर सांगितलेले चारी प्रकारचे माझे उपासक सद्बुद्धीचेच आहेत. मात्र ज्ञानी हा माझा आत्माच आहे असें मी मानितो. अर्थात, तो सर्वांत श्रेष्ठ आहे. या विवेचनावरून सहजच समजून येईल कीं, ऐहिक स्वहितासाठीं असो कीं निव्वळ परब्रह्मस्वरूपाच्यासाठीं असो अथवा तें प्राप्त झाल्यानंतर असो, जो कोणी ईश्वराकडे यत्किंचितही चित्त लावितो, तो 'उदार' ह्मणजे सद्बुद्धीचाच आहे, असें भगवान म्हणतात.

८६. भक्त ज्ञानी होईपर्यंत पहिल्या तीन प्रकारच्या भक्तांस प्रथम ईश्वराचें कृपेची अवश्यकता एखाद्या संकटसमयीं भासली पाहिजे. गरजेशिवाय एखाद्या मोठ्या माणसाची मैत्री संपादन करण्यास कोणी जात नाहीं. प्रथम तो त्याची ओळख करून घेतो.

८७. **आर्त भक्त** — या प्रमाणें ईश्वरोपासनेचे अवश्यकतेचा उगम संकटांतच होत असतो. बाहेरचे सर्व इलाज थकले व संकटही हटेना, अशी स्थिति झाली म्हणजे मग देवाची आठवण होत असते. संकटें व दुःखें हीच या जगांतील बहुतेकांशीं सदाचाराची व ईश्वरभक्तीची ओळख करून देणारीं आहेत. पूर्वपुण्याईनें ज्यांना सत्कुलांत जन्म मिळाला आहे, किंवा सज्जनांची संगति मिळाली आहे, ते मात्र संकटावांचूनही ईश्वरोपासक असतात. परंतु इतरांची स्थिति तशी नाहीं. जोपर्यंत सर्व इंद्रियें बरोबर काम देत आहेत, व व्यवहारिक साधनसंपत्ति जवळ आहे, तोपर्यंत मानवी-वृत्ति जगांत कोणी ईश्वर आहे कीं नाहीं याचा, विशेपसा तपासच करीत नाहीं. बाह्य सुखसाधनावरच जास्ती विश्वास असतो. या बाह्य गोष्टींच्या पलीकडे विचार करण्याची गरजच वाटत नाहीं. परंतु कालवशें करून एखादें संकट आलें, व त्यांत बाह्य सर्व उपाय थकले किंवा विशेप प्रसंगीं एकादा अद्भुत चमत्कार पाहिला म्हणजे मग देवाची आठवण होते. 'देवा, तूंच आतां मला तारणारा, तुज वांचून दुसरें कोणी नाहीं. मी अनन्य भावांनीं तुला शरण आहे.' अथवा 'तुझी सत्ता अगाध आहे,' असे सहजच उद्गार बाहेर पडूं लागतात.

८८. पुराणांतरी गजेंद्रादिच्या कथा हेंच दर्शवितात. तारुण्याच्या भरांत स्वतःच्या अनेक स्त्रियांसह जलाशयांत क्रीडा करण्यांत मग्न असलेल्या गजेंद्रास प्रथम देवाची आठवण कशी होणार? मोठी शक्ति, तारुण्य, व सर्व प्रकारचीं सुखसाधनें, इतकें त्याच्या पूवपुण्याईनेंच त्यास सहज प्राप्त झालें होतें. तेव्हां संकट प्राप्त होईपर्यंत देवाची आठवण झाली नाही, यांत नवल तें काय? परतु त्या सर्व स्त्रियांसह व परिवारांसह जलाशयांत आनंदानें क्रीडा करीत असतांना पुढें एकदम जेव्हां नक्रानें पाय पकडला, व तो त्याला सोडवितां येईना, आप्तइष्टांच्या हातून त्या संकटांतून मुक्तता होईना, तेव्हां मग त्यानें भगवंताचा धांवा केला, आणि अनन्य भावानें शरणागत होऊन त्याच सरोवरांतील एक कमल त्यानें दीनवाणीनें व भक्तीनें देवाला अर्पण केलें. भगवंतांनीं आपल्या 'भक्तवत्सल' या नांवा प्रमाणें

लागलीच येऊन त्या गजेंद्राचा उद्धार केला. त्याची उपेक्षा केली नाहीं. 'आतां संकटाचे वेळीं मात्र माझें स्मरण करितो, व आनंदांत होता तेव्हां त्यानें मला विचारिलें मुद्धां नाहीं,' अशी देवाच्या मनांत कल्पनाही आली नाहीं.

८९. देवाला पतितपावन, व दीनोद्धारक, अनाथांचा नाथ, इत्यादि पदव्या शास्त्रकारांनीं दिल्या आहेत. यावरूनही प्राणिमात्रांना त्यांच्या हीन व दीन अवस्थेंत भगवंताची आठवण होते, आणि त्याच्या मदतीची जरूरी भासते, व भगवानही त्या संकटसमयीं धांवून येतो, असेंच नाहीं कां सिद्ध होत? मनुष्यप्राणी जोपर्यंत सुखांत असतो, तोपर्यंत त्याला आनंदरूपी परमेश्वराचें सानिध्य असतेंच, असें म्हटलें तरी चालेल. व हें आनंदरूपी सानिध्य संकटसमयीं नाहींसें होतें; आणि मग मनुष्यप्राणी त्या ईश्वराचा धांवा करितो. व तो धांवा भक्तिपूर्ण असला ह्मणजे ईश्वर भक्तांस पुनरपि आनंद देतो. अशी ही देव व भक्त यांची पहिली भेट होत असते. परंतु संकटसमयीं धांवा केला तरी देव पावत नाहीं, असें जेव्हां दिसतें, तेव्हां पुरीशी उत्कटता त्या धांव्यांत नसते असेंच खरें. ही उत्कटता उर्फ कळवळा कसा असावा लागतो याचें उदाहरण श्रीशंकराचार्यांनीं देवीची स्तुति करितांना जें हृदय हलवून सोडणारे उद्गार काढले आहेत, त्यांत दिलें आहे. ते म्हणतात,

> आपत्सु मग्नः स्मरणं त्वदीयं करोमि दुर्गे करुणार्णवेशि ।
> नैतच्छठत्वं मम भावयेथाः क्षुधातृषार्ता जननीं स्मरंति ॥
>
> —देव्यपराधक्षमापनस्तोत्र.

**अर्थ**—हे करुणाशालिनि दुर्गे, जेव्हां मी संकटांत बुडून जातों, त्याच वेळीं तुझा मी धांवा करितों. असें करण्यांत माझी कसल्याही प्रकारची लबाडी किंवा धिटाई आहे असें तूं समजूं नकोस. कारण बालकांना जेव्हां तहान किंवा भूक लागते तेव्हांच ती आपल्या मातेची आठवण करीत असतात. या शंकराचार्यांच्या उक्तीवरून 'आर्त' म्हणजे संकटांत सांपडलेल्या भक्तांस, ते अनन्य भावानें शरण आले असतां प्रभु त्यांजवरही कृपा

करून उद्धारितो, असेंच सांगितलें आहे. आणि या भक्तीमुळें संकट निवारण तरी होतें किंवा तें सोसण्यास सामर्थ्य तरी येतें, वा ईश्वरोपासनेनें, क्रमानें का होईना पण ईश्वराविषयीं भक्ति उत्पन्न होण्याजोग्या कल्पना तयार होऊन त्या दृढ होतात, व देवावर विश्वास बसतो. अंधश्रद्धा कां होईना, परंतु ती ईश्वराबद्दल होते, व त्यामुळें हीच श्रद्धा दृढतर होते. मग प्रभूस अनन्य-भावानें शरण गेलें असतां तो प्रसन्न होऊन कृपा करितो व त्याचे भजनीं लागणें ओघानेंच प्राप्त होतें. अशा रीतीनें प्रभुभजन व उपासना यांची संवय लागतां लागतां त्यांत बरेंच श्रवण होऊन क्रमाक्रमानें त्याच्या स्वरूपाचें ज्ञान करून घेण्याची उत्कंठा होते.

९०. **अर्थार्थी भक्त**—आतां दुसरें वर्गांतील 'अर्थार्थी' भक्ताकडे वळूं. अर्थ म्हणजे फक्त द्रव्यच नव्हे. तर इतर व्यवहारिक सर्व कामनाही त्यांत येतात. द्रव्याकरितां आम्ही लक्ष्मीची पूजा करितों. इची मूर्ति कमलावर असते. ती धनदौलत देणारी देवता आहे, असें आपण समजतों. आणि ती अनुग्रह करण्यास तयार अशी प्रसन्न मुद्रेनें उभी असते. यावरून जर आपणास लक्ष्मी पाहिजे असेल तर, आपण ध्यानांत ठेवलें पाहिजें कीं,

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ।

म्हणजे उद्योग करण्यास सदा तयार व उभे आणि सदा प्रसन्न असेंच आम्ही बनलें पाहिजे, म्हणजे लक्ष्मी प्रसन्न होते; आणि तिजवर दिनेदिने अधिकाधिक भक्ति उत्पन्न होते. तिची पूजा दरवर्षीं कार्तीक शुद्ध प्रतीपदेस आपण करितों. येथें वर्षभर उद्योग करून मिळविलेली लक्ष्मीची कृपा ध्यानांत आणून कृतज्ञतेनें तिचें पूजन होतें आणि त्या पुढेंही उद्योगास यश मिळो अशीच प्रार्थना करण्यांत येते. याच प्रमाणें मनुष्याच्या व्यवहारांत त्यास उत्पन्न होणाऱ्या गरजा अनेक असून त्या भागविण्या करितां ईश्वरोपासना होत असतात. नाना प्रकारचीं व्रतें वैकल्यें करित असतात. संतति, संपत्ति, वैभव वगैरे अधिकार मिळविण्या करितां अनुष्ठानें, व्रतें, उपासनेच्या रूपानें जनता करित असते.

९१. **जिज्ञासु भक्त**—आतां जिज्ञासु या तिसऱ्या प्रकारच्या भगवद्भक्तासंबंधीं आपण विचार करूं जिज्ञासु ह्मणजे ईश्वरस्वरूप व त्याचें षड्गुणैश्वर्य जाणण्याची इच्छा करणारा, असा याचा अर्थ आहे. देव ही काय शक्ति आहे? तो कसा आहे? इत्यादि गोष्टी समजून घेण्याची ज्याची इच्छा असते, तो जिज्ञासु होय. ही जिज्ञासा साधारण स्थितींत संसाराचें असारत्व कळून आले म्हणजे, अथवा सत्संगतीनें, किंवा पूर्व जन्माचे संस्कार इत्यादिकांनीं, उत्पन्न होते. याप्रमाणें झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. अशा पैकींच पुराणप्रसिद्ध उत्तानपादराजाचा पुत्र ध्रुव याची कथा सुप्रसिद्ध आहे. तसेंच काशी येथें घडलेली एक गोष्ट सांगतात. तेथें वसुमती नामक एक स्त्री होती, व तिला गोविंद या नांवाचा एक पांच सहा वर्षांचा मुलगा होता. एके दिवशीं जवळच्याच मुरलीधराच्या मंदिरांत वसुमतीनें हरिकथा ऐकिली व मिळालेला प्रसाद तिनें आपल्या लाडक्या मुलास आणून दिला. मुलानें विचारिलें 'आई कोठून ग हा प्रसाद आणलास'? मातेनें सांगितलें कीं, 'मी हा प्रसाद मुरलीधराच्या मंदिरांतून आणिला.' मुलगा पुनः विचारितो कीं, 'आई मुरलीधर कोण आहे? कसा आहे? मला तो भेटेल कां मला प्रसाद देईल कां?' असे चौकसखोर मुलांना शोभतील अशा प्रकारचें त्या मुलानें मातेस अनेक गोड प्रश्न विचारले. मातेनें सांगितलें कीं, 'बाबारे, तो साक्षात परमेश्वर आहे. तो सर्वांत मोठा आहे; तो फार दयाळू आहे; प्रेमानें त्याचें भजन पूजन केल्यास तो खरेंच भेटतो. तूं तसें केल्यास तुलाही तो अवश्य भेटेल.' हें आईचें भाषण ऐकून मुरलीधर कसा आहे हें पाहण्याची इच्छा गोविंदास झाली. रोजच्यारोज आई बरोबर तो आरतीच्या वेळीं मंदिरांत जाऊं लागला. भगवंताची ती श्यामसुंदर मूर्ति सुभूषित अशी पाहून गोविंद अतिशय प्रसन्न होई, आनंदाच्या भरांत तो आईला म्हणे 'आई, हा मुरलीधर आपला आहे. नाहीं?' व मुरलीधराकडे पाहून हात पुढें करून 'येरे, मुरलीधरा, मला भेट' असें मोठ्या प्रेमानें म्हणत असे. हा त्याचा क्रम एक वर्षभर सारखा चालला. तरी मुरलीधर भेटेना. त्यानें मातेस विचारिलें कीं, आई मी रोज बोलावित असून हा

मुरलीधर मला अद्यापि कां ग भेटत नाहीं?' आईनें सांगितलें 'बाळ! तो भेटल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. आणखी प्रयत्न करशील तर खात्रीनें भेटेल.' दिनेदिने गोविंदाचें प्रेम जास्त जडूं लागलें. त्याला मुरलीधरा शिवाय गमेना. पुण्यसंचय होऊं लागला. आणि भगवान मुरलीधरास भेटण्या विषयीं त्याची तंद्री लागून गेली. अशा स्थितींत अत्यंत उत्कंठित होऊन गोविंद कांहीं कालपर्यंत मूर्तीच्या पुढें उभा राहून म्हणतो, 'देवा, आज जर तू मला नाहीं भेटलास तर मी प्राणच देईन.' भगवद्भक्तीची व उत्कट इच्छेची इतकी कसोटी घेतल्यावर प्रभु सात आठ वर्षांच्या बालकाच्या रूपानें प्रकट होऊन, गोविंदाच्या खांद्यावर हात टाकून 'चल, गोंदु आपण कांहीं तरी खेळूया' असें म्हणाले, आणि असा खेळ सुरू केला कीं, ज्याच्यावर जितके डाव होतील त्यानें तितक्या छड्या खाल्या पाहिजेत. गोविंदाचें पांच डाव भगवानावर आले. लगेच गोविंदानें हात पुढें कर म्हणून भगवंतास सांगून त्यांच्या हातावर तो छड्या मारूं लागला. तीन छड्या खाल्यानंतर भगवान पळत पळत येऊन मंदिरांत आपल्या मूर्तींत अंतर्धान पावले. गोविंदाही 'अरे लबाडा! माझे डाव पुरे दिल्याशिवाय पळून जातोस काय?' असें म्हणत म्हणत देवाच्या पाठोपाठ मंदिराच्या आंतील द्वारापर्यंत आला. परंतु पुढें मात्र आंत पूजारी त्यास सोडीनात. थोड्या धिटाईनें आंत पाऊल टाकितांच पूजाऱ्यानें गोंदूच्या गालावर एक चापट मारिली. त्या बरोबर गोंदूस मूर्च्छा येऊन तो खालीं पडला. थोड्या वेळानें सावध होऊन 'बरें, आज छड्या चुकविल्यास, उद्यां मात्र प्रथम आजच्या डावाच्या छड्या मारीन, तेव्हांच पुढें खेळेन!' असें म्हणत म्हणत गोविंद घरीं गेला. इकडे पूजारी मंदिरांत पाहतात, तों भगवंताचा गाल अगदीं लालभडक होऊन गेला आहे, व तोंड अगदीं उतरून गेलें आहे, असें त्यानां आढळून आलें. हें काय असावें? अशा संशयांत पूजारी गर्क झाले. नंतर पुजाऱ्याच्या स्वप्नांत जाऊन देवानें सांगितलें कीं, अरे, तूं गोविंदाचा फार अपराध केला आहेस. जा, आतां; अगोदर माझे सर्व धूपदीपनैवेद्यादि त्यास अर्पण कर; व त्यास प्रसन्न कर.

नाहीं तर तुमचा सर्वांचा संहार होईल. हें ऐकून पुजारी तत्काल सर्व पूजा साहित्य घेऊन गोंदूकडे गेले. तेव्हां तो म्हणाला 'पहा मुरलीधर कसा लबाड आहे? आपल्या वरचें डाव मी सोडावें म्हणून मला लांच देऊं करीत आहे!' अशीच कथा विठ्ठलभक्त श्रीनामदेव यांची आहे. तसेंच वंग देशांतील प्रसिद्ध आधुनिक सत्पुरुष स्वामी रामकृष्ण परमहंस यांच्या बाळपणींची ही कथा सुप्रसिद्ध आहे. हे भक्त जिज्ञासुस्थितींतील होत. तात्पर्य काय कीं, जशी ज्याची भावना तशी त्यास सिद्धि मिळते. वर लिहिले प्रमाणें गीतेंत सांगितलेंच आहे कीं,

**ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।**

अर्थ:— जे ज्या प्रकारानें माझी सेवा करतील त्या रीतीनेंच मी त्यांना प्रसन्न होतो.

९२. जिज्ञासु भक्तांत सगुण भक्त व निर्गुण भक्त या दोघांचाही समावेश होतो. ईश्वरप्राप्ति हें दोघांचेंही ध्येय आहे निर्गुण उपासनें पूर्वी सगुण उपासना करण्यास सोपी म्हणून तिची अवश्यकता सांगितली आहे. सगुण भक्ति करून ईश्वराचें प्रेम संपादन करण्यांत ईश सानिध्यानें त्याचें गुण आपणास प्राप्त व्हावेत, हें प्रामुख्यानें असतें म्हणून 'वंदे त्वद्गुणलब्धये' म्हणजे, देवा तुझ्या गुणांची मला प्राप्ति व्हावी, यासाठीं मी तुला नमस्कार करितो म्हणजेच भगवत् प्राप्त्यर्थ ईश्वरोपासना आहे. ती प्राप्त झाल्यास त्याचें सांनिध्यानें त्याचें गुणांचा लाभ झालाच पाहिजे. पण नुसत्या वंदनानें अथवा दर्शनानें हा लाभ व्हावा तितका होत नाहीं. तो होण्यास थोडे स्वतः यत्नही करावे लागतात. 'ईश्वरः पुरुषकर्म अनुगृण्हाति' म्हणजे मनुष्यानें भक्तिपुरःसर उद्योग केला असतां त्याजवर ईश्वर कृपा करितो असें सांगितलें आहे. स्वतः बलभीमास सामर्थ्य प्राप्त होण्यास पुण्याई व वरप्रसाद असूनही वनांतील फलमूलें खाऊन रात्रंदिवस रामरायाची सेवा करावी लागली.

९३. मूर्तिपूजा—आतां सगुण उपासनेंस मूर्तिपूजा हें एक साधन आहे. रामकृष्णादिकांच्या मूर्तिचें दर्शन होतांच सद्गुणांचें स्मरण झाल्याशिवाय

राहत नाहीं. व हें स्मरण दृढ होण्यास भक्तीचा सतत उद्योग झाला पाहिजे. अर्थात स्मरण होण्याकरितांच मूर्तिपूजेची कल्पना सर्व धर्मांत कोणत्याना कोणत्या तरी रूपानें शिरलेली आहे, असें नाहीं कां होत? यवन लोक किंवा क्रिश्चनांतील कांहीं लोक प्रत्यक्ष देवाची मूर्ती करून पूजा करीत नसले, तथापि त्यांचीं मंदिरें हीं आहेतच. व तींच मंदिरें त्यांना त्यांच्या पुण्य विभूतींचें स्मरण करून देण्यास पुरेशीं आहेत, अशी माझी कल्पना आहे. ज्याठिकाणीं आपण मूर्ति ठेवितों त्या देवगृहांत किंवा मंदिरांत गेलें असतां क्षणभर तरी संसाराची दगदग मिटल्यासारखे होतें. श्रीमंताचा असो सत्ताधीशांचा असो किंवा एखाद्या गरीबाचा असो संसार तो संसारच. तो कधीच कोणावर दया करीत नसतो. सर्वांना त्रास देण्यांत त्याचा आपला हातखंडा. या संसाराच्या यातना क्षणभर तरी कमी होऊन नवजीवन येण्यास देवगृहासारखी दुसरी कोणती जागा सांपडणार?

९४. मुंगूस व साप यांचें युद्ध पुष्कळांनीं पाहिलें असेल. या युद्धांत सर्पाचा नाश एकदम होत नाहीं. नाग वारंवार मुंगूसास दंश करितो. विषाचा अंमल न होता सर्प मारतां यावा म्हणून, वरचेवर तें मुंगूस जंगलांतून वनस्पती खाऊन पुन्हा ताजेंतवानें होऊन त्या सर्पाबरोबर युद्ध करून मग त्यास जिंकितें. त्याच प्रमाणें मनुष्याला संसार रूपी सर्पाशीं झुंजावयाचे आहे; तेंव्हा या सर्पाच्या विषाची बाधा हाऊ नये म्हणून रोजच्या रोज आपल्या प्रतिमापूजनद्वारा सगुण भक्तिरूपी विष शमन करणाऱ्या वल्लींचें नको कां सेवन करावयाला? संसारसर्पविषाचा उतारा याच्या वांचून दुसऱ्या कोणत्याही औषधानें होणार नाहीं.

९५. कोणत्या देवाची प्रतिमा असावी या विषयीं वादविवाद करण्याचें कारण नाहीं. ज्या देवावर आपली श्रद्धा असेल त्याची प्रतिमा चांगली. वैष्णव विष्णूच्या आणि शैव शिवलिंगाच्या उपासनानें इष्ट प्राप्ति करून घेतात. आरंभीं देव निरनिराळे आहेत असें जरी वाटलें, तथापि त्या देवांतील देवत्व एकच आहे. झाडाच्या फांद्या, पानें, फुलें आणि फळें

ही निरनिराळीं दिसलीं तथापि त्या सर्वांत रस जसा एकच असतो तद्वतच निरनिराळ्या देवांतील देवपणा हा एकच आहे.

**यम् शैवाः समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदांतिनो**
**बौद्धा बुद्ध इति प्रमाणपटवः कर्तेति नैय्यायिकाः ।**
**अर्हन्नित्यथ जैनशासनरताः कर्मेति मीमांसकाः**
**सोऽयं वो विदधातु वांच्छितफलं त्रैलोक्यनाथो हरिः ॥**

**अर्थ**— शैवास शिव, वेदांत्यांस ब्रह्म, बौद्धांस बुद्ध, नैयायिकांस कर्ता, जैनांस जिनदेव व मीमांसकांस कर्म, असा जो त्रैलोक्याचा नाथ परमात्मा तो तुम्हास इच्छित फल देवो. या एका प्राचीन श्लोकावरून निरनिराळ्या पंथांतील उपासकांचा तंटाच मिटून गेला आहे. मात्र हें तत्व उमजलें पाहिजे. इतकेंच.

९६. **नवविधा भक्ति**— आतां उपासना अथवा भक्ति नव विध म्हणजे नऊ प्रकारची आहे असें शास्त्रकार सांगतात. ते नऊ प्रकार खालीं दिलेल्या सुप्रसिद्ध श्लोकांत दर्शविलेले आहेत.

**श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं ।**
**अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनं ॥**

अर्थ—श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, आणि आत्मनिवेदन असे हे भगवंताच्या भक्तीचे नऊ प्रकार आहेत.

९७. **श्रवणभक्ति**—ही प्रथम सांगितली आहे. श्रवण म्हणजे भगवंताचें गुणानुवाद ऐकणें. ईश्वराच्या ठिकाणीं प्रेम जडण्यास त्याचे षड्गुणैश्वर्याचें श्रवणच अत्यंत अवश्य आहे. श्रवणामुळें भगवंताच्या षड्गुणैश्वर्याचें आपल्यास ज्ञान होतें व तें पटू लागतें. हे सहा गुण विख्यात भगवद्भक्त शिरोमणी वामन पंडितांचे यथार्थदीपिकेंत फारच बोधपर आहेत. त्यांतील कांहीं वेचें वाचकांकरिता खालीं दिले आहेत.

जयजयजी भगवंता ।
ऐश्वर्य ज्ञान वैराग्यता ॥
धर्म यश श्रीमता ।
षड्गुणा ॥ २ ॥

ऐश्वर्य म्हणजे समर्थपणें ।
कीं अघटित तें ही घडविणें ॥
विश्व नसोनि मिरवणें ।
हें ऐश्वर्य ॥ ११ ॥

एवं जगचि ऐश्वर्य जैसें ।
जगचि तुझें ज्ञान तैसें ॥
येथें ही द्वैत तें कैसें ।
सांपडलें अणुमात्र ॥ १४ ॥

भूत भविष्य वर्तमान ।
हें कल्पका सर्वज्ञाचें ज्ञान ॥
तेंव्हा विश्वरूपेंची ध्यान ।
जगत्कल्पकाच्या ज्ञानाचें ॥ १७ ॥

विश्व नसोनि दावी ।
हे ऐश्वर्य शक्ति तुझी वदावी ॥
त्याची सिद्धि अनुभवी ।
या ज्ञानगुणेंचि देखती ॥ २३ ॥

प्रपंच मिथ्या कळला ।
जरी परमार्थ वळला ॥
तरी देह आहे खवळला ।
प्रारब्ध कर्में ॥ ३० ॥

जरीं बाणलें ध्यान ।
क्षुधा तृषा ओढी मन ॥
ऐश्यास विश्वकल्पनानुसंधान ।
राहेल कैसें ॥ ३१ ॥

आतां वैराग्य हेंचि जग ।
रज्जूस न वाटे साच भुजग ॥
सुवर्णास वासना नग ।
न उपजवी आपुली ॥ ३७ ॥

प्रपंच वाटतां सत्य ।
तरी वासना उपजती अगत्य ॥
तूं सत्य कल्पिसी असत्य ।
स्वतः सिद्ध वैराग्य ऐसें ॥ ३८ ॥

वैराग्य नाशी अनुराग ।
अनुराग नाशी विराग ॥
राग नाशक मिथ्या भाग ।
वैराग्य तुझें हें विश्व ॥ ४० ॥

मुख्य धर्म समता दया ।
हे दोन्ही तुझे गुण अव्यया ॥
कर्मानुरूपें देवराया ।
फळें हारिती वैषम्यें ॥ ४३ ॥

दया समान सर्वां वरी ।
मेघ सर्वत्र वृष्टी करी ॥
जो जैशी बीजें पेरी ।
तैशीं फळें तो पावे ॥ ४४ ॥

मुमुक्षा जया तया मुक्ति ।
बुभुक्षा तया देशी भुक्ति ॥
इच्छित फळें दे तुझी व्यक्ति ।
गुण हा कल्पवृक्षचि ॥ ४८ ॥

आतां जेथें धर्म तेथें यश ।
तेंव्हा जगातिं तव यश लेश ॥
कीं समदयाळू हृषीकेश ।
जगचि ऐसें गर्जते ॥ ५७ ॥

आतां श्रीनाम हीं यशाचें ।
श्री वेंचूनि यश साधितों साचें ॥
श्री आणि यश परम पुरुषांचें ।
तेंचि जग ॥ ६७ ॥

एवं माया विश्वरूपें ।
ते श्री धरिली चित्स्वरूपें ॥
जैशी धरी शुक्तिरूपें ।
श्रीधरें धरिली श्री तैशीं ॥ ६३ ॥

९८. वर वर्णन केलेलें भगवंताचें षड्गुणैश्वर्य व या सृष्टींत जिकडे पाहावें तिकडे त्या गुणांचें अस्तित्व याविषयीं भक्तिपूर्वक श्रवण झालें पाहिजे. म्हणजे त्याचा परिणाम श्रोत्यांच्या मनावर उत्कृष्ट रीतीनें झाल्याशिवाय राहणार नाहीं. पहिली भक्ति श्रवण व दुसरी कीर्तन या दोहोंमध्यें 'मनन' व 'निदिध्यास' असे दोन व्यवसाय जरूर आहेत. मनन केलें असता श्रवण केलेलें पटूं लागतें. पटल्यावर त्याचा नाद लागतो. आणि भक्ति दृढ होते. वाचकहो पुस्तकें पुष्कळ मिळतात, कथा पुराणें नित्य ठिकठिकाणीं चालतात; पण त्या श्रवणापासून बोध करून घेण्याची लालसा अवश्य आहे. मग त्या जगचालकाच्या या षड्गुणैश्वर्याची साक्ष आपल्या स्वतःच्याच शरीरापासून तों जिकडे नजर फेकावी तिथपर्यंत त्या कृपाळू परमेश्वराची विभूति भरून गेली आहे याची श्रवणानें साक्ष पटवून घेण्याचा व भक्तिपुरःसर अवलोकनाचा उद्योग करण्याची अवश्यकता आपल्यास वाटत नाहीं काय? या श्रवण भक्तिचा उत्कृष्ट लाभ म्हणजे प्रभु सर्वत्र भरला आहे या सत्याचाच अनुभव संपादणें.

९९. ज्या देहांत आपण आहोंत, तें देहयंत्र कोणीं केलें? त्याची रचना व महत्व याबद्दल विचार केल्यास त्या प्रभूचें कौतुक किती करावें तितकें थोडेंच आहे. साधारण गोष्टी ज्यास कळतात त्यांनें आपल्या देहाकडे किंचित् काळजीनें विचारपूर्वक पाहावें, आणि आपल्यासच पुसावें कीं इतकी सुरेख रचना, आपले कडून घडणाऱ्या हरएक व्यापारास सर्वतोपरी

सोईची, ज्यांत व्यवस्थित व योग्य असेच अवयव ठेविले आहेत, असा एका दुसऱ्याचा नव्हे तर अखिल मानवी जातीचा देह कोणी केला? या यंत्रांत किती तरी चमत्कार आहेत! त्यांत असलेल्या डोळ्याच्या मदतीनें आपण असंख्य तारागणांणीं सुशोभित असें आकाश पहातों. इतकेंच नव्हे तर जिकडे नजर फेंकावी तिकडे हें सर्व दृश्य जग जणूं काय क्षणांत आपल्यास दिसतें त्या डोळ्याची रचना पाहूं गेल्यास अक्कल गुंग होते. आणि याचा कर्ता जो असेल त्याच्या सत्तेचें, चातुर्याचें, दयेचें, व प्रेमाचें, जितकें कौतुक करावें तितकें थोडेंचसें वाटूं लागतें. त्याच प्रमाणें कानाची रचना घ्या, ज्या श्रवणाशिवाय जगांतील आमचें सर्व व्यवहार चालणें शक्य नाहीं, ज्याचें पासून अवश्य विषयांचें ज्ञान लागलेंच होऊन, आमचे सर्व व्यवहार चालतात. इतकेंच नव्हे तर या सृष्टींत उत्पन्न झालेल्या निरनिराळ्या जीवकोटींचे निसर्गानें आलेले बोल, संगीतादि मानवी व कृत्रिम वाद्याचे मधुर ध्वनी, व अत्यंत प्रेमळ भगवद्भजन, व आपल्या लहानपणापासूनच मातेचे प्रेमळ बोल, आप्तइष्टांचे सुखकर शब्द, गुरूजींचे प्रेमळ शिक्षण, आपणास परम पूज्य व अत्यंत आधारभूत अशा महाजनांची प्रेमळ नवजीवन देणारी भाषा, ज्या कर्णेंद्रियानीं ऐकावयास मिळते तें कर्णेंद्रिय कसें रचिलें आहे? ती देणगी किती प्रेमाची? हें लक्षांत आणल्यास तें ज्यानें दिलें त्याबद्दल कृतज्ञता, आदर, व श्रद्धा उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्याचप्रमाणें वाचा हिचा या शरीरांत किती उपयोग आहे, हें सांगत बसण्याची अवश्यकताच नाहीं. या जिभेपासून आपणास बोलतां येतें, तिची योग्य ठिकाणीं स्थापना, शब्द उच्चारण्यास तिचें मदतीकरितां जवळच सर्व साधनें; इत्यादि उत्पन्न करून तिजकडून तो प्रभु किती महत्वाचीं कामें करवीत आहे? ही वाचा मनुष्यास नसती तर त्याचे हाल किती हें एखाद्या मुक्या मनुष्याकडे पाहिलें म्हणजे सहज कळेल. व्यवहारांत मनुष्यास आपले विचार इतरांस कळविण्यास हें साधन नसतें तर खचित अत्यंत अडचण पडली असती. याशिवाय आणखि एक अवयव हात घ्या. मनुष्याच्या व्यवहारांत या हातांचे महत्व वर्णन करावें तितकें थोडेंच. मानवी जातीच्या

या हातानें केलेल्या कुशल, सुरेख, व सुंदर, शौर्याचीं, व अक्कल गुंग करून सोडणारीं अशीं अगणित कामें केलीं आहेत. सृष्टींतील महत्वाचीं जीं पंचमहातत्वें, त्यांचेवर बुद्धि सामर्थ्यानें सत्ता चालविण्याची खटपट करून तो प्रयत्न यशस्वी करण्याचे कामीं या हाताचा उपयोग किती तरी झाला आहे !

या देहाचीं बहिरिंद्रियें अशा प्रकारें सांगून फक्त कर्मेंद्रियासच महत्व देऊन या देहांचें वर्णन संपत नाहीं. या देहाचे आंत त्याचे चलन, त्याचा जीव, त्यांतल्या समजुती, कल्पना, स्मरणशक्ती, मन, व त्याचे विकार हे कोठून उत्पन्न होतात? याचा उगम कोठें आहे? याचा विचार करून या गोष्टी या देहांत कशा बसविल्या आहेत, त्यांकडे लक्ष गेलें असता आपण आश्चर्यचकित होतों असें हें मानवी देहयंत्र कोणी केलें? यांत निरनिराळ्या भागाची व्यवस्था एकमेकांस अनुरूप व इतकी सूक्ष्म प्रकाराची कीं तिचें वर्णन करितां येत नाहीं. व यांपैकीं एक भाग उणा पडला असतां सर्वच बिघडतें. सर्व तऱ्हेनें बिनचूक अशी आंतील निरनिराळया भागाची गति आणि मनुष्याच्या अचाट कल्पनेच्या बाहेरची अशी उयांतील करणी असें हें यंत्र आपो आपच झालें असेल अशी कोणत्या तरी साधारण शहाण्या मनुष्याची कल्पना होणे शक्य आहे काय? जगांतील अव्यवस्थित अणुरेणु कसे तरी मिळून हें यंत्र घडलें आहे काय? कल्पनातीत शहाणपणा शिवाय हें रचितां आलें असतें काय? मोठी दूरदृष्टि चातुर्य व बिनचूक कल्पना असलेल्या मनुष्याच्या हातून हें यंत्र घडणें शक्य आहे काय? मनुष्यानें केलेली अत्यंत सुंदर कामें मोठमोठ्या इमारती, उत्तम चित्रें, अत्यंत उपयुक्त अशीं यंत्रें, जीं आपण पाहून त्यांचें कौतुक व स्तुति करितो तीं या देहयंत्रास ताडून पाहतां, चातुर्यांत म्हणा वा कल्पनेंत म्हणा, मनुष्याची करणी ईश्वराचे या अगाध करणीच्या पासंगासही लागत नाहीं. फार बळकट अशी लोखंड व पोलादी यंत्रें दररोज त्यांस तेल व चरबी घालून सुद्धां व कांहीं काल विश्रांति देऊन सुद्धां अल्पकालांतच झिजून जातात; आणि या नरतनुकडे पाहि-ल्यास आंतील रचना अत्यंत नाजूक असूनही आणि अहर्निश तें चालू

असूनहीं एक शतकां पर्यंत कमी ज्यास्त प्रमाणानें अक्कल गुंग करणारीं कामें करीत करीत हें अघटीत यंत्र टिकाव धरतें. यातील बुद्धिसामर्थ्याकडे पाहतां ती कोठून येते? तिचें ठिकाण कोणतें? तिचा आकार काय? या विषयीं कल्पनाच चालत नाहीं. त्याच प्रमाणें आंतील मनोदेवता, विचार-शक्ती, यांचा ठाव ठिकाणच लागत नाहीं. यातील पंचप्राणांची व्यवस्था, यांतील इडा, पिंगला, सुषुम्ना आदिकरून नाड्या बाहात्तरहजार रक्तवाहि-न्याची लता, अन्नाचा कोठा त्याचें रसीकरण व त्यांतून शरिरांस पोषक रसरूपी द्रव्यें जीं मनास व बुद्धीस पोषक अशीं बनतात, त्यांची व्यवस्था खरोखरीच अक्कल गुंग करिते. यातंच परमार्थ प्राप्त करून घेण्या करीतां षट्चक्रांची व्यवस्था अत्यंत बहारीची आहे यांतील विशेष हा आहे कीं याच यंत्रात आत्मस्वरूपानें प्रभू स्वतः अंशत्वानें राहून हें यंत्र बिनचूक चालवीत आहे. ईश्वरोपासनेची कल्पना येणें पूर्वीं ज्या प्रभूनें हा देह निर्माण केला आहे त्या प्रभूचें सार्वत्रिक अस्तित्व मनास पटवून घेण्यास या देहा-बद्दलचा विचार हेंच मोठें साधन आहे. या एका देहाबद्दल अशा प्रकारें विचार भक्तानें श्रवण केल्यास प्रभूबद्दल आदर उत्पन्न होतो. अशाच मास-ल्याचे श्रवण सृष्टींतील रचना व तींत भरलेलें ईशचैतन्य, त्याची सत्ता, व त्या सत्तेचे अनुभव यां विषयीं ऐकल्यानें व त्याच मनन केल्यानें भक्ति दृढ होते. तिचें प्रेमांत पर्यवसान होतें. मग अन्योन्यतेनें प्रभूही कृपा कारितो.

१००. **श्रवण भक्तीविषयीं श्रीसमर्थांचे विचार**—याच मुद्यावर श्रीसमर्थांनीं आपल्या दासबोधांत श्रवण भक्तीविषयीं असें सांगितलें आहे कीं,

प्रथम भजन ऐसें जाण ।
हरिकथा पुराण श्रवण ।
नाना अध्यात्मनिरूपण ।
ऐकत जावें ॥

नाना पिंडांची रचना ।
नाना भूगोल रचना ।
कैशी ती ऐकावी ॥

केशी नवविधा भक्ति ।
केशी चतुर्विधा भक्ति ।
केशी पाविजे उत्तम गति ।
ऐसें हें ऐकावें ॥

पिंडब्रह्मांडाची रचना ।
नाना तत्व विवेचना ।
सारासार विचारणा ।
केशी ती ऐकावी ॥

ऐसें हें अवघेंचि ऐकावें ।
परंतु सार शोधूनि घ्यावें ।
असार तें जाणोनि त्यागावें ।
या नांव श्रवणभक्ति ॥

ऐसें श्रवण सगुणाचें ।
अध्यात्मनिरूपणाचें ।
विभक्ति सांडून भक्तीचें ।
मूळ शोधावें ॥

—दशक. ४.

असें भक्तीनें श्रवण झाल्यास त्या करुणासागर प्रभूची कल्पना होऊन आपलें चित्त प्रभूचे चरणीं लीन होतें.

१०१. **प्रभूच्या षड्गुणैश्वर्याचें ज्ञान सर्व धर्मास मूलाधार आहे**— मानवी जात जर मूळ सत्व स्थितींत असती, तर प्रभूच्या या षड्गुणाचें पर्यालोचन या विश्वरचनेंत त्याला सहज कारितां आलें असतें. तशा स्थितींत हल्लीं ती नसल्यामुळें साधारण समाजाची दृष्टि शुद्ध नाहीं. त्यामुळें या विश्वरचनेंत त्या षड्गुणाचा आश्चर्यकारक खेळ, कार्य कारण भावानें त्यास समजणें सोपें नाहीं. त्याबद्दलचें श्रवण व मननच झालें पाहिजे. प्रभूच्या या लीलेचें कीर्तन करण्याची पद्धत इकडे अगर अन्यत्र कोठेंही असल्याचें ऐकिवांत नाहीं. परंतु श्रीसमर्थांनीं हरिकीर्तन ह्मणजे 'सगुण

हरिकथा या नांव कीर्तन ' असेंच म्हटलें आहे सगुण म्हणजे हरिचे षड्गुण ज्यांत सांगतां येतील असें हरिकीर्तन जें इकडच्या समाजांत करण्यांत येतें, त्यांत मानवी जातीची ईश्वरावर भक्ति, त्यांचा नैतिक आयुष्य क्रम, त्यांजवर युगयुगांत आलेलीं संकटें, व विहित धर्मकर्मांचीं ग्लानि होऊन धर्मपराङ्मुखता फार वाढल्यास प्रभूचा अवतार, जगाची अशाश्वतता जड चैतन्य, विवेक, इत्यादि अध्यात्मकथनापर्यंत सांगितलें जातें. परंतु अशा कीर्तनापासून प्रभूच्या षड्गुणैश्वर्याचा प्रत्यक्ष बोध होणें थोडें कठीण आहे. तसा बोध होण्यास या विश्व रचनेंत दररोज क्षणोक्षणीं पाहण्यास मिळणाऱ्या हरिलीलेचें विवेचन वा निरूपण, सप्रयोग सप्रमाण दाखवून केलें असतां जास्त बोधप्रद होईल. परंतु वर सांगितल्या प्रमाणें असलें कीर्तन करणाऱ्या हरिदासांच्या अभावी साधकांनीं त्यांस मिळालेल्या साधनांचा उपयोग तरी तुर्तातुर्त करून, पुढील ज्ञानार्जनाची भूमिका तयार करून ठेवण्यास हरकत पडणार नाहीं. अशी भूमिका तयार होण्याचा विशेष फायदा असा होईल कीं प्रभू सदोदित व सर्वत्र भरला असे त्याची खात्री पटेल. व या गोष्टीची जाणीव सतत राहिल्यानें मनुष्याच्या हातून कसलेंही वावगें काम घडणार नाहीं कारण. कोणीही दुसऱ्यांच्या देखत वाईट विचार बोलून दाखवीत नाहीं. किंवा कोणतेंही दुष्कृत्य करीत नाहीं. मग साधारण मनुष्याच्या समक्ष जें करण्यास मनुष्य धजत नाहीं, तें प्रभूच्या देखत करण्याचें तर राहूं द्या. पण मनांत सुद्धां आणणार नाहीं. इतकी तयारी झाल्यानंतर सद्गुरुकडून ईश्वरी साक्षात्कार मिळविणें सोपें जाणार आहे, असें मला वाटतें.

१०२. **या ज्ञानार्जनास भरपूर साधनसंपत्ति**—या साधनांची उणीव मुळींच नाहीं. जिकडे पहावें तिकडे ही साधनसंपत्ति प्रभूच्या कृपेनें भरून राहिली आहे. व तिचा उपयोग कसा करावा या विषयीं प्राचीन कालापासून बुद्धिवान, दीर्घोद्योगी, व चतुर शोधकांनीं शांतपणानें या सृष्टीकडे अवलोकन करून अनेक मूल तत्वांची भौतिक शास्त्रें तयार करून ठेविलीं आहेत. त्यांनीं या सृष्टींतील पंचमहाभूतांचीं उत्पात्ति, त्यांचा अन्व-

यव्यतिरेक, अणुरेणूपासून तों विश्वातील मानवी बुद्धीस समजण्याजोग्या यच्चावत् गोलापर्यंत, व्यष्टिसमष्टिरूपानें झालेली रचना, व त्या संबंधानें सतत कार्य करीत असलेल्या शक्ती, व त्यांचा नियमित खेळ वगैरे अनेक गोष्टींचा सप्रयोग विचार करून ठरलेलीं सत्य तत्वें ग्रथित करून ठेविलीं आहेत, असें कळतें. शास्त्रदृष्टीनें असें लिहिलेलें ग्रंथ शास्त्रीय भाषेंत व विशेषतः परकीय भाषेंत असल्यामुळें साधारण जनतेस ते वाचावयास मिळणे कठीण आहे, ही गोष्ट खरी. तथापि त्यांतील मुख्य मुख्य गोष्टींचा विचार व त्यांची माहिती मराठी भाषेंत दिलेले ग्रंथ आहेत. यांत भौतिक शास्त्रदृष्ट्याच विचार असून ज्या अनंत शक्तींचें त्यांत वर्णन दिलें आहे त्या शक्त्या विश्वकर्त्या प्रभूच्या असून, त्यांत त्यांची लीला प्रगट झाली आहे. व तो या अनंतकोटिब्रह्मांडांत अणुरेणू पासून विराटस्वरूपापर्यंत भरून राहिला असल्याविषयीं व प्रत्येक लीलेंत तो हजर आहे, याविषयीं कोठेंही विचार झाल्याचें तपासा अंती समजून येत नाहीं. अर्थात भौतिक शास्त्रज्ञ मंडळीचें प्रयत्नांत या पंचमहाभूतांच्या मूळ उगमाकडे लक्ष गेलें नाहीं. आणि आर्य धार्मिक ग्रंथात या विश्वरचनेंतील पंचमहाभूतांचा व त्रिगुणांचा उपयोग कांहीं ठरीव नियमानीं प्रभूनें कसा केला आहे, व त्यांतील नियम काय, व प्रभूच्या अनंत शक्ती अनंत रीतीनें कशा चालविल्या आहेत. व त्यावरून हें विश्व बिनचूक रीतीनें अहर्निशीं कसें सुखरूप चाललें आहे, व त्यांवरून ईश्वराचें सर्वांतर्यामित्वाचि कल्पना कशी प्रत्ययाला येते, अशा विषयीं पद्धतशीर शास्त्र उपलब्ध असल्याचें चौकशी अंतीं समजून येत नाहीं. ही उणीव जर खरोखरच असेल, तर समाज हितकारी विद्वानानीं तें काम हातीं घेतल्यास, ती थोडक्या श्रमानें भरून येणार आहे.

१०३. आतां शहरांत असो वा खेड्यांत असो, वा वनांत असो, भूमिवर असो वा भूगर्भांत असो, तसेंच आकाशांत वा वातावरणांत असो, जलाशयांत मग तो स्थिर असो, वा वाहता असो, या पंचमहाभूतांचा खेळ आपल्या नजरेस सदोदित दृष्टीस पडतो. यांत ईश्वरोपासना करणाऱ्यास

त्या प्रभुची अगाध लीला पहावयास सांपडते. या अवलोकनांत पुढें लिहिलेल्या गोष्टी येतात.

१०४. या भूगोलाची रचना, त्यांतील खनीज द्रव्यें, त्यांतील रस, भूगोलांचे गर्भांतील आकर्षण शक्ति जिच्या योगानें ही पृथ्वी आपल्याभोंवतीं फिरत असतांही व ती आकाशांत तरंगत असतां ही आपण पडत नाहीं अशी तिच्यावरील व्यवस्थित रचना, समुद्र, नद्या, डोंगर जमीन व तिजवरील तिच्यामधूनच उत्पन्न होणाऱ्या वृक्षवल्ली वगैरे, तिजवरील चौऱ्यांशीं लक्षयोनींच्या उपजीविके प्रीत्यर्थ त्यांतच ठेवलेले अन्योन्य संबंध, व निसर्गतःच तींत ठेवून दिलेली बीजें-व यां सर्वांचें रक्षण व्हावें म्हणून तिज सभोंवती असलेलें वातावरण-व त्यांपासूनच कालमानाप्रमाणें प्राणी रक्षणाचें हेतूनेंच होत असलेले ऋतुमान, या सर्वांकडे विचाराची दृष्टि शांतपणें गेल्यास त्या जगन्नियंत्याच्या षड्गुणैश्वर्यांचा बोध झाल्याशिवाय राहणार नाहीं. धार्मिक दृष्ट्या या भूगोलाचें ज्ञान फार महत्वाचें असून मननीय आहे.

१०५. आमच्या दृष्टिकोणांत येत असलेल्या नभोमंडळांकडे विचारानें अवलोकन केलें असतां असें समजून येतें कीं, अनेक दिव्य गोलांचें एक प्रचंड यंत्र त्यांत बसविलें आहे. त्यांची स्थिति, गति, रचना, अन्योन्य संबंध व त्यांचे नियम वगैरे विषयीं ज्योतिषशास्त्र प्रयोगद्वारा अनुभव घेऊन रचिलें आहे. या विश्वासबद्दल प्रसिद्ध तत्ववेत्ता इमरसन् यांनीं आपल्या निबंधांत या जगाच्या वर्तुळत्वाबद्दल लिहिताना म्हटलें आहे कीं, विश्व हें असें अद्भुत वर्तुळ आहे कीं त्यांतील मध्यबिंदु जेथें पहावा तेथें आहे. आणि परिघाचा पत्ताच नसल्यामुळें, अनंत आहे! अशा नभोमंडळांत अनेक गृहमाला आपआपल्या सूर्याभोंवती फिरतात; आणि प्रत्येक सूर्य आपल्या गृहमालेसह मध्यवर्ती दिव्य शक्तिभोंवतीं फिरत आहे. याचप्रमाणें अनंतकोटिब्रह्मांडें असल्याचें त्या शास्त्रांत सांगतात. आणि या सर्वांचा मध्यवर्ती प्रभु आहे. श्रीसवितासूर्यनारायणांचें ध्यान मुलें म्हणतात त्यांत— ‘ध्येयः सदा सवितृमंडलमध्यवर्ती नारायणः’ असेंच म्हटलें आहे. हें जरी सर्व प्रत्यक्ष

मनुष्यास पाहाण्यास मिळत नाहीं, तरी त्यांच्या दृष्टीस जेवढा भाग येतो त्यांत या नभोमंडलांत कोणताही दिव्य गोल कोठेंही न पडतां आपाआपल्या कक्षेंत ठरीव नियमानें एखाद्या यंत्रांतील चक्राप्रमाणें बिनचूक फिरत आहे. आणि अनेक आकर्षण शक्तींनीं हें तोलून धारिलें आहे ; असें लक्षांत घेतल्यास प्रभूच्या अनंतत्वाविषयीं, ऐश्वर्याविषयीं, ज्ञानाविषयीं व चातुर्याविषयीं अत्यन्त आदर उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. त्याचें अनंतत्व मनांत आलें म्हणजे विश्वकर्त्या प्रभूपुढें मनुष्य किती क्षुद्र प्राणि आहे याची साक्ष पटून त्याचा अभिमान पार नाहीसा होऊन लीनता येते. अशा अगाध रचनेंत ज्या अनंत शक्ती काम करीत आहेत, त्या सर्व शक्ती कार्यकारणभावाच्या एकाच साखळींत एकमेकांशीं संबद्ध आहेत. आणि त्यांच्या नित्यक्रमांतच सृष्टीचे उत्पत्ति स्थिति व लय हीं घडत असतात. याचविषयीं ज्ञानेश्वरींत म्हटलें आहें कीं—

> **जें सर्वांतें ये या वियें । सर्व जेणें जिये ।**
> **हेतु जे यासि भिये । अनित्य जें ॥**

१०६. **कीर्तन भक्ति**—अशा श्रवणामुळेंच पुढें स्वतःस भगवंताच्या गुणाचें कीर्तन करावेसें सहाजिक वाटणार, कारण एखाद्या चांगल्या गोष्टीचा आपल्यास लाभ जाहला कीं तीं आपल्या आवडत्या मनुष्यांस मिळावी अशी इच्छा होते. आपण तिचें वर्णन त्यांजपाशीं करितो. तिचे गुण सांगतो, तें अगदीं तन्मय होऊन सांगतो. परंतु असें करण्या पुर्वीं त्या वस्तूची व आपली एकतानता व्हावी लागते. मग प्रभूच्या हृदयंगम गुणांची आपल्यास माहिती झाली म्हणजे, आपले उद्गार बाहेर पडणारच. या कीर्तन भक्तीच्या द्वारा स्वतःचा तर उपयोग होतोच ; पण इतर श्रोत्यांसही त्यामुळें फार लाभ होतो. अशा रीतीनें स्वपरहितकारी त्या प्रभूचें गुणकीर्तन आहे. कीर्तन करणाऱ्यास दुप्पट लाभ होतो ; कारण कीं, मनांतून तो प्रथम ईश्वराचे गुणानुवाद कसकसे गावेत, या विषयीं ठरवितो व नंतर तो तोंडानें त्याचें कथन करितो. अशा रीतीनें मानसिक व वाचिक अशा उभय विध पुण्याचा वांटा त्यांच्या पदरीं पडतो.

१०७. **नामसंकीर्तनापूर्वी गुणसंकीर्तन विशेष महत्त्वाचें:—** नुसतें ईश्वराचें नाम घेणें, म्हणजे 'राम राम' किंवा 'कृष्ण कृष्ण' म्हणणें आणि त्याचें गुणानुवाद गाणें अर्थात त्यांची चरित्रें सांगणें, असें हें दोन प्रकारचें कीर्तन आहे. पुराणिक बुवाचें पुराण किंवा हरिदास बुवाचें कीर्तन हें या कीर्तन भक्तींत समाविष्ट होईल. मात्र हल्लीं जसा हा पोट भरण्याचा धंदा जाहला आहे, तशा प्रकारच्या धंद्यांत 'कीर्तन' ही भक्ति पूर्णपणें होते कीं नाहीं याविषयीं संशयच वाटतो. आतां इतकें खरें कीं, या पोट भरण्याच्या धंद्यांत सुद्धां ते स्वतः हरिनामाचा उच्चार करितात, व त्यापासून पूर्ण फळ नाहीं मिळालें तरी, अंशतः तरी फलप्राप्ति होण्यास कांहीं हरकत आहे असें मला वाटत नाहीं. संस्कृत भाषेमध्यें अशी एक म्हण आहे कीं 'अनिच्छयापि संस्पृष्टो दहत्येव हि पावकः' म्हणजे, इच्छा असो वा नसो अग्नीला स्पर्श केला कीं पोळलें पाहिजेच. ती मी वर सांगितलेल्या तत्वाचीच निदर्शक आहे. असेंच वामन पंडिताच्या एका श्लोकांत म्हटलें आहे. तो असा—

**न कळतां पद अग्निवरी पडे**
**न करि दाह असें न कधीं घडे ।**
**अजित नाम वदो भलत्या मिषें**
**सकल पातक भस्म करीतसे ॥**

१०८. श्री समर्थ रामदास म्हणतात —

**सगुण हरिकथा करावी ।**
**भगवत्कीर्ति वाढवावी ॥**
**अखंड वागेश्वरी वसवावी ।**
**यथा योग्य ॥**

**आपुलिया सुखस्वार्था ।**
**केलीच करावी हरिकथा ॥**
**हरिकथेवीण सर्वथा ।**
**राहूंच नये ॥**

मनापासोन आवडी ।
जीवापासोनि अत्यंत गोडी ॥
सदासर्वदा तांतडी ।
हरिकीर्तनाची ॥

यश कीर्ति प्रताप महिमा ।
आवडी वर्णावा परमात्मा ॥
जेणें भगवद्भक्ताचा आत्मा ।
संतुष्ट होय ॥

सगुण हरिकथा नांव कीर्तन पुन्हा ।
कीर्तनें महादोष जाती ।
कीर्तनें होय उत्तम गति ॥
कीर्तनें भगवत्प्राप्ति ।
यदर्थी संशयो नाहीं ॥
कीर्तनें वाचा पवित्र ।
कीर्तनें होय सत्पात्र ॥
कीर्तनें प्राणीमात्र ।
सुशील होती ॥
कीर्तनाचा अगाध महिमा ।
कीर्तनें संतोषे परमात्मा ॥
सकळ तीर्थें जगदात्मा ।
हरि कीर्तनीं वसे ॥

असा हा कीर्तनभक्तीचा महिमा आहे. वर श्रवणभक्तीविषयीं लिहितांना श्रवण कशाचें व कसें करावें या विषयीं सांगितलें. त्यांत प्रभूच्या षड्गुणांचें श्रवण प्रत्यक्ष अवलोकनसहित करावें असें सांगितलें. श्रवणास कीर्तनाची जरूर आहे. प्रभूच्या षड्गुणाचें कीर्तन कसें असावें तें या निबंधांत वर श्रवणभक्तीसंबंधी विवेचन केलें आहे त्या मासल्याचें कीर्तन जरी ऐकण्यास मिळालें नाहीं, तरी जसें मिळेल तसलेंच ऐकत जावें. त्यांत

सार हुडकावें आणि आपल्या ईश्वरावरील भक्तीचा एक भाग तरी दृढ करून घ्यावा.

१०९. श्री तुकाराम साधूंचें कीर्तन अशाच प्रकारचें अत्यंत निरपेक्ष बुद्धीचें असे. ते स्वयंस्फूर्तीनेंच कीर्तन करीत असत. व त्यांच्या कीर्तनाला इतर कांहीं एक लागत नसे. आणि या मुळें त्यांचें कीर्तन जास्ती सुपरिणामी आणि स्वपरहितकारक होई. परंतु तसें सर्वांच्या हातून कसें घडणार ? प्रापंचिक लोकांचें चित्त प्रपंचांत कांहीं तरी गढणें स्वाभाविक आहे, तशांनच नित्य व्यवहार आटपून फुरसतींत आपल्याच घरची मंडळी घेऊन त्यांनांच कीर्तनाचा लाभ आपल्याच घरीं बसून देतां येतो. त्यांतच आपल्यास समाधान प्राप्त होतें. चित्तास आनंद होऊन तें पवित्र होतें. आपल्या बरोबर घरच्या मंडळीसही तो प्रसाद मिळतो. मनाची प्रवृत्ति कुमार्गी होत नाहीं. ईश्वरपर मन होतें. मनाची दुर्बलता नाहींशी होते. प्रभूचा आधार वाटूं लागतो. संसाराचें भय नाहीसें होतें. व पुढील मार्ग निष्कंटक होतो. आतां,

११०. **स्मरणभक्तीकडे** आपण वळूं. ईश्वराचें म्हणजे जो आपल्या भक्ताचा देव असेल, त्याचें अत्यंत प्रेमानें स्मरण करणें याचें नांव स्मरण भक्ति याचें याविषयीं श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे,

**नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें ।**
**तिसरें भक्तीचें । लक्षण ऐसें ॥**

मनुष्याला आपल्या प्रेमळ मनुष्याचें व वस्तूचेंच स्मरण होतें. त्याचप्रमाणें प्रभूचें स्मरण होण्यापूर्वी श्रवणामुळें व कीर्तनामुळें त्यांजवर प्रेम जडणें साहजिकच. त्या प्रेमाचें पर्यवसान साक्षात्कारांत होतें. यानंतर स्मरण भक्ति ही ओघानेंच येतें. स्मारक वस्तूंच्या सांनिध्यानेंही स्मरण होतें. माता कोठेंही गेली तथापि तिला तिच्या बालकाचें स्मरण आपोआपच होतें. कारण, मातृवात्सल्यांत 'तान्हा याची भूक मातेसीच लागे.' ( ज्ञानेश्वरी ) कांहीं महत्वाचा इतर व्यवसाय असला तरी ती त्याचें स्मरण विसरत नाहीं.

आणि तिला अहोरात्र आपल्या बालकाचें स्मरण असतेंच. पशुपक्ष्यांत सुद्धां स्वतःच्या वत्साविषयीं वारंवार स्मरण होतें, असें दिसून येतें. हें स्मरण अत्यंत प्रेमामुळें होतें. याला इतर स्मारकांची गरज नाहीं. परंतु ईश्वरभक्तींत मात्र प्रथम प्रथम मनुष्याला स्मारकाची अवश्यकता असते व पुढें प्रेम जडलें म्हणजे मग स्मारकाच्या सांनिध्यावाचून त्याला आपल्या देवाचे गुण आठवतात; व तो तदाकार होतो. जिकडे पहावें तिकडे त्याला 'अवघाची देव जनीं वनीं सारा' या तुकोबाच्या उक्तीप्रमाणें भासूं लागतें. व स्मरण-भक्ति त्याचे हातून निरंतर होतच रहाते. श्रीतुकोबामहाराजांनी

देह देवाचें देऊळ। आंत बाहेर निर्मळ।
देव पहायासी आलों। मीच देव होऊनि ठेलों॥

असें म्हटलें आहे. देवाच्या गुणांची आणि ऐश्वर्याची आठवण करून देणारीं, देवगृह, मंदिर, प्रतिमा, जपाच्या माळा, इत्यादि आहेत. जपाच्या माळेस तर आपण 'स्मरणी' असें म्हणतों, व ती नेहमीं आपल्याजवळ ठेवितों. कां? कीं, जेव्हां त्या स्मरणीकडे सहज लक्ष जाईल, त्यावेळेस प्रापंचिक उद्योग असतांना सुद्धां देवाचें 'स्मरण' व्हावें, हाच मुख्य हेतु असतो. या स्मरणामुळेंच शेवटीं अंतःकरण ईश्वराकार होतें. म्हणून श्रीरामदासानीं सांगितलें आहे कीं—

स्मरण देवाचें करावें। अखंड नाम जपत जावें।
नामस्मरणें पावावें। समाधान॥

नामें संकटें नासती। नामें विघ्नें निवारिती।
नामस्मरणें दाविजेति। उत्तम पद॥

बाळपणीं तरुणकाळीं। कठिण काळीं वृद्धापकाळीं।
सर्व काळीं अंतकाळीं। नामस्मरण असावें॥

नामें पाषाण तरलें। असंख्यात उद्धरले।
महापापी तेचि झाले। परम पवित्र॥

चहूं वर्णास नामाधिकार । नामीं नाहीं लहान थोर ।
जड मूढ पैल पार । पावती नामें ॥

याप्रमाणें या स्मरणभक्तीचें अत्यंत महत्व आहे.

१११. **पादसेवन.**—आतां 'पादसेवन' म्हणजे, देवाच्या पायांच्या आश्रय करणें. ज्या मूर्तीची आपण सेवा करणार, त्या मूर्तींत देवाची प्रेमपुरःसर कल्पना प्रथम पाहिजे. 'पादसेवन' या शब्दानें केवळ पायांचीच सेवा, नुसतें पाय धुणें व पुसणें, असेंच नव्हे. यांत लाक्षणिक पद्धतीनें ईश्वरचरणीं संपूर्ण सेवेंकरितां आपली तत्परता सांगितली आहे. व्यवहारांत 'त्यानें आपल्या गुरुजींचे पाय धरिले' 'मी आपल्या पायांचाच चाकर आहे,' असें जें म्हणतात, तें कांहीं नुसत्या पायांचीच चाकरी करीत नसून, त्यांची सर्वच प्रकारें मनःपूर्वक सेवा करण्याची तयारी असते. श्रीसमर्थ सांगतात,

पादसेवन तेंचि जाणावें । कायावाचामनोभावें ।
सद्गुरूपाय सेवावें । सद्गती कारणें ॥
या नांव पादसेवन । भगवत्पदीं अनन्य शरण ।
निरसावया जन्ममरण । यातायाती ॥

यांत ईश्वरचरणाची सेवा मनोभावानें करणें हें विशेष आहे. असें करण्यांत ईश्वराकडे अतीशय नम्रता ठेवणें अगत्याचें आहे. व्यवहारांत जसें गुरुजनांच्या मातापितरांच्या, राजाच्या पाया पडतात, तसेंच देवाच्या पायां पडण्यांत आपलें नम्रत्व अगर अनन्य भावानें शरण जाणें स्पष्ट होतें. असें झाल्यास भगवान आपलें सर्व ओझें प्रेमानें घेतो.

११२. **अर्चन**:— यानंतर पांचवी भक्ति 'अर्चन'; म्हणजे देवाची गंधपुष्पादिकानीं अंतःकरणपूर्वक भक्ति, आदर ठेऊन प्रसन्न मनानें पूजा करणें.

काया वाचा आणि मनें । चित्तें वित्तें आणि प्राणें ।
सद्भावें भगवदर्चनें । या नांव अर्चन भक्ति ॥

ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानस पूजा करावी ।
मानस पूजा अगत्य व्हावी । परमेश्वराची ॥

मनें भगवंतासि पूजावें । कल्पूनि सर्वहि समर्पावें ।
मानस पूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ॥

यांत उपचारपूजा व मानसपूजा असे दोन प्रकार सांगितले आहेत. या दोन्हींतही ईश्वरी सांनिध्य प्रथम गृहीत आहे. येथें इष्ट देवतेचें ध्यान व आवाहन जरूर आहे. ही पांचवी भक्ति झाली.

११३. **वंदन**—आता सहावी भक्ति 'वंदन', म्हणजे नमस्कार करणें ओघानेंच प्राप्त होतें. देवापुढें आपलें किती तरी अल्पत्व आहे! हें सांगावें कां लागतें? ज्या देवानें आपल्यास जन्म दिला, मातेच्या उदरांत आपलें संरक्षण केलें, व बाह्य जगांतही ज्याच्या इच्छेनें आपलें व्यवहार चालतात, व शेवटींही पण ज्याच्या इच्छेलाच आपल्याला मान द्यावा लागतो त्या देवापुढें मान लवविल्यास त्यांत नवल तें काय? व्यवहारांत सुद्धां गुणांनीं, वैभवानें, व सत्तेनें श्रेष्ठ, मनुष्यास वंदन करण्याचा प्रघात आहेच; मग अखंडब्रम्हांडनायकापुढें जर मान नाहीं लववावयाची तर लववावयाची तरी कुठें? श्रीसमर्थ म्हणतात—

सर्व देवासि नमस्कारिलें । तें ऐका भगवंतासि पावलें ।
यदर्थी वचन बोलिलें । आहे तें ऐका ॥

आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमःस्कारः केशवं प्रतिगच्छति ॥

नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे ।
नमस्कारें सख्य घडे । सत्पात्रासि ॥ (अर्थात् ईश्वराशीं)

नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमिती ।
नमस्कारें मोडलीं समाधानें ॥

सीसा परता नाहीं दंड । ऐसें बोलती उदंड ।
या कारणें देव भक्त वंदावे ॥

नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे ।
नमस्कारें गुरुदेव बोले । साधका वरी ॥

विशेष करितां नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर ।
आणि मुख्य परमेश्वर । कृपा करी ॥

याप्रमाणें या वंदनभक्तीचें महत्व सांगितलें आहे. सहस्र अपराध करूनही पश्चात्तापानें साष्टांनमस्कार घातल्यास, श्रेष्ठ त्या अन्याची क्षमाच करितात. म्हणून नमस्कार हा सहाव्या भक्तीचा रामबाण उपाय आहे. या उपायानें मनुष्याची बुद्धि चांगली होते; तिला उपरति प्राप्त होतें; केलेल्या दुष्कर्माबद्दल पश्चात्ताप होऊन मनाची शुद्धि होते; पवित्रता प्राप्त होते.

११४. **दास्य**—प्रभूस शरणागत होऊन रोजच्यारोज याप्रमाणें आपला क्रम चालला म्हणजे, आपोआप देवाचें 'दास्य' करण्याची आमच्यामध्यें प्रबल इच्छा उत्पन्न होते. व आह्मी परमात्म्याचे दास बनून जातों. 'दास' हा शब्द व्यवहारांत 'गुलाम' अशा अर्थी वापरतात; व फारच कमी प्रतीचा समजतात. मनुष्याचा दास होणे हें, व्यवहारांत चांगलेंही पण नव्हे; दासाला आपली इच्छा चालवितां येत नसते. निव्वळ मालकाची इच्छा तीच दासाची इच्छा, मालकाचें मन तेंच दासाचें मन, मालकाची आवड नावड तीच दासाची आवड नावड, असावी लागते. असें आपण व्यवहारांत समजतों; व स्वार्थाकारितां कित्येक लोक व्यवहारांत मनुष्याचेंच दास्य उर्फ गुलामगिरी पत्करतात. ती कशाकारितां? कांहीं इच्छित हेतुप्राप्त्यर्थच. हेतु व्यवहारिक जसा, तसाच पारमार्थिकही असतो. ईश्वरोपासनेंत साधारणतः उभय हेतू असतात. अर्थात ते देण्याचें सामर्थ्य ज्याच्यापाशीं आहे, त्याची प्रसन्नता संपादन करणें अत्यंत अवश्य असते. ती संपादणें झाल्यास त्याची हरएक तऱ्हेनें सेवा करणें जरूर आहे. अशी सेवा करणें, अगर करण्यास तयार होणें, म्हणजे आपला अभिमान सोडून अत्यंत लीनता पत्करिली पाहिजे. अशा लीनतेनें प्रभूची सेवा आदरानें करूं लागल्यास त्यांस भक्ति उत्पन्न होते. त्या भक्तीचें प्रेम बनतें. अशा स्थितींत

पडिलें कार्य तितुकें करावें । सदा सन्निधचि असावें ।
देवद्वारीं ॥

सर्वाठायीं अति सादर । आणि दास्यत्वासही अति तत्पर ।
कार्यभागचा विसर । पडणार नाहीं ॥

या दास्यांत विशेष फायदा ईशसानिध्याचा होतो. देवाचें दास्य किंवा गुलामगिरी ज्यांनीं ज्यांनीं पत्कारिली, ते ते तुकारामासारखे किती उच्च पदवीला चढले, हें आपण पाहत असून सुद्धां, ही पवित्र गुलामगिरी पत्करण्यास आह्मी कां कुरकुर करावी, हेंच मला समजत नाहीं. देवाची इच्छा तीच आपली इच्छा, तो जें जें करितो, तें सर्व आपल्या हितासाठींच आहे, अशी एकदां आपल्या अंतःकरणाची स्थिति झाली म्हणजे ती देवास लागलींच पटते. आणि साधकाची भक्ति दृढ होते.

११५. सख्यः—आतां आठवी भक्ति म्हणजे ईश्वराशीं 'सख्य'. तें आपोंआप घडून येण्याचा प्रसंग येतो.

देवासि परम सख्य करावें । प्रेमप्रीतीनें बांधावें ।
आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥

देवासि जयाची अत्यंत प्रीति । आपण वर्तावें तयाचि रीति ।
येणें करितां भगवंतीं । सख्य घडे नेमस्त ॥

देवाच्या सख्यत्वा कारणें । आपुलें सौख्य सोडोनि देणें ।
अनन्य भावें जीवें प्राणें । शरीर तें ही वेंचावें ॥

देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगास तुटी ।
सर्व अर्पावें शेवटीं । प्राण तोही वेंचावा ॥

देव म्हणजे आपुला प्राण । प्राणासि न करावें निर्वाण ।
प्रेमप्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असें ॥

ऐसें असावें सख्यत्व । विवेकें धरावें सत्त्व ।
भगवंतावरील ममत्व । सोडूं नये कां ॥

सखा मानावा भगवंत । मातापिता गणगोत ।
विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळही परमात्माच ॥

मनुष्याच्या गुलामगिरींत निरंतर राहण्यानें मनुष्याचा नाश होतो; व देवाच्या गुलामगिरींत राहण्यानें देवाचें सख्यत्व होऊन त्याची शक्ति आपल्यास प्राप्त होते. इतका हा उभयदास्यांत जमीन आस्मानाचा फरक आहे. मालक कधीं गुलामाचा मित्र म्हणजे सखा झालेला असल्यास तो मानवी स्वभावास अपवादच असला पाहिजे. परंतु देवाचें गुलाम मात्र शेवटीं प्रत्यक्ष देहधारी देव बनतात. व सर्व जग त्यांचे सेवक होतें. केवढा हा महिमा या सख्यभक्तीचा !

११६. आत्मनिवेदनः—सख्यभक्तीच्या पाठोपाठ 'आत्मनिवेदन' नांवाची भक्ति सांगितली आहे. व हें योग्यच आहे. एकदां कां अत्यंत प्रेमळ अशा सख्य भक्तीस पूर्णत्वाचा रंग चढला, म्हणजे आत्मनिवेदन करण्यास निराळें सांगावें लागतच नाहीं. तें अपोआपच स्वयंस्फूर्तीनें होत असतें.

देवाचिया सख्यत्वासाठीं । पाडाव्या जिवलगासि तुटी ।
सर्व अर्पोनि शेवटीं । प्राण तोहि वेंचावा ॥

असेंच आतांच वर दासबोधांतलें अवतरण दिलें आहे. हें जें श्रीरामदास स्वामींनीं लिहून ठेविलें आहे, त्याचाहि अर्थ मी वर सांगितलेल्या तत्वाचाच द्योतक आहे मात्र 'शरीर तें ही वेंचावें' 'प्राण तोही वेंचावा' असें सांगणें आत्मनिवेदनार्थ आहे. परंतु 'शरीर वेंचणें' 'प्राण वेंचणें' याचा अर्थ मात्र आत्महत्या नव्हे. ही शेवटची भक्ति आहे, हें लक्षांत ठेवावें. मनुष्याचें अखेरचें प्रेम या जिवंत देहावर अत्यंत आहे. पूर्वी सांगितलेल्या आठही भक्तिमार्गांची ज्या महाभागाकडून तपश्चर्या अंतःकरणपूर्वक होईल, त्यास आपल्या या जड शरीरावर व प्राणावर कसलेंही प्रेम अथवा आपलेपणा राहणें शक्य नाहीं. श्रवणभक्तीनें त्यास आपल्या शरीराची व प्राणाची या अनंत जड विश्वांत काय योग्यता आहे, याचें ज्ञान सहजच

होतें. ज्या जड शरीराचा व प्राणाचा नाश होतो, त्यांपैकीं एकही आपण त्या जगदात्म्याचेच अंश आहों हेंही ज्ञान त्यास सहज होतें, आणि प्रभूच्या वियोगापासून मुक्त होऊन त्यास आपल्या आत्म्याचें अर्पण करणें याचेंच नांव 'आत्मनिवेदन'. यांत शरीरावरील व प्राणावरील लोभ एकादा खडा वेंचून टाकून देतात तद्वतच, वेंचून टाकून देणें आहे. तुकोबांनीं एका वाक्यांत असें सांगितलें आहे. ते म्हणतात 'तुज पाहता विठ्ठला, देह भाव हरपला' याचेंच नांव आत्मनिवेदन. देहभाव, अहंभाव, प्राणभाव विसरून जाऊन तादात्म्य मिळविणें म्हणजे आत्मार्पणच होय.

श्रीसमर्थ रामदासस्वामींनी देखील असेंच सांगितलें आहे. ते म्हणतातः—

ऐका निवेदनाचें लक्षण । देवासि वहावें आपण ।
करावें तत्वविवरण । म्हणजे कळे ॥

मी भक्त ऐसें म्हणावें । आणि विभक्तपणें भजावें ।
हें अवघेंचि जाणावें । विलक्षण ॥

तस्मात् विचार करावा । देव कोण तो ओळखावा ।
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ॥

मी कोण ऐसा निवाडा । पाहों जाता तत्व झाडा ।
विचार पाहतां उघड । आपण नाहीं ॥

तत्वें तत्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे ।
आत्मनिवेदन तेणें प्रकारें । सहजचि झालें ॥

आत्मा एक स्वानंद घन । आणि अहं आत्मा हें वचन ।
तरी मग आपण कैंचा भिन्न । उरला तेथें ? ॥

वरील उताऱ्यांत आत्मनिवेदन म्हणजे काय हें स्पष्ट सांगितलें आहे. त्यावरून असा बोधार्थ निघतो कीं, भक्त म्हणून भक्ति करिताना देवाशीं आपलें ऐक्यच असलें पाहिजे. म्हणजे भगवंताशीं आपली एकतानता व्हावी लागते. ती प्राप्त होण्यास विचार करावा कीं, प्रभूची

पूजा करणाऱ्या स्त्रीनें किंवा पुरुषानें विचार करावा – मी कोण ? हें माझें शरीर मी नव्हे, माझा प्राण मी नव्हें, हे दोन्ही माझे म्हणून मी वागवीत आहे ते पंचमहातत्वाचे बनले आहेत. त्या वेगळेंच आपण आहोंत. असा जो कोणी आपण, जो चैतन्य रूपी जगदात्मा, त्याचाच मी एक अंश आहें. या देहांत असलेला जो आत्मा तोच मी आहे. अशा स्थितींत मी देवाची भक्ति करीत असून, मी आपल्यास ईश्वरभक्त म्हणवीत आहे. असें जें आत्मत्व, तें प्रभूला अर्पण करणेंच 'आत्मनिवेदन' होत आहे. मागें सांगितलेल्या आठही प्रकारच्या भक्ती साधकास प्रवृत्तींतील जीवदशें-तून क्रमाक्रमानें त्याचे बुद्धीवरील एकेक पडदा दूर करीत, आत्मस्थितींत आणतात. आणि त्या नंतरच साधक पूर्ण भक्त बनतो. तेव्हांच आत्म निवेदनाची सहजवृत्ति होते. अशा स्थितींत आत्मनिवेदन म्हणजे सगुण भक्तीचा कळसच आहे. येथें असेंही सांगितलें पाहिजे कीं, इष्ट देवतेच्या सगुण भक्तींत प्रेमातिशयानें ईश्वरी साक्षात्कार झाल्यास, त्यास आपलें 'सर्वस्व' म्हणजे आत्मत्व अर्पण करणें हेंही आत्मनिवेदन होतें.

११७. अशा प्रकारचा आत्मनिवेदनाचा बिनमोल, हृदयंगम, अत्यंत प्रेमळ, असा मासला आमच्या वाचकांस मनोभावानें अर्पण करण्याची ही संधी मला दवडणें चांगलें वाटत नाहीं; असें मनांत आणून रामायणांतील एकनाथ महाराजांनीं सांगितलेले दोन प्रसंग येथें देत आहे.

प्रसंग १ ला.—सीता आणि रामचंद्र यांतील भक्त आणि प्रभु या नात्यानें कसें प्रेम होतें तें सांगतातः—

**सीतेचा भाव श्रीरामीं पूर्ण । राम सीतेसि संपूर्ण ।**
**सीतारामें सुख संपन्न । सुखी रघुनंदन सीतेचेनीं ॥**

**रामरसें रसज्ञ सीता । सीतेच्या रसनें श्रीराम भोक्ता ।**
**श्रीराम देखणें सीत डोळसता । तिच डोळां देखता श्रीराम ॥**

**श्रीरामें सीता सुंदर पूर्ण । सीतेनें राम शोभे सगुण ।**
**श्रीरामें सीता सुलक्षण । सीतेचेनि लक्ष लक्षण श्रीरामा ॥**

श्रीराम सीतेचा निजभोगु । सीतेचेनि श्रीरामा रसरंगु ।
श्रीराम सीता शोभे सांगु । सीता सर्वांगु श्रीराम ॥

सीता रस श्रीराम स्वाद । सीता भुवन श्रीराम सुगंध ।
सीता बुद्धि श्रीराम बोध । अनन्य सिद्धि येरयेरां ॥

सीता जीव राम जीवन । सीता मन राम उन्मन ।
सीता चित्त श्रीराम चतन्य । आनंद घन येरयेरां ॥

याचेंच नांव तादात्म्य, अथवा आत्मनिवेदन, अथवा जीवात्मा जगदात्म्यांत ओतणें, मिळून जाणें, एकरूप होणें.

दुसऱ्या प्रसंगीं सीताबाई अशोकवनांत श्रीरामचंद्राच्या वियोगानें दुःखित अशी अशोकवृक्षाखालीं बसली असतां, तिचें वियोग दुःखांत आत्मगत भाषण चाललें आहे. त्यावेळीं श्रीमारुतिराय त्याच वृक्षावर बसले असतां,-

देखोनि अनुतापिनी सीता कृपा उपजली हनुमंता ।
श्रीराममुद्रा होय टाकिता । दुःखावस्था शमावया ॥

मुद्रिका गर्भ अति पवित्र । त्याहीं माजी सार परात्पर ।
श्रीराम नामें निरक्षर । चिदचिन्मात्र मुद्रिका ।

ऐसि देखोनि मुद्रिका तेथ । सीता झाली सद्गदित ।
नेत्रीं आनंदजल स्रवत । हर्षयुक्त जानकी ॥

देखतांचि चमत्कार जाहला । स्वयें श्रीरामचि आला ।
सीतेसि ऐसा भाव गमला । सरसावला अंचळू ॥

श्रीराम आला एकाएकीं । लाजे झाली अधोमुखी ।
सर्वांगें हर्षेली जानकी । सुखोन्मुखीं डुलत ॥

आणि थोडीशी शुद्धि येतांच मुद्रिका हातीं घेऊन,—

पहिली वंदिली निढाळीं । मग आलिंगिली हृदयकमळीं ।
स्वानंदे चुंबी जनकबाळी । आणि सुखें वेल्हाळी आलिसी ।

म्हणूनि घातलें लोटांगण । बैस करूंदे चरण क्षाळण ।
तुझें तीर्थ मी सेवीन । करीन संवाहन चरणाचें ।
न म्हणे अचेतन सचेतन । भासि प्रेम संपूर्ण ।
तेणें हनुमंतासि आलें रुदन । करी स्फुंदन वृक्षा आड ॥

अशा स्थितींत श्रीमारुतिराय याप्रमाणें सीताबाईचें आत्मनिवेदन पाहून अत्यंत प्रेमानें भरून गेलें; आणि रडत रडतच काय म्हणतात तें पहा —

आम्ही म्हणवितों भक्त । परी हें प्रेम नाहीं पोटा आंत ।
जानकी प्रेमें सदोदित । ईशीं रघुनाथ तुष्टला ।
अचेतनीं प्रेम पान्हाहो । हा कोणासि वाही सद्भाहो ।
ईशीं तुष्टला श्रीरामरावो । वंद्यस्वयमेवो सर्वांसी ॥

त्या मारुतिरायासही आपल्या स्वःताच्या भक्तींत या तादात्म्याची उणीव वाटून आत्मनिवेदनाचें निज वर्म पटलें. वरील प्रसंग वाचून सहृदय वाचकांचि वृत्ति श्रीमारुतिरायाप्रमाणेंच झाल्याशिवाय राहणार नाहीं.

तसेंच एका गोपाचेंही आत्मनिवेदन मीं ऐकिलें आहे. तें असें — एके वेळीं श्रीकृष्ण सभेंत बसलें असतांना एक गोप धांवत धांवत आला; व खुणेनें श्रीकृष्णाला बाहेर बोलवूं लागला. कृष्णानें विचारिलें कीं, कायरे! कां बोलावतोस? तरी पण कांहीं एक न बोलता सारखें 'ऊं ऊं' करून हातानें आणि मानेनें खुणावीत कृष्णाला बोलविण्याचा त्यानें सारखा सपाटा चालविला. श्रीकृष्णानेंही त्यावर अत्यंत प्रेम असल्यानें, चटदिशी बाहेर येऊन कशासाठीं बाहेर बोलाविलेंस? म्हणून विचारिलें. गोपानें पुनः खुणेनें देवास तोंड पसरण्यास सांगितलें. व त्यानीं तोंड पसरतांच आपल्या तोंडातली कढी देवाच्या तोंडांत अत्यंत प्रेमानें घातली. याचें नांव आत्मनिवेदन! याचा अभ्यास करावा लागत नाहीं. ही स्थिति आपोआपच येत असते. मुलांकरितां जशी माता निसर्गतः आत्मनिवेदन करिते तसेंच भक्ताकडून त्यास नकळताच आत्मनिवेदन झालें पाहिजे. व तें क्रमानें होतेंही. फक्त मनुष्यानें त्या मार्गास लागलें पाहिजे, इतकेंच

११९. **ज्ञानीभक्त**— याप्रमाणें सगुणउपासक आर्त, अर्थार्थी व जिज्ञासु असे भक्ताचे तीन प्रकार सांगितले, व तत्प्रीत्यर्थ नव विधा भक्तीही सांगितल्या. आतां चौथे प्रकारचा भक्त 'ज्ञानी' वर्ग राहिला. या भक्तास भगवंताशीं सख्य व आत्मनिवेदन या कला कशा भरपूर साधतात तें पहा. या ज्ञानी भक्ताबद्दल भगवान् श्रीकृष्ण म्हणतात—

**तेषां ज्ञानी नित्ययुक्तः एकभक्तिर्विशिष्यते ।**
**प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थं अहं स च मम प्रियः ॥**

—गी. ७. १७.

या चार प्रकारच्या भक्तांत ज्ञानी श्रेष्ठ आहे. कारण कीं भक्तीचें जें अत्यंत गुप्त रहस्य त्याचें ज्ञान त्याला असतें. त्यालाच अखंड भक्तीची जी अत्यंत गोडी ती कळली असते. देवाची ज्याला आवड तोच भक्त. अर्थात ती आवड जेव्हां नसते तेव्हां तो भक्त नव्हे. शिवाय ही आवड नित्य असली तरच तो भक्त होतो. ती नित्य राहण्यास, भक्त ज्ञानीच असला पाहिजे. प्रभु सर्वात्मक आहे,-सर्वांतर्यामी आहे,-हें ज्ञान त्यासच बाणलें असते. हे ज्ञान आर्त, अर्थार्थी व जिज्ञासू या पैकीं कोणासही असत नाहीं. ज्ञानी भक्तांस मात्र तें ज्ञान असतें. आणि, त्यामुळेंच तो नित्य '**युक्त**' असतो, म्हणजे प्रभूशीं त्याचें सदा तादात्म्य झालें असतें. रमून असणें दोन प्रकारचें आहे. एक स्मरणांत रमणें, आणि दुसरें सदोदित प्रेमांत असणें. प्रस्तुत प्रसंगीं नित्ययुक्त म्हणजे प्रेमानें वा भक्तीनें नित्ययुक्त म्हणजे अखंड रंगलेला असला पाहिजे असें भगवान् म्हणतात. आतां साधारण असा नियम आहे कीं एकाद्यास सर्वांपेक्षा जास्त आवड ज्याची असते, त्यांच्यातच तो रमतो. खरें पाहूं गेलें असतां मनुष्यास, तशांत ज्ञानी मनुष्यास, अत्यंत प्रिय काय? तर त्याचें उत्तर आपल्यास 'आपणच' अत्यंत प्रिय, असेंच विचारा अंतीं कळेल. येथें 'आपण' म्हणजे कोण? आपण म्हणजे आपला आत्मा, असेंच थोड्या विचारा अंतीं ठरतें.

**सकल आवडि आपुलि आपणा । वळख तूं तुज टाकुनि पोपणा ।**
**प्रिय हे अप्रिय होय घडोघडीं । परि निजीं नच ये कधीं नावडी ॥**

—वामन-प्रियसुधा.

मग आत्मा आणि जगदात्मा एकच आहे; व, तो सर्वांठायीं भरला आहे, असा बोध ज्यास झाला, व जो त्या जगदात्म्याशीं सतत जडून राहिला, त्यालाच नित्ययुक्त म्हणतात. शिवाय प्रभूची नित्यस्मृति अशक्य होते. स्मरण करणें ही भक्ति थोडी कामिक असते. या भक्तीचें कारण कांहीं तरी आपलें कल्याण व्हावें, म्हणूनच असते. शिवाय निद्रेंत वा सुषुप्तींत तें स्मरण राहत नाहीं. यामुळें तें नित्य राहणें कठीण असतें. अर्थात् अशा प्रकारचें स्मरण अखंड समरसत्वापेक्षां कमी प्रतीचें आहे. ज्याला जगदात्मा निर्निमित्त आपला असा होतो, व त्याच्याशीं तो मिळून जातो, तोच नित्य युक्त या पदवीला पोंचतो. तशा अनुभवानें व अभ्यासानें त्याचें नित्ययुक्तत्व सिद्ध होतें. अनुभवाशिवाय नुसत्या ज्ञानानें तें सिद्ध होत नाहीं. व त्यास आत्मत्वाची खूण पटलेली असत नाहीं. मग ती खूणच ज्यास पटली नाहीं, त्यास ज्ञानी भक्त तरी कसें म्हणावें व तो त्या आत्मत्वांत रंगणार तरी कसा? यावरून अनुभवाशिवाय ज्ञान अथवा नुसतें स्मरण असलेल्या भक्तास खरा ज्ञानीच म्हणतां येणार नाहीं. मग 'भक्त' अथवा 'नित्य युक्त भक्त' ही पदवी दूरच राहिली. आतां अखंड स्मरण जर रहाणें अशक्य तर अखंड प्रेम तरी कसें राहणार, कारण देह प्रारब्धानें निद्रा सुषुप्ति हीं मनुष्यास आहेच, असा प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव आहे. त्यास 'स्मरण' आणि 'प्रेम' या दोन शब्दांतील अर्थ मनांत मनांत आणिला कीं याचें उत्तर त्यांत आहे. 'प्रेम' एकदां का दृढ झालें म्हणजे त्यास नाश नाहीं. तें निद्रा वा सुषुप्ति या कशांत ही कमी होत नाहीं. तें अखंडच राहणार, आत्मत्वांत रंगलेल्या भक्ताचें प्रेम नाहींसें होणार. प्रेमानें स्मरण होईल परंतु स्मरणांत प्रेम राहीलच असें नाहीं, निजात्मबोध व निजभक्ति व अखंड प्रेम फक्त एका खऱ्या ज्ञान्यासच साध्य आहे. इतर तीन प्रकारच्या भक्तांस तें साध्यच नाहीं. म्हणून भगवान् म्हणतात कीं, तो सर्वांत श्रेष्ठ आहे. आणि इतर ज्ञान्यांपेक्षां तो परमार्थात अत्यंत दृढ झाला असल्यामुळें अन्योन्यत्वानें तदाकार मी आणि तो मदाकार झाल्यामुळें तो मला प्रिय आहे. याचें कारण प्रभु कल्प

वृक्षाचे स्वभावाचा. ज्याचा जसा आणि जितका भाव, त्याचप्रमाणें त्याचा तसा व तितकाच असण्याचा. अर्थात्, जो भक्त प्रभुस्वरूपांत प्रेमानें रंगला त्यांत प्रभूही तितक्याच प्रेमानें रंगणें साहजीकच आहे. अशा प्रकारची भक्ति, ही त्या भक्तांचा कळसच आहे. ही अखेरची भक्ति इलाच खरें प्रेम म्हणतात. असा भक्त कसा असतो या विषयीं भगवान् श्रीकृष्ण अर्जुनास म्हणतात: —

दृष्टी त्याच्या अनंत । मी जेव्हां दिसतसें भगवंत ।
मग त्याची प्रीती तसि अंत । केंवि दिसेल मजलाही ॥ ६४ ॥
सर्व ही मी म्हणोनि । भक्त मज पाहे ज्ञानी ।
उतराई होऊं काय देऊनि । भक्ता तया ॥ ६५ ॥
इत्यादि भाव पोटीं । तों कृष्ण म्हणे शेवटीं ।
कीं त्यास मी प्रिय किरीटी । प्रिय अत्यर्थ मज तो ॥ ६६ ॥
अत्यर्थ ऐसी परस्पर प्रीती । वदतां हे भक्ति सुगुणाचीच हे रीती ।
सुचवी येथें श्रीपती । कीं प्रीति निर्धर्मी असेचिना ॥ ६७ ॥
भक्तिरसीं चित्त लावी । तो मोक्षसुखास वांकुल्या दावी ।
आतां कोण्या निमित्तें वदावी । भक्ति त्याची ॥ ७५ ॥
माझीच लागली गोडी । माझेंच ठायीं आवडी ।
आत्मत्वें भज न सोडी । पाय माझे ॥ ७६ ॥
कीं परमपुरुषार्थ दिधला । परंतु तो अर्थ देऊनि हि मला ।
अर्थ दिधलासा नाहीं वाटला । प्रिय अत्यर्थ मज ऐसा ॥ ८६ ॥

वामनपंडित.

ज्ञानी भक्तांची योग्यता इतकी मोठी आहे. अशाच भक्तांनीं प्रभूला आपलासा करून ठेवला आहे.

## प्रकरण ७ वें.

# ईश्वरोपासनेंत समाजसेवा.

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥

—गी. ६।३२.

१२०. याप्रमाणें मागील प्रकरणांत, सगुण उपासना, त्याकारितां भक्तीची अवश्यकता, भक्तांचे प्रकार, प्रथम आर्त, अर्थार्थी व जिज्ञासू असे सांगून नंतर उपासनेचीं साधनें म्हणून नवविधा भक्तीचें वर्णन सांगून शेवटच्या दोन भक्ती, सख्य आणि आत्मनिवेदन, या उपासनेंत ज्ञानीभक्तांत कशा ओतप्रोत भरल्या असतात हें सांगितलें. आतां आपण याच नवविधा भक्तींचा किंवा सगुण उपासनेचा आपल्या नित्याच्या इहलोकीच्या व्यवहारांत कांहीं समाजाच्या सेवेंत उपयोग आहे काय? व तो तसा करणें शक्य आहे काय? व अशा उपयोगानें ऐहिक व पारमार्थिक अशा उभय विध लाभास आह्मी पात्र होऊं किंवा कसें? तसेंच नवविध भक्तीचा अशा रीतीनें व्यवहारांत उपयोग करण्यास शास्त्रकारांची स्पष्ट गर्भित परवानगी आहे कीं नाहीं? इत्यादि गोष्टींच्या विवेचनाकडे वळूं. म्हणजे, अर्थातच ओघानें समाजसेवा या विषयाचें विवेचन केल्यासारखें होईल; व आतां क्रमानें ईश्वरोपासनेच्या विवेचनानंतर तोच मुद्दा प्राप्तही झाला आहे.

१२१. **अचेतन मूर्तींत प्रभूचें आवाहनापेक्षां उपासनेस सचेतन सगुणमूर्ति अधीक चांगली.**—निर्गुण उपासनेकडे वळण्यासाठीं सगुण उपासना म्हणजे मूर्तीची उपासना सांगितली; व ती मूर्ति पाषाणादिकाची किंवा इतर सुवर्णादि धातूंचीही चालते, असेंही पण सांगितलें. आतां प्रस्तुत प्रसंगीं त्याच ईश्वराची सगुण मूर्ति सचेतन मिळण्याचा संभव आहे काय? मिळाल्यास त्यापासून इष्ट कार्यें कशीं घडून येतील? या विषयांकडे वळूं.

आणि, हें शास्त्र सिद्ध कसें आहे, याच मुद्याचें विवेचन करूं. वर या निबंधांत ईश्वरोपासनेबद्दल लिहिलें आहे. त्यांत हें जग भगवद्रूपच आहे, आणि प्रभूच्या षड्गुणैश्वर्यानें भरलें आहे, असें सांगितलें आहे. त्या सहा गुणांत विश्वरचना करितांना प्रभूनें आपला चौथा गुण जो 'धर्म' म्हणजे समता व दया यांचा सर्वत्र उपयोग केल्याचेंही नमूद आहे. ही समता सर्वत्र नियमबद्ध असल्यामुळें, प्राणिमात्राच्या कर्मभोगानें सृष्टींत विषमता दिसून येत आहे. अर्थात त्यामुळेंच सृष्टींतील प्राणिमात्र सुखदुःखानें भरलेल्या संसारांत सांपडलें आहेत. अशा प्रकारचीही सृष्टि असली तरी, तिच्यांत ईश चैतन्य ओतप्रोत भरलें आहे. या नाशवंत सृष्टीचा आधारच, हें चैतन्य आहे. श्रीमद्भगवद्गीतेंत—

**यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।**
**न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥**

—अ. १ श्लो. ३९.

या श्लोकाचा अर्थ लिहितानां वामन पंडित म्हणतातः—

**जें बीज सर्वांभूतांचें । जैसें मृषाजलाचें बीज उष्ण साचें ।**
**तें मी कारण प्रपचाचें । अगा अर्जुना ॥**
**तैसें मज विना । चर अचर रूप काहीं उपजेना ।**
**बीजा वांचोनि अर्जुना । अंकुर कैसा ॥**
**एव बीजचि अंकुर । तेव्हां मीच चराचर ।**
**योग विभूति दोहींचें निरंतर । हेंचि रूप पाहें हा भाव ॥**

यावरून अखिल प्राणिमात्रांत प्रभु चैतन्यरूपानें आहे, हें उघड आहे. नउ प्रकारची भक्ति करून ईश्वरास संतुष्ट करण्याचा साधकाचा अट्टहासानें व अत्यंत प्रेमानें प्रयत्न चालत असतो. मृत्तिकाकाष्ठपाषाणधातु वगैरेच्या मूर्ती कल्पून त्यांत प्रभूच्या चैतन्याची सेवा, ध्यान आवाहन पूजन वगैरे मार्गांनीं केली जाते. तद्गतच चैतन्यानें भरलेल्या या सृष्टींतील प्राणिमात्रांची सेवा लोकसंग्रह रूपानें करण्याचा उद्योग कां करूं नये? प्रत्येक जीवात्म्यांत ईशचैतन्य आहे, हें सांगितलें. तें गुप्त असून त्यास प्रकट करणें हेंच

समाजसेवेचें ध्येय आहे. यास प्रयत्न केला पाहिजे. हा प्रयत्न मनुष्याच्या अंतःकरणांतील आणि बहिःकरणांतील वृत्ती ताब्यांत राहिल्यासच साध्य होणार. हें कार्य सतत उद्योग. ईश्वरोपासना, शारीरिक सत्ता, अध्यात्मज्ञानाचा उपदेश, इत्यादि उपायांनींच यशस्वी होणार. यांपैकीं ज्याच्या त्याच्या सामर्थ्याप्रमाणें एक वा अधिक किंवा सर्व उपायांची योजना करून यश संपादणें याचेंच नांव समाजसेवा.

१२२. सर्व सचेतनांत प्रभु आहे.—

यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ॥ ४१ ॥
अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नं एकांशेन स्थितो जगत् ॥ ४२ ॥

—गी. अ. १.

अर्थ—जें जें कांहीं सामर्थ्यवान, श्रीमान, व तेजस्वी असेल, तें सर्व माझ्या तेजाचें अंशभूत आहे, असें समज. जास्ती कशाला? हें सर्व जगत् मद्गुणी आहे. यावरून पाहतां इतर पाषाणादि मूर्तीपेक्षां सुद्धां मनुष्यांत ईश्वराचें चैतन्य आयतेंच बऱ्याच मोठ्याप्रमाणांत प्रकट झालें आहे, असें प्रत्यक्ष दिसतें. भगवान सत् चित् आनंद स्वरूप आहे, असें आर्य वैदिक म्हणतात. व या स्वरूपांतील चैतन्याचा अंश प्रत्येक मनुष्यांत दिसत आहे, असें वर सांगितलेंच आहे; व हें सच्चिदानंदत्व मनुष्यांत निरंतर असतें. इतक्या गोष्टी जर सर्व मनुष्यमात्रांत जुळलेल्या आहेत, तर मग ईश्वराची उपासना मनुष्याच्या मूर्तींच्या द्वारा कां करितां येऊं नये? असा प्रश्न आहे. आह्मी आर्य, क्षुल्लक व हिंस्रप्राण्यांना सुद्धां ईश्वराची मूर्ति मानून त्याची पूजाहि केव्हां केव्हां करीत असतों. भगवान् आदिनारायण शेषावर निजले म्हणून व श्रीशंकरांनीं नागाचें भूषण केलें म्हणून नागाची पूजा आह्मी करितों. तसेंच, शंकराचें वहान म्हणून बैलाचीही पूजा आह्मी करितोंच. देवीची पूजा करितांना तिच्या सिंहासही गंधाक्षता वाहण्यास आह्मी विसरत नाहीं. आणि श्रीगुरुदत्तात्रेयाच्या पूजेंत त्यांच्या संनिध असलेल्या श्वानालाही आह्मी नमन करितों.

१२३. या सर्व गोष्टी काय दाखवितात? कीं केवळ जड मूर्तींचीच पूजा केली पाहिजे असें नसून सजीव मूर्तींचीही पण पूजा केली असतां चालतें. इतकेंच नव्हे तर तसें करणें हें आपलें कर्तव्य आहे. मात्र हें कर्तव्य थोड्या विवेकानें करावें लागतें, इतकेंच. यांत तारतम्य कडे फार लक्ष पुरवावें लागतें. उगाच घर साप, कीं कर पूजा, असें जर सर्व लोक करीत सुटतील तर बहुतकरून मानवी समाज नामशेष होण्याचीच पाळी येण्याचा संभव आहे. देव किंवा धर्म या गोष्टी मानवी प्राण्याचा घात करण्याकरितां नसून त्याच्या हितासाठीं, अर्थात सुखासाठींच आहेत. हें तत्व दृष्टीआड करितां कामा नयें. समाजांत केव्हां केव्हां देवधर्मामुळें सुद्धां ज्या लोकांना दुःख भोगावें लागतें, तें खरोखरीच त्या देवधर्माचें फळ नसून मनुष्याच्या तारतम्य बुद्धीच्या अभावाचाच तो परिणाम होय. असें माझ्या अल्प मतीस वाटतें. सर्वत्र तारतम्य बुद्धि ही पाहिजेच आहे. व ही बुद्धि जेव्हां नाहींशी होऊन मनुष्य अंधश्रद्धेनें मोहीत होतो, तेव्हां त्याच्या दुःखास सुरवात झालीच म्हणून समजावें. इष्टानिष्ट, सुखदुःख, हीं कोठून दुसरीकडून येत नसून बहुतांशी तीं आमच्या बुद्धींत तारतम्याची उणीव भासल्यानेंच निर्माण होत असतात. परंतु मनुष्यास आपलें अज्ञान कबूल करण्याइतकें विवेकज्ञान व धैर्य नसल्यानें नेहमीं तो आपल्या दुःखाचें कारण इतर वस्तूंत शोधित असतो, व असेंच जन्माच्या जन्म गेलें तरी त्यास खऱ्या सुखाचा लाभ होत नाहीं

**साप विंचू नारायण । त्यासि दुरूनि नमन ॥**

असें जे साधुवर्य तुकोबांनीं म्हटलें, त्यांतील तात्पर्य सुद्धां हेंच आहे कीं, ईश्वराचे चैतन्य सकल प्राणिमात्रांत गुप्त व प्रकट असलें तथापि त्याची पूजा सावधगिरीनेंच केली पाहिजे. व्याघ्र सिंहादि हिंस्र पशु किंवा सर्पादि उपद्रवी लहान मोठ्या प्राण्यांच्या वाटेस आपण होऊन न जाणें, इतकेंच नव्हे तर त्यांत देखील प्रभु भरला आहे म्हणून, त्यांतील चैतन्यांशाविषयीं कौतुक वाटून आदर ठेवणें, ही त्याची उपासनाच समजावी. कारण ते कधींही आपण होऊन एखाद्या मनुष्याचा शोध घेत येऊन आपणास उपद्रव

सहसा करीत नसतात. त्यांचें कोणी नांव काढल्यास मात्र स्वसंरक्षणासाठीं त्यांना दुसऱ्यास उपद्रव देणें भाग पडतें

१२४. आतां गाय, म्हैस, बैल, घोडे इत्यादि समाजोपयोगी प्राण्यांची नुसती उपेक्षारूपी पूजा करून भागत नाहीं ; व तें योग्यही नाहीं. हे पशू मनुष्याच्या उपयोगाकारितांच ईश्वरी योजनेनें उत्पन्न झाले आहेत. आह्मी जर हिंस्र पशूंसारखे किंवा साप विंचवासारखेंच त्यांजकडे दुर्लक्ष केलें तर त्यांत आमची हानी आहे. आमच्या शेतीला रेडे बैल आवश्यक आहेत ; व दुधाला गाई म्हशींची अपेक्षा आहे. स्थलांतराकारितां बैल व घोड्याची गरज लागते. व हे प्राणी निरुपद्रवी आहेत, घातक नव्हेत म्हणून शक्य तितक्या प्रयत्नानें यांचें संरक्षण आणि संवर्धन रूपी पूजा या अशा उपयुक्त प्राणिवर्गाची आपण केलीच पाहिजे. असें करण्यांत त्या प्राणीवर्गाचें आणि आमचें असें दोघांचेंही हित होणार आहे म्हणूनच, आमच्या वैदिक धर्मीयांनीं गोसेवा प्रामुख्यानें सांगितली आहे. गाईच्या शरीरांत तेहतीस कोटि देव आहेत, असें आमचे शास्त्रकार ह्मणतात. म्हणनच आम्ही हिंदू त्या गाईची पूजा करीत असतों. गाईच्या दुधांत ज्यास्ती आरोग्य, आणि शिवाय बैलांचा जास्ती उपयोग, म्हणूनच म्हशीपेक्षां गाईचीच पूजा धार्मिक दृष्टीनें अधिक योग्यतेची ठरली असावी, असें वाटतें, यावरून गोमातेचें व इतर प्राणिवर्गाचेंही संहारापासून रक्षण करणें हें किती अगत्याचें आहे, हें निराळें सांगावयास नकोच. धुळ्याची प्राणिरक्षक संस्था व श्रीक्षेत्र वाई सारख्या ठिकाणच्या अनेक गोरक्षणसंस्था यांना या बाबतींत द्यावें तितके धन्यवाद थोडेच आहेत. परमात्मा सर्वांना अहिंसा बुद्धि देवो, व वर सांगितलेल्यासारख्या संस्थांना पूर्ण यश येवो अशी माझी प्रभूच्याचरणीं लीन होऊन प्रार्थना आहे.

१२५. **समाजसेवा—** आतां या प्राणिवर्गापेक्षां उच्च दर्जाचा जो मनुष्य प्राणि त्याच्याविषयीं आपण विचार करूं लागलों असतां, ईश्वराच्या त्या चालत्या बोलत्या सगुण मुर्तीच आहेत, असें म्हणण्यास मला मुळींच

हरकत दिसत नाहीं. चौऱ्याऐंशी लक्षयोनींत फिरून या मानवी प्राण्याची विवेकबुद्धि आणि हस्तपादादि सर्व इंद्रियांतील सामर्थ्य व कौशल्य, हीं कळसास पोंचल्यामुळें मनुष्यप्राणी इतर प्राण्यापेक्षां भारी व कार्यक्षम झाला आहे. ऐहिक व पारमार्थिक अशीं सर्व प्रकारचीं सुखें त्याला प्रयत्नानें मिळवितां येतात. मानवी प्राण्यांत प्रेमळ अंतःकरणें आहेत. त्यांत दया, क्षमा, उपकारबुद्धि, करुणा, शांति इत्यादि ईश्वरी गुण व अद्भुत शक्ती आहेत. अशा मनुष्याला गुलामही होतां येतें आणि बादशहाही पण मनुष्यच होऊं शकतो. केवढी ही मनुष्यप्राण्याची योग्यता! मानवी सृष्टीकडे पाहून ईश्वरास खरोखरीच कौतुक वाटत असलें पाहिजे. मनुष्याच्या मूर्तीचि कल्पना व रचना विश्वकर्म्यानें आपलें दैवी अगाध चातुर्य खर्च करून अत्यंत प्रेमानें केली असली पाहिजे. आणि ती तयार झाल्यानंतर तिजकडे त्यानें खरोखरच अत्यंत प्रेमानें व कौतुकानें पाहिल्याचें ग्रंथांतही आढळतें. आपल्यासारखें असलेलें आपल्याला फारच आवडतें, या नियमास अनुसरून ईश्वराच्या अगदीं जवळ जवळ तयार झालेला हा मनुष्यप्राणी ईश्वरास जास्त पसंत व्हावा यांत नवल तें काय? मानवी समाजाची अशा प्रकारें असामान्य योग्यता असल्यामुळेंच त्यांतील विशिष्ट घटना प्रसंगविशेषीं प्रत्यक्ष '**देव**' या नांवानेंच संबोधिल्याचें सर्वांस माहित आहेच. हें कसें तें खालील विवेचनावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

१२६. **मातृदेवोभव**— मानवी समाजाचे सामान्यतः स्त्री आणि पुरुष असे दोन वर्ग केल्यास, या दोन वर्गांत बाल, तरुण, प्रौढ, व वृद्ध असे पुनः चार वर्ग करितां येतील. या चारी वर्गाला त्यांच्या त्यांच्या वयोमानाप्रमाणें आणि अवस्थाप्रमाणें त्यांच्याच जातीचे म्हणजे मानवी जातीचेच 'देव' सांगितले आहेत, बाल्यावस्थेंत, मग ती मुलगी असो कीं मुलगा असो त्यांस 'मातृदेवोभव' (तैत्तिरीय उपनिषत् शिक्षावली) म्हणजे 'माता' इलाच तूं देव समज, अशी वेदाची आज्ञा आहे. व ही अक्षरशः सत्य आणि योग्य आहे. प्रेमळ व पवित्र मातेच्या नुसत्या स्मरणानें सुद्धां कोणाचें बरें अंतःकरण सद्गदित होणार नाहीं! मातेच्या प्रेमळ वाणीचें,

आणि आपल्या अपत्याचे हितासाठीं असाधारण स्वार्थत्याग, याचें स्मरण झालें कीं, कृतज्ञ अंतःकरणास प्रेमाचा पाझर फुटलाच पाहिजे. बालपणीं आणि पुढें प्रौढपणींही मातेविषयीं किती आदर असतो, याचा अनुभव सर्वांना आहेच. देवापासून थोडें दूर होतांना कसें वाटतें, याचें विवेचन जेव्हां तुकोबानीं केलें तेंव्हां ते म्हणतात—

> कन्या सासुऱ्याशी जाये, मागें परतोनि पाहे ।
> तैसें वाटे माझ्या जिवा, कधीं भेटशी केशवा ॥

या प्रमाणें तुकोबामहाराज मातृप्रेमाचें स्मरण करून देत आहेत. मानवी समाजाचा म्हणा किंवा सर्व प्राणिवर्गाचाही म्हणा, पहिला मूर्तिमंत देव म्हणजे माता हाच होय औशनसंहितेंत

> नास्ति मातृसमो देवो नास्ति मातृसमो गुरुः
>
> —अ १ ३६ ४

म्हणजे मातेसारखा देवही नाहीं, व मातेसारखा गुरुही नाहीं असें सांगून मातृसेवेची अवश्यकता दाखविली आहे.

श्रीरामचंद्राची मातृदेवता जी कौसल्या, तिनें रामचंद्र वनास जाण्याकरितां निघते समयीं, त्याचा मार्ग व वनवास सुखरूप होवो म्हणून स्वस्त्ययन केलें. त्यांत तिनें प्रथम श्रीमदधोक्षजाची यथाविधि पूजा केली. श्रीरामचंद्रास वनवासांत असतां कसलेंही दुखणें बाणें येऊं नये, म्हणून अवश्य त्या औषधीं त्याच्या दंडास बांधिल्या. ब्रह्मा, विष्णु, महेश आदिकरून सर्व देवतांची, सिद्धचारण मरुद्गणादिकांची, तसेंच पूषाभगअर्यमादिकांची, सूर्य, चंद्र, वरुणादिकांची त्याचप्रमाणें रुद्र, इंद्र, उपेंद्राची, सप्तऋषी, महाऋषींची आणि नारद यांची त्यानीं श्रीरामचंद्राचें सर्वतोपरि रक्षण करावें म्हणून सद्गदित अंतःकरणानें प्रार्थना केली. इतकेंच नव्हे, तर महा क्रूर शनि भौमादि ग्रहास माझ्या रामावर वक्रदृष्टी होऊं नये अशी भाक मागितली. विद्युल्लतेस तिनें रामचंद्रावर पडूं नये म्हणून भिक्षा मागितली. यानंतर उदक,

पृथ्वी, आकाश, यांतील हिंसक विषारी प्राण्यांसहीं रामचंद्रास पीडा न करण्याविषयीं तिनें प्रार्थना केली. या सर्व विनवण्या करितानां 'तुमची दासी मी झालें' अशा लीन दीन वाणीनें ती त्या सर्वांस आपल्या मातृवात्सल्यानें शरण गेल्याचें सांगितलें आहे. तिनें प्रभु रामचंद्राबरोबर अनेक मंगलें दिलीं आणि ती म्हणाली,

तुज रक्षो आगम निगम । तुज रक्षो स्थावर जंगम ।
तुझें संकट दुर्गम । पुरुषोत्तम निवारी ॥

जनवना जो जीवन । निरंजना जो निजजीवन ।
तो तुज रक्षो जनार्दन । लोटांगण त्यासि माझें ॥

म्यां प्रार्थिलें देवदेवता । म्यां प्रार्थिलें भूतां समस्तां ।
म्यां प्रार्थिलें आदि अच्युता । वनीं रघुनाथा रक्षावया ॥

असें बोलत असतां जी कौसल्येची स्थिति झाली, तिचें वर्णन श्री एकनाथ करितात, तें असें :–

राम जगाचा निज जिव्हाळा । त्याहिवरी मातेचा कळवळा ।
अश्रु पूर्ण भरले डोळां । वेळोवेळां आलिंगी ॥

क्षणी न पुरे आलिंगितां । क्षणी न पुरे मुख पाहतां ।
क्षणी न पुरे गुज बोलतां । निज माता कृपाळू ॥

क्षणी न पुरे कुर्वाळितां । क्षणी न पुरे मुख चुंबितां ।
क्षणी न पुरे हृदयीं धरितां । ऐसी निज माता कृपाळू ॥

अशी मातृदेवतेचें हें अलोट प्रेम पाहून––

देखोनी मातेचा कळवळा । श्रीराम कृपेचा कोंवळा ।
आनंदाश्रु आले डोळां । बाष्पें गळा रोधला ॥

देखोनी निज जननीचें वदन । पुढतीं नमन पुढतीं गमन ॥
पुढतों घाली लोटांगण । प्रेम पूर्ण मातेचें ॥

तें देखोनी उठाउठी । कौसल्यें राम धरिला पोटीं ।
ललाट मर्दोनि ललाटीं । घातली मिठी दृढचरणीं ॥

माऊलीचें प्रेम पूर्ण । तेणें अश्रु लोटले संपूर्ण ।
झालें श्रीरामचरण क्षाळण । प्रक्षाळण निज दुःखा ॥

वरील वर्णन वाचून 'मातृदेवो भव' या आज्ञेचें महत्व व मर्म, सज्जन सहृदय व रसज्ञ वाचकांस सहजच पटणार आहे. त्यांनांही क्षणैक अश्रु गाळावे लागतील, यांत संशय नाहींच. पण या प्रेमप्रसंगानें स्वर्गांतील देव देवतांस देखील हलवून सोडलें. आणि —

तंव गर्जली आकाशवाणी । श्रीरामा निज विजयो वनीं ।
दुःख नको करूं जननी । राम त्रिभुवनीं महाराजा ॥
श्रीरामा नाहीं सुख दुःख । जे मानिती ते केवळ मूर्ख ।
ऐकतां कौसल्ये झालें सुख । हृदयीं हरीख कोंदाटला ॥

अशी हीं 'मातृदेवता' व असें तिचें महत्व आहे!

या प्रमाणें बालसमाजास साक्षात् चालती बोलती देवता ही माता आहे. असें सांगून पुढें पांच वर्षें वय जाहल्यानंतर मुलास किंवा मुलीस कुमारत्व आलें म्हणजे माता हा एक देव असून दुसरा देव पिता हा एक आहे, असें सांगितलें आहे. वस्तुतः जन्मापासून माता व पिता हे त्या मुलाचे देव आहेतच. परंतु अगदीं बाल्यावस्थेंत माते इतकें सांनिध्य पित्याचें असूं शकत नाहीं, म्हणूनच देवत्व पदवीला माताच प्रथम योग्य आहे, असें समजूनच शास्त्रकारांनीं 'मातृदेवो भव' हे सांगून लागलींच,

१२७. पितृदेवोभव— म्हणजे, पित्यास देवाप्रमाणें मान, असा उपदेश केला आहे. याशिवाय, इतर कित्येक ठिकाणीं माता व पिता यांचा देवत्वानें उल्लेख एकदमच केलेला आढळतो. महानिर्वाण उत्तर तंत्रांत —

मातरं पितरं चैव साक्षात् प्रत्यक्षदेवताम् ।
मत्वा गृही निषेवेत सदा सर्वप्रयत्नतः ॥

—उल्लास ८–२५–५.

अर्थ — माता व पिता ही साक्षात् देवाचीं रूपें आहेत, असें मानून गृहस्थानें त्यांची सदा सर्वदा हर प्रयत्नांनीं सेवा करावी, या प्रमाणें सांगितलें आहे.

संतुष्टौ पितरौ यस्मिन्ननुरक्तो सुहृद्गणः ।
गायंति यद्यशो लोकाः तेन लोकत्रयं जितम् ॥

—उ० ८-६४-५.

अर्थः— ज्यांच्यावर माता पिता संतुष्ट आहेत व सर्व लोक ज्याची कीर्ति गातात, त्यानें स्वर्ग, मृत्यु, पाताळ हे तीनही लोक जिंकले असें समजावें.

यावत्पिता च माता च द्वावेतौ निर्विकारिणौ ।
तावत्सर्वं परित्यज्य पुत्रः स्यात्तत्परायणः ॥

—औशनः संहिता.

अर्थः— जों पर्यंत माता व पिता निर्विकार आहेत, तों पर्यंत सर्व सोडून देऊन पुत्रानें त्यांची सेवा केली पाहिजे.

यावरून निर्विकार माता पित्यांची सेवा शास्त्रकारांनीं सांगून स्वतःच्या तारतम्य ज्ञानाचा उपयोग करावा असें दर्शविलें. प्रल्हादानें पित्याची आज्ञा मोडली व तो हरिनाम घेऊं लागला. तसेंच सकल वैदिक धर्म संस्थापक श्रीशंकराचार्य यानीं सुद्धां मातेस फसवून तिजकडून सन्यासाश्रम घेण्याची आज्ञा मिळविली. या व अशा प्राचीन आणि अर्वाचीन गोष्टींवरून माता पित्यांचेंही देवत्व किती व कसें मानावयाचें हें ज्याच्या त्याच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. प्रल्हादानें पित्याचें देवत्व नाकबूल करून पितृ आज्ञेचा सपशेल भंग केला; तर प्रभु रामरायानें पित्याच्या वचनासाठीं चौदा वर्षें वनवास व अनंत आपत्ति भोगिल्या. पित्यांत आसुरीवृत्ति उत्पन्न झाली म्हणजे मग त्याची आज्ञा न मानणें श्रेयस्करच आहे. व दैवी वृत्ति जों पर्यंत आहे तों पर्यंत देवासारखी पित्याची आज्ञा पाळली पाहिजे. असाच याचा निष्कर्ष निघतो. मात्र इतकें खरें कीं माता पिता कोणत्याही

आसुरी वृत्तीला बळी पडले तथापि त्यांची आपण तोंडानें निर्भर्त्सना कधींही करूं नये. स्वतःच्या विवेकबुद्धीप्रमाणें आपण आपला मार्ग आक्रमावा. आणि आपल्या सत्कार्यास आड न येतील अशा रीतीनेंच त्यांची सेवा आपण करावी, इतका या विवेचनापासून बोध घेण्यासारखा आहे.

१२८. **अपत्यांची शुश्रुषा हें मातापितरांचें कर्तव्य** — ज्याप्रमाणें 'मातृदेवो भव' 'पितृदेवो भव' या शास्त्राज्ञा कन्या व पुत्र यांनीं मानल्या पाहिजेत. त्याच प्रमाणें उलट पक्षीं जे प्राणी माता पितरांच्या पोटीं जन्म घेवून येतात त्यांच्या कल्याणाकरितां शक्य तितके प्रयत्न शहाणपणानें, दूरदृष्टीनें, व आपल्या शक्त्यनुसार आईबापांनीं करणें जरूर आहे हें विसरतां कामा नये. आपल्या पोटीं मुलें जन्मलीं, तीं मुलें आपली आहेत, आपण त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ आहोत, त्यांनीं आपल्या इच्छा मानिल्या पाहिजेत, या सर्व गोष्टी जशा खऱ्या तद्वतच आपल्या प्रमाणेंच तेही प्राणी आहेत, पूर्व जन्माच्या ऋणानुबंधानें तें आपल्या पोटीं आलें आहेत, आपलें त्यांचें अन्योन्यसंबध आहेत, आणि आपल्याप्रमाणेंच त्यांच्यांत सुद्धां प्रभूचें चैतन्य भरलें आहे, हें निज सत्य न विसरतां त्यांचीही शुश्रूषा केली पाहिजे. त्यांचें पोषण चांगलें करून, त्यांचें शील वाढवून, त्यांस चांगली विद्या देवून त्यांचा आयुष्यक्रम सुलभ व सुखद होण्याकरितां त्यांस सन्मार्ग दाखवून, त्यांस सुखी केलें पाहिजे.

१२९. **विद्यादानाची अवश्यकता** — विद्येची प्रत्येक मनुष्यास अवश्यकता आहे; मग स्त्री असो वा पुरुष असो. विद्येवांचून मनुष्य पंगु आहे. विद्येशिवाय त्याचें सर्वतोपरि अडतें. विद्येचें महत्व भर्तृहरीचे नीतिशतकांत दिलें आहे. त्यांत असें सांगितलें आहे कीं, विद्येनें मनुष्याच्या रूपास तेज चढतें. ती एक आपलें गुप्त धनच आहे. तिचे पासून सर्व अवश्य वस्तु मिळतात. यश व सुख प्राप्ती होते. गुरूंना गुरुत्व तिजपासून प्राप्त होतें. परदेशांत तीच आपल्यास आप्त आहे. विद्याच आपले अत्यंत श्रेष्ट दैवत आहे. राजसभेंत विद्येलाच मान आहे. धनास तसा

मिळत नाहीं. यावरून स्पष्टच आहे कीं, विद्या नसलेल्या मनुष्याची आणि पशूंची स्थिति एकच आहे.

१३०. पाश्चात्य देशांतील स्त्री पुरुष येथें येतात. त्यांत लष्करांतील शिपाई होऊन येणाऱ्यांच्या कुटुंबापासून वरपर्यंत जे लोक आहेत, त्यांत विद्याविहीन स्त्री पुरुष सांपडत नाहींत. लिहिणें वाचणें इतकेंच नव्हे, त्यांतील बहुतेक लोकांस बऱ्याच गोष्टींची माहिती असते. तसें नसेल तर त्यांचे समाजांत त्यास कोणीच मानीत नाहींत. स्त्री पुरुषांस एकसारखीच विद्या देण्याची तिकडे पद्धत आहे. बायकांस विद्या दिल्यास घात होईल अशी तिकडील लोकांची समजूत नाहीं. त्यामुळें तिकडील लोकांत उद्योग, धैर्य, शहाणपण वगैरे गुण उभय वर्गांच्या अगीं वसतात. या देशांत तेहत्तीस कोटी प्रजेपैकीं निम्मी स्त्री जात अज्ञानांत दडपून टाकिली आहे. ज्याकाळीं स्त्रियांस विद्या देणें (मग ती व्यावहारिक असो वा पारमार्थिक असो) ही निषिद्ध गोष्ट ठरली गेली, व ती अधिकारयुक्त वाणीनें अयोग्य ठरवून, त्या-प्रमाणें शास्त्रबद्ध नियम केला, त्या वेळचे ते अधिकारी महाभाग मोठे धूर्त व दूरदर्शी होते असें मानणारे लोक कोणत्या वर्गांत चालण्याचे याविषयीं सूज्ञ वाचकांनींच विचार करावा. मी तर स्त्री आहें. मला त्याविषयीं बोलण्यास काय अधिकार ? परंतु वाचकहो, तुमच्या पूज्य माता आहेत, स्त्रिया आहेत, तुमच्या अत्यंत जीव कीं प्राण बहिणी व मुली आहेत, तुमच्या उभ्या आयुष्यांत तुम्हांस सुख देणाऱ्या तुमच्या पतिव्रता बायका आहेत. यांस अज्ञानांत ठेवल्यास तुमचें किती नुकसान होतें, व खऱ्या प्रेमास कसें विर्जण पडतें, याचा विचार कराल व अभिमान बाळगाल असा मला भरंवसा वाटतो. येथें इतकेंच सांगितल्यास पुरे कीं या देशाची साडे-सोळा कोटि प्रजा अज्ञानांधःकारांत कोंडून ठेवणाऱ्या आणि अधःपातास नेणाऱ्या या पापाचें फळ आज हा हिंदुस्थान देश हीनदशेंत भोगीत आहे, याची आठवण असूं द्या. गीतेंत श्रीकृष्णांनीं तर चतुर्वर्णास स्त्री पुरुष हा भेद न ठेवितां सर्व विद्येचा, पराविद्यासुद्धां, शिकण्याचा अधिकार असल्याचें स्पष्ट भाषेंत सांगितलें आहे. म्हणून तरी यानंतर, ही उभयविध विद्या वरील

भेद न ठेवितां उदार अंतःकरणानें सर्वांस देण्याचें सत्कर्म त्यांचें कडून घडावें अशी सूज्ञ समाजास माझी विनयपूर्वक प्रार्थना आहे. हें थोडें विषयांतर झालें, असें कदाचित वाटलें तरी तें योग्यस्थलींच समाजसेवेचा भाग म्हणून झालें आहे. त्याबद्दल, अपराधच वाटल्यास सुज्ञ वाचक उदार अंतःकरणानें मला क्षमाच करितील अशी माझी खातरी आहे.

१३१. **आचार्यदेवो भव**— आतां ही विद्या प्राप्त करून घेण्याची झाल्यास ती दोन प्रकारची आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. एक व्यावहारिक व दुसरी पारमार्थिक. दोन्ही बाबतींत ‘आचार्यदेवो भव’ म्हणजे गुरूनां प्रत्यक्ष देवच समज अशीही एक आज्ञा आहे. गुरु हा चालता बोलता देव आहे आणि त्याची शुश्रूषा वेद शास्त्रांत सांगितली आहे—

**यथा गुरुस्तथैवेशो यथैवेशस्तथा गुरुः ।**
**पूजनीयो महाभक्त्या न भेदो विद्यते तयोः ॥**

—यो. शि. उ. अ. ५

**अर्थः**— जसा ईश्वर तसेच गुरू आहेत. प्रत्यक्ष ईश्वरांत व गुरूंत कांहीं फरक नाहीं. एवढ्यासाठीं अत्यंत भक्तीनें गुरूसेवा केली पाहिजे.

**स्वर्गो धनं वा धान्यं वा विद्या पुत्राः सुखानि च ।**
**गुरुवृत्त्यनुरोधेन न किंचिदपि दुर्लभम् ॥**

—वा. रामा. स. ३०-२६-१४

**अर्थः**—स्वर्ग, धन, धान्य, विद्या, सुसंतति, सौख्य हें सर्व गुरुकृपेनें प्राप्त होतें. गुरूचे आज्ञेप्रमाणें वागणारास कांहीं एक दुर्लभ नाहीं.

१३२. **व्यवहारिक विद्यागुरु व मोक्ष विद्यासद्गुरु**— आतां या गुरूंमध्यें दोन प्रकार आहेत. एक मोक्षविद्यागुरु व दुसरे व्यवहारिक विद्यागुरु. मोक्षविद्यागुरु म्हणजे जे गुरु आत्मशक्तीनें पराविद्येचा मंत्रोपदेश देऊन परमपदाची प्राप्ति करून देतात ते; व व्यवहारिक विद्यागुरु म्हणजे जे आपल्यास व्यवहारिक विद्या सांगतात ते. मात्र दोन्ही गुरू योग्य असले

पाहिजेत. त्यांचे कुल, शील, विद्या, आचार, आरोग्य, दानत, अधिकार, आणि शिष्याविषयीं कळकळ, हीं सर्व उत्तम असली पाहिजेत. तरच ते देव या पदवीला योग्य होतात. व्यवहारिक गुरूंपासून व्यवहार व त्यांतील भाषाज्ञान व तत्वें व निरनिराळें भौतिकशास्त्रांचें ज्ञान, इतिहास, गणीत, भूगोल वगैरेचें ज्ञान संपादणें शिष्याच्या बुध्यनुसार व साधनसंपत्तीच्या मानानें मिळविणें अवश्य आहे. त्याकारितां त्या त्या विद्येंत निष्णात अशा आचार्यांकडून ती ती विद्या मिळवावी लागते. आणि मोक्षगुरूकडून अध्यात्मज्ञान मिळविण्याचें असतें. हे गुरु कसें निवडावे याबद्दल 'शाब्दे परे च निष्णातम' असें योगवासिष्टांत सांगितलें आहे. विद्वत्ता आणि परब्रह्म-साक्षात्कार या दोन्हींचाही संगम गुरूच्या ठिकाणीं असला पाहिजे; असें शास्त्रकार सांगतात. केवळ विद्वान् किंवा नुसता भजनी गुरु कमी प्रतीचा मानिला आहे. गुरुत्वाच्या धंद्यावरच आपलें पोट भरणारे गुरु वेषधारी व फसवे असतात. ते समाजाचे घातक आहेत. त्यांच्या नादीं न लागतां योग्य सद्गुरु पाहणें शिष्याच्या बुद्धिमत्तेवर अवलंबून आहे. भोंदू गुरूही आजकाल आहेत. आणि त्याचें भोळेभाबडे शिष्यही पण आहेतच. जग एक पेठ आहे. या पेठेंत सर्व तऱ्हेचा बरा वाईट माल आल्याशिवाय कसा राहील ? सुदैवानें ब्रह्मदेवाच्या हातून अगदीं योग्य प्रकारची या सृष्टीची रचना झाली हें मोठें आश्चर्यच म्हणावयाचें, कारण कडूलिंबाच्या पिकलेल्या लिंबूण्यासारखीं फळें व त्यांचा भोक्ता काकपक्षी हे निर्माण करण्यांत ब्रह्मदेव खरोखरच प्रशंसापात्र आहे. असें काव्यप्रकाशांत सांगितलें आहे. मात्र या भोंदू गुरूंची लाट जशी परमार्थांतून आहे, तशी शिक्षणखात्यांत नाहीं, व ती असणेंही शक्य नाहीं. नुसत्या मंत्रोपदेशानें परब्रह्मस्वरूपाप्रत पोहोंचवितों म्हणून अजाण शिष्यास एखाद्या प्रशस्त रुद्राक्षधारी भोंदूस सांगतां येईल. परंतु गणितशास्त्र, व्याकरणशास्त्र अथवा श्रीशंकराचार्यांचें भाष्य शिकवितों म्हणून मात्र उगीच कोणासही गप्पा मारतां यावयाच्या नाहींत.

१३३. **शिष्यलक्षणें**:— याकरितां गुरु निवडणें तें शिष्याच्या अकलेवर अवलंबून विशेष आहे. ज्या गुरूकडे अध्ययन केलें असतां

आपला काल, द्रव्य व उत्साह यांचा अपव्यय होईल असा गुरु निवडूं नये. उत्तम गुरूपाशीं शिष्य कसा असावा, याबद्दल श्रीसमर्थ रामदास यांनीं नियम घातले आहेत. ते लक्ष्यांत ठेवण्याजोगें आहेत :— शिष्य सत्पात्र असावा; अधिकारी असावा; त्यास विद्येचा हव्यास असावा; साधक असावा; शेत पेरलें आणि उगवलें परंतु निगा न ठेवल्यास फुकट जातें. पीक आलें तरी त्याची निगा पाहिजेच. गुरूंनीं आत्मज्ञान दिलें तरी साधन हें केलेंच पाहिजे. तर तें टिकून हातीं येतें. म्हणून शिष्यामध्यें साधन, अभ्यास, सत्कर्म, सद्वासना, उपासना, सत्संग, स्वधर्म आणि नित्यनेम इत्यादि अवश्य आहेत. हे गुण शिष्यानें संपादिले पाहिजेत. तरच सद्विद्या फलास येते. नाहीं तर गुरूचे व शिष्याचे श्रम सर्व व्यर्थ जाणार. आतां सद्गुरूंचीं लक्षणें काय हीं पाहूं.

१३४. सद्गुरुलक्षणें :— श्रीसमर्थ रामदास म्हणतात :—

जो ब्रह्मज्ञान उपदेशी । अज्ञान अंधार निरसी ।
जीवात्मा शिवात्म्यासी । ऐक्यता करी ॥

बिघडे देव आणि भक्त । जीव शिवाचें द्वैत ।
तयां देव भक्तां एकांत । करी तो सद्गुरु ॥

भव व्याघ्रे घालूनि उडी । गोवत्सास ताडातोडी ।
केली देखोनि शीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ॥

फोडूनि शब्दांचें अंतर । वस्तु दाखवी निज सार ।
तोचि सद्गुरु माहेर । अनाथांचे ॥

संदेह निःशेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी ।
वेदविरहित टवाळी । करूंचि नेणे ॥

मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ ज्ञान ।
निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिति ॥

याहा वरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदासीन केवळ ।
विशेष आचारें निर्मळ । स्वधर्मविषयीं ॥

नाना सद्विद्येचे गुण । याहीवरी कृपाळूपण ।
सद्गुरूचें हें लक्षण । जाणिजे श्रोतीं ॥

येथें सद्गुरु व सत्‌शिष्याच्या जोडींत काय काय अवश्यक आहे हें सांगितलें. सद्गुरु कांहीं गरजू नव्हे; साधक मात्र गरजू आहे; हेंहा लक्षांत राहिलें पाहिजे.

१३५. **गुरुशिष्यांचे अन्योन्य संबंध**—परमार्थ मार्गांत काय किंवा विद्यार्जनांत काय, सच्छिष्याचे सद्गुरूवांचून कांहीं चालत नाहीं. असाच सर्वांचा अनुभव आहे. व्यवहारिक विद्यागुरु आपल्या नोकरीसाठीं शाळेंतील मुलांस शिकवितांना पुष्कळ कंठशोष करून शिकवितात. त्यांना शिष्यांची गरज असते. पण त्यांचें शिष्यगण ऐकत नाहींत. आजकालची विद्यार्थी मंडळी तर अशी कीं, त्यांच्या अपक्व समजुतींच्या विरुद्ध कोणी गुरु असले कीं, त्या गुरूची टाळ्या पिटवून फजीती करण्याकडेच शिष्यांची प्रवृत्ति असते. हे आमचे गुरूच नव्हत, असेंही म्हणण्यास ते तयार असतात. यामुळें नुकसान झालें तरी शिष्याचेंच होणार. आतां गुरूच्या इतकें अध्ययन झाल्यानंतर मग जर त्यांचीं मतें आणि आपलीं मतें भिन्न असतील, तर तीं मतें गुरू समक्षच बोलावयाचीं असल्यास आदरानें व नम्रतेनें प्रतिपादन केलीं पाहिजेत. काया, वाचा, मनेंकरून कोणत्याही प्रकारें गुरूचा उपमर्द होईल असें न करण्याची नेहमी खबरदारी घेतली पाहिजे. उलटपक्षीं गुरूंनींही पुत्रप्रेमानें किंवा कन्याप्रेमानेंच सर्व शिष्यांना शिकविलें पाहिजे. व त्यांची सर्व प्रकारें काळजी वाहिली पाहिजे. तसें तेही करीत नाहींत. या अफाट संसारसागरांत शिष्यरूपी नौकेचें सुकाणू गुरूच्या हातीं असतें. ते जसें वळवतील तशी ही शिष्यनौका वळणारी आहे. शिष्याची सर्व कर्तबगारी गुरूवरच अवलंबून असते. म्हणूनच अशा गुरूंना मग ते मोक्षगुरु असोत कीं ते विद्यागुरू असोत त्यांना साक्षात् देवाप्रमाणें मान देण्यांत शिष्याचें कल्याण आहे.

१३६. **पतिपत्नींत अन्योन्य आदर**—याप्रमाणें बाल बालिकांना त्यांच्या बाल्यावस्थेंत आणि विद्यार्थीपणाच्या अवस्थेंत क्रमानें माता, पिता व

गुरु हेच प्रत्यक्ष देवाचीं रूपें आहेत, असें सांगितलें. आतां स्त्रीपुरुषांचा विवाहकाल येतो, तेव्हां विवाहाचा नियम समाजांत ईश्वरोपासनेंचे साधनाप्रीत्यर्थ मुख्यत्वें आहे, हें लक्षांत ठेवावें. प्रजोत्पत्तीचा हेतु त्यांतच अंतरभूत होतो. विवाह कार्यानें पुरुषास भार्येची ईश्वर सेवेंत अत्यंत मदत होते. सदाचार, धर्माचरण, व ईशसेवेची संवयही सर्व भार्याच जास्त संभाळते. या सर्व बाबतींत तीच पुरुषाच्या वृतीस वळण देते. हीच गृहलक्ष्मी आहे. ती आपल्या पतीस देवाप्रमाणेंच मानते. उलटपक्षीं इतक्या मनोभावानें आपल्यास ईशसेवेंत तत्परतेनें मदत करण्यास तयार, अशी जी भार्या, तिला तितक्याच आदरानें व प्रेमानें वागाविल्यास, व तिला सद्भक्त ही संज्ञा प्राप्त होते ही गोष्ट लक्षांत ठेऊन ईश्वरभक्तास व आपलें भलें करणारास, जसें आपण मानितों, तसें तिला मानिल्यास, त्यांत पतीचें कल्याणच आहे. शिवाय मनूनें केलेल्या मानवधर्म शास्त्रांत

**पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ।**
**पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमिप्सुभिः ॥ ३-५५ ॥**

**यत्र नार्यस्तु पूज्यंते रमंते तत्र देवताः ।**
**यत्रैतास्तु न पूज्यंते सर्वास्तत्राऽफलाः क्रियाः ॥ ५६ ॥**

**शोचंं विजामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम् ।**
**न शोचंति तु यत्रैता वर्धते तद्धि सर्वदा ॥ ५७ ॥**

**तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः ।**
**भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषु च ॥ ५८ ॥**

**संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।**
**यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुव ॥ ५९ ॥**

वरील वचनांचा अर्थ— सर्व प्रकारचें कल्याण इच्छिणाऱ्या पिता, भ्राता, पति दीरांनीं स्त्रियास पूज्य मानावें. जेथें त्यांचा मान राहतो त्या कुलांत देवता प्रसन्न राहतात. नसल्यास तेथें सर्व कर्में निष्फल होतात. कुलांतील स्त्रिया दुःखी झाल्यास तें कुल सत्वर नष्ट होतें. आनंदित असल्यास कुलाचा अभ्युदय होतो. अपमानानें त्यांनीं शाप दिल्यास ती कुलें नष्ट होतात.

म्हणून कल्याणाची इच्छा असल्यास स्त्रियांचा सर्वदा सन्मान करावा. पतिपत्निहीं एकमेकांस संतुष्ट करीत असल्यास त्या कुलाचें चिरकाल कल्याण निःसंशय आहे. या पवित्र अन्योन्य संबंधाचें रक्षण प्रत्येक कुटुंबांत झाल्यास संघटित रीतीनें यांत समाजसेवा उत्कृष्ट रीतीनें घडते. अशा प्रकारें सिद्ध होणाऱ्या गृहस्थाश्रमांत आणखी एक ईशसेवेचा प्रकार—

१३७. **अतिथिदेवोभव**— म्हणजे, अतिथिला देवाप्रमाणें मानावें, असें या आज्ञेंत आहे. येथूनच खऱ्या समाजसेवेस सुरुवात होते. या अतिथिदेवाचें महत्व आपल्या शास्त्रकारांनीं अनेक ठिकाणीं अनेक प्रकारें सांगितलें आहे. अतिथीचें देवत्व महाभारतांत सांगितलें असल्याचें मीं ऐकिलें आहे. त्यांत—

**तस्मात् गृहाश्रमस्थस्य नान्यत् दैवतमस्ति वै ॥**
**ऋतेऽतिथीं नरव्याघ्र मनसैतद्विचारय ॥**

—अनुशासनपर्व अ. २-९१.

भीष्म म्हणतातः—युधिष्ठिरा, ज्यानें गृहस्थाश्रम स्वीकारिला त्याला अतिथीखेरीज दुसरें दैवतच नाहीं असें पक्कें समज. तसेंच

**अतिथीनागतान् दृष्ट्वा पूजयेदविचारतः ॥**

—हारितसंहिता अ. १-२७-४.

अर्थ—आपल्या घरीं आलेल्या अतिथीबद्दल कसलीही विचारपूस न करितां पूजा करावी. तसेंच,

**न यज्ञैर्दक्षिणाभिश्च वह्निशुश्रूषया च वै ।**
**गृहस्थः स्वर्गमाप्नोति यथा चातिथिपूजनात् ॥**

—शंख संहिता अ. ५.

अर्थ—अतिथीच्या पूजनानें गृहस्थांना जशी स्वर्गप्राप्ति शीघ्र होते, तशी यज्ञानीं, दक्षिणा देण्यानें, किंवा अग्नीची सेवा करण्यानेंही होत नाहीं. या सर्व वर दिलेल्या प्रमाणांवरून अतिथी हा देव कसा आहे, व त्याच्या पूजनाची गृहस्थाश्रमी लोकांना किती अवश्यकता आहे, हें सहज ध्यानांत येण्याजोगें आहे.

१३८. **अतिथि म्हणजे काय**— 'अतिथि' या शब्दाचा अर्थ कोशांत 'अतिथि: म्हणजे अतति = गच्छति = न तिष्ठति' म्हणजे जो (वहात) चालला आहे, उभा राहूं शकत नाहीं, ज्याचा पडता काल आहे, असा दिला आहे. या शिवाय 'पांथस्थ' 'भिक्षु' असाही अर्थ आहे. आपल्या शास्त्रकारांनींच अतिथिपूजनाचें विवरण करितांना 'अतिथि' या शब्दाचें ऐवजीं 'भिक्षु' हा शब्द घातला आहे, व त्याचा अर्थ अत्रिसंहितेंत पुढील प्रमाणें दिला असल्याचें मला सांगितलें आहे—

ब्रह्मचारी यतिश्चैव विद्यार्थी गुरुपोषकः ।
अध्वगः क्षीणवृत्तिश्च षडेते भिक्षुकाः स्मृताः ॥

अर्थ— ब्रह्मचारी, संन्यासी, विद्यार्थी, गुरूंची उपजीविका चालविणारा शिष्य, पांथस्थ, व ज्यांच्या वृत्ति क्षीण झाल्या आहेत, व ज्यांस चरितार्थास कांहीं साधन नाहीं, असे सहा प्रकारचे भिक्षु आहेत.

वर सांगितल्याप्रमाणें भिक्षुकांना प्रत्यक्ष देवच समजून त्यांची पूजा गृहस्थाश्रमी लोकांनीं शक्त्यनुसार रोजच्या रोज केली पाहिजे, अशी वैदिकधर्माची आज्ञा आहे हीं आज्ञा आमच्या हातून पूर्णपणें पाळली जात नाहीं. मधुकऱ्यांना मधुकरी व भिक्षेकऱ्यांना भिक्षा कशीवशी कावाकावीनें वाढून, आम्ही अतिथिपूजनेचा विधि उरकून घेतों. परंतु तेंच आथिथ्य जास्ती चांगलें व यथासांग कशानें होईल, याचा बहुतकरून बरेच लोक विचार करित नाहींत म्हटलें तरी चालेल.

१३९. **क्षीणवृत्ति अतिथी**— भिक्षूंच्या यादींत 'क्षीणवृत्ति' याचे दोन अर्थ आहेत. एक ज्यांच्या मनोवृत्ति क्षीण झाल्या आहेत ते, व दुसरे चरितार्थाचें साधन नसलेले लोक. या क्षीणवृत्तीचे लोकांना नुसती भिक्षा म्हणजे मूठभर तांदूळ वाढूनच जर आपण स्वस्थ बसलों तर खरे अतिथिपूजन झालें असें कसें बरें म्हणतां येईल? हीं क्षीणवृत्ति कां झाली? तसेंच यांच्या क्षीणवृत्तित्वाची यांना स्वतःला तरी कल्पना आहे का? यांचें क्षीणवृत्तित्व कशानें जाईल? इत्यादि प्रश्नांचा विचार करून कालमानानुसार ते

प्रश्न सोडविण्याचा यत्न प्रत्येक सुजाण माणसानें नको कां करावयाला ? या 'क्षीणवृत्ति' लोकांत सर्व जातींचे स्त्रीपुरुष येतात. आजकाल या महागाईच्या दिवसांत पूर्वींपेक्षां या गरीब लोकांची संख्या जास्तीच वाढली आहे. भरपूर अन्नवस्त्र मिळत नाहीं, असे कोट्यावधी लोक हिंदुस्थानांत दिसूं लागले आहेत. निवळ राजकीय अधिकार जास्ती मिळाल्यानें ही सर्व स्थिति पालटून सर्व हिंदुस्थान संपन्न होईल, असें कांहींचें म्हणणें आहे. परंतु हें कितपत खरें आहे, कोण जाणें ? आम्हां बायकांस मात्र तसें वाटत नाहीं. समाजांतील कांहीं सुशिक्षित लोक कौन्सिलमध्यें जास्ती निवडून जातील, व ते देशहिताकडे लक्ष पुरवतील, तर आहे त्याच्यापेक्षां अंशतः देशाच्या उन्नतीचीं साधनें जास्ती निर्माण होतील हें खरें. परंतु आपल्या देशांतील कोनाकोपऱ्यांतल्यासुद्धां राहाणाऱ्या सर्व जातींच्या लोकांची उन्नति मात्र तेवढ्यानेंच होणार नाहीं. तेहत्तीस कोटींवर असणाऱ्या लोकांच्या सर्व प्रकारच्या उन्नतीचीं साधनें एकटे सरकारच कशीं निर्माण करूं शकेल ? या कार्यास देशांतील सर्व सुशिक्षित स्त्रीपुरुषांनीं आपण होऊनच निस्वार्थबुद्धीनें कंबर बांधिली पाहिजे. देशांतील क्षीणवृत्तित्व म्हणजे गरीबी व नादारी नाहींशी करण्यास प्रथम या गरीब व असाह्य लोकांना त्यांच्या हीनस्थितींतच मदत दिली पाहिजे. व ही मदत म्हणजे अवश्य तितकी विद्या आणि पोटापुरते धंदे त्यांस मिळतील, असें केलें पाहिजे. याचबरोबर देवाबद्दल जाणीवही त्यांत उत्पन्न केली पाहिजे. आजकाल जिकडे तिकडे स्वदेशाभिमानाची जागृति झालेली दिसत आहे. प्रचंड सभा भरत आहेत. आणि हजारों व्याख्यानें होत आहेत. परंतु देशांतील निरक्षरतेचें मान कमी करण्याकरितां किती लोक स्वतःस वाहून घेणारे आहेत ? प्रत्येक खेड्यापाड्यांतूनसुद्धां दहा पांच लोक लिहितां वाचतां येणारे निघतील. शहरांतून तर शिकलेले लोक बरेचसे आहेत. या सर्व लोकांनीं जर समाजसेवेप्रीत्यर्थ रोज एकएक तास स्वार्थबुद्धि सोडून काम करूं म्हटलें तर लक्षावधि स्त्रीपुरुष साक्षर होतील. आणि त्यांना स्वस्थितीची जाणीव उत्पन्न होईल. व पुढें त्यांना आपल्या उन्नतीचा मार्ग दिसूं लागेल. नुसतें लिहितां-

वाचतां आल्यानें ही जीवनयात्रा सुखानें चालणार नाहीं. अवश्य विद्ये-शिवाय नीतीनें निरनिराळे धंदेही चालविण्यास क्षीणवृत्तींच लोकांकरितां साधनें तयार केलीं पाहिजेत. या कामीं धनिकांनीं या समाजसेवेस मदत करण्यास पुढें सरसावलें पाहिजे. क्षीणवृत्तीच्या लोकांस साधनसंपन्न लोकांनीच मदत केली पाहिजे. ही मदत मोफत करावी लागत नाहीं. या कामीं सदिच्छेनें व उदार मनानें क्षीणवृत्तांस मदत करण्याच्या बुद्धिनें भांडवल घालून उद्योग धंदे उठविल्यास त्यांचें द्रव्य फायदा घेऊन खचितच परत येईल. याप्रमाणें संपन्न गृहस्थांनीं आपल्यासारखेच इतर संपन्न गृहस्थांची सहकारी मंडळी घेऊन, ईश्वरप्रीत्यर्थ ही समाजांतील 'अतिथींची' सेवा करणें योग्य नाहीं काय? 'क्षीणवृत्ति' अतिथींची सेवा करण्याचे कामीं सर्वांनीं आपल्या शक्त्यनुसार तें कार्य हातीं घेतलें पाहिजे. वैदिकविद्या ज्यांस येत असेल, त्यांनीं ती आपल्यापाशींच गुप्तधन म्हणून न ठेवितां अवश्यकांस दिलीच पाहिजे. शास्त्राप्रमाणें कां होईना तिन्ही वर्णांचे लोकांस अध्ययनाचा अधिकार वेदविद्येचे बाबतींत आहेच. तरी ती अज्ञपरंपरेच्या समजूतीनें ब्राह्मणेतरांस देण्याची बुद्धि आमचे वैदिकांस होत नाहीं. हल्लीं ती गुप्त ठेवण्यांत कांहीं मतलब राहिला नाहीं. म्हातारीनें कोंबडें झांकून ठेविलें तरी उजाडणेचें राहत नाहीं. वर लिहिल्याप्रमाणें या विद्येपैकीं कांहीं भाग इतर ज्ञातीचे हातीं जाऊन तिचा फायदाही त्यांनीं घेतला आहे. मग वाहत्या गंगेंत हात धुऊन घेतल्याप्रमाणें तरी आपण होऊनच ती अवश्यकांस देऊन पुण्याचे भागीदार कां होऊ नये?

**१४०. वेदार्थाच्या ज्ञानाची मनुष्यमात्रास अवश्यकता—** वैदिकांनींही या परंपरेच्या समजुतीनें आपलें स्वतःचेंही बरेंच नुकसान करून घेतलें आहे. त्यांस पाठ येत असलेल्या मंत्रांचा बोध स्वतः करून घेतला असल्याचीं उदाहरणें फारच क्वचित सांपडतात. आमच्या मुलांची मुंज करण्याचे वेळीं त्यांस गायत्रीमंत्रासह संध्या सांगतात; आणि तत्पूर्वीं अगर त्यावेळीं तरी श्रीसूर्यनारायणास नमस्कार घालण्यासही मंत्र सांगतात. त्यापैकीं कोणत्याही मंत्राचा अर्थ त्यावेळीं अगर त्यानंतर केव्हांही मुलांस

सांगत नाहींत. मुलांस द्विजत्व देणारे जे मंत्र त्यांचा 'उपदेश' म्हणून करावा लागतो. तसा उपदेश करावयाचा झाल्यास त्या मंत्राचा अर्थ त्या मुलांस सांगणें व त्यांतील रहस्य अधिकारानें त्यास समजेसें व पटेसें सांगणें अवश्य नाहीं काय? या बाबतींत चौकशी करितां, उत्तर मिळतें तें असें कीं 'असा मंत्रार्थ सांगणें फार कठीण आहे. मंत्रामध्येंच असें सामर्थ्य आहे कीं त्याचें पठण करून तो म्हणत गेल्यास पुरे आहे!' हें उत्तर खरोखरच आम्हां बायकांस सुद्धां पटण्याजोगें नाहीं. मग शहाण्या समाजास कसें पटेल? असा विचार करूं गेल्यास समाजांत तरी या बाबतींत मंत्र-पठण अगर त्यांच्या अर्थ बोधाची जिज्ञासा क्वचितच दृष्टीस पडते. गायत्री-मंत्रासारखा महामंत्र ज्याची ब्राह्मण व तपस्वी पुरश्चरणें करितात, व ज्या मंत्रांतच ब्रह्मज्ञान असल्याचें सांगतात, व म्हणून जें गुप्त ठेविलें आहे, अशा मंत्रार्थाबद्दल आबालवृद्धांत अनास्था! याला काय म्हणावें? संध्येंतील चोवीस नांवें भगवंताचीं घेऊन दरएक नावानें 'नमः नमः' असें पाठ म्हणण्याचा प्रघात सररहा आहे, तीं निरनिराळीं नांवें प्रभूच्या विभूतीच्या सामर्थ्याची दर्शक म्हणून व त्या त्या नावानें प्रभूला त्याचें सामर्थ्य मनांत आणून नमस्कार करणें सुद्धां अर्थ न समजल्यामुळें होत नाहीं असें पंगुत्व व त्यांतच दिसणारी अनास्था या उपर तरी राहूं देऊं नये, अशी आमचे ब्रह्मवृंदास माझी हात जोडून प्रार्थना आहे. हा अर्थबोध न झाल्यामुळें नित्य नियमाचे वेळीं सहृदयतेनें प्रभूची सेवा करण्याची उत्कृष्ट संधि फुकट चालली आहे. ही उणीव भरून काढावी, म्हणजे ह्या ब्रह्मविद्येस तेज चढेल. अशा रीतीनें तिचा उपयोग सर्वांस करून देण्याचें श्रेय आमच्या ब्रह्मवृंदास मिळूं लागेल, तोच सोन्याचा दिवस.

१४१. या सृष्टींत आमच्या समोर दर दिवस प्रत्यक्ष दिसणारा श्रीसूर्यनारायण. (त्यास माझें मनोभावानें वंदन असो.) त्यास प्रत्यहीं नमस्कार घालण्याचा व घालण्यास आग्रहपूर्वक सांगण्याचा प्रघात अजीबात लोपूं लागला आहे. निदान हा सूर्यनारायण तरी आपल्यास पटण्याजोगा देव आहे, ही गोष्ट आतांच्या कालीं धर्माचे बाबतींत उदासीन असलेल्या

मंडळीस सुद्धां पटण्याजोगी आहे. या देवाचें ध्यान-मंत्रांत (यांत वाचकांस वर्ज अशी आडकाठी नसल्यामुळें) काय आहे याचा विचार करितां अखिल सवितृमंडलाचा मध्यवर्ती चालक प्रभु नारायण, याचेंच त्यांत वर्णन असल्याचें समजलें. मुंजीचे वेळीं उपाध्यास फुरसत नसते. आणि त्यानंतर घरच्या पुरुषांसही फुरसत नसते. यामुळें तो मंत्र मुलांकडून पाठ करून घेण्याचें काम केव्हां केव्हां मुलांच्या आयांनीं केलेलें नजरेस येतें. अशावेळीं मलाही तो श्लोक मंत्र कळला. हा मंत्र व गायत्री मंत्र मिळून ब्रह्मरहस्याची भूमिका असल्याचें सांगतात. इतक्या महत्वाच्या व उपयुक्त गोष्टींचा फायदा आपल्यासही नाहीं, व दुसऱ्यासही नाहीं; अशी शोचनीय स्थिति आज जरी झाली असली, तरी ती सुधारणें केव्हांही असाध्य नाहीं. अद्यापि मनांत आणल्यास उपासनेच्या मार्गानें सिद्धि करून घेऊन त्या सिद्धीचा फायदा शक्य तितक्या रीतीनें जनतेस ब्रह्मवृंदाकडून मिळाल्यास ही समाज-सेवा फार महत्वाची खचित होणार आहे. यांत तिळप्राय संदेह नाहीं.

१४२. **व्यवहारिक विद्येची सर्व जातीस अवश्यकता**:—जशीं वैदिक विद्येची तशीच इतर सर्व व्यवहारिक विद्येचीही गोष्ट आहे. कला-कौशल्य, वैद्यकी व इतर शास्त्रीय विषयांची विद्या, ज्यांस अवगत असेल त्यांनीं ती उदार अंतःकरणांनीं अवश्यकांस देऊन तिचा प्रसार करावा. हाच लोक संग्रह, हीच समाजसेवा, हें करित असतां कसलींही रहस्यें गुप्त ठेवूं नयेत. समाज सर्व आपलाच आहे. त्याचें हित करावें. उणें पडूं देऊं नये. आपण सर्व एकच आहोंत. हा आपलेपणा दृष्टीआड होऊं देऊं नये. भेदभाव अज्ञानाचें चिन्ह आहे. त्यांत आपला व इतरांचा नाश आहे. कोणतीही विद्या लपवून कशाकरितां ठेवण्याची? सर्व प्राण्यांत प्रभु भरून गेला आहे. हें जर खरें, तर परकीपणा कशाकरितां? दारूच्या गुत्त्यावर 'पिकेटिंग' करण्याकरितां बरेचसे लोक जातात. व दुर्व्यसना-पासून अज्ञजनांना परावृत्त करण्याकरितां, त्यांना उपदेश करितात. परंतु ज्या कारणामुळें हे अज्ञ लोक दुर्व्यसनें करितात, तें अज्ञान दूर करण्या-करितां काय प्रयत्न चालू आहेत? जोपर्यंत 'पिकेटिंग' चालू आहे, तों-

पर्यंत कांहीं दिवस पर्यंत ही अज्ञजनता धाकानें व भेणें भावानें दुर्व्यसन करणार नाहीं. परंतु हें 'पिकेटिंग' बंद झालें कीं पुढें अगदीं थोड्याच दिवसांत हा वेताळ पूर्वस्थळावर आल्यावांचून राहणार नाहीं. मनावर सुसंस्कार झाल्यावांचून कोणत्याही व्यसनापासून किंवा दुर्मार्गापासून मनुष्य कसा परावृत्त होईल? अज्ञानावरच 'पिकेटिंग' सुरू झालें पाहिजे. उत्साही विद्यार्थी आणि इतर देशभक्त म्हणविणारेही अज्ञजनतेस दररोज एकएक तास प्रथम अक्षर ओळख करून देऊन मग नित्य व्यवहारांतील चार नीतीच्या गोष्टी सांगतील, तर क्रमाक्रमानें बरेंच मोठें देशकार्य होणार आहे. व यामुळें क्षीणवृत्तित्व ( गरीबी व नादारी ) नाहींशी होण्यास पुष्कळशी मदत होणार आहे. क्षीणवृत्ति म्हणजे 'चरितार्थाचें साधन नसलेले' इतकाच याचा अर्थ न घेता माझ्या मतें 'क्षीणवृत्ति' या शब्दांत ज्यांची दानत कोती झाली आहे, मानसिक दौर्बल्यानें जे नादान झाले आहेत, आणि परंपरेच्या अभिमानानें ज्यांस पुरें गिळून टाकिलें आहे, अशांचाही अंतर्भाव होतो. अशा लोकांस प्रभूचें चिंतन करून सद्यः-स्थितीची व त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देऊन सुजाणांनीं त्यांचें आतिथ्य योग्य प्रकारें नको का करावयाला?

१४३. **स्त्रीपुरुषांस ब्रह्मचर्याची अवश्यकता** – मनुष्याची दानत राहण्यास अत्यंन्त पहिलें अवश्य साधन म्हणजे ब्रह्मचर्य. याची अवश्यकता स्त्रीपुरुषांस सारखीच आहे. मनुष्याची वाढ ठरीव कालपर्यंत पूर्ण रीतीनें झाल्याशिवाय, विवाह केला तर ब्रह्मचर्याचा घात होतो, अधर्म घडतो. तसें करण्याचें पाप अक्षम्य आहे. या ब्रह्मचर्याचा घात झाल्यास त्या मनुष्याच्या पुढील सर्व सुखाचा घात सर्वस्वी केल्याप्रमाणें होत आहे. त्याच्या भरपूर आयुष्याची वाढ खुंटते. हा नियम जसा पुरुषांस तसाच स्त्रीयांसही लागू समजला पाहिजे. ब्रह्मचर्यांत वृत्ती ताब्यांत राहतात. शरीरयष्टीस जोम येतो. शरीर निरोगी राहतें. वृत्ती शुद्ध राहतात. समाजनीति बिघडत नाहीं; मोह, लोभ, मद, उसळत नाहींत. चित्तास शांति येते. त्यामुळें त्याच मासल्याचे गुण, धैर्य, दया, क्षमा, आपोआपच तयार होतात, व समाधान प्राप्त होतें.

ब्रह्मचर्यं चरित्वा गृही भवेत्

म्हणजे शिक्षण पुरें होईतोंपर्यंत ब्रह्मचर्यव्रताचें परिपालन करून, त्यानंतर गृहस्थाश्रम स्वीकारावा, अशी सर्वच स्त्रीपुरुषांनां वेदांची आज्ञा असतांना, अमुकच वर्षीं मुलीचें लग्न झालें पाहिजे, असा निर्बंध कशासाठीं? लग्न केलें तरच पवित्र, नाहींतर भ्रष्ट, हा नियम कोठला? सुशील, अविवाहित स्त्रीला किंवा पुरुषाला ईश्वराच्या द्वारांत मज्जाव आहे काय? वेदांत फक्त गृहस्थाश्रम स्वीकारावा इतकेंच आहे. परंतु पुढें कांहीं स्मृतिकारांनीं कन्या विवाहाला वयोमर्यादेचा नियम लावून स्त्रीशिक्षणांत मोठा थोरला अडथळा उत्पन्न केला आहे. स्मृतिग्रंथ ज्या कालीं लिहिले गेले, त्यावेळीं त्याकालचे परिस्थितींत समाजास बालविवाहाची आवश्यकता कदाचित वाटली असेल. परंतु सध्यां आमच्या स्त्रीसमाजाच्या उन्नतीला तसलें लग्न म्हणजे तिचे ब्रह्मचर्याला व विद्यार्जनाला महत् विघ्न होऊन बसलें आहे. आणि समाजाचा घातच झाला आहे. व क्षीणवृत्तींची संख्या अतोनात वाढली आहे.

१४४. **वेदार्थाच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष** – प्रत्यक्ष वेदांचे वाचन, अध्ययन, व त्याच्या अर्थाचें चिंतन जर आपल्या आर्य लोकांत आज रूढ असतें, तर आमचा खरा धर्म काय आहे हें सर्वांनाच सहज समजलें असतें. व आपल्यांत क्षीणवृत्तिरच आलें नसतें. आह्मी आपला धर्म वैदिकधर्म म्हणवितों. परंतु वेद किती आहेत, कसें आहेत, त्यांत काय सांगितलें आहे, हे लाखांत एकाला तरी माहीत आहे कीं नाहीं याची शंकाच आहे. याचें कारण वेद वाचनाचा अधिकारच एका विशिष्ट वर्गाखेरीज कोणाला नाहीं असा एक विचित्र समज आमच्या आर्य वैदिकांचा होऊन बसला आहे. स्त्रियांना वेदाधिकार नाहीं, अमक्या जातीला नाहीं, तमक्या जातीला नाहीं, असें म्हणून, ज्या कोणाची इच्छा असेल त्यांना त्या पवित्र वेदवाणीपासून दूर ठेवण्यांत आलें आहे. व ज्यांना अधिकार आहे, त्यांनींही त्यांतील रहस्य काय आहे, तें स्वतः समजाऊन घेऊन इतरांना त्याचा लाभ दिला नाहीं. अर्थातच त्याचा परिणाम देवळांतील देवाची पूजा बाजूस राहून

जशी मंदिराच्या पाहिरीची पूजा व्यवहारांत यावी तद्वतच स्मृतिग्रंथाचा प्रसार सर्वत्र होऊन मूळ आधारभूत वेद सपशेल बाजूला पडले.

१४५ **त्या अभ्यासास अडचणी** —ज्वर आला असतां तूप, कणीक खाण्याचा अधिकार नाहीं असें वैद्य सांगतात. परंतु त्यावरून असें निष्पन्न होतें काय कीं ज्वर थांबल्यावर देखील शक्ति येण्यासाठीं तूप, कणीक खाण्याचा अधिकार नाहीं. उलट शक्ति वाढण्यासाठीं पौष्टिक पदार्थ खाल्लेच पाहिजेत. हा जसा सिद्धांत आहे, तसेंच ज्याला लिहितां वाचतां येत नाहीं, संस्कृत समजत नाहीं, अशांना वेदाचा अधिकार नाहीं म्हणजे ते वेद समजण्याची त्यांच्यांत ताकत नाहीं, त्यांच्या वृत्तीच क्षीण आहेत असाच अर्थ समजला पाहिजे; परंतु जर तेच निरक्षर लोक साक्षर होतील तर त्यांनाही वेदाचा अधिकार नाहीं असें कसें म्हणतां येईल? वेद ईश्वरानें निर्माण केले, आणि सृष्टि ही ईश्वर निर्मितच आहे, हें जर खरें, तर सर्व जगाला वेद समजाऊन घेण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे, असें सहजच होत आहे. व तसें हक्क जगांतील सुशिक्षित लोक बजावीतही आहेत. मग आतां या वैदिक लोकांनीं वेदाधिकाराच्या पात्रतेची चिकित्सा का करावी? ईश्वर करो आणि दरएक वेदांतील धर्मरहस्यें, नीतिरहस्यें आणि व्यवहाररहस्यें काय आहेत तीं अगदीं थोडक्यांत मूळ मंत्रासह मराठी भाषांतर रूपानें सर्व जनतेच्या पुढें मांडण्याचा काल लौकरच येवो, अशी प्रभूला माझी मनोभावानें प्रार्थना आहे. अशा रीतीनें 'क्षीणवृत्ति' जनतेला 'उदात्त वृत्ति' करण्याचा प्रयत्न कळकळीनें करून एखाद्या खऱ्या अंतःकरणाच्या स्त्रिनें अगर पुरुषानें समाजस्वरूपी प्रत्यक्ष देवाची उपासना करावी, अशी माझी उत्कट इच्छा आहे.

१४६. **अतिथी देवोभव याची व्यापक व्याख्या** -- तात्पर्य ज्या ज्या ठिकाणीं ज्या ज्या गोष्टींची समाजांत न्यून्यता दिसत असेल तेथें सर्व क्षीणवृत्ति अतिथीत्व भरलें आहे, आणि ही न्यून्यता सर्व भरून काढण्याचा प्रयत्न करणे जरूर आहे इतका व्यापक त्या वचनाचा अर्थ आहे. ज्यांना अन्नवस्त्र मिळविण्याचेंही सामर्थ्य नाहीं; अशा अंध, पंगूंना अन्न-वस्त्र देऊन, आणि ज्यांना उद्योग धंदा नाहीं त्यांना उद्योग देऊन, आणि

ज्यांना व्यवहारिक व पारमार्थिक ज्ञान नाहीं त्यांना तें ज्ञान देऊन व आलस्य नाश व चैतन्य जागृतिकरून समाजस्वरूपीं प्रत्यक्ष देवाची सेवा आमरण केली पाहिजे. श्रीमंतांनी संपत्तीच्या द्वारां, विद्वानांनीं विद्वत्तेच्या द्वारां, आणि इतरांनीं स्वतःच्या अंगमेहेनतीनें वर सांगितलेल्या त्रिपुराचा नाश व या विराटात्म्याची सेवा, करणें कांहीं कठीण नाहीं

> येन केनाप्युपायेन यस्य कस्यापि जन्मनः ।
> संतोषं जनयेत्प्राज्ञस्तदेवेश्वरपूजनम् ॥

अर्थः—कोणत्याही रीतीनें कोणत्याही जातीच्या माणसाला संतोष देणें यांचेच नांव ईश्वरपूजन असें सांगितलें आहे. आणि तें अक्षरशः खरें आहे. येथें हें ही सांगणें अवश्य दिसतें कीं कांहीं कल्पक लोक अशी शंका घेतात कीं, जनतेंत क्षीणवृत्तित्व जें येतें तें त्यांच्या पूर्व जन्माच्या कर्म भोगानें येत असतें. मग त्यांस इतरांनीं त्या क्षीणत्वापासून सोडविण्याचा प्रयत्न तरी कशाकरितां करावा? प्रश्न दिसतांना कठीण दिसतो. परंतु थोड्या विचाराअंतीं दिसून येईल कीं, असें प्रश्न करणाऱ्या ठिकाणीं स्वतःस सोडूनच मोजण्याची वृत्ति असते. समाजांत कोणत्याही स्थितींतील मनुष्यास क्षीणवृत्तित्व केव्हांना केव्हांतरी येऊन गाठतेच. त्यांतून कोणीही सुटला नाहीं. अशा कालीं इतरांनीं आपल्यास त्या वृत्तींतून सोडवावें म्हणून इच्छा न करणारा कोण आहे? अशा क्षीणत्वांत कोणच्याही जीवकोटीस अडचण पडूं नये, म्हणून ईश्वरानें या निसर्ग सृष्टींत सर्वत्र योजना केली आहे. फक्त यत्न केला असतां त्यास त्या अडचणींतून पार पडतां येतें. मग असा जो अत्यंन्त प्रेमानें सृष्टिकर्त्यानें अखिल जीवकोटीवर उपकार करण्याचा कित्ता घालून दिला आहे, तो सुबुद्ध मनुष्यानें गिरविणें व त्याचें यथानुशक्त्या अनुकरण करणें हें मनुष्यत्वास सोडून आहे काय? दुसरें असें कीं मनुष्याची क्षीणवृत्ति पूर्व जन्माच्या कर्मभोगाचेंच फळ असलें, तरी समाजसेवा या दृष्टीनें अशा प्राण्याच्या जीवात्म्यास मनापासून मदत केल्यास, ते संतुष्टच होतील. व त्यांना झालेला संतोष म्हणजेच त्या परमात्म्याच्या सेवेचें पुण्यफल आहे.

१४७. **परोपकार ही एक उपासनाच आहे.**—दुसऱ्याचा उपयोग करणें किंवा त्याच्या विपन्नावस्थेंत त्यास मदत करणें यास आह्मी 'परोपकार' असें नांव देत असतों. परंतु माझ्या मतें हा सुद्धां स्वोपकारच आहे. इतरांना मदत करण्यांत आह्मी स्वतःही वाटेल तेव्हां दुसऱ्याकडून मदत मिळण्याची समाजाची मनोभूमिकाच तयार करीत असतों. असें समजण्यास कांहींच हरकत नाहीं. इतरांच्या सर्व प्रकारच्या संकटसमयीं धांऊन जावें, हें तत्व जर समाजांत पूर्णपणें रूढ झालें, तर वाटेल त्यावेळीं आह्मांस स्वतःस सुद्धां नाहीं कां सहाय्य मिळणार ? व अशा दृष्टीनेंच परोपकार हें स्वोपकाराचेंच बीज आहे, असें मी म्हणतें. जें आह्मांस पाहिजे तें इतरांनाही मिळवून देण्याविषयीं रात्रंदिवस आह्मी खटपट केली पाहिजे. आह्मांस जर ज्ञान पाहिजे, तर तेंच ज्ञान आचांडालास सुलभ करण्याची आह्मीच खटपट केली पाहिजे. वेदांत दृष्टीनें—

**अहं ब्रह्माऽस्मि**

म्हणजे मी ब्रह्म आहें. मी ईश्वर आहें, हे तत्व जर खरें आहे, तर—

**त्वं ब्रह्माऽस्मि** अशा अर्थी **तत्वमसि**

म्हणजे तो ईश्वर तूंच आहेस, हें तत्व व्यवहारांत कां येऊं नये ?

१४८. **समबुद्धि**—

**विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।**
**शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥**

—भ. गी. ५-१८.

विद्वान आणि विनयशील ब्राह्मणाविषयीं जशी तशीच गाय, हत्ती, श्वान आणि चांडाळ या सर्वांविषयीं ज्ञानी लोकांची दृष्टि सारखीच असते असें सांगितलें आहे. कारण, जें ईश्वरी चैतन्य आमच्यामध्यें आहे, तेंच कृमिकीटकांत सुद्धां आहे, असें पूर्वींच सांगितलें आहे. म्हणूनच पूर्ण ज्ञानी 'सर्वत्र समबुद्धयः' (भगवद्गीता) म्हणजे, ज्ञानी सर्व ठिकाणीं समान बुद्धि ठेवतात, असें सांगितलें आहे. ज्ञानी पुरुषाचें परमार्थ स्थितींतील हें वागणें आहे परंतु यांतील तत्व व्यवहारांत उतरणें झाल्यास एक फार महत्वाची सूचना करणें जरूर आहे. ती अवश्य लक्षांत ठेविली पाहिजे.

ती हीच कीं विद्वान व विनयशील मनुष्यापासून तों थेट चांडालपर्यंत सर्वांचेंच ठिकाणीं समबुद्धि असावी. परंतु समवर्तन मात्र असलेंच पाहिजें असें नाहीं. जसें आपण विद्वानांशीं वागतों, तसेंच व्यवहारांत एखाद्या बेरडाशीं वागावें, म्हटलें तर तें शक्य होणार नाहीं. मित्रत्वाच्या प्रसंगीं उभयपक्षीं समानशील असावें लागतें. तसें नसल्यास मैत्री जुळणें शक्य नाहीं. सुजाण मनुष्याचें कर्तव्य इतकेंच कीं, स्त्री असो वा शूद्र असो, किंवा अंत्यज असो, त्यांच्यांत ईश्वराचा अंश आहे असें समजून त्यांच्यांतील तेज ज्या रीतीनें जास्त प्रकट होईल, त्या रीतींची शक्य तितकी साधनें आपलेंपणानें त्यास सुलभ करून दिलीं पाहिजेत. मानवप्राणी म्हणून जितका आहे त्या सर्वाला त्याच्या सद्गुणानें आणि प्रयत्नानें चांगलें रीतीनें राहतां येईल इतकी मदत प्रेमानें करणें अवश्य आहे.

प्रभु रामचंद्र व श्रीकृष्ण हे क्षत्रिय जातीचे असून सुद्धां उच्च वर्णीय म्हणविणारे ब्राह्मण, त्यांना नुसते सन्मान देतात इतकेच नव्हे, तर श्रीराम-कृष्णास प्रत्यक्ष देवच समजतात. आणि, त्यांच्या भावनेंप्रमाणें त्यांच्या मूर्तींची आजरोजींही पूजा करून आपल्यास धन्य मानितात. तसेंच आधुनिक कालांतील श्रीतुकाराम महाराजांच्या तसबिरींचीही आह्मी ब्राह्मण पूजा करीत नाहीं काय? कनकदासाचीं भक्तिरस प्रधान पदें कितीतरी आदरानें आपण म्हणतों.

१४९. **समबुद्धीच्या तपश्चर्येचे परिणाम**—यावरून समबुद्धीच्या तपश्चर्येनें उच्च पदवी आणि पूज्यता खचित मिळते, हें तत्व निर्विवाद आहे. मात्र हें तत्व व्यवहारांत आणण्याकरितां सर्वांनींच प्रयत्न केला पाहिजे. एकमेकांना मदत केली पाहिजे. आपआपसांतील कलह नाहींसे केलें पाहिजेत व खऱ्या मित्रत्वाच्याच नात्यानें एकमेकांनीं एकमेकांशी वर्तन केलें पाहिजे. म्हणजेच खरा वैदिकधर्म पाळला असें होईल. खरी ईश्वरोपासना केल्यासारखें होऊन, आपल्या देशाची आणि समाजाची उन्नति होण्यास मदत केल्याचें श्रेय मिळेल मित्रत्वाच्या दृष्टीनें सर्वांशीं वागण्यांतच ईश्वरो-पासना आहे. व या कृतींतच वैदिकधर्माचेंही परिपालन आहे.

मित्रस्य मा चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षंताम् ।
मित्रस्याहं चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षे ।
मित्रस्य चक्षुषा समीक्षामहे ॥

—यजुर्वेद ३६।१८.

अर्थ—ईश्वर म्हणतो कीं बाबांनो, प्रेम ठेवूनच तुम्ही मजकडे या. त्याप्रमाणें अखिल प्राणिमात्रावरही तशीच दृष्टी ठेवा. आणि मग मीही त्याच दृष्टीनें सर्व प्राणिमात्राकडे पाहीन. व परस्परांनी परस्परांविषयीं अशीच भावना जागृत ठेवावी. असा या वरील वेदवाक्यांचा अर्थ आहे. शिवाय बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्यांनीं मैत्रेयीस उपदेश करितांना

लोकास्तं परादुः योऽन्यत्र आत्मनो लोकान् ।
वेदभूतानि तं परादुः योऽन्यत्र आत्मनः क्षत्रं वेद ॥

याप्रमाणें सांगितलें आहे.

म्हणजे जो लोकांना आपल्याहून निराळे समजतो, त्यास लोक दूर करितात. प्राणिमात्रांस जो आपल्याहून निराळे समजतो, त्यास सर्व प्राणीही दूरच ठेवितात. क्षत्रियांना जो आपल्याहून निराळे समजतो, त्यास सर्व क्षत्रिय दूर करितात. या वाक्याप्रमाणें लोकांनीं आपल्यास जसें वागवावें म्हणून आपल्यास वाटतें, तसेंच त्यास आपणही वागविलें पाहिजे.

१५०. **जगत्पालकास अनन्यत्वें मागणें**—हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या व सर्व वर्णांच्या स्त्रीपुरुषांना अत्यंत प्रेमानें व आदरानें कसलाही भेदभाव न ठेवितां वागण्याची बुद्धि होवो; व तद्वारा ऐहिक आणि पारत्रिक उन्नति सर्वांना लाभो, अशी त्या जगन्नियंत्या परमात्म्याच्या चरणीं प्रार्थना करून, ही निबंधरूपी पुष्पांजली त्याच्या चरणावर समर्पण करीत आहे.

प्रकरण ८ वें.

## उपसंहार.

याप्रमाणें ईश्वरोपासना ही, प्रत्येक मनुष्याला, स्त्री असो वा पुरुष असो, त्याच्या इहलोकीच्या यात्रेंत करणें जरूर असल्याचें सांगितलें. ईश्वराविषयीं बरोबर कल्पना येण्यास त्याची साधनसंपत्ति काय आहे व तिचा माझ्या मतें, कसा उपयोग केल्यास हा कार्यभाग होणार आहे, याचें हीं विवेचन झालें.

या आपल्या चतुर्वर्णांच्या हिंदुसमाजांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र, यांपैकीं ब्राह्मणवर्ग तर श्रेष्ठ म्हणून मानला गेला आहे; आणि आपल्या स्वतःसही आपण इतर वर्गांपेक्षां श्रेष्ठ आहों असेंच तो मानित आला आहे. कोणताही ब्राह्मण घ्या, तो वैदिक असो, गृहस्थ असो, श्रीमान् असो वा गरीब असो तो कोणत्या ना कोणत्या तरी गोत्रांत जन्मलेला आहे. या गोत्रावळीची यादी पाहिली म्हणजे तींत ज्यांचें नांव घेतांच त्यांचेबद्दल अत्यंत आदरबुद्धि आपोआपच उत्पन्न होते, जे अत्यंत ब्रह्मनिष्ठ, तपोनिधि, त्रिकालज्ञ असल्यामुळें ज्यांचा अधिकार मोठा असे, व जे जगद्वंद्य असेंच होऊन गेल्याचें सुप्रसिद्ध आहे, अशा महाशयांच्या, महात्म्यांच्या व सिद्ध, ऋषि, महर्षिगणांच्या वंशांत आमच्या ब्राह्मण मंडळींचा (यांत स्त्रिया व पुरुष दोघांचाही समावेश होतो) जन्म असल्यामुळें, त्यांचे रक्तांत अनुवंशिकसंबंधानें त्या महर्षिगणांचें पवित्र ब्रह्मतेज, बुद्धिमत्ता व अधिकार, प्रच्छन्न दशेंत कां होईना आज काल वसतच आहेत. ते गुण प्रकटरूपानें बाहेर आणण्याचा प्रयत्न प्रत्येक ब्राह्मण व्यक्तीनें केल्यास या भरतभूमीचा भाग्योदय खचित येणार आहे. हिंदूसमाजांतलि वर्णभेद राष्ट्राच्या प्रगतीच्या आड येत आहे, अशा कांहीं सूज्ञजनांच्याही समजुती आहेत. त्या कितपत खऱ्या आहेत याचा विचार येथें कर्तव्य नाहीं. परंतु, ज्याअर्थी जन्म ज्या त्या वर्णांत देणारा प्रभु आहे, ही समजूत जर खरी असेल, आणि या आर्यभूमीवर त्याच प्रभूनें जर निरनिराळीं झाडें, पक्षी वगैरे वर्गांतसुद्धां जाति केलेल्या दिसतात, तर

मनुष्यांमधील वर्णभेद या आर्यभूमीवर कां नसावा? ही आर्यभूमी पृथ्वीवरील इतर देशांसारखी नव्हे. इचें वर्णन थोडक्यांत करावयाचें म्हणजे ती सर्वांत श्रेष्ठभूमी आहे. अशा पुण्यभूमींत ज्या मनुष्यांस जन्मास घातलें, तें त्यांच्या पूर्वजन्मींच्या 'गुणकर्म विभागशः'च घातलें आहे. मग अशा पूर्व पुण्याईनें ज्यांस ब्राह्मण गोत्रांत जन्म मिळाला त्यांनीं आपल्या सात्विकगुणधर्मांनीं पुनीत अशा धर्माचाराची आपण होऊनच अवनति करण्याची बुद्धि धरल्यास, हें त्यांच्या भवितव्यतेचें सुचिन्ह म्हणावें, किंवा दुश्चिन्ह म्हणावें, याचा वाचकांनींच विचार करावा. अनेक गोष्टींचा विचार मनांतच केल्यास आह्मा आर्यांचा बरा काळ येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. आणि याच पर्वकालांत वरील इशारा कांहीं तरी उपयोगी पडण्याचा संभव आहे. प्रच्छन्न असलेलें तें तेज प्रगट होण्याची ही संधी आहे, म्हणून इकडे विशेष लक्ष पोंचेल अशी आशा आहे. आतां हें हीं लक्षांत असलें पाहिजे कीं ब्राह्मणांची पूज्यता ही त्यांचे प्रकट असलेल्या गुणांसच जनतेकडून मिळेल. नुसत्या त्यांच्या गोत्राकडे पाहून ती प्राप्त होणार नाहीं. ते गुप्त असलेलें गुण प्रकट होण्यास ईश्वरोपासनादिक प्रयत्न जरूर आहेत. या गुणांचें बीज कितीही मलिन झालें असलें व गुप्त झालें असलें तरी, त्यांस योग्य संस्कार मिळाल्यास तें खास तेजास चढेल. श्रेष्ठांची जबाबदारी मोठी आहे. जे श्रेष्ठ नसतील त्यांस श्रेष्ठ करणें हें त्यांचेंच काम आहे. क्षत्रिय व वैश्य हेही द्विजच आहेत. त्यांस तर विद्या उत्तम शिकविलीच पाहिजे. पण याहून अधिक महत्वाचें कार्य म्हणजे, त्यांचा रजोगुण व तमोगुण जिंकणें. भगवद्गीतेंत सात्विकगुणाचें सामर्थ्य 'रजस्तमश्चाभिभूय सत्वं भवति भारत' असें असल्याचें सांगितलें आहे. मग ब्राह्मण स्वभावतःच सात्विक. त्यांस इतर वर्णांशीं प्रेमानें वागून त्यांस शहाणें करून आपलेंसें करण्यास कठिण काय?

माझ्यापेक्षां वडील, माझ्या बरोबरीच्या व लहान सर्व आया, बहिणींस माझें विनयपूर्वक सांगणें कीं वर लिहिलेल्या सर्व गोष्टी त्यांसही सारख्याच लागू समजाव्या. स्त्रियांत प्राचीनकाळीं अरुंधति, वडवा, सुलभा, मैत्रेयी,

अनुसूया, गार्गी, वाचक्नवी, वगैरे ऋषिपत्न्या, शिवाय द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी वगैरे स्त्रीरत्नें होऊन गेली, त्यांची आठवण रहावी. त्यांच्या गुणांचें यथाशक्ति अनुकरण करावें. व्यवहारांत कलहास कारण स्त्रिया, अशी म्हण आहे. ती व्यर्थ करावी. प्रभु सर्वा ठायीं भरला आहे. आणि सर्व आपलींच आहेत असेंच समजून वागावें. विद्या, ईश्वरोपासना, आणि पातिव्रत्य हें आपलें प्राण समजावें.

क्षत्रिय बंधुवर्गांनीं, स्वधर्माचरण सोडूं नये. वर जें ब्राह्मणास हात जोडून मागणें केलें आहे, तें सर्व क्षत्रिय बांधवासही लागू आहे. त्यांतील पूर्व कालीन राजर्षींचा इतिहास त्यांनीं लक्षांत ठेवावा. वर्णद्वेष वा मत्सर कोणांशींही केल्यास 'दोघांचें भांडण तिसऱ्यास फायदा' असें त्याचें पर्यवसान होत असतें. ईश्वरोपासनेंत प्रभु सर्वांठायीं सर्व प्राण्यांत आहे, याची आठवण राहिल्यास या द्वेष मत्सरास वाव कोठे!

तीच गोष्ट वैश्यद्विजास लागू आहे. त्यांस सुद्धां वेदाध्ययनाचा संपूर्ण अधिकार आहे. वैश्यांत तर मोठे मोठे साधुसंत होऊन गेले. देवानीं त्यांच्याशीं प्रेम किती केलें, याबद्दल श्रीतुकाराम, नामदेव, सांवतामाळी गोरा कुंभार, यांची गाथांत रसभरित वर्णनें आहेत भक्तिमार्गांत झेंडा मिरविला नामदेवानीं. ते तर पंढरिरायाचें हृदयरत्न म्हणवून घेऊन राहिले. त्यांच्या गाथा पहा. त्यां वाचण्यास स्त्रीपुरुषांनीं आपल्यास येत नसल्यास शिकून वाचाव्या, व त्यांचे मनन करावें. आळस करूं नये. ईश्वरोपासना हाच तरणोपाय आहे. ती बाणल्यास समाजांत अत्यंन्त प्रेमानें सहजच वागण्याची प्रवृत्ति होते. वर्ण भेदभाव कसलाही राहणार नाहीं, तरच ती खरी ईश्वरोपासना.

माझे शूद्र बंधुभगिनींस त्यांच्या वर्णाबद्दल खेद होणें अनवश्यक आहे. जन्मदाता प्रभु आहे. दरएक प्राणी सर्व वर्णांत केव्हांना केव्हां तरी होताच, व जाईलच. ती व्यवस्था प्रारब्धाच्या लिखिताप्रमाणें होत असते. म्हणून प्राप्त झालेल्या अवस्थेंत धैर्यानें पण विनयानें ईश्वरोपासना करित असलेंच पाहिजे.

शिकल्याशिवाय शहाणपण येत नाहीं. शहाणपणाशिवाय तेज नाहीं; यश नाहीं. आणि शहाणपणानें ईश्वराची उपासना कशी करावी हें चांगलें समजतें. उपासना चांगली झाल्यास देव प्रसन्न होतो. आपलें कल्याण होतें, इतकेंच नव्हे तर जग आपल्यावर अर्थात आपण जगावर, प्रेम करूं लागतो. चांगदेव, चोखामेळा, रोहिदास, कनकदास, यांनीं एक ईश्वरी उपासना करून प्रभूस व जगास आपलें केलें. 'शूद्रास वेदाचा अधिकार नाहीं' असें म्हणतात म्हणें. त्याचा अर्थ त्यांनीं वेद शिकूंच नयेत असा नसावा. 'अधिकार' याचा अर्थ योग्यता असा आहे. योग्यता ही ज्याच्या त्याच्या परिश्रमावर अवलंबून आहे. वर लिहिलेल्या शूद्रवर्णाच्याच साधुसंतांनीं अनाधिकाराची ही अट राखिली नाहीं. त्यांच्या प्रेमळ कविता ब्राह्मणभक्त अत्यंत प्रेमानें गातात. अर्थात त्यांस अधिकार होताच. मग इतर शूद्रास तो नाहीं कां? त्यांनींहीं विद्या शिकावी. गीतेंत भगवंतांनीं याबद्दल कोठेंही आडकाठी ठेविली नाहीं. वर्णाश्रमधर्म राखून विद्या व ईश्वर उपासना करण्यास प्रत्येक प्राण्यास अधिकार संपादन करतां येईल. असें केल्यानें त्यांसही मोक्षमार्ग खुला होईल. व्यवहारांत नीति, प्रामाणिकपणा व अन्योन्य प्रेम खचित वाढेल.

'शूद्रांस अधिकार नाहीं' असें ज्या कालीं ठरविलें, त्या कालीं त्या वर्णाचे लोक व्यवहारांत मागसलेले असावेत. आतां तो काल व परिस्थिति पार बदलून गेली आहे. मागसलेली त्यांची स्थिति ही कांहीं विशेष कारणांनीं त्यांना प्राप्त झाली होती त्या कारणांचा दोष कोणाचा हें आतां शोधित बसणें चांगलें नाहीं. निदान हल्लींच्या कालांत तरी तीं कारणें राहिलीं नाहींत. शूद्र तर असोत, परंतु यवनांनीं सुद्धां तो अधिकार मिळविल्याचीं उदाहरणें पाहूं गेल्यास कबीर, कमाल, शेखमहमद वगैरे अनेक विभूति होऊन गेल्या. मग शूद्रासच सत्यज्ञान संपादण्यास मज्जाव कशा साठीं?

ईश्वराविषयीं तसेंच व्यवहाराविषयीं, ज्ञान मिळविण्याचा प्रत्येक मनुष्यमात्रास जन्मसिद्ध हक्क आहेच आहे. मग जातिगोतासंबधीं विनाकारण नाहीं त्या कुशंका काढून वरिष्ट म्हणविणाऱ्यांनीं त्यांचे पासून ज्ञान छपवून ठेवण्याचा प्रयत्न करण्यांत आपलें श्रेष्ठत्व कमी करून घेतल्यासारखें होत नाहीं काय?

उपसंहार थोडा लांबत चालला, तरी सर्वत्रास विशेषतः श्रेष्ठ म्हणवून घेणाऱ्या वर्णांतील सुजाण लोकांस, माझी पदर पसरून अशी मागणी आहे कीं, त्यांनीं श्रीसमर्थ रामदासांचा उदार अंतःकरणानें केलेला पुढील उपदेश ध्यानांत ठेवून तदनुसार समाजसेवा करण्यास अगदीं मागें सरूं नये. समर्थ म्हणतात: —

जितुकें कांहीं आपणास ठावें । तितकें हळूहळू शिकवावें ।
शाहणें करून सोडावें । बहुतजन ॥

परोपरी शिकविणें । आडणुका सांगत जाणें ।
निवळ करून सोडणें । निस्पृहासी ॥

होईल तें आपण करावें । न होता जनां करवावें ।
भगवद्भजन विणें राहणें । हा धर्म नव्हे ॥

आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें ।
आपण धरावें धरवावें । भजन मार्गासी ॥

या बोधपर उपदेशांत समजांत मनुष्यमात्रावर अन्योन्य प्रेम, आपलेपणा, अत्यंत औदार्य, उपकारबुद्धि, निस्पृहता, ओतप्रोत भरली असून यांतच ईश्वरोपासना आणि समाजसेवा सांगितली आहे. हा उपदेश बहुमोल आहे. त्याचें सार्थक वाचक करितील असा मला सद्यःस्थितीवरून भरंवसा वाटतो. तसें करण्याची बुद्धि अवश्यकास देणारा प्रभु अनंतकोटि-ब्रह्मांडनायक समर्थ आहे. त्या जगन्नायकापाशीं माझें मागणें:—

दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो ।
वांछिल तें तें लाहो । प्राणिजात ॥

—ज्ञानेश्वर.

इतकेंच मागून हा उपसंहार समर्पित आहे.

इति विद्या तपो योनिरयोनि विष्णुरीडितः ।
वाग्यज्ञेनार्चितो देवः प्रीयतां मे जनार्दनः ॥

Printed by M. K. Joshi at the Karnatak Printing Works, Dharwar.